शुक्रवार
८
ऑगस्ट २०२५

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : १५९
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

बातम्यांचा गतिमान पाठलाग
# अजिंक्य भारत



'आयसीसी'च्या पुरस्कारासाठी गिलला नामांकन (पान ७ वर)

## महत्त्वाचे

### शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर महामोर्चा - शशिकांत शिंदे



**नाशिक :** शेतकरी, कांदा उत्पादक, कामगार हे घटक अस्वस्थ असून, सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी पक्षाचे नेते शरद पवार यांच्या उपस्थितीत नाशिकमध्ये सरकारविरोधात महामोर्चा काढण्याची घोषणा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी केली. प्रदेशाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर शशिकांत शिंदे प्रथमच नाशिक शहरात आले होते. यावेळी त्यांच्या स्वागतासाठी दुचाकी रॅली काढण्यात आली. त्यानंतर झालेल्या सत्कार समारंभात शिंदे बोलत होते. राज्यातील सरकार हे उद्योगपतींना पायघड्या घालणारे असून, त्या माध्यमातून मुंबई गीळंकृत करण्याचा डाव आहे, असा आरोप त्यांनी केला.

### अवयवदानात महाराष्ट्र देशात अव्वल!



**मुंबई :** अवयवदानाच्या बाबतीत महाराष्ट्र देशात आघाडीवर असून, गेल्या वर्षी राज्यात १९८ ब्रेन-डेड दात्यांची नोंदणी झाली आहे. यामुळे महाराष्ट्र तेलंगणा, तामिळनाडू आणि कर्नाटक यांसारख्या राज्यांच्या पुढे आहे. मुंबई, पुणे आणि नागपूर येथील झोनल ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेशन सेंटर्सने ग्रीन कॉरिडॉरचा वापर करून अवयवांची जलद वाहतूक करून आणि प्रत्यारोपण गतीमान करून या यशात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. एका उल्लेखनीय उदाहरणात, मुंबईतील एका १६ वर्षीय मुलाला फेब्रुवारी २०२५ मध्ये ब्रेन-डेड घोषित केल्यानंतर, त्याचे अवयव चार वेगवेगळ्या रुग्णांना प्रत्यारोपित करण्यात आले. मुंबईत मोठ्या संख्येने लोक अवयव प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत आहेत, ज्यात ४,००० लोकांना किडनी आणि २,००० लोकांना लिव्हरची गरज आहे.

### भारतीय 'आकाशात' धोक्याची घंटा

**नवी दिल्ली :** भारतीय हवाई क्षेत्रात २०२५ हे वर्ष चिंताजनक ठरत असून, गेल्या सात महिन्यांत विमानांमधून मदतीसाठी ३ 'मे-डे' कॉल करण्यात आले आहेत, तर ६ वेळा विमानांचे इंजिन हवेत बंद पडल्याच्या घटना घडल्या आहेत. ही धक्कादायक माहिती केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी राज्यसभेत दिली. या घटनांमुळे हवाई प्रवासाच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. मोहोळ यांनी सांगितले की, जानेवारी ते जुलै २०२५ या कालावधीत एकूण ६ इंजिन शटडाऊन आणि ३ 'मे-डे' कॉलच्या घटनांची नोंद झाली आहे.

# महाराष्ट्रात ४० लाख संशयास्पद नावे; कर्नाटकातही घोटाळा!

## मतदार यादीतील हेराफेरी : राहुल गांधींचा आरोप

बेंगळुरू, दि. ७ वृत्तसंस्था

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी गुरुवारी मतदार यादीतील हेराफेरींवर तब्बल १ तास ११ मिनिटांचे २२ पानांचे सादरीकरण केले. निवडणूक आयोगाने भारतीय जनता पक्षासोबत मिळून महाराष्ट्रातील निवडणुकीत चोरी केल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. कर्नाटकातील मतदार यादी स्क्रीनवर दाखवत राहुल यांनी यादीत संशयास्पद मतदार असल्याचा दावा केला. महाराष्ट्रातील निकाल पाहिल्यानंतर आम्हाला खात्री झाली की निवडणुकीत चोरी झाली आहे. मशीन-वाचनीय मतदार यादी न दिल्यामुळे आमचा संशय बळावला की निवडणूक आयोगाने भाजपसोबत मिळून ही चोरी केली, असे राहुल यांनी सांगितले.



### महाराष्ट्रात ४० लाख संशयास्पद मतदार

■ राहुल यांनी महाराष्ट्रात काही महिन्यांत लाखो मतदारांचे नाव यादीत समाविष्ट केल्याचा दावा केला. ''महाराष्ट्रात ४० लाख मतदार रहस्यमयी आहेत. पाच महिन्यांत अनेक मतदार जोडले गेले. निवडणूक आयोगाने यादीच्या सत्यतेबाबत स्पष्टीकरण द्यावे. संध्याकाळी पाचनंतर मतदानाचा टक्का वाढणेही संशयास्पद आहे. याचे उत्तर निवडणूक आयोगाने द्यावे,'' असे राहुल म्हणाले. काँग्रेसने मतांच्या गडबडीबाबत प्रश्न उपस्थित केले, पण आयोगाने एकाही प्रश्नाचे उत्तर दिले नसल्याचा त्यांचा आरोप आहे.

कर्नाटकातील महादेवपुरा विधानसभा मतदारसंघातील मतदार यादी दाखवत राहुल यांनी सांगितले की, येथील ६.५ लाख मतांपैकी १ लाख मतांची चोरी झाली आहे. काँग्रेसच्या संशोधनात येथे चुकीचे पत्ते, एकाच पत्त्यावर मोठ्या संख्येने मतदार आणि डुप्लिकेट मतदार असल्याचे आढळले. कर्नाटकात आम्हाला १६ जागांवर विजय मिळाला असता, पण आम्ही फक्त ९ जागा जिंकलो. आम्ही हरलेल्या सात जागांपैकी बेंगळुरू सेंट्रल मतदारसंघाची तपासणी केली. या मतदारसंघात काँग्रेसला ६,२६,२०८ मते मिळाली, तर भाजपला ६,५८,९१५ मते मिळाली. दोन्ही पक्षांमधील मतांचा फरक फक्त ३२,७०७ होता. पण महादेवपुरा मतदारसंघात हा फरक १,१४,०४६ इतका होता. (पान २ वर)

# दादर कबुतरखाना वाद : उच्च न्यायालयाचा आदेश कायम!

मुंबई, दि. ७ वृत्तसंस्था

## तज्ज्ञ समिती नेमण्याचे निर्देश

दादरमधील कबुतरखाना बंद करण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर निर्माण झालेला वाद कायम आहे. कबुतरांना अन्न-पाणी देण्यावर बंदी घालणारा आदेश न्यायालयाने कायम ठेवला असून, यासंदर्भात सखोल अभ्यासासाठी तज्ज्ञ समिती नेमण्याचे निर्देश दिले आहेत.

नागरिकांचे आरोग्य सर्वोच्च प्राधान्य असल्याचे सांगत, न्यायालयाने बृहन्मुंबई महानगरपालिकेला (बीएमसी) आदेशांचे काटेकोर पालन सुनिश्चित करण्यास सांगितले. याचिकाकर्त्यांना खडे बोल सुनावत, न्यायालयाने असा अवमान करणाऱ्यांना सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचा पर्याय खुला असल्याचे स्पष्ट केले. दादर कबुतरखान्यावर बीएमसीने ताडपत्री टाकून बंदी लागू केली होती, परंतु जैन समाजाच्या काही सदस्यांनी ती फाडून कबुतरांना खाद्य टाकले. यामुळे बुधवारी आंदोलक आणि पोलिसांमध्ये





झटापट झाली. गुरुवारीही दादरमध्ये कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला.जैन आणि गुजराती समाजावर ताडपत्री फाडल्याचा आरोप आहे, तर पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी यात बाहेरील लोकांचा हात असल्याचे म्हटले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नियंत्रित खाद्याची परवानगी देण्याबाबत बैठक घेतली, तरी समाज आक्रमक आहे. शिवसेना आमदार मनीषा कायंदे यांनी कबुतरांमुळे होणारे आजार वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध असल्याचे सांगत धर्माशी याचा संबंध नसल्याचा मुद्दा उपस्थित केला.

# उधमपूरमध्ये जवानांची बस २०० फूट दरीत कोसळली; ३ सैनिकांचा मृत्यू



जम्मू, दि. ७ वृत्तसंस्था

जम्मू आणि काश्मीरमधील उधमपूरमध्ये सीआरपीएफच्या जवानांना घेवून जाणारी बस २०० फ ूट खोल दरीत कोसळल्याची दुर्घटना घटना घडली आहे. या अपघातात तीन सैनिकांचा मृत्यू झाला असून १५ जण जखमी झाले आहेत. जखमी सैनिकांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या १८७व्या बटालियनची बस उधमपूर जिल्ह्यातील कडवाहून बसंत गडला जात असताना आज सकाळी १०.१५ वाजता सुमारे २०० फूट खोल दरीत कोसळली. बसमध्ये एकूण २३ सैनिक प्रवास करत होते. यातील तीन सैनिकांचा (पान २ वर)

# धारलीमध्ये जीव वाचविण्याची लढाई सुरुच!

## आतापर्यंत २७४ जणांना वाचविण्यात यश

उत्तरकाशी, दि. ७ वृत्तसंस्था

उत्तराखंडमधील उत्तरकाशी जिल्ह्यातील दोन दिवसापूर्वी धराली गावात झालेल्या भयानक दुर्घटनेने संपूर्ण देशाला हादरवून टाकले आहे. दुपारी डोंगरावरून अचानक आलेल्या ढिगाऱ्याने आणि पाण्याने प्रचंड हाहाकार माजवला, अनेक घरे, दुकाने, बाजारपेठा उद्ध्वस्त झाल्या. आतापर्यंत या घटनेत ६ जणांचे मृतदेह सापडले आहेत, तर अनेक लोक अजूनही बेपत्ता आहेत. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता, लष्कर, एनडीआरएफ आणि एसडीआरएफच्या तुकड्या घटनास्थळी मदत आणि बचाव कार्यात गुंतल्या आहेत.

राज्याचे मुख्य सचिव आनंद बर्धन यांनी डेहराडून याठिकाणी राज्य आपत्कालीन ऑपरेशन सेंटरमधून



मदत कार्याचा आढावा घेतला. आपत्ती व्यवस्थापन सचिव विनोद कुमार सुमन यांनी मदत कार्य जलद करण्यासाठी लष्कराच्या एमआय-१७ आणि चिनूक हेलिकॉप्टरची मदत घेतली जात आहे अशी माहिती त्यांनी दिली. दरम्यान, मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी स्वतः घटनास्थळी उपस्थित आहेत आणि संपूर्ण ऑपरेशनवर लक्ष ठेवून आहेत. प्रशासनाकडून राबवण्यात येणाऱ्या मदत कार्यांतर्गत आतापर्यंत २७४ जणांना हर्षिल याठिकाणी सुरक्षितपणे आणण्यात आले आहे. यामध्ये गुजरातमधील १३१, महाराष्ट्रातील १२३, मध्य प्रदेशातील २१, उत्तर प्रदेशातील १२, राजस्थानातील ६, दिल्लीतील ७, आसाममधील ५, (पान २ वर)

# शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचा आजपासून बेमुदत संप

पुणे, दि. ७ वृत्तसंस्था

महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ संलग्न अखिल महाराष्ट्र शिक्षण सेवा राजपत्रित अधिकारी संघाच्या विविध मागण्यांबाबत राज्य शासनाकडून काहीच लेखी आश्वासन मिळाले नाही. त्यामुळे आता शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी शुक्रवार (दि.८) पासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे.

गेल्या तीन-चार महिन्यांपासून नागपूर विभागातील बोगस शालार्थ आयडी बाबतचे प्रकरण उफाळले आहे. या प्रकरणात काही अधिकारी व कर्मचारी यांना कोणतीही चौकशी न होता अटक होत असल्याच्या घटनेचा संघटनेच्या वतीने ३१ जुलै रोजी एक दिवसीय सामुहिक रजा आंदोलन करुन निषेध व्यक्त करण्यात आला आहे. अधिकाऱ्यांच्या कामात अनियमितता आढळल्यास महाराष्ट्र नागरी सेवा नियमाप्रमाणे शास्तीची तरतूद आहे. शिक्षण विभागाच्या परवानगीशिवाय विनाचौकशी अटकेपासून संरक्षणाची लेखी हमी शासनाकडून मिळावी, अशी मागणीही संघटनेने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शालेय शिक्षण मंत्री यांच्याकडे करण्यात आली होती. मात्र शासनाने या निवेदनावर काहीच उत्तर दिले नाही. संघटनेबरोबर साधी काहीच चर्चाही केली नाही. त्यामुळे शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांकडून संताप व्यक्त करण्यात येऊ लागला आहे. खरोखर ज्यांनी बोगस शालार्थ आयडी देण्याचा गुन्हा केला असेल त्यांच्यावर कायदेशीर कारवाई व्हावी अशी संघटनेची मागणी आहे. चोर सोडून संन्याश्याला फाशी या म्हणी प्रमाणे तपास (पान २ वर)

# आम्ही दोन्ही भाऊ सक्षम, तिसऱ्याची आवश्यकता नाही

## राज ठाकरेंबरोबरच्या युतीबाबत उद्धव ठाकरे यांचे वक्तव्य

नवी दिल्ली, दि. ७ वृत्तसंस्था

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे इंडिया आघाडीच्या बैठकीसाठी बुधवारीच राजधानी दिल्लीत दाखल झाले आहेत. दरम्यान, आज गुरुवारी सकाळी दिल्लीतील प्रेस कॉन्फरन्समध्ये उद्धव ठाकरेंनी विविध विषयांवर आपले मत व्यक्त केले. यावेळी बोलताना राज ठाकरेंसोबत युतीबाबतच्या प्रश्नावर उद्धव यांनी युतीचा निर्णय घ्यायला आम्ही दोन्ही भाऊ सक्षम आहोत, त्यासाठी तिसऱ्याची आवश्यकता नाही, अशा शब्दात आपले मत व्यक्त केले.

त्यांच्या या मतानंतर मुंबई महापालिका निवडणुकीसाठी शिवसेना आणि मनसे एकत्र येणार असल्याच्या शक्यतांना आणखी बळ मिळाले



आहे. उद्धव ठाकरे म्हणाले, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर एकतर्फी ५० टक्के टॅरिफ लादूनही पंतप्रधान मोदी गप्प का आहेत? ट्रम्प आपल्या देशाची थट्टा करत आहेत. मात्र तरीही त्यांना मोदी उत्तर देत नाहीत. देश कोण चालवत आहे? आपल्या देशाला सक्षम पंतप्रधान, गृहमंत्र्यांची गरज आहे. ते दोघेही मणिपूरला जात नाहीत. मात्र दोघेही प्रचाराला जातात. मोदी-शहा भाजपचे प्रचार मंत्री आहेत. त्यांच्याकडे खंबीर धोरण नाही. मोदींच्या आगामी चीन दौऱ्यावरही ठाकरेंनी टीका केली. गलवान संघर्षानंतर देशात चीनी वस्तूंवर बहिष्कार टाकला गेला. चीनविरोधाबाबत मोहिम उघडली गेली. आणि आत्ता त्याच चीनला मोदी भेट देत आहेत. चीन हा पाकिस्तानचा मित्र आहे. चीनचा दौरा हा मोदींच्या उद्योगपती मित्रांसाठी आहे का? असा सवाल ठाकरेंनी केला. मोदी सरकारला काही नितीमत्ता राहिलेली नाही. पाकिस्तान जो पर्यंत दहशतवाद थांबवत नाही तोपर्यंत पाकिस्तानसोबत सबंध नको. मग दुबईमध्ये जाऊन क्रिकेट पाहणं हीदेखील देशभक्ती नाही, असा टोलाही त्यांनी अमित शहा यांचे पुत्र आणि आयसीसीचे चेअरमन जय शहा यांना लगावला. मला राहुल गांधी यांचा फोन आला होता. त्यांनी बोलावलं होतं. आज संसदेच्या (पान २ वर)

# गडचिरोलीत भरधाव ट्रकने सहा मुलांना चिरडले; चौघांचा मृत्यू!

## काटली गावाजवळ पहाटेची घटना; संतप्त नागरिकांचा अवजड वाहतुकीविरोधात रोष

यवतमाळ, दि. ७ वृत्तसंस्था

गडचिरोली-आरमोरी मार्गावर गुरुवारी पहाटे 'मॉर्निंग वॉक'साठी गेलेल्या सहा शाळकरी मुलांना एका अज्ञात ट्रकने चिरडले. या भीषण अपघातात चार मुलांचा मृत्यू झाला असून, दोघे गंभीर जखमी आहेत. या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत असून, अवजड वाहतुकीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, काटली गावातील सहा मुले नेहमीप्रमाणे पहाटे फिरायला गेली होती. सकाळी ५ वाजून १० मिनिटांच्या सुमारास, गावापासून एक किलोमीटर अंतरावरील नाल्याजवळ ही मुले बसलेली असताना, एका भरधाव अवजड वाहनाने त्यांना चिरडले. या अपघातात टिंकू नामदेव



### प्रशासनाला अपघात रोखण्यात अपयश

■ गेल्या तीन वर्षांत, गडचिरोली जिल्ह्यात उद्योगधंद्यांसोबतच अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. आष्टी ते आरमोरी मार्गावर लोहखनिज आणि रेतीची वाहतूक करणाऱ्या भरधाव टिप्परवर कोणाचेही नियंत्रण नाही. यामुळे, प्रशासनाला अपघात रोखण्यात अपयश येत आहे. या मार्गावरून जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो, अशी संतप्त प्रतिक्रिया या अपघातानंतर गावकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

भोयर (१४) आणि तन्मय बालाजी मानकर (१६) यांचा जागीच मृत्यू झाला, तर दूषण दुर्योधन मेश्राम (१४) आणि तुषार राजेंद्र मारबते (१४) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. क्षितिज तुळशीदास मेश्राम आणि आदित्य धनंजय कोहपरे हे दोघे गंभीर जखमी असून, त्यांना नागपूरला हलविण्यात आले आहे. अपघातानंतर अंधाराचा फायदा घेत ट्रकचालक पसार झाला. घटनेची माहिती मिळताच, गडचिरोलीचे पोलिस निरीक्षक विनोद चव्हाण यांनी घटनास्थळी भेट देऊन तपास सुरू केला आहे.

**जखमींच्या मदतीसाठी धावले हेलिकॉप्टर :** अपघाताची माहिती मिळताच, लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड या कंपनीने सामाजिक दातृत्व दाखवत, जखमींना गडचिरोलीहून नागपूरला नेण्यासाठी आपले हेलिकॉप्टर तातडीने उपलब्ध करून दिले. (पान २ वर)

## वीर मातेचे निधन | शेतीच्या हक्कासाठी अजूनही संघर्ष सुरू!

# शहीद दुर्योधन शिरसाट यांचे कुटुंब आजही उपेक्षित

। विठ्ठल महल्ले ।

**अकोला, दि. ७ :** अकोट तालुक्यातील केळीवेळी या छोट्याशा गावात देशासाठी बलिदान दिलेल्या एका वीर शहीदाच्या कुटुंबाचे आजही शासनाकडून होणारे दुर्लक्ष संपलेले नाही. १९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धात शौर्याने लढत वीरगती प्राप्त केलेल्या शहीद जवान दुर्योधन झाबुजी शिरसाट यांच्या कुटुंबाला आजही शासनाच्या मोफत पाच एकर शेती योजनेचा लाभ मिळालेला नाही. एवढेच नव्हे, तर त्यांच्या सुशिक्षित नातवाला अनुकंपा तत्वावर सरकारी नोकरी सुद्धा मिळालेली नाही.

दुर्योधन शिरसाट यांचा जन्म १३ नोव्हेंबर १९४२ रोजी झाला. १३ नोव्हेंबर १९६२ रोजी त्यांनी सैन्य






दलात भरती होऊन महार रेजिमेंटमध्ये कर्तव्य बजावण्यास सुरुवात केली. १२ सप्टेंबर १९६५ रोजी पाकिस्तानने भारतावर अचानक हल्ला केल्यावर त्यांनी आपल्या बटालियनसोबत देशाच्या सीमांचे रक्षण करत वीरगती प्राप्त केली.

शहीद दुर्योधन यांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांना सुरुवातीस फक्त ₹ पेन्शन मिळत होती. काळानुसार ती रक्कम वाढून २२ हजारांपर्यंत पोहोचली होती. मात्र २०२३ मध्ये लक्ष्मीबाई यांचे निधन झाले आणि त्यानंतर पेन्शनही बंद करण्यात आली. एक संपूर्ण आयुष्य त्यांनी देशासाठी पती गमावून जगले, पण शेवटपर्यंत त्यांना सरकारच्या संपूर्ण योजनेचा अथवा मदतीचा लाभ मिळालेला नाही, ही अत्यंत दुःखद बाब आहे. शहीदांना आपण शब्दांनी गौरवतो, पण त्यांच्या कुटुंबांना न्याय देण्यात सरकार अपयशी ठरत असेल, तर तो गौरव केवळ औपचारिक ठरतो. अकोल्यातील (पान २ वर)

### शहीद पुत्राचा आक्रोश

■ ''देशसेवा करताना माझ्या वडिलांनी आपले प्राण दिले. आम्ही सरकारकडून आमच्या हक्काच्या शेतीसाठी सर्व कागदपत्रांसह सातत्याने मागणी केली, पण अजून काहीच मिळालेले नाही. मी स्वेच्छानिवृत्त झालो, माझा मुलगा सुशिक्षित असूनही त्याला नोकरी नाही. एकीकडे शेती नाही आणि दुसरीकडे मुलालाही सरकारी नोकरी नाही. शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे ही माझी मागणी आहे.''

- मिलिंद दुर्योधन शिरसाट, शहीद पुत्र

### अनुकंपावर नोकरी नाही, शेतीचाही लाभ नाही

■ शहीद दुर्योधन शिरसाट यांचे चिरंजीव मिलिंद शिरसाट रेल्वे खात्यात वायरमन म्हणून कार्यरत होते आणि २०२० मध्ये त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली. नियमानुसार अशा सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या मुलांना अनुकंपावर शासकीय नोकरी मिळते. मात्र त्यांचा ३० वर्षीय सुशिक्षित मुलगा विकास शिरसाट याला अद्यापपर्यंत अशी कोणतीही नोकरी मिळालेली नाही. विकासने शिक्षण घेतले असून सध्या कुटुंबाचा उदरनिर्वाह पारंपरिक २ एकर शेतीवर अवलंबून आहे.



## पान 1 वरून...

### महाराष्ट्रात ४० लाख संशयास्पद ...

यावरून १ लाखाहून अधिक मतांची चोरी झाल्याचे स्पष्ट होते, असे राहुल यांनी नमूद केले. ही चोरी पाच प्रकारे झाल्याचा त्यांचा दावा आहे. राहुल यांनी हरियाणातील काँग्रेसच्या पराभवाला मतदार यादीतील हेराफेरी जबाबदार असल्याचे सांगितले. निवडणूक आयोग मतदारांचा डेटा उपलब्ध करत नाही, त्यामुळे ही चोरी शक्य होत आहे, असे त्यांनी नमूद केले. पुरावे गोळा करण्यासाठी सहा महिने लागले आणि लाखो कागदपत्रांची तपासणी केल्याचे त्यांनी सांगितले. ही कागदपत्रे एकावर एक ठेवली तर त्याची उंची ७ फूट होईल. निवडणूक आयोगाने जाणीवपूर्वक मशीन-वाचनीय कागदपत्रे दिली नाहीत, जेणेकरून ती स्कॅन करता येऊ नयेत, असे राहुल यांचे म्हणणे आहे. कर्नाटकच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी राहुल गांधी यांना पत्र लिहून मतदार यादीच्या वैधतेवर प्रश्न उपस्थित करणाऱ्या व्यक्तीने लेखी तपशील द्यावा, असे सांगितले. नियम २०(३)(बी) अंतर्गत शपथपत्रासह संशयास्पद मतदारांची नावे द्यावीत, जेणेकरून तपासणी करता येईल आणि आवश्यकता भासल्यास कायदेशीर कारवाई करता येईल, असे आयोगाने म्हटले आहे. तसेच, निवडणूक आयोगाने राहुल यांच्या पत्रकार परिषदेचा व्हिडिओ दिशाभूल करणारा असल्याचे वर म्हटले आहे.

### उधमपूरमध्ये जवानांची बस ...

मृत्यू झाला असून १५ सैनिक जखमी झाले आहेत. सर्व जखमींना विमानाने उधमपूर येथील लष्करी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. एडीसी उधमपूर प्रेम सिंह यांनी अपघाताबद्दल दुःख व्यक्त केले आहे. त्यांनी सांगितले की, सकाळी अपघातानंतर एका तासाच्या आत सर्व जखमींना दरीतून बाहेर काढण्यात आले आहे. तसेच गंभीर जखमींना एअरलिफ्ट करण्याची प्रक्रिया सुरू आहे. हा अपघात कसा झाला याचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही, परंतु कच्चा रस्ता आणि खराब हवामान हे अपघाताचे कारण असू शकते. अपघातानंतर तातडीने मदत आणि बचाव कार्य राबवून स्थानिक लोकांनी जखमींना मदत करून महत्त्वाची आणि प्रशंसनीय भूमिका बजावली आहे.

### धारलीमध्ये जीव वाचवण्याची ...

कर्नाटकातील ५, तेलंगणातील ३ आणि पंजाबमधील १ यात्रेकरूचा समावेश आहे. या सर्वांना हर्षिलमध्ये सुरक्षित ठेवण्यात आले आहे आणि त्यांना उत्तरकाशी आणि देहराडूनला पाठवण्याची प्रक्रिया सुरू आहे. याशिवाय, आज एकूण १३५ जणांना यशस्वीरित्या वाचवण्यात आले आहे आणि हर्षिलमधून सुरक्षित ठिकाणी नेण्यात आले आहे. यापैकी १०० जणांना उत्तरकाशीला आणि ३५ जणांना देहराडूनला पाठवण्यात आले आहे. राज्य सरकार, जिल्हा प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन विभाग, आयटीबीपी, एनडीआरएफ आणि इतर एजन्सी या कठीण काळात मदत कार्य करण्यासाठी एकत्र काम करत आहेत. मुख्यमंत्री धामी सतत परिस्थितीचा आढावा घेत आहेत आणि अधिकाऱ्यांना बाधित लोकांना सर्वतोपरी मदत करण्याचे निर्देश देत आहेत. ही दुर्घटना राज्यासाठी एक मोठे आव्हान आहे, परंतु प्रशासनाच्या तत्परतेमुळे आणि बचाव संस्थांच्या समन्वित प्रयत्नांमुळे आतापर्यंत अनेकांचे जीव वाचले आहेत. बचाव कार्य अजूनही सुरू आहे आणि बेपत्ता लोकांचा शोध जोरात सुरू आहे.

### शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचा ...

यंत्रणा काम करत आहेत. प्रामाणिकपणे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना कायद्याने दिलेले संरक्षण नाकारून विनाचौकशी अटक झाल्याने शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांमध्ये दहशत व भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. चौकशीसाठी सहकार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांना विनाकारण अटक करू नये. शालार्थ प्रणालीत तांत्रिक छेडछाड किंवा लॉगिन आयडी व पासवर्ड वापरून गैरपध्दतीने कृत्य केलेले खरे गुन्हेगार लवकरात लवकर शोधून त्यांचेविरुध्द कठोर कायदेशीर कारवाई व्हावी, अशी मागणीही संघटनेने शासनाकडे केलेली आहे.

### आम्ही दोन्ही भाऊ सक्षम, ...

पक्षाच्या कार्यालयाला जात आहे. इंडिया आघाडीच्या बैठकीनंतर चर्चेबाबत बोलेन. उपराष्ट्रपतीपदासाठी मराठी उमेदवार दिला तर त्यावर तेव्हा ठरवू. एक मुद्दा आहे माजी उपराष्ट्रपती कुठं आहेत? ते कुठं आहेत माहिती नाही त्यामुळे माहिती असतं तर त्यांना भेटलो असतो. दहाव्या शेड्युल्ड नुसार शिवसेनेचा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. व्हीव्हीपॅट स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये वापरले जाणार नाही त्यामुळे माझं मत कुठे आहे ते कसं कळणार? असा सवालही त्यांनी केला.

### गडचिरोलीत भरधाव ट्रकने सहा ....

रुग्णवाहिकेने लागणारा वेळ पाहता, 'एअरलिफ्ट'चा निर्णय महत्त्वपूर्ण ठरला. कंपनीने अपघातग्रस्त मुलांच्या कुटुंबांना सर्वतोपरी मदत करण्यासाठीही धावपळ केली. दोन दिवसांपूर्वीच कंपनीने एका पोलिस कर्मचाऱ्यालाही अशीच मदत केली होती.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला शोक**

ही घटना अत्यंत दुर्दैवी आणि वेदनादायी असल्याचे मुख्यमंत्री तथा गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. त्यांनी मृत युवकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली असून त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी असल्याचे स्पष्ट केले आहे. मुख्यमंत्र्यांनी एक्स (ट्विटर) हॅण्डलवरून दिली. राज्य सरकारकडून अपघातात मृत्युमुखी पडलेल्या प्रत्येक युवकाच्या कुटुंबीयांना चार लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात येणार असून, जखमी झालेल्या युवकांच्या उपचाराचा सर्व खर्च राज्य सरकार उचलणार आहे, असेही त्यांनी जाहीर केले. या दुःखद घटनेमुळे गडचिरोली जिल्ह्यात शोककळा पसरली असून, जिल्हा प्रशासनाकडून सर्व आवश्यक मदत तातडीने पुरवली जात आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या अपघाताची गंभीर दखल घेतली असून, संबंधित यंत्रणांना तत्काळ मदत व उपचाराची कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

**शिक्षणमंत्र्यांनी घेतली घटनास्थळी भेट; कुटुंबीयांचे सांत्वन**

आरमोरी-गडचिरोली महामार्गावरील भीषण अपघातानंतर राज्याचे शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. त्यांनी जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा व आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांच्यासह मृत युवकांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. संतप्त गावकऱ्यांशी संवाद साधत त्यांनी शांततेचे आवाहन केले. शिक्षण विभागाच्या सानुग्रह अनुदान योजनेचा लाभ देण्याचे निर्देश दिले. जिल्हा परिषदेत मृतांना श्रद्धांजली वाहण्यात आली. अपघाताची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे आश्वासनही त्यांनी दिले.

### शहीद दुर्योधन शिरसाट ...

शिरसाट कुटुंबाला त्यांचा न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासनाने तत्काळ पुढाकार घ्यावा, अशी जनतेतूनही मागणी होत आहे.

**पाच एकर शेती पासून अजूनही वंचित**

देशासाठी बलिदान दिलेल्या शहीदाच्या कुटुंबाला पाच एकर मोफत शेतजमीन देण्याचा शासन नियम आहे. परंतु शिरसाट कुटुंबाने ११ प्रकारच्या परवानग्या प्राप्त करून तहसील कार्यालय आणि जिल्हाधिकारी कार्यालयात संबंधित सर्व कागदपत्रे सादर केली असतानाही, आजवर ही जमीन त्यांना मिळालेली नाही. त्यांच्या पाठपुराव्याला प्रशासनाकडून केवळ आश्वासने मिळाली, कृती मात्र अद्याप पर्यंत झाली नाही.

**सरकारकडून तत्काळ कारवाईची गरज**

ही केवळ एका कुटुंबाची कथा व व्यथा नाही, तर संपूर्ण व्यवस्थेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा विषय आहे. देशासाठी जीव गमावणाऱ्या जवानांच्या कुटुंबाला त्यांच्या हक्काचा न्याय देणं ही शासनाची नैतिक जबाबदारी आहे. अकोट तालुक्यातील शिरसाट कुटुंबाचा लढा हा केवळ त्यांच्या हक्कासाठी नाही, तर प्रत्येक शहीद कुटुंबाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न आहे.

## उत्तरकाशीतील दुर्घटनेवर अजित पवारांचे भाष्य

# प्रत्येकाला महाराष्ट्रात सुखरूप आणणे हीच प्राथमिकता

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**मुंबई, दि. ७ :** उत्तराखंड राज्यात उत्तरकाशी जिल्ह्यातील धराली परिसरात झालेल्या ढगफुटीच्या घटनेमुळे अडकलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी आणि त्यांना राज्यात सुखरूप परत आणण्यासाठी राज्य सरकार युद्धपातळीवर प्रयत्न करत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उत्तराखंड राज्याचे सचिव (वित्त) दिलीप जवळकर, पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था) निलेश भरणे यांच्याशी संपर्क साधून महाराष्ट्रातील पर्यटकांना तातडीने आवश्यक ती मदत पुरवण्याची विनंती केली आहे. प्रत्येक पर्यटकाला सुरक्षितपणे घरी परत आणणे आणि त्यांच्या कुटुंबांना दिलासा देणे हीच प्राथमिकता आहे. उत्तराखंडमध्ये अडकलेल्या पर्यटक, भाविकांच्या नातेवाईकांनी घाबरून जाऊ नये, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे.

अडकलेल्या पर्यटकांमध्ये नांदेड जिल्ह्यातील ११ आणि इतर जिल्ह्यातील ४० अशा एकूण ५१ पर्यटकांचा समावेश आहे. त्यांना आवश्यक ती मदत करण्यासाठी राज्य शासन तत्पर असून पर्यटकांशी सतत संपर्क साधत आहे. उत्तराखंडच्या प्रशासनाशी सुद्धा राज्य शासन सातत्याने संपर्कात असून अडकलेल्या पर्यटकांना सुरक्षित स्थळी हलविण्यासाठी व त्यांना महाराष्ट्रात लवकरात लवकर परत आणण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली यांच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत. आवश्यकतेनुसार राज्यातील जिल्हा प्रशासनाला सूचनाही देण्यात आल्या आहेत,अशी माहितीही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

उत्तरकाशीमध्ये पुण्यातील मंचर भागात राहणारे सुमारे २४ नागरिक अडकल्याची माहिती समोर आली आहे. गेल्या २४ तासांपासून त्यांच्याशी कोणताही संपर्क झाला नसल्याची माहिती त्यांच्या कुटुंबियांकडून देण्यात आली आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी ट्विट करत यासंदर्भात माहिती दिली आहे. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांच्या टॅग करत या पर्यटकांचा शोध घेण्याचे आणि त्यांना मदत करण्याचे आवाहन केले आहे. तसेच, त्यांनी यातील काही पर्यटकांची नावे आणि त्यांचे संपर्क क्रमांकही दिले आहेत.उत्तराखंड राज्यातील उत्तरकाशीतील धराली येथे मंगळवारी (५ ऑगस्ट) झालेल्या ढगफुटीमुळे संपूर्ण उत्तराखंडमध्ये पुन्हा भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. खीर गंगा नदीला अचानक आलेल्या महापुरामुळे संपूर्ण गाव पाण्याखाली गेले. या आपत्तीत आतापर्यंत चार जणांचा मृत्यू झाला असून ५० हून अधिक लोक बेपत्ता असल्याची माहिती समोर आली आहे.

## मुंबई गोवा महामार्ग, पनवेल ते इंदापूर प्रवास डिसेंबरपासून अतिजलद



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मुंबई, दि. ७ :** मुंबई-गोवा महामार्ग चौपदरीकरण प्रकल्पातील पनवेल ते इंदापूर अशा ८४ किमीच्या महामार्गाचे काम सध्या वेगात सुरु आहे. आतापर्यंत ८४ किमीपैकी ८० किमीच्या महामार्गाचे काम पूर्ण झाले असून उर्वरित चार किमीच्या महामार्गाचे काम डिसेंबरपर्यंत पूर्ण करून हा टप्पा वाहतूक सेवेत दाखल करण्याचे भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे (एनएचएआय) नियोजन आहे. त्यामुळे हा टप्पा डिसेंबरपासून वाहतुकीसाठी खुला झाल्यास पनवेल ते इंदापूर प्रवास सुकर आणि अतिजलद होण्यास मदत होणार आहे. मुंबई, कोकण ते गोवा प्रवास सुकर आणि अतिजलद करण्यासाठी दोन पदरी मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरण करण्याचा निर्णय घेत २०११ मध्ये या कामास सुरुवात झाली. कामास सुरुवात होऊन १५ वर्षे झाली तरी हे काम पूर्ण झालेले नाही. या कामाच्या पूर्णत्वासाठी सातत्याने नवनवीन तारखा दिल्या जात असल्याने कोकणवासीयांमध्ये प्रचंड नाराजी आहे. हा महामार्ग केव्हा पूर्ण होणार याची प्रतीक्षा त्यांना आहे. अशात आता हे काम डिसेंबरपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश सरकारने संबंधित यंत्रणांना दिले आहेत. त्यानुसार या महामार्गाच्या कामातील पनवेल ते इंदापूर असा ८४ किमीचा टप्पा ज्या एनएचएआयकडे आहे त्यांनी या टप्प्याच्या कामाला वेग दिल्याची माहिती एनएचएआयमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

## बीडमध्ये पंकजा मुंडेंना धक्का; कट्टर समर्थक सोडणार भाजपची साथ

### पिता-पुत्रांचा अजित पवार गटात प्रवेश

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**बीड, दि. ७ :** बीड जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात सध्या भाजप नेत्या पंकजा मुंडे यांच्या कट्टर समर्थकांच्या पक्षप्रवेशाची जोरदार चर्चा रंगली आहे. पंकजा मुंडे यांच्यासोबत सावलीप्रमाणे उभे राहिलेले राजाभाऊ मुंडे आणि त्यांचा मुलगा बाबरी मुंडे यांनी भाजपला रामराम केला आहे. हे पिता-पुत्र आता बीड जिल्ह्याच्या वडवणी येथे आयोजित मेळाव्यात आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रवादीत पक्षप्रवेश करणार आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर असताना हा एक पंकजा मुंडे यांच्यासाठी मोठा धक्का मानला जात आहे. महायुती असताना अजित दादांच्या राष्ट्रवादीचे घड्याळ बांधण्याचा निर्णय का घेतला यावर राजाभाऊ मुंडेंनी प्रतिक्रिया दिली आहे. । राजाभाऊ मुंडे म्हणाले की, 'बीड जिल्ह्याचा विकास खुंटत जात आहे आणि या जिल्ह्यावर आता अजित पवार यांनी लक्ष घातले आहे म्हणून आम्ही भाजप सोडून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्या सोबत जात आहे. मला पंकजा मुंडेंबद्दल काही बोलायचे नाही. मी त्यांची साथ सोडून दुसरीकडे जात आहे म्हणून साधा त्यांनी मला फोन देखील केला नाही. आमदार प्रकाश सोळंके हे आमच्या माजलगाव मतदार संघाचे आमदार आहेत आणि त्यांच्या नेतृत्वामध्ये आम्ही जाहीर प्रवेश करत आहोत.'

पक्षवाढीसाठी पक्षासाठी एकनिष्ठेने काम केले. पण पक्ष आणि नेत्यांकडून स्थानिक कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष झाले. न्याय मिळत नसेल, तर अशा पक्षात राहण्यात अर्थ नाही, अशी खदखद बाबरी मुंडे यांनी बोलून दाखवली.

सायंकाळी पाच वाजता होणाऱ्या या मेळाव्याची जय्यत तयारी सुरू आहे. वडवणी शहरात अजित पवार यांच्या स्वागताचे बॅनर लावण्यात आले आहे. मात्र या लावलेल्या बॅनरवर मात्र माजी मंत्री धनंजय मुंडे यांचा फोटो लावण्यात आला नाही. त्याबाबतही राजाभाऊ मुंडे स्पष्टीकरण दिले आहे. जर बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे असते तर आम्ही त्यांचा ही फोटो या बॅनरवर लावला असता, अशी प्रतिक्रिया यावेळी राजाभाऊ मुंडे यांनी बोलताना दिली. राजाभाऊ मुंडे दिवंगत गोपीनाथ मुंडे यांचे जवळचे सहकारी मानले जातात.

## ग्रामदक्षता समितीने वृक्ष लागवडीची केली पाहणी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**अकोला , दि. ७ :** ग्रामपंचायत वडद बुद्रुक येथील गट नंबर १० मधील ई क्लास जमिनी वरील व वडद बुद्रुक ते कौलखेड गोमासे या रस्त्याच्या दुतर्फा केलेल्या वृक्षारोपण चे ग्रामस्तरीय देखरेख व दक्षता समितीकडून वृक्षांची स्थळ पाहणी करून वृक्षाची मोजणी करण्यात आली आली त्यावेळी ग्रामस्थ या समितीचे अध्यक्ष गोवर्धन जाधव सचिव शितल मेंडे अंगणवाडी सेविका सुशीला चोर पगार नरेगा मजूर आकाराम ओके प्राथमिक शिक्षक सरपंच वनमाला इंगळे ग्रामसेवक गणेश शिरसाट रोजगार सेवक श्रीकांत नंदाने ग्रामपंचायत कर्मचारी निलेश मेंढे व आदी मजूर वर्ग हजर होते.

## रायगडच्या पालकमंत्री पदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार?

**मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. अमित शाहांच्या भेटीनंतर शिंदेंनी सहकुटुंब पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट घेतली. यावेळी महायुतीमधील विविध मुद्द्यांवर एकनाथ शिंदेंनी अमित शाह यांच्यासोबत चर्चा केल्याचं सांगितलं जात आहे. दुसरीकडे, रायगड आणि नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदावरून शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात रस्सीखेच सुरू आहे.समोर आलेल्या माहितीनुसार, रायगडच्या पालकमंत्री पदाबाबत एकनाथ शिंदे यांना राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या मुख्य नेत्यांनी बसून प्रश्न सोडवण्याच्या सूचना अमित शाह यांनी दिल्या. शाह यांच्या या सूचनेनंतर सुनील तटकरे आणि एकनाथ शिंदे यांच्यातली दिल्लीत बैठक झाली. दोन्ही नेत्यांनी जवळपास ४० मिनिटे चर्चा केली.

## टीबी, मलेरिया आणि टायफॉईडविरोधात स्वदेशी लसीसाठी आयसीएमआरकडून निर्णायक पावले!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**मुंबई, दि. ७ :** भारतातील संसर्गजन्य रोगांवरील नियंत्रणासाठी आता नव्या युगाची सुरुवात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद (आयसीएमआर) कडून टीबी (क्षयरोग), मलेरिया आणि टायफॉईडसाठी स्वदेशी लसींच्या विकासावर मोठ्या प्रमाणावर काम सुरू असून, या लसी लवकरच प्रत्यक्ष वापरासाठी उपलब्ध होणार असल्याची माहिती समोर आली आहे. या लसीमुळे देशातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत मोठा बदल घडवण्याची शक्यता असून, यामुळे लाखो नागरिकांचे प्राण वाचू शकतील.

दरवर्षी भारतात लाखो नागरिकांना मलेरियाचा संसर्ग होतो. टायफॉईडमुळेही अनेक रुग्णांना रुग्णालयात दाखल करावे लागते. तर टीबीसारखा दीर्घकालीन आजार अजूनही भारतासाठी मोठी सार्वजनिक आरोग्याची समस्या आहे. २०२३ मध्ये भारतात तब्बल २४ लाखांहून अधिक टीबी रुग्णांची नोंद झाली तर तीन लाखाहून अधिक लोकांचा मृत्यू झाला. टायफॉईडचे रुग्ण ४० लाखांच्या आसपास आहेत. मलेरियाचेही लाखो रुग्ण देशात सापडत असतात. अशा परिस्थितीत या आजारांवर स्वदेशी लसींचा विकास ही मोठी सकारात्मक घडामोड ठरते.

आयसीएमआरकडून तीन वेगवेगळ्या टीबी लसींची प्रगती अंतिम टप्प्यात असून, पहिली म्हणजे 'रिकॉम्बिनंट बीसीजी एचपीव्ही लसीबाबतही आयसीएमआरने एक महत्त्वाचे पाऊल उचलले असून, त्यांनी भारतातील पहिल्या स्वदेशी एचपीव्ही लसीची चाचणी सुरू केली आहे. ही चाचणी सध्या आयात केलेल्या एचपीव्ही लशींच्या तुलनेत सुरू असून, दोन्ही लसी लवकरच मोठ्या प्रमाणावर वापरासाठी आणल्या जाण्याची शक्यता आहे. एचपीव्ही म्हणजेच ह्युमन पॅपिलोमा व्हायरस हा गर्भाशयाच्या कर्करोगाचा मुख्य कारणीभूत घटक आहे. देशात दरवर्षी सुमारे ७०,००० महिलांचा मृत्यू गर्भाशयाच्या कर्करोगामुळे (सर्व्हायकल कॅन्सर) होतो.

व्हॅक्सिन' ही पारंपरिक बीसीजी लसीपेक्षा अधिक प्रतिकारशक्ती निर्माण करणारी आहे.

**सोहळा** लायन्स क्लब ऑफ अकोला मिडटाऊनचे पदग्रहण

# लायन्सचे कार्य प्रशंसनीय-अर्चित चांडक

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ७ :** लायन्स क्लब ऑफ अकोला मिडटाऊन चा पदग्रहण सोहळा ३५० मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.या पदग्रहण मध्ये प्रमुख पाहुणे म्हणून डिस्ट्रिक्ट ३२३४ एच २ चे प्रांतपाल अश्विनकुमार बाजोरिया, सत्कारमूर्ती अकोला जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक अर्चित चांडक होते. माजी महापौर विजय अग्रवाल, शपथविधी अधिकारी रमाकांत खेतान, इंडक्शन ऑफिसर डॉ कैलाश मुरारका, विश्व सिंधी सेवा संगमचे राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रकाश आनंदानी, महाराष्ट्राचे झोन २चे अध्यक्ष डेटाराम मनोजा, झोन चेअरमन सुनील जेसवानी,शशी मुरारका, अध्यक्ष महेश संतानी उपस्थित होते.प्रारंभ अध्यक्ष महेश संतानी यांनी केला. सत्कारमूर्ती यांचा जीवन परिचय डॉ हेमंत जोशी यांनी दिला. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांचा सत्कार लायन्स क्लब अकोला मिडटाऊनचे संस्थापक अध्यक्ष तसेच प्रसिद्ध समाजसेवी भारत भूषण सुभाष चांडक यांनी केला.अर्चित चांडक यांनी सांगितले की, नागपूरच्या आपला परिवार सुद्धा लायन्स क्लब ऑफ गोंडवानाशी जुळलेला आहे. म्हणून मला लायन्सच्या प्रकल्पाची माहिती आहे.अकोला लायन्स पदाधिकाऱ्यांनी पोलीस विभागासोबत संयुक्त सामाजिक उपक्रम राबविण्याचे आवाहन केले.मुख्य अतिथी अश्विनकुमार बाजोरिया यांनी अकोल्यामध्ये लायन्सचे दोन प्रकल्प आणू असे सांगितले.

डॉ कैलास मुरारका यांनी नवीन सदस्यांना शपथ दिली. त्यामध्ये गोपाल आखरे,वर्षा अग्रवाल,रत्नमाला कापडे,छाया अग्रवाल, ईशा अली खान,योगेश अग्रवाल, विलास विसपुते,असलम गाझी,सुरेश बुंदेले,ग ज्योत्स्ना फलारी, संजय राऊत, नंदकिशोर काळे, श्रीनिधी अग्रवाल,सोनल मानकर,प्रवीण मानकर समावेश आहे. रमाकांत खेतान यांनी पदाधिकाऱ्यांना आपापल्या पदाची जबाबदारी दिली

महेश संतानी यांनी लायन्सचे गॅवल अग्रवाल याना दिले.यावेळी डॉ अग्रवाल यांनी कु तृप्ती शंकर शर्मा हिला उच्च शिक्षणासाठी पोलीस अधिक्षक अर्चित चांडक यांच्या हस्ते ५१ हजाराचा धनादेश दिला व आपण वार्षी सामूहिक विवाह, कर्करोग, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, वृक्षारोपण, गरजूना कपडे,विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके असे लोकोपयोगी उपक्रम राबविणार असल्याचे सांगितले. डॉ मनोज अग्रवाल यांच्या कार्यकारिणीत सचिव प्रशांत फलारी, कोषाध्यक्ष अमित अग्रवाल, आयपीपी महेश संतानी, उपाध्यक्ष राहुल सावजी, शामसुंदर साधवानी, संतोष कळमशेते, सहसचिव विजय मीराणी,सह कोषाध्यक्ष राजेश डाहे,टेमर रतन लालवानी,टेल ट्युस्टर अशोक राठी, पीआरओ घनश्याम जोशी, डायरेक्टर सुभाष चांडक, विजयकुमार तोष्णीवाल, प्रकाश आनंदानी, नरेश अग्रवाल, महेश मनवानी, रोमिल मेहता,दयाराम रोहडा, सुनील जेसवानी, महेश सुखरामाणी, गिरीश नानोटी, योगेश अग्रवाल, प्रमोद चांडक,निर्मल आयदासानी, रवींद्रसिंह ओबेरॉय, किशोर कापडे, डॉ हेमंत जोशी, राजू पनीकर, नंद आलिमचंदानी, संतोष वाधवानी, सुहास जैन, सुनील हातेकर यांचा समावेश करण्यात आला. ११या सोहळ्याचे संचालन निशाली पंचगम यांनी व आभार सुभाष चांडक यांनी मानले. या कार्यक्रमात डॉ राजीव बियाणी,डॉ आशीष डेहनकर, हेमंत शाह, पुरुषोत्तम मालानी,डॉ उमेश अग्रवाल, डॉ सुनीता अग्रवाल,डॉ के के अग्रवाल,अरविंद सोनालावाला, अशोक सोनालावाला, सत्यपाल बाशाणी, राहुल अग्रवाल,जयप्रकाश चांडक, दिलीप चौधरी, गौरव अग्रवाल,मनोहर विरवाणी, घनश्याम भैया,अशोक झवर,पुरुषोत्तम अग्रवाल, अँड गोपाल अग्रवाल, मयूर बट्टू,रवी चांडक, सुहास शेळके, कमल शर्मा, डॉ एन के माहेश्वरी, हरिष खेतान,गोपाल झुनझुनवाला, किशोर घोटे, चंपालाल जाजू,डॉ तारा माहेश्वरी,बजरंग तातीया, विजयकुमार देशमुख,अशोक कावरा, गणेश खुमकर, दीपक चौधरी, गणेश चौधरी,राजेश डोंगरकर,प्रमोद चांडक, कमलकिशोर अग्रवाल, पंकज कोठारी, विलास शेळके,विनायक भोंगे, प्रभाकर भिसे, सुनिता अग्रवाल, लक्ष्मीकांत अग्रवाल,गौरव अग्रवाल, राहुल अग्रवाल, संगीता अग्रवाल मोहिनी अग्रवाल चंचल अग्रवाल आशिष अग्रवाल, माही अग्रवाल, चारू कापडे, गिरधर कापडे, सागर महाजन, दर्शन शहा,रितेश गोयनका, धीरज गावंडे,पराग शाह,विशाल शाह,वंदना अग्रवाल, साक्षी बशाणी,वंदन गोयनका,मधुकरराव फुलारी, रोहित घनमोडे. उमेश पिंजरकर. बाळू सरकटे, प्रमोद खंडारे, शेषराव फुलारी, प्रफुल फलारी,शिवाजी भगोरा, बाळू काळे, रवींद्र अग्रवाल, नेहा अग्रवाल, राणी अग्रवाल, मनोज चांडक आदी उपस्थित होते.




अकोला: डॉ मनोज अग्रवाल यांनी तृप्ती शंकर शर्मा हिला उच्च शिक्षणासाठी पोलीस अधिक्षक अर्चित चांडक यांच्या हस्ते ५१ हजाराचा धनादेश दिला. यावेळी उपस्थित सुभाष चांडक व इतर मान्यवर.

## महत्त्वाचे

### १४.५ कोटींचा हायड्रोपोनिक गांजा जप्त




**मुंबई:** छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमा शुल्क विभागाने केलेल्या कारवाईत १४ कोटी ५० लाख रुपयांच्या हायड्रोपोनिक गांजासह एका प्रवाशाला अटक केली. आरोपीने मोठ्या हुशारीने त्याच्या ट्रॉलीबॅगमधील कपड्यांमध्ये गांजा लपवलेला होता.

सीमा शुल्क विभागाने गुरुवारी दिलेल्या माहितीनुसार, बँकॉकहून विमानाने आलेल्या एका प्रवाशाला संशयावरून ताब्यात घेण्यात आले. त्याच्या बॅगच्या तपासणीत १४ किलो ५४८ ग्रॅम वजनाचा हिरव्या रंगाचा पदार्थ मिळाला, तो हायड्रोपोनिक गांजा (मारिजुआना) असल्याचा संशय होता. या अमली पदार्थाचा नमुना चाचणी कीटमध्ये तपासण्यात आला आणि तो हायड्रोपोनिक गांजा असल्याचे स्पष्ट झाले.

### किन्नौर कैलास यात्रा तात्पुरती स्थगित



**शिमला :** हिमाचल प्रदेशात झालेल्या मुसळधार पावसामुळे किन्नौर कैलास यात्रा तात्पुरती पुढे ढकलण्यात आली आहे. यात्रा मार्गावर अडकलेल्या ४१३ भाविकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले आहे. पावसामुळे टांगलिप्पी आणि कांगरांग येथील दोन तात्पुरते पूल वाहून गेल्यामुळे भाविक अडकल्याचे बुधवारी अधिकाऱ्यांनी सांगितले. किन्नौर जिल्हा प्रशासनाला अडकलेल्या भाविकांची माहिती मिळताच आयटीबीपी आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या (एनडीआरएफ) पथकांनी बचावकार्य सुरू केले. आयटीबीपीने 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर मदतकार्याचे व्हिडिओ शेअर केले आहेत. यामध्ये भाविक झिपलाइनच्या मदतीने नाले ओलांडताना दिसत आहेत.

### ज्योतिर्लिंग विकास आराखडा अंमलबजावणीसाठी सचिव



**मुंबई :** राज्यातील पाच ज्योतिर्लिंगाच्या विकास आराखड्यांची प्रभावी आणि वेगाने अंमलबजावणी व्हावी, यासाठी प्रथमच पाच सचिवांची नियुक्ती करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. राज्यातील पाच ज्योतिर्लिंगांचा विकास करण्यासाठी आराखडे तयार करण्यात आले आहेत. या आराखड्यांची अंमलबजावणी वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने व्हावी याकरिता या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भीमाशंकर (जि.पुणे) ज्योतिर्लिंग विकास आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे श्री. क्षेत्र घृष्णेश्वर (जि. छत्रपती संभाजीनगर)ची जबाबदारी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी यांच्याकडे तर त्र्यंबकेश्वर (जि. नाशिक)ची जबाबदारी वित्त विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय यांच्याकडे देण्यात आली आहे.

## डोनाल्ड ट्रम्पचे नाव न घेता टॅरिफवर पंतप्रधानांचे थेट उत्तर

# शेतकऱ्यांच्या हितासाठी भारत मोठी किंमत मोजण्यास तयार

**नवी दिल्ली : दि.७ वृत्तसंस्था**

अमेरिकेने भारतावर लादलेल्या टॅरिफवरून दोन्ही देशांमध्ये सध्या वितुष्ट आल्याचे दिसत आहे. ट्रम्पच्या २५ %टॅरीफची आजपासून अंमलबजावणी सुरु झाली आहे. तर अतिरिक्त २५ % टॅरिफ हा २७ तारखेपासून लागू करण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यातच आता अमेरिकेने लागू केलेल्या या टॅरिफवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे.

नवी दिल्ली येथे एम.एस. स्वामीनाथन शताब्दी आंतरराष्ट्रीय परिषदेला संबोधित करताना मोदी म्हणाले की, सरकार शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी आणि शेतीवरील खर्च कमी करण्यासाठी सतत काम करत आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे नाव न घेता



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज अमेरिकेला सडेतोड उत्तर दिले आहे. त्यांनी देशातील शेतकऱ्यांच्या बाजूने एक मोठे विधान केले आहे. याविषयी त्यांनी,''शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करणे ही आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे'' असे म्हटले आहे. भारत शेतकरी, मच्छीमार आणि दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताशी कधीही तडजोड करणार नाही. असे सांगत याची मोठी किंमत मोजावी लागेल हेआपल्याला माहित आहे आणि आपण त्यासाठी तयार आहेत''असे म्हटले.

### शेतकऱ्यांपेक्षा महत्त्वाचे काहीही नाही

**पंतप्रधान मोदी म्हणाले की, देशात सोयाबीन, मोहरी आणि शेंगदाण्याचे उत्पादन विक्रमी पातळीवर वाढले आहे. त्यांनी जोर देऊन सांगितले की, ''आमच्यासाठी शेतकऱ्यांचे हित हे सर्वोच्च प्राधान्य आहे. भारत कधीही आपल्या शेतकरी, पशुपालक आणि मच्छीमार बंधू-भगिनींच्या हिताशी तडजोड करणार नाही आणि मला माहित आहे की मला वैयक्तिकरित्या याची मोठी किंमत मोजावी लागेल पण मी त्यासाठी तयार आहे. आज भारत माझ्या देशातील शेतकऱ्यांसाठी, माझ्या देशातील मच्छीमारांसाठी, माझ्या देशातील पशुपालकांसाठी तयार आहे.''**

## कारोल नॉवरॉकी यांनी घेतली पोलंडच्या अध्यक्षपदाची शपथ

**वॉरसॉ, (पोलंड) : दि.७ वृत्तसंस्था**



पुराणमतवादी इतिहासकार आणि ट्रम्प यांच्या मेक अमेरिका ग्रेट अगेन चळवळीचे पुरस्कर्ते कारोल नॉवरॉकी यांनी आज पोलंडच्या अध्यक्षपदाची शपथ घेतली. यामुळे पोलंड आणि युक्रेन यांच्यात आतापर्यंत असलेले सौहार्दाच्या संबंधांमध्ये तणाव निर्माण होण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादी विरोधी पक्ष लॉ अँड जस्टिसने नॉवरॉकी यांना अध्यक्षपदाच्या निवडणुकीमध्ये पाठिंबा दिला होता.

नॉवरॉकी यांच्या निवडणुकीतील विजयामुळे पंतप्रधान डोनाल्ड टस्क यांच्या युरोपीय संघाच्या समर्थनाला बळकटी देण्याच्या आशेला धक्का बसला आणि त्यांच्या सरकारला निवडणुकीत अडचणी आल्या. तसेच ते कर कपातीसारख्या उपाययोजना प्रस्तावित करण्याची शक्यता आहे. त्यामुळे सरकारची डोकेदुखी आणखी वाढू शकते. निवडणुकीतील प्रचंड गोंधळानंतर नॉवरोकी विजयी झाले.त्या निवडणुकीच्या प्रचारात त्यांच्या भूतकाळाबद्दलचे आरोप केले गेले होते. त्यात त्यांनी एका वृद्ध माणसाकडून दुसरी मालमत्ता मिळवल्याचा आरोपाचा समावेश होता. मालमत्तेच्या बदल्यात त्यांनी या वृद्ध व्यक्तीची काळजी घेण्याचे आश्वासन दिले होते,

## डोनाल्ड ट्रम्प यांनी वाढविले टॅरिफ, नेहा सिंग राठोडने मागितला मोदींचा राजीनामा



**नवी दिल्ली : दि.७ वृत्तसंस्था**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के अतिरिक्त टॅरिफ लागू केलं आहे. आयात शुल्क त्यामुळे आता ५० टक्के झालं आहे. ज्याचा फटका भारतातल्या विविध क्षेत्रांना बसणार आहे. दरम्यान सोशल मीडियावर प्रसिद्ध असलेली गायिका नेहा सिंग राठोडने या प्रकरणाबाबत भाष्य करत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आता राजीनामा दिला पाहिजे अशी मागणी केली आहे.

नेहा सिंग राठोडने एका मागोमाग एक पोस्ट करत डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या देशावर कसं ५० टक्के टॅरिफ लादलं असा प्रश्न विचारला आहे. नरेंद्र मोदी हे देशाचे कमकुवत पंतप्रधान आहेत. डोनाल्ड ट्रम्प हे मोदींना आव्हान देत आहेत त्यांनी नरेंद्र मोदींची ती नस दाबली आहे ज्याला अदाणी असं म्हणतात असं म्हणतात. पुढे आपल्या ट्वीटमध्ये नेहा म्हणते पंतप्रधान नरेंद्र मोदींनी राजीनामा द्यावा. तर त्यापुढे केलेल्या पोस्टमध्ये नेहा म्हणते देश झुकाने आए थे, नाक कटा कर जाएंगे. शिवाय डोनाल्ड ट्रम्प, टॅरिफ, नरेंद्र मोदी यांचे हॅशटॅगही नेहाने पोस्ट केले आहेत. नेहाच्या या पोस्टवर नेटकऱ्यांनीही विविध कमेंट केल्या आहेत.

नेहा सिंह राठोडच्या पोस्टनंतर तिला ट्रोल केलं जातं आहे. अभिषेक नावाचा युजर म्हणतो काँग्रेसने तुझी कोणती नस दाबली आहे? तुझा अजेंडा काँग्रेसच्या बाजूनेच कसा असतो? अर्शित नावाचा युजर म्हणतो डोनाल्ड ट्रम्प फक्त टॅरिफ वाढवत नाहीयेत. तर आपल्या आत्मसन्मानाला आव्हान देत आहेत. मोदी आणि अदाणी यांचे व्यावसायिक हितसंबंध आहेत ट्रम्प यांनी त्याच व्यावसायिक हितसंबंधांना लक्ष्य केलं आहे ज्यामुळे आपल्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होतो आहे असंही या युजरने म्हटलं आहे.अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के अतिरिक्त टॅरिफ लादण्याची घोषणा केली आहे.

## श्रीलंकेचे माजी मंत्री शशींद्र राजपक्षे यांना अटक



**कोलंबो :दि.७ वृत्तसंस्था**

श्रीलंकेचे माजी राज्यमंत्री शशींद्र राजपक्षे यांना आज सकाळी लाचखोरी किंवा भ्रष्टाचाराच्या आरोपांच्या चौकशी आयोगाने कोलंबो येथील त्यांच्या निवासस्थानी अटक केली. दिनांक ९ मे २०२२ रोजी झालेल्या देशव्यापी निदर्शनांमध्ये नुकसान झालेल्या इमारतीच्या वादग्रस्त भरपाई दाव्याशी हे प्रकरण संबंधित आहे. श्रीलंका महावेली प्राधिकरणाने व्यवस्थापित केलेल्या सरकारी जमिनीवर असलेली ही मालमत्ता बेकायदेशीरपणे बांधली गेली होती असे म्हटले जाते. सुरुवातीला जमीन राज्याची असल्याची पुष्टी केल्यानंतर भरपाई नाकारण्यात आली होती. तथापि, राजपक्षे यांच्यावर त्यांच्या अधिकृत पदाचा वापर करून नुकसान मूल्यांकन अधिकाऱ्यांवर फसवणूकीने भरपाई देण्यासाठी दबाव आणल्याचा आरोप आहे.

## मी वाघीण आहे, मला जखमी करण्याचा प्रयत्न करू नका

## ममता बॅनर्जींचा भाजपला थेट इशारा

**नवी दिल्ली : दि.७ वृत्तसंस्था**



पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी पुढच्या वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीपूर्वी भारतीय जनता पक्षाला (भाजप) आव्हान दिले आहे. याविषयी बोलताना त्यांनी, ''तुम्ही मला तोपर्यंत हरवू शकत नाही जोपर्यंत मी तुम्हाला यासाठी परवानगी देत नाही.'' असे म्हणत त्यांनी भाजपचे नाव न घेता टीका केली.

झारग्राममधील पंचमठा मोरे याठिकाणी एका जाहीर सभेला संबोधित करताना ममता बॅनर्जी यांनी,''ती एक वाघिणी आहे आणि कोणीही तिला जखमी करण्याचा प्रयत्न करू नये आणि तिला 'धोकादायक' बनवण्याचा धोका पत्करू नये.'' असे म्हणत त्यांनी भाजपवर टीका केली. मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या राजकीय प्रतिस्पर्ध्यांनी त्यांना कमी लेखू नये असा इशारा देत तिचा लढा अजून संपलेला नसल्याचे म्हटले.

राजकारणातील पूर्वीच्या घटनांचा स्पष्ट उल्लेख करताना बॅनर्जी म्हणाल्या,''त्या कम्युनिस्ट पक्षाच्या (मार्क्सवादी) (सीपीआय-एम) गोळ्यांमधून वाचली. माझे डोके फुटले होते, माझे शरीर रक्ताने माखले होते. मला भीती वाटली नाही. मी एक जिवंत वाघीण आहे. मला जखमी करण्याचा प्रयत्न करू नका, मी धोकादायक होईन.''असे म्हटले. बॅनर्जी यांनी पुढे बोलताना, ''तुम्ही मला तोपर्यंत हरवू शकत नाही जोपर्यंत मी तुम्हाला यासाठी परवानगी देत नाही. ममता बॅनर्जींना पराभूत करणे सोपे नाही.''असे म्हणत विरोधकांना थेट आव्हान दिले.

ममता बॅनर्जी यांच्या आक्रमक विधानाचा अर्थ भाजपला आव्हान म्हणूनच घेतला जात आहे. निवडणूक आयोगाने त्यांच्या सरकारला दोन निवडणूक नोंदणी अधिकाऱ्यांसह (ईआरओ) चार अधिकाऱ्यांना निलंबित करण्याचे निर्देश दिल्यानंतर बॅनर्जी यांचे हे विधान आले. यावर नाराजी व्यक्त करताना त्यांनी आयोगावर राजकीय पक्षपाताचा आरोप केला.ममता बॅनर्जी म्हणाल्या, ''आयोग अमित शहा (केंद्रीय गृहमंत्री) यांच्या एजंटसारखे वागत आहे. ते अमित शाह यांच्या हातातील बाहुल्यासारखे वागत आहे. बंगाल हा अपमान सहन करणार नाही. मी माझ्या अधिकाऱ्यांना शिक्षा होऊ देणार नाही. जर तुमच्यात हिंमत असेल तर प्रयत्न करा!'' तृणमूल काँग्रेसच्या प्रमुखांनी मतदारांना मतदार यादीतील त्यांची नावे तपासण्याचे आणि सतर्क राहण्याचे आवाहनही केले. त्यांनी इशारा दिला, ''मतदार यादीतील तुमचे नाव ही तुमची ओळख आहे. आत्ताच नोंदणी करा आणि नंतर पुन्हा तपासणी करा. निवडणुकीच्या दिवशी तुमचे नाव गहाळ झाल्याचे पाहून आश्चर्यचकित होऊ नका.''बॅनर्जींनी राष्ट्रीय नागरिक नोंदणी (एनआरसी) बद्दलच्या त्यांच्या भीतीचा पुनरुच्चार करत, ''लोकांना धमकावण्यासाठी आसाममधून बंगालला नोटिसा पाठवल्या जात आहेत.

**❑ आम्ही लढल्याशिवाय एक इंचही मागे हटणार नाही**

**बॅनर्जींनी लोकांना प्रतिकार करण्याचे आवाहन केले करत, ''जय बांगला म्हणा''. निषेध करा. आम्ही लढल्याशिवाय एक इंचही मागे हटणार नाही. तुमचे मतदार कार्ड हे फक्त एक कार्ड नाही ते तुमच्या ओळखीचा पुरावा आहे.''असे म्हटले. तसेच 'मी पद सोडण्याचा निर्णय घेतला तरच तुम्ही मला काढून टाकू शकता. अन्यथा, तुमचे समर्थकही मला मतदान करतील.'असे म्हणत त्यांनी विरोधकांना डिवचले आहे.मुख्यमंत्र्यांनी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना थेट संबोधित केले आणि त्यांना पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले.**

## मुंबई पोलिसांच्या नावाने बंगळूरुच्या वृद्धाची १.७७ कोटींची फसवणूक

**बंगळूर :दि.७ वृत्तसंस्था**

सायबर गुन्हेगारांनी मुंबई पोलिसांच्या नावाने 'डिजिटल अरेस्ट'ची भीती दाखवत कर्नाटकातील बंगळूरमधील ८१ वर्षीय वृद्धाची तब्बल १.७७ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. सदानंदनगर येथील एनजीईएफ ले-आउटमधील रहिवासी जी. वसंतकुमार यांची डिजिटल अरेस्टच्या माध्यमातून फसवणूक झाली आहे.




पाच जुलै रोजी संदीप जाधव नावाच्या एका व्यक्तीने मुंबईतील कुलाबा ठाण्यातील पोलिस असल्याचे भासवत वसंतकुमार यांना कॉल केला. त्याने सांगितले की, ''तुमच्या आधार क्रमांकावरून जेट एअरवेज कंपनीचे नरेश गोयल यांच्या खात्यात कोट्यवधी रुपये ट्रान्सफर झाले आहेत. त्यामुळे तुम्हाला 'डिजिटल अरेस्ट' करण्यात येईल.

त्यानंतर ९ ते १५ जुलैदरम्यान व्हॉट्सअॅप कॉलद्वारे अटक वॉरंट दाखवून त्यांना घाबरवण्यात आले. यामुळे भयभीत वसंतकुमार यांनी स्वतःच्या पाच बँक खात्यांची माहिती दिली. फसवणूक करणाऱ्याने तपासासाठी तुमचे पैसे सुरक्षित खात्यात हलवावे लागतील, नंतर ते परत केले जातील, असे सांगून एकूण १.७७ कोटी रुपये ट्रान्स्फर करून घेतले.

बऱ्याच दिवसांनी पैसे परत न आल्यामुळे वसंतकुमार संशय बळावला. त्यामुळे त्यांनी त्वरित पूर्व विभाग सायबर क्राईम पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.



## पाक लष्करप्रमुख असीम मुनीर दुसऱ्यांदा अमेरिका दौऱ्यावर

**इस्लामाबाद/वॉशिंग्टन : दि.७ वृत्तसंस्था**

पाकिस्तानचे लष्करप्रमुख फील्ड मार्शल असीम मुनीर पुन्हा एकदा अमेरिकेला भेट देणार आहेत. ही त्यांची दोन महिन्यांत दुसरी अमेरिका यात्रा असून, अमेरिकेसोबतच्या लष्करी आणि धोरणात्मक संबंधांमध्ये वाढ होत असल्याचे स्पष्ट संकेत आहेत.

या वेळी मुनीर यांची भेट यूएस सेंट्रल कमांडचे () कमांडर जनरल मायकेल कुरिल्ला यांच्या निरोप समारंभासाठी आहे. कुरिल्ला हे या महिन्याअखेरीस सेवानिवृत्त होत आहेत.

त्यांनी पाकिस्तानला ''आतंकविरोधी लढ्यात एक विलक्षण भागीदार'' म्हणून गौरविले होते. तसेच पाकिस्तानने त्यांचा सर्वोच्च लष्करी सन्मान देऊन गौरव केला होता. केवळ दोन महिन्यांपूर्वीच कुरिल्ला यांनी पाकिस्तानच्या मदतीने इसिस-खोरासान (-) च्या पाच दहशतवाद्यांना पकडण्यात आले, हे जाहीर केले होते. अमेरिकेच्या हाऊस आर्म्ड सर्व्हिसेस कमिटीसमोर बोलताना त्यांनी म्हटले होते, ''पाकिस्तान हा दहशतवादविरोधी लढ्यात एक अद्भुत भागीदार आहे... म्हणूनच आपल्याला पाकिस्तान आणि भारत दोघांशी संबंध ठेवावे लागतील.'' या वक्तव्यामुळे भारताने नाराजी व्यक्त केली होती, कारण भारत आंतरराष्ट्रीय स्तरावर पाकिस्तानवर दहशतवाद प्रायोजक देश म्हणून शिक्का मारण्याचा प्रयत्न करत होता.

पाकिस्तानने देखील कुरिल्ला यांच्या गौरवाला उत्तर दिले. जुलै महिन्यात कुरिल्ला इस्लामाबाद दौऱ्यावर असताना त्यांना पाकिस्तानचा सर्वोच्च नागरी सन्मान निशान-ए-इम्तियाज प्रदान करण्यात आला. या दरम्यान एक महत्त्वाचा राजनैतिक आणि लष्करी घडामोड घडली. असीम मुनीर आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात खासगी लंच मिटिंग झाली.

**विध्वंस** | कत्यूर शैलीत बांधलेले मंदिर त्याच्या शिल्पकलेसाठी ओळखले जाते

# प्राचीन कल्पकेदार मंदिराचे गर्भगृह ढगफुटीत मातीखाली

**उत्तरकाशी : दि.७ वृत्तसंस्था**

उत्तरकाशीमध्ये झालेल्या ढगफुटीमध्ये प्राचीन 'कल्पकेदार' मंदिराचे मोठे नुकसान झाले असून, ते मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले आहे. काही दशकांपूर्वी उत्खननामध्ये ते जमिनीवर आले होते. मंगळवारच्या घटनेनंतर आता पुन्हा ते जमिनीखाली गेले आहे. या मंदिरात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत असे, असे स्थानिकांनी सांगितले.

कत्यूर शैलीत बांधलेले हे शिवमंदिर स्थापत्यशास्त्रात चारधाम मंदिरांपैकी केदारनाथ मंदिराशी साधर्म्य असणारे आहे. सन १९४५ मध्ये उत्खननामध्ये या मंदिराचा शोध लागला. जमिनीत काही फूट खाली खोदल्यानंतर हे प्राचीन शिवमंदिर सापडले होते. हे मंदिर



जमिनीच्या पातळीखाली होते आणि भक्तांना दर्शनासाठी खाली उतरून जावे लागत असे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, खीर गंगेचे पाणी मंदिराच्या गर्भगृहातील शिवलिंगावर येत असे, यासाठी एक विशेष मार्ग तयार करण्यात आला होता.

पाच ऑगस्ट रोजी दुपारी धराली गावातील खीरगंगा नदीच्या पाणलोट क्षेत्रात ढगफुटी झाली. परिणामी, पाणी, माती, राडारोड्याचा मोठा लोंढा अंदाजे १२३० फूट उंचीवरून खाली आला आणि काही सेकंदात धराली गावावर संकट कोसळले. पुराने गावातील निवासी भागच नव्हे, तर गंगोत्री महामार्गापासून ५० मीटर अंतरावर असलेल्या कल्पकेदार मंदिरालाही फटका बसला. मंदिराचा वरचा भाग वाहून गेला असून, गर्भगृह ढिगाऱ्याखाली गाडले गेले.

मंदिराच्या बाहेरील भागात दगडी शिल्पकाम आढळते. उत्खननानंतरही हे अर्धे मंदिर अजूनही जमिनीखालीच राहिले. यावेळी भग्नावशेषांच्या थरामुळे मंदिराची स्थिती अधिक गंभीर झाली आहे. मंगळवारच्या नैसर्गिक आपत्तीमध्ये दोन मजल्यांहून अधिक उंचीपर्यंत ढिगारा जमा झाल्याचा अंदाज आहे. ढिगाऱ्यांमध्ये माती, दगड आणि अवशेषांचा समावेश आहे. आधीच जमिनीपासून सात मीटर खाली असलेले हे मंदिर यावेळी आणखी आत गेले आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले पत्र या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

## संपादकीय...

## भयावह अनुभव!

उत्तराखंडमध्ये झालेल्या ढगफुटीमुळे उत्तरकाशीतील गंगोत्रीच्या मार्गावरील धराली गाव वाहून गेले. ५ जणांचा मृत्यू झाला असून, १०० पेक्षा जास्त लोक बेपत्ता आहेत. या राज्यावर गेल्या काही वर्षांत वारंवार संकटे येत असून, दोन वर्षांपूर्वी जोशी मठ तीर्थक्षेत्राची प्रचंड हानी झाली होती. खीरगंगा नदीच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या आताच्या ढगफुटीमुळे अचानक पूर येऊन अनेक घरे वाहून गेली. धराली हा चार धामांपैकी एक असलेल्या गंगोत्रीच्या मार्गावरील एक महत्त्वाचा टप्पा. तेथे अनेक हॉटेल्स, रेस्टॉरंट आणि घरगुती निवासव्यवस्था आहे. पर्यटनावर अवलंबून असलेले हे स्थळ ढगफुटीत पुरते उद्ध्वस्त झाले. या विध्वंसाचे दृश्य भीतीदायक आणि धडकी भरवणारे होते. गंगोत्रीच्या मार्गावर जागोजागी पावसामुळे दगड-माती वाहून आल्याने त्याचे ढिगारे रस्त्यावर साचले. रस्ते मार्ग ठप्प झाले. अनेक भागांत मदत व बचाव पथकेच अडकून पडली. हर्षिल भागात हेलिपॅड वाहून गेले. लष्कराची छावणीही पाण्याखाली गेली. लष्कराचे ८ ते १० जवान बेपत्ता असतानाही अन्य जवान बचावकार्य करण्यास सरसावले आहेत. निसर्गाचे संकट कधी सांगून येत नाही. मंगळवारी दुपारी अनेक लोक घरात विश्रांती घेत असताना ढगफुटीने दगड, पाणी, मातीचे प्रचंड लोट डोंगर दरीतून वेगाने खाली आले. काही कळायच्या आतच इमारती वाहून गेल्या. हे पाणी धरालीच्या दिशेने येत असल्याचे दिसताच दूरच्या ठिकाणी असलेल्या अन्य लोकांना सावध करण्यासाठी स्थानिकांनी इशारे दिले; पण निमिषार्धातच होत्याचे नव्हते झाले. याआधीच्या घटनांचा परामर्ष घेतला असता वारंवार अशा घटना घडल्या आहेत. केदारनाथमध्ये मुसळधार पाऊस आणि पुरामुळे २०१३ मधील दुर्घटनेत मोठी जीवित आणि वित्तहानी झाली. अनेक गावे व वस्त्या, रस्ते, पूल आणि इमारतींची मोठी हानी झाली. यानंतर केदारनाथची यात्रा काही काळ थांबवली होती. केदारनाथ दुर्घटनेतून सावरायला आणि तेथे पुनर्बांधणी व्हायला बराच काळ लागला. या घटनेच्या आठवणी आजही तेथील लोकांच्या मनात जाग्या आहेत. उत्तराखंडमधील हवामान अचानक बिघडल्यामुळे १५ जून रोजी रुद्रप्रयाग जिल्ह्यात हेलिकॉप्टर कोसळून त्यात महाराष्ट्रातील तिघांचा मृत्यू झाला होता. ते केदारनाथ धाम येथून पर्यटकांना गुप्तकाशी तळावर परत आणत होते. मार्चमध्येच चमोली जिल्ह्यामधील बद्रीनाथ धामजवळ हिमकडा कोसळल्यामुळे ५५ कामगार बर्फाच्या ढिगाऱ्याखाली अडकले होते. यातील ५० कामगारांना बाहेर काढण्यात यश मिळाले. ७ फेब्रुवारी २०२१ रोजी ज्योतिर्मठाच्या तपोवन क्षेत्रातील रैमी गावावर ढगफुटी झाल्याने हाहाकार माजला होता. ऋषीगंगा आणि धौलीगंगा नद्यांना पूर आले होते. या आपत्तीत ऋषीगंगा ऊर्जा प्रकल्प आणि तपोवनमधील नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशनचा प्रकल्प उद्ध्वस्त झाला होता. पावणेदोन वर्षांपूर्वी उत्तरकाशीत धरासू ते यमुनोत्रीपर्यंत नवा मार्ग उभारला जात होता. त्यावरील सिलक्यारा-बारकोट मार्गाचा काही भाग कोसळला होता. त्यावेळी बोगद्यात ४१ कामगार अडकले होते. त्यांची सुटका करण्यास १७ दिवस लागले. हा प्रकल्प बद्रीनाथ, केदारनाथ, यमुनोत्री आणि गंगोत्री या पवित्र स्थळांना जोडणाऱ्या चारधाम महामार्ग प्रकल्पाचा एक भाग आहे. या प्रकल्पाचे काम करणाऱ्या कंपनीने आंतरराष्ट्रीय मानकांनुसार काम न केल्यामुळे बोगद्याचा भाग कोसळला. एवढ्या महत्त्वाच्या बोगद्याच्या बांधकामावेळी संकटकालीन मार्ग बनवला नव्हता, हे एक आश्चर्यच होते. हिमस्खलन ही एक नैसर्गिक आपत्ती आहे. त्यात बर्फ, डोंगर आणि मातीचा मोठा भाग वेगाने खाली घसरतो. अशा घटना बर्फ पडतो त्या डोंगराळ भागात होतात. एकाच भूभागावर भरपूर बर्फ साचतो, तेव्हा पावसाचे पाणी आत झिरपते. त्यातून भूभाग गुळगुळीत होतो आणि हिमस्खलनाला वेग येतो. मुळात हिमालय रांगांमधील प्रदेश भूकंपप्रवण असून, पर्वत भुसभुशीत आहे. तेव्हा रस्ते अथवा बोगदे या स्वरूपाची कामे हाती घेताना निसर्गाच्या समतोलास धक्का लावला जात असतो, हे लक्षात घेतले पाहिजे. हिमालयात डोंगर आडवे-उभे कापले जात आहेत. पर्वतरांगा आतून-बाहेरून पोखरल्या जात आहेत. पर्यटन विकासाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर नागरीकरण सुरू आहे. ते करताना पर्यावरणाचा विचार केला न गेल्याने नैसर्गिक प्रवाहांवर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे सुरू आहेत. त्यासाठी बेसुमार वृक्षतोड आणि एकूणच निसर्गाशी खेळ सुरू आहे, हे सारेच धोकादायक आहेच शिवाय मानवी विनाशास आमंत्रणही ठरते आहे. सिंधू नदीच्या उत्तरेस नंगापर्वतापासून अफगाणिस्तानपर्यंत काराकोरम पर्वताची रांग पसरली आहे. काराकोरममधील श्योक नदीचा प्रवाह एका हिमखंडाने रोखला आहे. यामुळे तेथे छोटे छोटे तलाव बनले आहेत. पाण्याचा दबाव वाढला, तर तो हिमखंड तुटेल, असा इशारा शास्त्रज्ञांनी काही वर्षांपूर्वीच दिला होता. उत्तरकाशी हे समुद्रसपाटीपासून ८०० ते ६,९०० मीटर या दरम्यान वसलेले आहे. वर्षभर तेथील मोठा भाग बर्फाच्छादित असतो. या भागात अनेक ठिकाणी हिमनग आहेत. दरवर्षी सरासरी १,२८९ मिलिमीटर पाऊस तेथे पडतो. १९६९ मध्ये तर तेथे २४३६ मि.मी. पाऊस पडला. हवामान बदलामुळे पावसाची तीव्रता वाढली आहे. त्याचा समतोलही बिघडत चालला आहे. हवामानबदलाची चर्चा हा आता केवळ जागतिक परिषदांमधील विषय राहिला नसून, त्याचा प्रत्यक्ष भयावह अनुभवही दिवसेंदिवस येत आहे. देशातील उत्तर व पूर्वेकडील राज्यांत तापमानात विलक्षण वाढ झाली आहेच शिवाय कमाल आणि किमान तापमानातील फरकही वाढतो आहे. तज्ज्ञांचा सल्ला धुडकावून लावून गंगा, भागीरथी, अलकनंदा आदी नद्यांच्या पट्ट्यात जलविद्युत प्रकल्प केंद्रे उभारली. रस्ते मोठे करण्यासाठी डोंगरांमधून बोगदे खणले. यामुळे नैसर्गिक संकटात सर्वजण भरच घालत आहोत. वैज्ञानिकांच्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे लोकांच्या जीवांशी खेळणे होय, हे ध्यानात ठेवावे. उत्तरकाशीमधील या ताज्या दुर्घटनेचा हाच अर्थ आहे. हिमालयीन पर्वतरांगांतील विकासाचे दीर्घकालीन नियोजन वेळीच झाले पाहिजे. ते न केल्यास त्याचे काय, याचा हा इशाराही मानता येईल.



## लक्ष्यभेद

जयदीप सोनखासकर
9890508017

### ट्रम्प



भारतावर हे लादले
पन्नास टक्के शुल्क
ट्रम्प तात्या बोलले
समजून त्या शुल्लक

टेरिफ अवाजवी आहे
अन्याय कारक देखील
त्याची चलतीच आहे
वेसण कोण घालील?

हा भारताला लाथाडते
करून गोड गोड गोष्टी
त्या पाकडया चोपडते
मैत्री करते खोटी खोटी

## ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

जो स्वत:ला भक्त
दाखवितो मोठा ।
तो लबाड मोठा
अहंकारी ॥

कलाकारा जेव्हा
अहंकार येतो ।
कला शून्य होतो
तेव्हा तेव्हा ॥

स्वत:ला पंडित
समजतो मोठा।
तो पाखडी मोठा
अहंकारी ॥

जगा दाखवून
जो कृती करितो ।
तो जगी ठरितो
अहंकारी ॥



## स्नेहाचे ऋणानुबंध चिरकाल टिकावेत!

प्रासंगिक

प्रविण बागडे
नागपूर 9923620919



श्रावणमास पर्व हे समाज जीवनाचे प्रतिबिंब आहे. रक्षाबंधन हे एक सामाजिक व धार्मिक पर्व आहे. हे पर्व सामाजिक परंपरेमध्ये सद्भाव, स्नेह, आत्मियता, बंधुभाव, कौटुंबिक एकात्मता यांचा प्रवाह निर्माण करणारे आहे. खऱ्या अर्थाने संस्कृतीला समृध्द बनविणारे, आध्यात्मिक स्पर्शाने जनमनाला पुलंकित करणारे पर्व आहे, रक्षाबंधन पर्व! राणी कर्णावतीने आपल्या रक्षणासाठी हुमायुँ राजाला भाऊ मानून बांधलेली राखी इतिहासाच्या पानावर कोरल्या गेली. हिंदू-मुस्लिम यांच्यामधील स्नेह व एकी निर्माण करणारी ही जीवंत साक्षच आहे. 'स्त्री' जातीच्या रक्षणासाठी धर्म, जाती, लिंग या भेदांना छेदून पुढे टाकलेले एक पाऊल आहे हे! राष्ट्रीय एकात्मेला पोषक व वर्धक प्रसंग समाजात सद्भावना व सत्प्रवृत्तींचे पोषण करण्याचे कार्य करतात. आपल्या भाऊरायाला बहीण राखी बांधते व आपल्या रक्षणाची अप्रत्यक्षरीत्या हमी घेते. हिंदू संस्कृतीतील समाजमुल्यांचे पोषण करणारी ही सामाजिक परंपरा आजही मोठया दिमाखाने देशात सर्वत्र नांदतांना दिसत आहे.

हिंदू पौराणिक कथेनुसार, महाभारतात, जे एक महान भारतीय महाकाव्य आहे, पांडवांची पत्नी द्रौपदीने भगवान श्रीकृष्णाच्या मनगटामधून वाहणारे रक्त थांबवण्यासाठी तिने तिच्या साडीचा कोपरा फाडून त्याच्या मनगटावर बांधला. त्यामुळे भगवान श्रीकृष्ण यांच्यात एक बंध निर्माण झाला आणि द्रौपदीचे रक्षण करण्याचे वचन त्यांनी तिला दिले. राखी बांधताना बहिणीने म्हणावे, ''येन बद्धो बली राजा दानवेन्द्रो महाबलः। तेन त्वामनुबध्नामि रक्षे मा चल मा चल'' (दानवांचा राजा बली यांच्या हातात दैत्यगुरू शुक्राचार्य यांनी जशी रक्षा (राखी) बांधली होती तशीच ही राखी मी तुझ्या हाताला बांधत आहे) रक्षाबंधनाची सुरुवात केव्हा झाली, याबद्दल निश्चित पुरावा नाही; पण त्याविषयी एक आख्यायिका आहे. पूर्वी देवदानवांच्या युद्धात दानवांच्या शक्तीपुढे देवांचे काही चालत नसे. दानवांचा राजा वृत्रासुर याने देवांचा राजा इंद्र याला युद्धाचे आव्हान दिले. इंद्र आपले वज्र घेऊन युद्धास निघाला. त्या वेळी इंद्राला विजय मिळावा म्हणून त्याची पत्नी शुची हिने विष्णूकडुन मिळालेला एक दोरा (राखी) इंद्राच्या हातावर बांधला. त्या राखीच्या प्रभावाने इंद्राला त्या युद्धात विजय मिळेल, अशी तिची श्रद्धा होती. शेवटी श्रध्दा खरी ठरली आणि इंद्राचा विजय झाला आणि त्याचे गेलेले वैभव परत मिळाले. या प्रसंगाची आठवण म्हणून मनगटावर राखी बांधण्याची पद्धत पडली, असे सांगितले जाते. हिंदू पंचांगाप्रमाणे श्रावणात येणारी राखी पौर्णिमा ही नारळी पौर्णिमेच्या दिवशी किंवा पौर्णिमा लागोपाठ दोन दिवस असेल तर दुसऱ्या दिवशी असणाऱ्या पौर्णिमेला साजरी करतात. याच दिवसाला 'रक्षाबंधन' म्हणतात. या दिवशी रक्षाबंधनाचा कार्यक्रम असतो. हा सण बहीण भावाच्या अतूट, उत्कट प्रेमाची आठवण करून देणारा दिवस आहे. श्रावण पौर्णिमेस राखी बांधावी, असे धर्मशास्त्रात म्हणले आहे. या विधीस 'पवित्रारोपण' असेही म्हणतात. भावाचा उत्कर्ष व्हावा, आपल्या भावाने आपले रक्षण करावे, ही यामागची मंगल मनोकामना असते. उत्तर भारतात हा सण राखी म्हणून प्रसिद्ध आहे. या दिवशी बहिणी आपल्या भावाच्या उजव्या हाताच्या मनगटावर राखी बांधून ''भावास दीर्घ आयुष्य व सुख लाभो मिळो'' अशी कामना करतात. राखी बांधण्याचा अर्थ ती बांधणाऱ्या व्यक्तीच्या प्रेमरूपी बंधनात स्वतःला गुंतवून त्या व्यक्तीच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारणे. राखी बांधण्याच्या या सणातून स्नेह व परस्परप्रेम वृद्धिंगत करण्याची प्रथा अस्तित्वात आली आहे. रक्षाबंधन म्हणजे हातातील राखीस साक्षी मानून आपल्या बहिणीचे सदैव रक्षण करण्याचे वचन देणे. काही प्रांतात नोकर आपल्या मालकाला, ब्राह्मण आपल्या यजमानाला, मुलगी आपल्या वडिलांना, आणि पत्नी नवऱ्याला राखी बांधते. आपल्यापेक्षा बलवान, समर्थ माणसाला राखी बांधून आपल्या रक्षणाचे वचन घेणे हीच यामागची भावना आहे. भारतीय समाजात ऐक्य आणि प्रेमभाव वाढीस लागावा यासाठी रक्षाबंधनाचा सण राजपूत लोकांत रूढ झाला. आजकाल मात्र बहीण-भावाच्या पवित्र प्रेमाचा सण म्हणून हा सण साजरा होतो. या दिवशी बहिणी आपल्या सख्ख्या भावाच्या हातावर राखी बांधतातच आणि शिवाय त्या बंधुत्वसमान नाते असलेल्या व्यक्तीसही राखी बांधतात.

उत्तर भारतातील ग्रामीण भागांत जिथे अनेक खेड्यांमध्ये बहिर्विवाह पद्धती प्रचलित आहे, तिथे मोठ्या संख्येने विवाहित हिंदू स्त्रिया दरवर्षी त्यांच्या पालकांच्या घरी सणासाठी परत जातात. त्यांचे भाऊ, जे विशेषतः पालकांसोबत किंवा जवळपास राहतात, कधीकधी त्यांच्या बहिणींच्या विवाहित घरी त्यांना परत घेऊन आणण्यासाठी जातात. अनेक तरुण विवाहित स्त्रिया त्यांच्या जन्माच्या घरी काही आठवड्यांपूर्वी येतात आणि समारंभ होईपर्यंत राहतात. भाऊ हे बहिणीचे सासर आणि माहेर यांच्यामध्ये आजीवन मध्यस्थ म्हणून काम करतात. शहरी भारतात जिथे कुटुंबे अधिकाधिक विभक्त होत आहेत, तिथे हा सण अधिक प्रतीकात्मक बनला असला तरीही तो खूप लोकप्रिय आहे. या उत्सवाशी संबंधित विधी त्यांच्या पारंपारिक प्रदेशांच्या पलीकडे पसरले आहेत. तंत्रज्ञान, स्थलांतर, चित्रपट, सामाजिक संवाद, आणि हिंदू धर्माच्या राजकीय प्रचाराद्वारे या सणाचे स्वरूप बदलले जात आहे. रक्ताचे नाते नसलेल्या स्त्रिया आणि पुरुषांमध्ये स्वैच्छिक नातेसंबंधांची एक बदललेली परंपरा देखील आहे. यासाठी जाती आणि वर्गाच्या पलीकडे, तसेच हिंदू आणि मुस्लिम हा भेद विसरून राखी बांधली जात आहे. जैन परंपरेमध्ये सातशे मुनींवर दुष्ट प्रवृत्तीने केलेल्या उपसर्गाला दुर करण्याचे कार्य या पर्वमध्ये झाले. जैन लोक रक्षाबंधनाच्या दिवशी जैन मंदिरात जाऊन अभिषेक-पूजन करुन मुनीं प्रती हृदयभाव ठेवून पंडित-पुजाऱ्यांच्या हस्ते राखी बांधून हे पर्व साजरे करतात. धर्मरक्षणाचे चकं कण आहे ते ! प्रथम धार्मीक व नंतर सामाजिक दायित्व पार पाडले जाते. हे पर्वधर्म व धर्मावलय यांच्येशी मातृत्व भावनेतून जोडणारे आहे. संस्कृती व धर्म समर्पणाच्या भावनेला वृध्दिगत करणारे आहे. श्रमण संस्कृतिमध्ये रक्षाबंधनाचे आगळे वेगळे वैशिष्ट्य आहे. ईश्वरप्रती समर्पणाची भावना व संस्कृतिचा अत्यंत आदरया भावनांना श्रेष्ठस्थान दिले गेले आहे. सामाजिक दृष्टिकोनातून रक्षाबंधन हे वात्सल्य व बंधुभावाचे परिपाक पर्व आहे. बंधुभाव व स्नेहवर्धनाचे पाठया पर्वामुळे गिरविले जातात. समाज व धर्म या पेक्षाश्रेष्ठ आहे राष्ट्रधर्म ! म्हणून सामाजिक व धार्मीक अस्तित्व टिकविण्याची आज राष्ट्राचे अस्तित्व टिकविण्याची, त्याचे जतन करण्याची गरजभासत आहे. ही महान जबाबदारी आज आपणांवर आहे. ती नेटाने करणे गरजेचे आहे, त्यामुळेही घडी नीट घट्ट बसेल. आलमगीर बादशहा दिल्लीवर राज्य करीत होता. त्याच्या प्रधानाने कट आखून बादशहाचा खून केला व प्रेत नदीत टाकून दिले. एका स्त्रिने ते पाहिले. प्रेत वाहून जाऊ नये म्हणून तिने प्रेत पाण्याबाहेर काढले आणि प्रेताचा वाली येईपर्यंत प्रेताजवळ बसून राहिली. बऱ्याच वेळानंतर बादशहाच्या शोधात सैनिक तेथे आले. बादशहाचा मुलगा शहाआलम याने त्या हिंदू स्त्रीचे आभार मानले. तिला आपली बहीण मानले. ती हिंदू स्त्री पुढे दरवर्षी शहाआलमला राखी बांधू लागली. ही प्रथा पुढे अकबरशहा व बहादूरशहा यांनीही चालू ठेवली. इतिहासात याचा उल्लेख आहे. मुघल बादशहानी पवित्र मानलेला हिंदूंचा हा एकमेव सण आहे. या श्रावण पौर्णिमेला 'पोवती पौर्णिमा' असेही म्हणतात. कापसाच्या सुताच्या नवसुती (नऊ धाग्यांची जुडी) करून तिला आठ-बारा किंवा चोवीस गाठी मारतात व त्यांच्या ठिकाणी ब्रह्मा, विष्णू, महेश, ओंकार, सूर्य इत्यादी देवतांचे आवाहन करून हे पोवते प्रथम देवास वाहून नंतर तसलीच पोवती कुटुंबातील माणसांच्या मनगटावर बांधली जातात. रक्षाबंधनाच्या निमीत्ताने पर्यावरणाचे रक्षण, ऑलिम्पिक खेळाडूंना शुभेच्छा आणि स्त्रीभृणहत्या रोखण्याचा संदेश राखीच्या माध्यमातून करण्याचा निर्धार भाऊ-बहिण आणि समस्त भारतीयांनी या नाजुक पर्वावर केला पाहिजे. रक्षाबंधन निमित्त सर्व बंधु-भगिनींना मन:पूर्वक शुभेच्छा!



## शिक्षण क्षेत्राला दिशा देणारे पुस्तक : शाळा एके शाळा

समीक्षण

सुरेश मंत्री
मो. ९४०३६५०७२२

द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय, बीड येथे कार्यरत असणारे सहशिक्षक श्री. माधव अरूणराव डाके लिखित शाळा एके शाळा ही लघुकादंबरी. पुस्तकाच्या शिर्षकावरूनच हे पुस्तक शिक्षणक्षेत्राशी संबंधित असल्याचे लक्षात येते. माधव डाके हे स्वत: शिक्षक म्हणून एका शाळेत काम करत असल्याने शिक्षण संस्था, संस्थाचालकांचा शाळेच्या प्रगतीबद्दलचा दृष्टीकोन, मुख्याध्यापकाला संस्था व शिक्षक यामधील दुवा म्हणून काम करीत असताना प्रशासन चालवताना करावी लागणारी कसरत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थ्यांचे मनोभाव यांचे त्यांनी जवळून निरीक्षण केलेले असल्याने ही कादंबरी लिहीताना त्यांनी शिक्षणक्षेत्राच्या वास्तविकतेशी सांगड घातली आहे. पुस्तकास पत्रकार, साहित्यिक स्वर्गीय प्रा. एकनाथ आबुज यांची प्रस्तावना लाभलेली असून ह.भ.प. मोहन महाराज खरमाटे यांचा शुभेच्छा संदेश आहे. पुस्तकाचे मुखपृष्ठ आकर्षक आणि बोलके आहे.

एक चांगला मुख्याध्यापक उत्तम शिक्षक असतोच असे नाही तसेच एक चांगला शिक्षक चांगला मुख्याध्यापक बनु शकतोच असे नाही असे म्हटले जाते. एक चांगला मुख्याध्यापक शाळेला केवळ एक इमारत नाही, तर एक समुदाय बनवतो, जिथे विद्यार्थी आणि शिक्षक एकत्र शिकतात आणि वाढतात. एक चांगला मुख्याध्यापक हा शाळेला दिशा देणारा आणि एक मजबूत नेता असतो. माधव डाके यांनी अरूण भिडे या आदर्श शिक्षक व मुख्याध्यापकाचे व्यक्तीचित्र पुस्तकात रेखाटले आहे. अरूण भिडे हे संस्थेतील एका शाळेवर उपमुख्याध्यापक पदावर कार्यरत असतात. कडक शिस्तीचे व हाडाचे शिक्षक म्हणून त्यांची ख्याती असते. संस्थेचीच संस्कार विद्यालय नावाची एक दुसरी माध्यमिक शाळा. जिची अवस्था नावाच्या अगदी विपरीत असते. शाळेचे मुख्याध्यापक अकर्तव्यदक्ष असल्याने शाळेचे दैनंदिन कामकाज रामभरोसे चालत असते. कामचुकार शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी, शिस्त नसणारे व शाळेत अनियमित उपस्थिती दर्शवणारे विद्यार्थी यामुळे शाळेची एकूण गुणवत्ता फार खालावलेली असते. ना शहर म्हणाव ना गाव अशा ठिकाणी असणारी




ही शाळा असल्याने पालकही शिक्षणाच्या बाबतीत उदासिन. शाळेचे मुख्याध्यापक संस्थाचालकांचे जावई असल्याने ते सर्व काही माहित असताना सुद्धा याबाबतीत मुख्याध्यापकांना काही बोलु शकत नाहीत. या संस्कार विद्यालयाच्या अकर्तव्यदक्ष मुख्याध्यापकांच्या सेवानिवृतीनंतर जिल्हा परिषदेचे शिक्षण सभापती असणारे संस्थेचे सचिव अरूण भिडे सरांना पदोन्नती देवून संस्कार विद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी नियुक्ती करतात.

संस्कार विद्यालयाच्या मुख्याध्यापक म्हणून पदभार स्विकारल्यानंतर पहिल्याच दिवशी भिडे सरांच्या लक्षात येते की, त्यांच्या पूढे खूप मोठी आव्हाने आहेत. माणसाच्या ठिकाणी प्रबळ ईच्छाशक्ती असेल, डोळ्यासमोर विशिष्ट ध्येय असेल आणि ते साध्य करण्यासाठी कठिण परीश्रम करण्याची तयारी असेल तर अशक्य ते शक्य करता येते. भिडे सर हे शिवधनुष्य उचलतात. सुरुवातीला ते शाळेतील शिक्षकांचे समुपदेशन करतात. शाळेतील विद्यार्थ्यांचे मित्र बनतात. त्यांच्यात मिळून मिसळून त्यांना शिस्त व अभ्यासाची गोडी लावतात. वेळोवेळी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देतात. यामुळे अल्पावधीतच ते विद्यार्थी प्रिय होतात. सुरूवातीला त्यांना विरोध करण्याची भाषा करणारे काही शिक्षक आपला विरोध सोडून देतात. संस्थेचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन, शिक्षकांचे सहकार्य, भिडे सरांचे उत्तम प्रशासन यामुळे लयाला गेलेली ही शाळा भिडे सरांनी मुख्याध्यापक म्हणून पदभार स्विकारल्यानंतर अगदी कमी काळात नावारूपाला येते. शाळेची शिक्षक सभा, शाळेत चालणारे विविध उपक्रम आणि कार्यक्रम याचे यथोचित वास्तव चित्र उभा करण्यात लेखक यशस्वी झाल्याचे दिसून येते. राजा कालस्य कारणम या उक्तीप्रमाणे राज्याची प्रगती असो अथवा अधोगती यास त्या त्या कालखंडातील राजाचे कर्तृत्व कारणीभूत असते, त्याप्रमाणे विद्यालयाचा प्रमुख हा मुख्याध्यापकही विद्यालयाच्या प्रगती अथवा अधोगतीस कारणीभूत असतो. म्हणून जर मुख्याध्यापक खास असेल तर विद्यालयाचा सर्वांगीण विकास हा हमखास होणारच. यात कोणाचेही दुमत असणार नाही. आणि हाच मुख्याध्यापक कर्तृत्ववान नसेल तर विद्यालयाच्या अधोगतीसही वेळ लागणार नाही. मुख्याध्यापक हा शिक्षक व प्रशासन याना जोडणारा दुवा असतो. त्या दोघांमधील सुवर्णमध्य साधणारा असतो. म्हणून मुख्याध्यापकामध्ये तेवढी विचारांची,अनुभवाची परिपक्वता असली तर तो विद्यालयाला नंदनवन बनवणारा महत्वाचा घटक ठरतो. त्याच्यामध्ये उत्कृष्ट सारथ्य असेल तर तर विद्यालयाचा रथ योग्य प्रगतिपथावरुन ध्येयपूर्तीकडे नेल्याशिवाय राहणार नाही.

माधव डाके सरांनी साध्या सरळ परंतु ओघवत्या वर्णन शैलीत हे पुस्तक लिहिलेले आहे. हे पुस्तक हाती घेतल्यानंतर पूर्ण वाचल्याशिवाय हातातुन सुटत नाही. शाळा एके शाळा हे पुस्तक केवळ मुख्याध्यापकांसाठीच वाचनीय नाही तर संस्थाचालक, शिक्षक आणि शिक्षण क्षेत्राशी संबंधित प्रत्येकाने वाचावे असे आहे. माधव डाके सरांना पूढील लेखन कार्यासाठी खूप-खूप शुभेच्छा!



## लोकमान्य टिळक यांनी चेतवली स्वातंत्र्याची ज्योत

स्वातंत्र्यपर्व

तुळशिदास खिरोडकर
मो. 9970276582

**लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी ''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे'' ही प्रेरणादायी घोषणा १९०८ साली अकोल्यात जाहीरपणे केली. त्यांच्या ओजस्वी विचारांनी अकोल्यातील जनमानसात स्वातंत्र्याची तळमळ निर्माण झाली. स्वदेशीचा पुरस्कार, इंग्रजी वस्तूंवर बहिष्कार, आणि राष्ट्रीय शिक्षणाची गरज या त्यांच्या विचारांनी चळवळीला नवे वळण मिळाले. त्यांच्या व्याख्यानांमुळे अकोल्यातील तरुणांमध्ये राष्ट्रभक्तीचे स्फुल्लिंग चेतवले गेले. अनेक कार्यकर्ते टिळकांच्या विचारांनी प्रेरित होऊन स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. वाशिम, अकोट, मंगरूळ यांसारख्या भागात चळवळीचे वारे वाहू लागले. टिळकांचा अकोला दौरा हा जिल्ह्याच्या स्वातंत्र्य लढ्यातील एक निर्णायक आणि तेजस्वी टप्पा ठरला.**

''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच!''
ही केवळ घोषणा नव्हती, तर ती होती स्वातंत्र्याच्या लढ्याची चैतन्यदायी सुरुवात. या घोषणेने संपूर्ण भारतात स्वातंत्र्यालढ्यात प्राण फुंकला. अभिमानाची गोष्ट ही आहे की संपूर्ण देश जागृत करणारी ही गर्जना अकोल्याच्या मातीत प्रत्यक्ष लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी प्रथम केली, आणि त्यानंतर अकोल्यातील भूमीतही स्वातंत्र्यप्रेमाचे बी रुजले.

टिळकांचे व्यक्तिमत्त्व हे तेजस्वी, विद्वान, आणि जाज्वल्य राष्ट्रभक्तीने झपाटलेले होते. त्यांच्या विचारांमुळे असंख्य तरुणांनी आपले जीवन स्वातंत्र्यलढ्याला वाहून घेतले. त्यांनी भारतीय समाजात स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षणाचे बीज पेरले. २ मे १९०८ रोजी अकोल्यात शिवजयंती उत्सवात व्याख्यान करण्याचे निमित्त टिळक आले होते. तो दिवस अकोल्याच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहावा असा होता. त्यावेळी इंग्रज राजवटीविरुद्ध जनतेत जागृती करण्यासाठी लोकमान्य टिळक देशभर दौऱ्यावर होते. अकोल्यात त्यांचे आगमन झाल्यावर, रेल्वे स्टेशनवर हजारोंचा जनसागर त्यांचं स्वागत करण्यासाठी जमला होता. ही सभा म्हणजे जनतेच्या अंत:करणात निर्माण झालेल्या असंतोषाचा जणू उद्रेक होता.

टिळकांचा मुक्काम अकोल्यातील जुन्या शहरात श्री व्यंकटेश देशपांडे यांच्याकडे झाला. दुसऱ्या दिवशी राजेश्वर मंदिर परिसरात ऐतिहासिक जाहीर सभा झाली. ही सभा अकोल्याच्या इतिहासातील पहिली आणि सर्वात मोठी राष्ट्रभक्तीची जाहीर सभा ठरली. दहा हजारांहून अधिक नागरिक त्या वेळी उपस्थित होते, जे त्याकाळातील खूप मोठे प्रमाण मानले जाते. टिळकांचे भाषण झणझणीत, ओजस्वी आणि थेट हृदयाला भिडणारे होते. ''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे!'' ही त्यांची घोषणा एकदा मंचावरून उच्चारली गेली आणि हजारो लोकांच्या मनात असलेल्या असंतोषाला जणू शब्द लाभले. त्यावेळी जमलेला प्रत्येक नागरिक, स्त्री-पुरुष, तरुण-वृद्ध, या एका विचाराने भारावून गेला. त्या दिवशी टिळकांसोबत त्यांचे निकटवर्तीय दादासाहेब खापर्डे उपस्थित होते. ते टिळकांचे स्नेही, सहकारी म्हणून ओळखले जात. टिळकांच्या स्वराज्यप्रसार यात्रेत खापर्डे यांचे महत्त्वाचे योगदान होते. त्यांनी अकोल्यातील तरुणांना संघटित केले आणि टिळकांच्या विचारांची मशाल गावोगावी पोहोचवण्याचे काम केले.



भाग-२

टिळकांनी दुसऱ्या दिवशी शेगाव येथील संत गजानन महाराजांच्या उपस्थितीत एक दीर्घ आणि प्रभावी व्याख्यान दिले. या प्रसंगी अनेक साधू-संत आणि सामान्य जनतेने मोठ्या श्रद्धेने सहभाग घेतला. टिळकांच्या विचारांमुळे केवळ राजकीय नव्हे, तर धार्मिक आणि सामाजिक पातळीवरही एक जागृती निर्माण झाली.या घटनेचा उल्लेख श्री. गजानन विजय ग्रंथात पंधराव्या अध्यायात दास गणू महाराज यांनी केला आहे. या दौऱ्याचा परिणाम म्हणून अकोल्यात आणि परिसरात स्वदेशी चळवळ, इंग्रज वस्तूंवर बहिष्कार, राष्ट्रीय शाळा स्थापनेसारखे उपक्रम सुरू झाले. वाशिम, अकोट, मंगरूळ, पूर्णा, बाळापूर या ठिकाणी तरुण कार्यकर्ते प्रेरित झाले. त्यांनी लोकजागृतीसाठी सत्याग्रह, सभासद नोंदणी, हस्तलिखित पत्रके वाटप यासारख्या अनेक उपक्रमांद्वारे चळवळीला गती दिली. टिळकांच्या भेटीने अकोल्याच्या मातीला राष्ट्रप्रेमाची झणझणीत जाणीव दिली. आजही अकोल्यातील राजेश्वर मंदिर परिसर, जुनं शहर, आणि रेल्वे स्थानक हे टिळकांच्या त्या ऐतिहासिक भेटीचे साक्षीदार आहेत. या दौऱ्यामुळे अकोला जिल्ह्याचा स्वातंत्र्यलढ्याच्या नकाशावर ठळकपणे उल्लेख होतो. लोकमान्य टिळकांचा अकोला दौरा म्हणजे स्वातंत्र्याच्या इतिहासातील एक तेजस्वी पर्व! त्यांनी पेटवलेली ज्योत अनेक वर्षे चेतवत राहिली आणि पुढील काळातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर, नेहरू, सुभाषचंद्र बोस, महात्मा गांधी यांसारख्या नेत्यांच्या चळवळींना प्रेरणा देणारी ठरली. अकोल्याच्या भूमीने या तेजस्वी स्मृती जपल्या आणि स्वाभिमानाने त्या पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवल्या. ही भेट म्हणजे अकोल्याच्या इतिहासातील एक प्रेरणादायी, अभिमानास्पद आणि स्वराज्याचे तेज पावलांखाली उमटलेली अमर पाऊलखुण!

# रश्मिका मंदाना १३ वर्षांनी मोठ्या अभिनेत्याबरोबर करणार होती लग्न



अभिनेत्री रश्मिका मंदाना सध्या दाक्षिणात्य सुपरस्टार विजय देवरकोंडा याच्याबरोबर असलेल्या नात्यामुळे चर्चेत आली आहे. रश्मिका मंदाना आणि विजयच्या कथित प्रेमसंबंधांची चर्चा नेहमीच होते आणि चाहतेही त्यांच्या नात्याबाबत जाणून घेण्यास उत्सुक असतात.

पण, काही वर्षांपूर्वी रश्मिकाचा साखरपुडा १३ वर्षांनी मोठ्या असलेल्या अभिनेत्याबरोबर झाला होता. वयाच्या २१ व्या वर्षी रश्मिकाने अभिनेता रक्षित शेट्टी याच्याबरोबर साखरपुडा केला होता. पण, दोघांचं नातं लग्नापर्यंत पोहोचलं नाही; अखेर रश्मिका आणि रक्षित यांनी विभक्त होण्याचा निर्णय घेतला.सध्या रश्मिका मंदाना आणि अभिनेता रक्षित शेट्टीच्या साखरपुड्याचे फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले आहेत. दरम्यान, त्यांच्या नात्यात दुरावा का आला? आणि ते कशामुळे वेगळे झाले हे जाणून घेऊयात. रश्मिकाने २०१६ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'क्रिक पार्टी' चित्रपटातून अभिनय क्षेत्रात पदार्पण केलं. चित्रपटात रश्मिका आणि रक्षित यांनी एकत्र स्क्रिन शेअर केली होती. रश्मिकाचा पहिलाच सिनेमा सुपरहिट झाला. आज इंडस्ट्रीमध्ये रश्मिका हिचं नाव फार मोठं आहे. एवढंच नाही तर, रश्मिका हिला आज कोणत्याही ओळखीची गरज नाही.त्या चित्रपटावेळी दोघांमध्ये जवळीक निर्माण झाली आणि वर्षभरात म्हणजेच जुलै २०१७ मध्ये त्यांनी साखरपुडा केला. सोशल मीडियावर सध्या व्हायरल होत असलेला फोटो तेव्हाचाच आहे, ज्यामध्ये हे दोघं सेम ड्रेसिंग स्टाईलमध्ये केक कापताना आणि अंगठी घालताना दिसत आहेत. रश्मिका या साखरपुड्याच्या वेळी फक्त २१ वर्षांची होती तर रक्षित ३४ वर्षांचा होता. अभिनेत्रीने सोशल मीडियावर साखरपुड्याचे फोटो पोस्ट करत कुटुंबात रक्षित याचं स्वागत केलं होतं. पण, त्यानंतरच्या एका वर्षातच त्यांच्या नात्यात दुरावा आला आणि सप्टेंबर २०१८ मध्ये त्यांनी साखरपुडा मोडून टाकला. ते कधीच ब्रेकअपबद्दल बोलले नाहीत.साखरपुडा मोडल्यानंतर रश्मिकाने बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं. बॉलीवूडमध्येदेखील रश्मिकाने स्वतःचं स्थान पक्क केलं आहे. रश्मिका मंदाना अलीकडेच 'पुष्पा २' आणि सलमान खानबरोबर 'सिकंदर' या चित्रपटात दिसली होती.

# भोपळ्याच्या बियांमध्ये मांसाहारापेक्षा जास्त प्रथिने



प्रथिने हा घटक आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे आपल्या रोजच्या आहारात प्रथिनांचा आवर्जून समावेश केला जातो. वनस्पती आणि प्राणीआधारित अन्नातून प्रथिने मिळतात. वनस्पतीजन्य आहार आणि प्राणीजन्य आहार यांपैकी प्रथिनांसाठी कोणता आहार चांगला आहे यावर नेहमीच चर्चा होते. त्या बाबतीत सर्वाधिक तुलना ही भोपळ्याच्या बिया आणि मांसाहार जसे की बकरी, कोंबडी (चिकन), डुक्कर (पोर्क), गाई/बैलाचे मांस (बीफ), मासे इत्यादी यांच्यात केली जाते. कारण- भोपळ्याच्या बियांमध्ये नऊ आवश्यक अमिनो आम्ले असतात. जरी त्यापैकी दोन प्रमाणात कमी असली तरीसुद्धा हे प्रमाण मांस आणि कोंबडीमधून मिळणाऱ्या प्रथिनांइतकेच असते. मात्र, या दोघांपैकी एक दुसऱ्याचा पर्याय ठरू शकत नाही. मग रोजच्या प्रथिनांचा समावेश करताना नक्की काय खायला हवे?

''आजकाल ऑनलाईन पोषणविषयक चर्चांचा मोठा दोष म्हणजे त्यातून संपूर्ण सत्य मांडलं न जाता, त्या अर्धसत्यावर आधारलेल्या असतात. भोपळ्याच्या बिया या उत्तम वनस्पती प्रथिनांचा स्रोत आहेत यात शंका नाही. पण, भोपळ्याच्या बिया या मांसाहार विशेषत: मासे आणि कोंबडीसारख्या स्वतंत्र आणि संपूर्ण प्रथिनंयुक्त सुपरफूड नाहीत,'' असे मत डॉ. सीमा गुलाटी (प्रमुख, न्यूट्रिशन रिसर्च ग्रुप, सेंटर फॉर न्यूट्रिशन अँड मेटॅबॉलिक रिसर्च -) यांनी मांडले आहे.१०० ग्रॅम भोपळ्याच्या बिया आणि १०० ग्रॅम चिकन समान का नसतात? ( ' १०० १०० ?) १०० ग्रॅम भोपळ्याच्या बियांमध्ये प्रथिने, आरोग्यदायी फॅट्स, फायबर्स, विविध जीवनसत्त्वे व खनिजे भरपूर प्रमाणात असतात. त्यातून सुमारे ३० ते ३२ ग्रॅम प्रथिने मिळतात.

# 'महावतार नरसिम्हा'चा तरुणांमध्ये क्रेझ!



सध्या भारतात सैय्यारा सिनेमाने साऱ्यांचे लक्ष जरी वेधून घेतले असले तरी 'महावतार नरसिम्हा'च्या एंट्रीने तरुणांचे लक्ष वळले आहे. 'महावतार नरसिम्हा'या सिनेमाने चांगलीच कामगिरी केली आहे. या चित्रपटाला इतके पाहिले जाते आहे की सिनेमाने रेकॉर्ड ब्रेक कामगिरी केली आहे. 'महावतार नरसिम्हा' आता फक्त ॲनिमेटेड फिल्म राहिलेली नसून ती बॉक्स ऑफिसवर १०० कोटींचा आकडा पार करणारी देशातील पहिली ॲनिमेटेड फिल्म आहे. 'महावतार नरसिम्हा'ने देशातील साऱ्या एनिमेटेड फिल्म्सला मागे सोडले आहे.

'महावतार नरसिम्हा'ने १२ दिवसांत १०६ कोटींचा आकडा पार केला आहे. विविध भाषांमध्ये हा चित्रपट प्रदर्शित करण्यात आला असून, मंगळवारी साडे सात कोटींची कमाई चित्रपटाने केली आहे. चित्रपटाने अनेक हिट आंतरराष्ट्रीय ॲनिमेटेड फिल्मने भारतात केलेले रेकॉर्डही तोडले आहे. फिल्म 'स्पायडर मॅन'ने भारतात ४३.९९ कोटींचा व्यवसाय केला होता. तर एनिमेटेड फिल्म 'कुंग फु पांडा'ने भारतात ३० ते ३२ कोटींचा व्यवसाय केला होता. या सर्व हिट ॲनिमेटेड सिनेमांना मागे टाकत 'महावतार नरसिम्हा'ने रेकॉर्ड ब्रेक कामगिरी केली आहे.

'महावतार नरसिम्हा' या ॲनिमेटेड चित्रपटानंतर भगवान विष्णूंच्या सर्व दहा अवतारांसबंधित चित्रपट येत्या दहा वर्षात रसिकांना भेट म्हणून प्रदर्शित केले जाणार आहेत. या चित्रपटांचे दिग्दर्शन दिग्दर्शक अश्विन कुमार करणार असून, निर्माते शिल्पा धवन, कुषल देसाई आणि चैतन्य देसाई आहेत. तसेच या चित्रपटांचे लेखन जयपूर्णा दास आणि रुद्र प्रताप घोष करणार आहेत.

## राशी-भविष्य

**मेष :** आर्थिक स्थिती आरामदायी राहील, परंतु सध्या पैसे येण्याची शक्यता कमी आहे. दैनंदिन कामे पूर्ण करणे तुमच्या हिताचे असेल.

**वृषभ:** जर तुम्हाला ग्रहांचा चांगला प्रभाव राहावा असे वाटत असेल तर कठोर परिश्रमाला महत्त्व द्या. प्रलंबित कामे प्राधान्याने पूर्ण करा.

**मिथून :** कुटुंबात सामान्य परिस्थिती असू शकते. वैवाहिक जीवनात प्रेमाच्या गोडव्यात कोणतीही घट होणार नाही, परंतु प्रेमींसाठी हा काळ अनुकूल नाही.

**कर्क :** घरात आणि कुटुंबात आनंदाचे वातावरण असेल. नातेवाईकांमध्ये तुमचा आदर वाढेल. उत्पन्न आणि खर्च यांच्यात संतुलन राहील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भावनिक आधारही मिळेल.

**सिंह :** आज उत्पन्नाच्या बाबतीत समस्या येतील. उत्पन्न आणि खर्चाचे संतुलन राखावे लागेल.नोकरीत पगारवाढीची बातमी मिळू शकते.

**कन्या :** खर्च वाढल्यामुळे काही अस्वस्थता येऊ शकते. आवश्यक खर्चासोबत बचत न करता येण्याची वेदना तुम्हाला त्रास देऊ शकते.

**तुळ :** कुटुंबातील एखाद्या सदस्यामुळे त्रास होऊ शकतो. पैशाची आवक होईल, परंतु खर्चावर नियंत्रण ठेवणे शक्य होणार नाही.

**वृश्चिक :** नातेवाईकांना भेटण्याचा कार्यक्रम असू शकतो. तुम्ही निरो-गी आणि तंदुरुस्त राहाल. नोकरी करणाऱ्यांना पदोन्नती मिळू शकते.

**धनु :** तुमचे आरोग्य चांगले राहील. करिअर, व्यवसाय किंवा वैयक्तिक व्यवसायाच्या बाबतीतही वेळ चांगला आहे.

**मकर :** अडकलेले पैसेही परत मिळतील. भांडवली गुंतवणुकीच्या योजना बनतील. कुटुंबातील नवीन सदस्याशी संबंध मजबूत होतील.जोडीदारासोबतचे प्रेमसंबंध गोड राहतील.

**कुंभ :** कुटुंबातील सदस्यांबद्दल चिंता असू शकते. तुमच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या पूर्ण न झाल्यास तुम्हाला तणावाचा सामना करावा लागू शकतो.

**मीन :** आर्थिक स्थितीत आणि व्यवस-ायात काही सुधारणा निश्चित आहे. पैशाचा ओघ देखील शक्य आहे.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

# आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 125




### हे कोडे कसे सोडवाल

संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्दः–**

**दोन अक्षरी**
आब, आप, आज्ञा, कल, काक, खर, घर, चरा, चल, चारा, चारू, तरू, दम, देर, द्रव, पद, पद्य, पाक, पोक, प्रति, पंक, मत, मति, मद्य, रण, लय, वार, साप, सेतु, हार

**तीन अक्षरी**
अनाथ, आभार, ऐपत, गतिक, चरक, चातक, तटस्थ, नायक, पातक, पांचाली, प्रगट, प्रभात, प्रमाद, मवाळ, सोपान, रपका, रमण, रवाना, रसद, रक्षक, लकब, सपक, समुद्र, सामना, सोनार, सोपान

**चार अक्षरी**
अजगर, अलगद, कथाकार, खानसा मा, जलपथ, तकलादू, तळघर, देवघर, पांचजन्य, प्रदूषण, प्रकरण, मेतकूट, रानमेवा, वास्तूशांती, षटकार, सनातन, स्थलचर, संगणक, संघटना

**पाच अक्षरी**
अमरावती, गणेशवात, नाराज होणे, जनानखाना

**सहा अक्षरी**
गणेश चतुर्थी, नाकबूल होणे

**अन्य अक्षरी**
प्रशांत महासागर

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर



Uday Munde - 8446302691

# महाशब्दकोडे 506



**आडवी विधाने:–** 1) स्वातंत्र्यवीर सावरकरांनी सागराला केलेली आर्त विनवणी, ' ने मजसी ने, परत मातृभूमीला ...... या गीतातील नंतरची ओळ
5) सुप्रसिद्ध मंगेशकर घराण्यातील एका संगीतकाराचे फक्त नाव
9) स्वर, छंद
10) सारखे
11) हिंदीत रहस्य
12) साप्ताहिक सुटीचा वार
13) त्यासारखे 14) मराठीत इंजिनियर
15) आठवणीत ठेवण्याजोगे
16) बायकोचा भाऊ
17) आकाश जमिनीचे मीलनस्थळ
18) फळातील रसाळ भाग
19) थंड, गार 21) लहानसा तुकडा
23) लूट, मिळकत (उर्दू)
25) शेतजमिनीवरील सरकारी कर
27) पैश्याची उधळपट्टी करणारा
28) तीर्थक्षेत्री केलेली हजामत
30) श्रीयुतचे संक्षिप्त रुप
32) कस्तुरबा गांधीजींचे संक्षिप्त नाव
34) घोड्याला खाजविणे
35) आंब्याचे बी 36) भारताचे पितामह
39) कॉम्प्युटर
41) आश्रयास जाणे, वर्चस्व मान्य करणे
42) घोड्यावर चढून बसलेला
43) फाक, तुकडा
44) सरसावून घेतलेली उडी
45) गालातल्या गालात किंवा मनातल्या मनात रचलेले
48) अंगावरील कोमल केस
49) झाडाला उगविणारी कोवळी पाने
51) मालक, स्वामी
52) महर्षी वेदव्यासांनी रचलेले एक महाकाव्य
54) तीक्ष्ण, तिखट
55) असं म्हणतात हा पक्षी ओरडला तर घरी पाहूणे येतात
56) ज्याला मरण नाही असा
57) मंत्र तंत्र
58) सापाने घेतलेला चावा
59) रामायणात अंगदचा पिता
61) सहजता, सरळपणा
64) लग्न समारोहासाठी जमलेली मंडळी 66) कर्ज
67) कौशल्य, हातोटी 68) मत्सर, द्वेष
69) विवाहितेच्या आईवडिलांचे घर
70) वरदान देण्यासाठी डोक्यावर ठेवलेला हात
73) फिकीर, पर्वा
75) स्तुती, प्रार्थना, स्तोत्र
77) क्रिकेटमध्ये फलंदाजाने काढलेल्या शंभर धावा
78) पूर्व दिशा
79) विडीचा झुरका, दम
81) लाकूड कापण्याचे हत्यार
83) अगदी मृदू आणि मुलायम कापड
85) पसंती, वेचणे
86) दुसऱ्यांची हुबेहूब नक्कल करणारा
87) होऊन गेलेले
88) हस्त, हात

**उभी विधाने :–** 1) सासूच्या अति धाकामुळे स्वतंत्रपणे वागण्याचे स्वातंत्र्य नसलेली स्त्री, सासरी राहणारी सून
2) राजाचे निवासस्थान
3) संतापाचा अतिरेक आणि बोलण्यात येणारे कठोर वचन
4) फुलाफुलांतील मध गोळा करणारी माशी
5) एक शरीरावयव
6) आंग्ल भाषेत दिलेला होकार
7) एक सारखे देवाचे नाव घेणे
8) महाभारतात कुरुक्षेत्रावरील युद्धाचे धृतराष्ट्राला प्रत्यक्ष वर्णन करुन सांगणारा मंत्री
9) बेंबी
11) राजमहालातील राण्यांचे निवासस्थान
14) सर्पयोनीतील एक प्रचंड आणि सुस्त जीव
20) पुढे होणाऱ्या गोष्टींचे आधीच लागलेले व्यवधान
22) इंद्राजवळ असलेले अस्त्र
24) विचार, अभिप्राय
26) वाल्मिकींनी रचलेले एक महाकाव्य
27) मध्य प्रदेश राज्याच्या एक माजी महिला मुख्यमंत्री (2003 – 2004)
29) शासनकर्त्यांचा जनतेवरील अंमल सुटल्यावर होणारी राज्याची स्थिती
31) आळ, बालंट
33) गणना करणारा 35) काठ, चंद्राची रेघ
36) श्री समर्थ रामदास स्वामींनी लिहिलेला एक ग्रंथ
37)फिर्याद 36) नौकेने सरोवरात मौजेने फिरणे
39) संपत्ती, धनद्रव्य 40) गाल
41) रात्रीच्या जेवणानंतर संथ गतिने थोड्यावेळ पायी फिरणे
46) थोडा सुद्धा अंश
47) सायंकाळी घरी परतणाऱ्या गाईंच्या पावलांनी उडालेली धूळ
50) लहान मुलांबद्दल वाटणारे प्रेम
52) ममत्व, प्रेम
53) तपश्चर्या, चिंतन
54) लग्नायोग्य झालेले तरुण–तरुणी
55) दुष्ट हेतू, कारस्थान
56) अर्थात, खात्रीने, निदान
58) साष्टांग नमस्कार
60) धारदार टोक असलेले
61) सर्वजण, समस्त 62) द्रव, आवड
63) वास्तवात नसलेले
65) हत्तीच्या गंडस्थळातून स्त्रवणारा द्रव
69) आदर 71) रोकड, द्रव्य
72) डोक्यावरचे केस कापणे
74) मर्कट, वानर 76) देश, राज्य
77) मोठे नगर 80) एक ग्रह
82) इतिहासकालीन मजनूची प्रेयसी
84) पक्षी (सं.) (उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर



Uday Munde - 8446302691

# आनंददायी व गुणवत्तापूर्ण शिक्षण हाच केंद्रबिंदू

## शिक्षण मंत्री दादाजी भुसे : चंद्रपूरमध्ये शैक्षणिक गुणवत्ता आढावा बैठक

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**चंद्रपूर, दि. ७ :** 'विद्यार्थी हे आपले दैवत असून, आनंददायी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण हाच विकासाचा केंद्रबिंदू आहे,' असे प्रतिपादन राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केले. चंद्रपूर जिल्हा परिषदेत आयोजित शैक्षणिक गुणवत्ता आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी, त्यांनी 'आयकॉन' शिक्षकांच्या उपक्रमांचे कौतुक करत, इतरांनीही त्यांचा आदर्श घ्यावा, असे आवाहन केले.

जिल्हा परिषदेत आयोजित या शैक्षणिक गुणवत्ता आढावा बैठकीत, मंत्री दादाजी भुसे यांनी शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी ग्रामस्तरावरील शाळांना भेटी देऊन, स्थानिक अडचणी सोडवण्याचे निर्देश दिले. यावेळी मंचावर आमदार किशोर जोरगेवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी गिरीश धायगुडे, विभागीय शिक्षण उपसंचालक माधुरी सावरकर आणि शिक्षणाधिकारी अश्विनी सोनवणे उपस्थित होते. मंत्री भुसे म्हणाले की, शाळांची पटसंख्या वाढवणे आणि 'निपुण शाळा अभियाना'त अधिक मेहनत घेणे आवश्यक आहे. जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय 'अटल क्रीडा स्पर्धा' आणि 'बाळासाहेब ठाकरे कला स्पर्धा' आयोजित केल्या जातील. तसेच, १५ ऑगस्ट रोजी देशभक्तीपर कवायत उपक्रम राबवण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षणाधिकारी अश्विनी सोनवणे आणि राजेश पातळे यांनी केले. संचालन विवेक इत्तडवार यांनी, तर आभार उपशिक्षणाधिकारी विशाल देशमुख यांनी मानले.




### 'आयकॉन' शिक्षकांचा आदर्श घ्या

### 'आयकॉन' शिक्षकांच्या पाठीवर कौतुकाची थाप

आमदार किशोर जोरगेवार यांनी जिल्ह्यातील 'आयकॉन' शिक्षकांच्या उपक्रमांचे कौतुक केले. ते म्हणाले, 'तत्परता आणि कल्पकतेने आपण विद्यार्थी घडवू शकतो.' यावेळी, दीपक गोतावळे, अविनाश जुमडे, गिरीधर पानघाटे, मोहिनी देशमुख, सविता झाडे, अजय मुसळे, अली अजाणी, शिल्पा ठाकरे आणि सोनाली चारवळ या 'आयकॉन' शिक्षकांनी शिक्षणमंत्र्यांसमोर आपापल्या शाळांचे सादरीकरण केले. त्यांच्या या कार्याचा आदर्श संपूर्ण केंद्रातील शाळांनी घ्यावा, असे मंत्री भुसे म्हणाले.

### शिष्यवृत्ती परीक्षा पुन्हा सुरू होणार

शाळांच्या भौतिक सुविधांना शासनाने प्राधान्य दिले असून, अधिकाधिक निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे मंत्री भुसे यांनी सांगितले. विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी पालकांच्या उपस्थितीत करून, प्रत्येकाचे 'हेल्थ कार्ड' तयार केले जाणार आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे, पूर्वीप्रमाणेच इयत्ता चौथी आणि सातवीची शिष्यवृत्ती परीक्षा पुन्हा सुरू करण्याचे नियोजन आहे, अशी महत्वपूर्ण घोषणाही त्यांनी केली. यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाला मोठी चालना मिळणार आहे.

## १५ ऑगस्ट देशभक्तीपर गीतांनी साजरा करा-दादाजी भुसे

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**गडचिरोली दि. ७ :** राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी येत्या १५ ऑगस्ट रोजी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर कवायती सादर करून उत्साहात स्वतंत्र दिन साजरा करण्याचे व या कार्यक्रमांमध्ये स्थानिक नागरिक व पालक यांची प्रत्यक्ष उपस्थिती राहावी, यासाठी शाळांनी योग्य नियोजन करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

शालेय कार्यक्रमांदरम्यान राष्ट्रगीतानंतर राज्यगीत गायन बंधनकारक असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर, जिल्हा परिषद शाळांमध्ये शैक्षणिक आणि मूलभूत सुविधा अधिक बळकट करण्यावर भर देताना त्यांनी शुद्ध पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, स्वच्छ व सुसज्ज स्वच्छतागृह, शालेय इमारतींची दुरुस्ती किंवा नव्या इमारतींचे बांधकाम, ई-सुविधा आणि संगणक लॅब, विज्ञान प्रयोगशाळा, ग्रंथालय आणि खेळाचे मैदान या क्षेत्रांमध्ये लक्ष देण्याचे निर्देश दिले. या सुविधा उभारण्यासाठी कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व निधी मिळवण्यासाठी प्रयत्न करण्याचे त्यांनी सांगितले.

आज गडचिरोली जिल्हा परिषद सभागृहात नियोजित असलेल्या जिल्हा शैक्षणिक गुणवत्ता आढावा बैठकीसाठी ते उपस्थित होते. मात्र गडचिरोली-आरमोरी मार्गावर झालेल्या दुर्दैवी अपघातात चार युवकांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाल्यानंतर, मंत्री दादाजी भुसे यांनी शोक व्यक्त करत ही बैठक तहकूब केली. त्यांनी जाहीर केले की, या बैठकीचा आढावा पुढील दौऱ्यात घेण्यात येईल. यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भुयार, शिक्षण उपसंचालक माधुरी सावरकर, शिक्षणाधिकारी वासुदेव भुसे व बाबासाहेब पवार तसेच सर्व विस्तार अधिकारी व जिल्हा परिषदेचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

**महत्त्वाचे**

### 'आधार' व 'स्वयं' योजनेसाठी विद्यार्थ्यांकडून ऑनलाइन अर्ज आमंत्रित

**चंद्रपूर:** इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेश मिळाला नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी असलेल्या 'ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना' आणि 'पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजने'साठी ऑनलाइन अर्ज मागविण्यात येत आहेत. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या योजनांचा लाभ घेता येणार असून, अर्ज करण्याची अंतिम तारीख १७ ऑगस्ट २०२५ आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या सहायक संचालक आशा कवाडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, जे विद्यार्थी व्यावसायिक आणि बिगर-व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात किंवा पदव्युत्तर पदवीसाठी (व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून) शिक्षण घेत आहेत, ते या योजनांसाठी पात्र आहेत. यासाठी विद्यार्थ्यांनी संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज सादर करावा. अर्जदाराने बारावीत किमान ६० टक्के गुण मिळवलेले असावेत आणि त्याच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाखांपेक्षा कमी असावे. या योजनेसाठी विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा, मात्र तो चंद्रपूरचा स्थानिक रहिवासी नसावा. व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नॉन-क्रिमिलेअर आणि जात वैधता प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे.

### नद्यांच्या पर्यावरणीय समतोलासाठी कृत्रिम वाळू धोरण: जिल्हाधिकारी

**अकोला:** नद्यांच्या पर्यावरणीय समतोलासाठी राज्य शासनाने नैसर्गिक वाळूला पर्याय म्हणून कृत्रिम वाळूचा ( एम सँड) पर्याय उपलब्ध करून दिला आहे. जिल्हा प्रशासनाने कृत्रिम वाळूचे उत्पादन वाढविण्यासाठी पुढाकार घेतला जात असून कृत्रिम वाळू उद्योगांचा विकास होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज येथे केले.

महसूल सप्ताह समारोपानिमित्त नियोजनभवनात आयोजित कृत्रिम वाळू धोरण कार्यशाळेत बोलत होते. प्र. अपर जिल्हाधिकारी महेश परांडेकर,उपजिल्हाधिकारी निखील खेमनार, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी महेश भिवापूरकर, जिल्हा खनिकर्म अधिकारी विशाल धांडे ,भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा उपसंचालक श्री कराळे, जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी अनिल चिंचोले, तहसीलदार सुरेश कव्हळे, सी.ए पंकज अग्रवाल आदी उपस्थित होते.

# 'पैशा'साठी मित्रानेच केला मित्राचा घात

## १५ लाखांना गंडा, तिघेही अटकेत

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**उमरखेड, दि.७ :** पैसे दुप्पट करून देण्याच्या आमिषाने मित्रांनीच मित्राला १५ लाखांना गंडविल्याचा प्रकार उमरखेड तालुक्यात उघडकीस आला आहे. हार्वेस्टर विकून आणलेली रक्कम आरोपींनी केमिकलच्या नावाखाली लंपास केली. याप्रकरणी पोफाळी पोलिसांनी तिघांनाही बेड्या ठोकल्या असून, फसवणुकीच्या या नव्या प्रकाराने तालुक्यात खळबळ उडाली आहे. उमरखेड तालुक्यातील शांतीनगर, मुळावा येथील फिर्यादी कपिल बाबुराव गायकवाड (वय २१) याला त्याच्याच मित्रांनी पैशांच्या जाळ्यात ओढले. कपिलने २४ जून रोजी १३ लाखांना हार्वेस्टर विकत घेतले होते, मात्र कर्जाचा बोजा वाढल्याने तो आपला जुना मित्र बंडू दिगंबर ढाकरे याच्याकडे मदतीसाठी गेला. बंडूने सुरुवातीला किरकोळ मदत करून कपिलचा विश्वास संपादन केला आणि नंतर 'पैसे दुप्पट' करून देणाऱ्या व्यक्तीची ओळख असल्याचे सांगितले. त्याच्यावर विश्वास ठेवून, कपिलने आपली हार्वेस्टर १२ लाखांना विकली आणि त्यातील १० लाख रुपये बंडूच्या सल्ल्याने पिंपरी येथे नेले. तेथे बंडू, गोपाल हनुमान कुरकुटे आणि किसन गोविंदा आढाव या तिघांनी मिळून कपिलला गंडवले. याच टोळीने पिंपळदरी येथील सखाराम खोबरे यांचीही सात लाखांची फसवणूक केल्याचे उघड झाले आहे.

### 'चकाकते ते सारे सोने नसते'

आरोपींनी कपिलचा विश्वास जिंकण्यासाठी एक 'डेमो' दाखवला. गोपाल नावाच्या इसमाने, पाचशेच्या नोटा केमिकलने दुप्पट कशा होतात, हे दाखवले. यावर विश्वास ठेवून, कपिलने आपल्याकडील रक्कम एका टाकीत टाकली. आरोपींनी त्यावर केमिकल ओतून, 'तीन दिवसांनी स्फोट होऊ नये म्हणून सावध राहा,' असे सांगून कपिल आणि त्याच्या पत्नीला घराबाहेर काढले. याच संधीचा फायदा घेऊन, आरोपींनी पैशांवर डल्ला मारला.

### पोलिसांपुढे नाही चालले 'ढोंग'

फसवणुकीची ही नवी पद्धत आणि गुंतागुंत पाहता, पोफाळी पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली. कपिल गायकवाड यांच्या तक्रारीनंतर, ठाणेदार पंकज दाभाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तात्काळ कारवाई केली. आरोपींनी वापरलेली धुर्तता आणि फसवणुकीची पद्धत लक्षात घेऊन, पोलिसांनी वेगाने तपास करत तिन्ही आरोपींना गजाआड केले. या तत्पर कारवाईमुळे पोलिसांचे कौतुक होत आहे.

# बालकांबाबत पोलिसांनी संवेदनशीलपणे काम करावे

## अ‍ॅड. संजय सेंगर; यवतमाळ येथे 'विशेष बाल पोलिस पथका'साठी प्रशिक्षण कार्यशाळा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.७:** पीडित आणि गरजवंत बालकांबाबत पोलिसांनी संवेदनशीलणे काम करावे, असे आवाहन राज्य बाल हक्क आयोगाचे माजी सदस्य अ‍ॅड. संजय सेंगर यांनी केले. ते यवतमाळ येथे 'विशेष बाल पोलिस पथक' आणि 'बाल कल्याण पोलिस अधिकाऱ्यांसाठी आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करीत होते.

जिल्ह्यातील 'विशेष बाल पोलिस पथक' आणि 'बाल कल्याण पोलिस अधिकाऱ्यां'साठी, मुलांशी संबंधित कायद्यांवर विशेष प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. जिल्हा बाल संरक्षण कक्ष आणि पोलिस विभागाने संयुक्तपणे आयोजित केलेल्या या कार्यशाळेत, तज्ज्ञांनी विविध कायद्यांची सविस्तर माहिती दिली आणि पोलिसांच्या भूमिकेवर मार्गदर्शन केले. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, जिल्हा बाल संरक्षण कक्ष आणि जिल्हा पोलिस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने, मंगळवारी (दि. ५) पोलिस मुख्यालयातील प्रेरणा सभागृहात ही कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी अप्पर पोलिस अधीक्षक अशोक थोरात होते.

यावेळी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी विशाल जाधव, बालकल्याण समिती सदस्य अनिल गायकवाड, प्रमुख न्यायदंडाधिकारी (बाल न्याय मंडळ) एस. एम. जोशी, राज्य बाल हक्क आयोगाचे माजी सदस्य अ‍ॅड. संजय सेंगर, बालकल्याण समिती अध्यक्ष वासुदेव डायरे, पोलिस निरीक्षक दीपमाला भेंडे आणि जिल्हा बाल संरक्षण अधिकारी देवेंद्र राजूरकर उपस्थित होते. यावेळी प्रमुख न्यायदंडाधिकारी एस. एम. जोशी यांनी विशेष बाल पोलिस पथकांतर्गत पोलिसांची विधिसंघर्षग्रस्त बालकाबाबत भूमिका व कर्तव्ये, बालकांच्या सोबत पुनर्वसनात्मकदृष्टीने काम होणे का गरजेचे आहे, विधिसंघर्षग्रस्त बालकाबाबत वयाचा पुरावा, आवश्यक प्रक्रिया व कागदपत्रे, गुन्ह्याचे स्वरूप त्यानुसार करण्यात आलेले वर्गीकरण याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. श्री. वासुदेव डायरे यांनी बाल कल्याण समितीची रचना, विशेष बाल पोलिस पथकांतर्गत पोलिसांची काळजी संरक्षणाची गरज असलेल्या बालकाबाबत भूमिका व कर्तव्ये, पीडित बालकांच्या सोबत संवेदनशीलपणे व तत्परतेने सर्व विभागाने काम करणे आवश्यक आहे, याबाबत मार्गदर्शन केले. देवेंद्र राजूरकर यांनी जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे कार्य स्वरूप व चाइल्ड हेल्प लाइन, बाल संगोपन योजना, अनाथ प्रमाणपत्राबाबत माहिती दिली. या कार्यशाळेच्या यशस्वितेकरिता पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अप्पर पोलिस अधीक्षक अशोक थोरात, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी विशाल जाधव यांचे मार्गदर्शन लाभले तसेच विशेष बाल पोलिस पथकाच्या पोलिस निरीक्षक दीपमाला भेंडे व पोलिस कर्मचारी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष व चाइल्ड हेल्प लाइनचे अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. या कार्यशाळेसाठी जिल्ह्यातील सर्व पोलिस स्टेशनमधून नेमण्यात आलेले पोलिस अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. देवेंद्र राजूरकर यांनी प्रास्ताविक केले. माधुरी पावडे यांनी संचालन केले. महेश हळदे यांनी आभार मानले.




यवतमाळ : कार्यशाळेला उपस्थित अप्पर पोलिस अधीक्षक अशोक थोरात, प्रमुख न्यायदंडाधिकारी एस. एम. जोशी, अ‍ॅड. संजय सेंगर, विशाल जाधव, अनिल गायकवाड व इतर.

### बाल न्याय मंडळ आणि बालकल्याण समितीची भूमिका

बाल न्याय मंडळाच्या प्रमुख न्यायदंडाधिकारी एस. एम. जोशी यांनी, विधिसंघर्षग्रस्त बालकांबाबत पोलिसांची भूमिका स्पष्ट केली. तर, बालकल्याण समितीचे अध्यक्ष वासुदेव डायरे यांनी, काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांबाबत पोलिसांनी संवेदनशीलपणे आणि तत्परतेने काम करण्याचे महत्त्व सांगितले. दोन्ही यंत्रणांसोबत समन्वय साधण्याचे आवाहनही त्यांनी केले.

# अल्पसंख्याक शाळांमध्ये ७ दिवसांत सुरक्षा समित्या स्थापन करा -प्यारे खान

## नागपुरात अल्पसंख्याक आयोगाची सुनावणी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**नागपूर, दि. ७ :** नागपूर विभागातील सर्व अल्पसंख्याक शाळांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी, ७ दिवसांच्या आत आवश्यक समित्या स्थापन करून अहवाल सादर करावा, अन्यथा कारवाईला सामोरे जावे लागेल, असे सक्त निर्देश महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी दिले आहेत. नागपूर येथे आयोजित विशेष बैठकीत ते बोलत होते.

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांच्या अध्यक्षतेखाली, गुरुवारी (दि. ७) नियोजन भवनात अल्पसंख्याक शाळांचे संस्थाचालक, मुख्याध्यापक आणि संबंधित अधिकाऱ्यांची विशेष बैठक पार पडली.

यावेळी, शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. अध्यक्ष प्यारे खान म्हणाले की, 'विद्यार्थ्यांची सुरक्षा ही कोणत्याही शाळेची प्राथमिक जबाबदारी आहे. शासन निर्णयानुसार प्रत्येक शाळेत आवश्यक समित्या स्थापन करणे बंधनकारक असून, याच्या अंमलबजावणीत कोणतीही हयगय सहन केली जाणार नाही.' या बैठकीला शिक्षणाधिकारी (माध्यमिक) निखिल भोयर, उपजिल्हाधिकारी सचिन गोसावी, अधीक्षक सचिन नाथ, जिल्हा बाल रक्षक समन्वयक प्रसनजीत गायकवाड आणि आयोगाचे अधिकारी मुश्ताक पठाण व गणेश सुरवसे उपस्थित होते. बैठकीत अनेक मुख्याध्यापकांनी निधी आणि धोरणात्मक अडचणी मांडल्या. यावर, आपण स्वतः मुख्यमंत्री आणि शिक्षणमंत्र्यांशी चर्चा करून पाठपुरावा करू, असे आश्वासन प्यारे खान यांनी दिले.



### 'या' समित्या करणे बंधनकारक

शासन निर्णयानुसार, प्रत्येक शाळेमध्ये शाळा व्यवस्थापन समिती, महिला तक्रार निवारण समिती, विद्यार्थी सुरक्षा समिती आणि भौतिक सुविधा विकसन समिती स्थापन करणे बंधनकारक आहे. शाळा व्यवस्थापनात पारदर्शकता आणण्यासाठी आणि गैरप्रकार रोखण्यासाठी या समित्या अत्यावश्यक आहेत. ७ दिवसांच्या आत या समित्या स्थापन करून, तसा अहवाल शालेय शिक्षण विभागाला सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय, मानोरा ता. मानोरा जि. वाशिम**
दुरध्वनी कंमाक -०७२५३-२६३२४६
Email Address tahsildarmanora@gmail.com
क्रं. जन्म-मृत्यु नोंदणी /म.स./कावि-४८८/२०२५

दिनांक ०६/०८/२०२५

**जाहिरनामा**

अर्जदार :- धनराज झिंगराजी भड रा. यशंवतनगर ता. मानोरा जि. वाशिम
...विरूध्द ...
गैरअर्जदार :- ग्राम पंचायत कार्यालय, कार्ली ता. मानोरा जि. वाशिम.
बनाम :- सर्व नागरिक

याव्दारे सार्वत्रिक लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, प्रस्तुत प्रकरणात अर्जदार धनराज झिंगराजी भड रा. यशंवतनगर ता. मानोरा जि. वाशिम येथील रहिवासी असून यांनी स्वतःचे मुलाचे नावाने जन्म नोंदीचा आदेश ग्राम पंचायत कार्यालय, कार्ली ता. मानोरा जि. वाशिम येथे आदेश मिळणेकामी विनंती अर्ज केलेला आहे. अर्जदाराचे स्वतःचे मुलांचे नामे स्वप्नील धनराज भड यांचा जन्म दिनांक २०/०४/२००७ रोजी अर्जदाराचे राहते घरी मौजा यशवंतनगर ता. मानोरा जि. वाशिम येथेच झालेला आहे. असे जन्म नोंदणी निबंधक यांचे अभिप्रायात नमुद आहे. परंतु ग्राम पंचायत कार्यालय, कार्ली येथे गेले असता अर्जदाराचे स्वत:चा मुलाचा जन्म नोंदीचा अभिलेख आढळला नाही. अर्जदाराकडून जन्म नोंद अनावधानाने करण्यात आलेले नाही. त्यासाठी ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत कार्यालय, कार्ली यांचे कडून जन्म नोंद नसल्याचा अभिप्रायासह अनुउपलब्धता प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.

प्रकरणात अर्जदारानी आधार कार्ड, सचिव, ग्राम पंचायत, कार्ली यांचा जन्म नोंद अनुउपलब्धता प्रमाणपत्र, पो. पाटील यांचा रहिवासी प्रमाणपत्र, ज्यु कॉलेज टि.सी., वंशावळ, शिधापत्रिका, ई. कागदपत्रे याप्रकरणा सोबत जोडलेले आहे. तरी वरिलप्रमाणे तारिख नमुद करून ग्राम पंचायत कार्यालय, कार्ली ता. मानोरा येथे जन्म-मृत्यु नोंदणी कायदा सन १९६९ चे कलम १३ (३) २०२३ अन्वये जन्म नोंद होण्याकरिता विनंती अर्ज केलेला आहे.

करिता सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्वतःचे मुलांचा जन्म मौजा यशवंतनगर ता. मानोरा येथे झालेले आहे. परंतु सदरचा दस्त / अभिलेख उपलब्ध नसल्याने जन्म नोंद ग्राम पंचायत कार्यालय, कार्ली ता. मानोरा यांचे अभिलेखावर घेवून जन्माचे प्रमाणपत्र मिळणेकामी कोणाचेही हितसंबंध असल्यास, कोणाचेही उजर असल्यास अथवा कोणास आक्षेप घ्यावयाचे असेल तर हा जाहिरनामा वृत्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत किंवा नेमलेल्या नेमलेल्या तारखेच्या दिवशी न्यायालयात हजर होवून आपली हरकती लेखी स्वरूपात कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर उपरोक्त मुदतीचे आत कोणीही योग्य हरकत न दाखविल्यास सदरहु न्यायालय उपरोक्त अर्जदारास त्यांच्या स्वतःचे मुलांचा जन्म नोंदणी करण्याबाबत लागलीच पुरावा घेवुन अर्ज निकाली काढण्यात येईल मंजुर करण्यात येईल.
आज दिनांक ०६/०८/२०२५ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले.

(डॉ. संतोष येवलीकर)
तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, मानोरा

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय, मानोरा ता. मानोरा जि. वाशिम**
दुरध्वनी कंमाक -०७२५३-२६३२४६
Email Address tahsildarmanora@gmail.com
क्रं. जन्म-मृत्यु नोंदणी /म.स./कावि- ४८९/२०२५

दिनांक ०७/०८/२०२५

**जाहिरनामा**

अर्जदार :- गणेश बाळकृष्ण रत्ने रा. यशवंतनगर ता. मानोरा जि. वाशिम
...विरूध्द ..
गैरअर्जदार :- ग्राम पंचायत कार्यालय, कार्ली ता. मानोरा जि. वाशिम
बनाम :- सर्व नागरिक

याव्दारे सार्वत्रिक लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, प्रस्तुत प्रकरणात अर्जदार गणेश बाळकृष्ण रत्ने रा. यशवंतनगर ता. मानोरा जि. वाशिम येथील रहिवासी असून यांनी स्वतःचे मुलाचे नावाने जन्म नोंदीचा आदेश ग्राम पंचायत कार्यालय, कार्ली ता. मानोरा जि. वाशिम येथे आदेश मिळणेकामी विनंती अर्ज केलेला आहे. अर्जदाराचे स्वतःचे मुलांचे नामे रोहन गणेश रत्ने यांचा जन्म दिनांक ०८/१२/२०१० रोजी अर्जदाराचे राहते घरी मौजा यशवंतनगर ता. मानोरा जि. वाशिम येथेच झालेला आहे. असे जन्म नोंदणी निबंधक यांचे अभिप्रायात नमुद आहे. परंतु ग्राम पंचायत कार्यालय, कार्ली येथे गेले असता अर्जदाराचे स्वत:चा मुलाचा जन्म नोंदीचा अभिलेख आढळला नाही. अर्जदाराकडून जन्म नोंद अनावधानाने करण्यात आलेले नाही. त्यासाठी ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत कार्यालय, कार्ली यांचे कडून जन्म नोंद नसल्याचा अभिप्रायासह अनुउपलब्धता प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.
प्रकरणात अर्जदारानी आधार कार्ड, सचिव, ग्राम पंचायत, कार्ली यांचा जन्म नोंद अनुउपलब्धता प्रमाणपत्र, पो. पाटील यांचा रहिवासी प्रमाणपत्र, शाळेचा बोनाफाईड प्रमाणपत्र, वंशावळ, शिधापत्रिका, ई. कागदपत्रे याप्रकरणा सोबत जोडलेले आहे. तरी वरिलप्रमाणे तारिख नमुद करून ग्राम पंचायत कार्यालय, कार्ली ता. मानोरा येथे जन्म-मृत्यु नोंदणी कायदा सन १९६९ चे कलम १३ (३) २०२३ अन्वये जन्म नोंद होण्याकरिता विनंती अर्ज केलेला आहे.
करिता सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्वतःचे मुलांचा जन्म मोजा यशवंतनगर ता. मानोरा येथे झालेले आहे. परंतु सदरचा दस्त/ अभिलेख उपलब्ध नसल्याने जन्म नोंद ग्राम पंचायत कार्यालय, कार्ली ता. मानोरा यांचे अभिलेखावर घेवून जन्माचे प्रमाणपत्र मिळणेकामी कोणाचेही हितसंबंध असल्यास, कोणाचेही उजर असल्यास अथवा कोणास आक्षेप घ्यावयाचे असेल तर हा जाहिरनामा वृत्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत किंवा नेमलेल्या नेमलेल्या तारखेच्या दिवशी न्यायालयात हजर होवून आपली हरकती लेखी स्वरूपात कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर उपरोक्त मुदतीचे आत कोणीही योग्य हरकत न दाखविल्यास सदरहु न्यायालय उपरोक्त अर्जदारास त्यांच्या स्वतःचे मुलांचा जन्म नोंदणी करण्याबाबत लागलीच पुरावा घेवून अर्ज निकाली काढण्यात येईल मंजुर करण्यात येईल.
आज दिनांक ०७/०८/२०२५ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले.

(डॉ. संतोष येवलीकर)
तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, मानोरा

**Dr. Panjabrao Deshmukh Naisargik Sheti Mission, Akola**
**Project Management Unit (PMU), Akola**

**EXPRESSION OF INTEREST**

EOI/proposals are invited from the interested CAG empaneled Audit firms conducting audit of Dr. Panjabrao Deshmukh Naisargik Sheti Mission for FY 2024-25 Details of Terms of References (TOR) & Application Forms etc. are available on can be obtained from Project Management Office (PMU) in personal from address mention below, be or sending a request on email address pdorganicfarmingmission@gmail.com.

The details are as below.

Name of Mission/Project : Dr Panjabrao Deshmukh Naisargik Sheti Mission Akola
Office of Mission : Project Management Unit (PMU) Dr PDKY Campus Akola
Area of Mission : All Districts of Maharashtra
Area of PMU (for Audit) : Akola, Amravati, Buldhana, Washim, Yavatmal & Wardha

1. Last date & time of submission of EOI : 25.08.2025
2. Date & time of opening of technical proposal : 26.08.2025
3. Date & time of opening of financial proposal : 26.08.2025
4. Both Technical & Financial proposals (Original hard copy duly signed by the authorized signature) should be submitted in separate sealed envelope marked on as **"Technical Proposal" & "Financial Proposal".**
5. Both envelopes shall be placed in one sealed envelope addressed to
**"Dr. Panjabrao Deshmukh Naisargik Sheti Mission, Rajgruha, gate no. 5/6, Dr. PDK Vidyapeeth campus, Murtijapur road, Akola - 444001 (Maharashtra State).**
And reach the office by hand or by post on or before **20.08.2025 05:00 PM.**
(Please do not email the technical or financial Bid on office or other Email, which shall consider disqualified.)
6. Financial Bids shall be opened only for those who have been qualified in technical Bid.
7. Bids shall be open at the **Dr. Panjabrao Deshmukh Naisargik Sheti Mission, Rajgruha, gate no. 5/6, Dr. Panjabrao Deshmukh Krushi Vidyapeeth campus, Murtijapur road, Akola - 444001 (Maharashtra State)**

**Dr. Panjabrao Deshmukh Naisargik Sheti Mission, Akola**
**Request for Expression of Interests**
**Invitation of for empanelment of Chartered Accountants/Auditor Firm**

The Maharashtra government has set up Dr. Panjabrao Deshmukh Naisargik Sheti Mission for promoting organic agriculture in the state by passing a government resolution on 27th Jun 2023 under the state sponsored scheme. The mission will be implemented in all the districts of Maharashtra for the promotion of Organic Agriculture on a cluster basis.

Project Management Unite (PMU) invites Request for Expression of interest for Chartered Accountants/ Auditor Firm for conducting audit for FY 2024-2025

**Chartered Accountants/Auditor Firm - 01**

Project Management Unite (PMU), Dr. Panjabrao Deshmukh Naisargik Sheti Mission invites applications from the eligible reputed Agencies/Firms to submit expression of interest for the above-mentioned categories.

Details of Terms of reference (TOR) and application form can be obtained from PMU office in personal from address mentioned below or by sending a request on email address pdorganicfarmingmission@gmail.com.

The interested Agencies/ Firms shall submit their application with the subject line of the caption category on top of sealed envelope to the address mentioned below. REOIS shall be submitted by 25/08/2025 up to 05:00

**Project Director**
**Dr. Panjabrao Deshmukh Naisargik Sheti Mission**
**Project Management Unit (PMU)**
**Rajgruha, Gate no-5 & 6 Dr. Panjabrao Deshmukh Krushi Vidyapith Akola -444104**

महत्त्वाचे

## यश दयालच्या अटकेला स्थगिती नाही




**नवी दिल्ली:** आयपीएलमधील रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचा वेगवान गोलंदाज यश दयाल याला राजस्थान उच्च न्यायालयाने मोठा धक्का दिला आहे. अल्पवयीन मुलीवर कथित बलात्काराच्या आरोपाप्रकरणी यश दयालच्या अटकेस अंतरिम स्थगिती देण्यास न्यायालयाने नकार दिला आहे. न्यायमूर्ती सुदेश बंसल यांनी जयपूर येथे या प्रकरणाची सुनावणी करताना केस डायरी मागवली असून पुढील सुनावणी २२ ऑगस्ट रोजी निश्चित केली आहे.यश दयालचे वकील कुणाल जैमन यांनी युक्तिवाद करताना हा संपूर्ण प्रकार क्रिकेटरला बदनाम करण्याचा डाव असल्याचा दावा केला आहे. त्यांनी सांगितले की, याचप्रमाणे गाझियाबाद येथेही बलात्काराचा खटला दाखल झाला होता, ज्यावर अलाहाबाद उच्च न्यायालयाने स्थगिती दिली होती.

# ऑस्ट्रेलियन संघाची घोषणा!

## भारताविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी सॅम कॉन्स्टासलाचा समावेश




### संघांची घोषणा

**■ ऑस्ट्रेलियाचा चार-दिवसीय संघ**

झेवियर बार्टलेट, जॅक एडवर्ड्स, कूपर कोनोली, सॅम कॉन्स्टास, ॲरॉन हार्डी, कॅम्पबेल केलावे, नॅथन मॅकस्वीनी, लान्स मॉरिस, टॉड मर्फी, फर्गस ओनील, ऑलिव्हर पीक, जोश फिलिप, कोरी रोचिचिओली, लियाम स्कॉट.

**■ ऑस्ट्रेलियाचा एकदिवसीय संघ**

कूपर कोनोली, हॅरी डिक्सन, जॅक एडवर्ड्स, सॅम इलियट, कॅलम विडलर, जेक फ्रेझर-मॅकगर्क, ॲरॉन हार्डी, मॅकेन्झी हार्वे, टॉड मर्फी, तनवीर संघा, लियाम स्कॉट, लॅची शॉ, टॉम स्ट्रॅकर, विल सदरलँड.

**नवी दिल्ली: दि.७ प्रतिनिधी**

येत्या सप्टेंबर महिन्यात होणाऱ्या भारत दौऱ्यासाठी क्रिकेट ऑस्ट्रेलियाने आपल्या अ संघाची घोषणा केली आहे. या महत्त्वपूर्ण दौऱ्यात दोन चार-दिवसीय आणि तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळवली जाणार आहे. या संघात युवा फलंदाज सॅम कॉन्स्टास याला स्थान देण्यात आले असून, २०२७ साली होणाऱ्या बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीच्या तयारीचा एक भाग म्हणून या दौऱ्याकडे पाहिले जात आहे.विशेष म्हणजे, २०२७ मध्ये भारतात होणाऱ्या बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीच्या पार्श्वभूमीवर या संघाची निवड करण्यात आली आहे. या दौऱ्याच्या माध्यमातून युवा ऑस्ट्रेलियन खेळाडूंना भारतीय खेळपट्ट्यांवर आणि येथील वातावरणात खेळण्याचा अनुभव मिळेल. भविष्यात होणाऱ्या मुख्य कसोटी मालिकेसाठी हा अनुभव अत्यंत मोलाचा ठरू शकतो, असे क्रिकेट ऑस्ट्रेलियाचे मत आहे.भारत अ विरुद्धच्या या दौऱ्यासाठी युवा फलंदाज सॅम कॉन्स्टासचा संघात समावेश करण्यात आला आहे. कॉन्स्टासने भारताविरुद्धच्या बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीमध्येच आपले कसोटी पदार्पण केले होते. आपल्या पदार्पणाच्या सामन्यात त्याने उत्कृष्ट खेळी करत सर्वांना प्रभावित केले होते. तथापि, त्यानंतर त्याला संघात आपले स्थान टिकवून ठेवण्यात अपयश आले आणि त्याच्या कामगिरीतही सातत्य राहिले नाही. या दौऱ्यातील निवडीमुळे इंग्लंडविरुद्धच्या आगामी ॲशेस मालिकेसाठी त्याची निवड होण्याची शक्यता कमी मानली जात आहे.भारत अ आणि ऑस्ट्रेलिया अ यांच्यातील ही मालिका सप्टेंबर महिन्यात खेळवली जाईल. या दौऱ्याची सुरुवात १६ सप्टेंबर रोजी लखनौ येथील अटलबिहारी वाजपेयी स्टेडियमवर होणाऱ्या सामन्याने होईल.

# 'वर्कलोड'च्या नावाखाली मनमानी नको!




## 'बीसीसीआय'चा खेळाडूंना सज्जड दम

**नवी दिल्ली, दि.७ प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेटमधील 'स्टार संस्कृती'ला नवे प्रशिक्षक गौतम गंभीर आणि निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांनी सुरुंग लावण्यास सुरुवात केली आहे. 'वर्कलोड मॅनेजमेंट'च्या नावाखाली महत्त्वाच्या मालिकांमधून माघार घेणाऱ्या खेळाडूंची मनमानी आता खपवून घेतली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश 'बीसीसीआय'ने दिला आहे. इंग्लंड दौऱ्यात मोहम्मद सिराजने दाखवलेल्या अविश्वसनीय तंदुरुस्ती आणि कामगिरीमुळे व्यवस्थापनाचे हात बळकट झाले आहेत.इंग्लंडविरुद्धच्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेत सिराजने तब्बल १८५.३ षटके टाकली. त्याची ही अथक मेहनत आता संघातील इतर खेळाडूंसाठी एक मापदंड बनली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, 'बीसीसीआय'चे पदाधिकारी, प्रशिक्षक गंभीर आणि निवड समितीत 'वर्कलोड'च्या नावाखाली होणाऱ्या खेळाडूंच्या मनमानी कारभाराला चाप लावण्यावर एकमत झाले आहे.

## महिला कर्मचाऱ्यांसोबत लज्जास्पद वर्तन



**नवी दिल्ली:** लंडनमधून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. एका काउंटी क्रिकेट प्रशिक्षकावर ९ महिन्यांची क्रिकेटमधून बंदी घातली गेली आहे. दोन ज्युनियर महिला कर्मचाऱ्यांसोबत वाईट वर्तन आणि अश्लील फोटो पाठवल्याबद्दल काउंटी क्रिकेट प्रशिक्षकावर ही बंदीची कारवाई करण्यात आली आहे.महिला कर्मचाऱ्यांसोबत लज्जास्पद वर्तन करणाऱ्या प्रशिक्षकाला ठोठावण्यात आलेल्या ९ महिन्यांच्या बंदीच्या शिक्षेपैकी ३ महिन्यांची शिक्षा सध्या निलंबित राहील. जर भविष्यात प्रशिक्षकाने कोणती देखील चूक केली नाही तर हे ३ महिने माफ करण्यात येऊ शकतात. म्हणजेच, जर तो ठीक राहिला तर त्याला फक्त ६ महिनेच शिक्षा भोगावी लागणार आहे.




## आयपीएलमधील भविष्याबाबत धोनीने मौन सोडले

**नवी दिल्ली, दि.७ प्रतिनिधी**

माजी भारतीय क्रिकेटपटू व चेन्नई सुपरकिंग्स (सीएसके) संघातील अनुभवी खेळाडू महेंद्रसिंह धोनी यंदा इंडियन प्रीमियर लीगमधून (आयपीएल) निवृत्ती घेणार असल्याच्या चर्चा चालू आहेत. दरम्यान, धोनीने यावर एक महत्वाची टिप्पणी केली आहे. धोनीने स्पष्ट केलं आहे की सीएसकेबरोबरचे त्याचे संबंध खूप घनिष्ट आहेत आणि ते यापुढेही कायम राहतील. धोनी आयपीएलच्या पुढच्या हंगामात खेळणार की नाही यावर धोनीने स्पष्ट प्रतिक्रिया दिलेली नसली तरी तो या फ्रेंचायझीबरोबर कायम असेल असं त्याने म्हटलं आहे. धोनी म्हणाला, त्याच्या कारकिर्दीत पुढे कोणत्याही गोष्टी घडल्या तरी तो नेहमीच सीएसकेबरोबर असेल.धोनीशिवाय सीएसके अशी प्रतिमा देखील डोळ्यांसमोर उभी राहत नाही, असं सीएसके व धोनीचे चाहते नेहमीच म्हणत असतात. धोनीलाही चाहत्यांच्या या प्रेमाची कल्पना आहे. दरम्यान, ४४ वर्षीय धोनीने स्पष्ट केलं आहे की सक्रीय खेळाडू असताना आणि त्यानंतरही तो सीएसकेबरोबर असेल.

■ काही दिवसांपूर्वी धोनीने चेन्नईत आयोजित एका खासगी कार्यक्रमात ही टिप्पणी केली होती, जी आता समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहे.धोनी म्हणाला, ''मी नेहमीच सांगत आलोय की माझ्याकडे निर्णय घेण्यासाठी खूप वेळ आहे. परंतु, तुम्ही जर पिवळ्या जर्सीमध्ये पुनरागमन करण्याबाबत विचारत असाल तर मी त्याबद्दल एवढंच सांगेन की मी नेहमीच पिवळ्या जर्सीमध्ये असेन. मी खेळत असेन किंवा नसेन ती वेगळी गोष्ट आहे. परंतु, मी आणि सीएसके एकत्र आहोत. पुढची १५-२० वर्षे आम्ही एकत्रच असू.'

■ 'धोनी २००८ पासून म्हणजेच आयपीएलच्या सुरुवातीपासून सीएसकेच्या संघाचा भाग आहे. धोनीने आता चेन्नई सुपरकिंग्स संघाचं कर्णधारपद सोडलं आहे. मात्र, आयपीएल २०२५ मध्ये नियमित कर्णधार ऋतुराज गायकवाडला दुखापत झाल्यामुळे त्याला स्पर्धा अर्ध्यातूनच सोडून जावं लागलं. त्यानंतर उर्वरित सामन्यांमध्ये धोनीने संघाचं नेतृत्व केलं. परंतु, पाच वेळा चेन्नईला आयपीएलचं विजेतेपद मिळवून देणारा धोनी यंदा संघासाठी कुठल्यही आघाडीवर उत्तम कामगिरी करू शकला नाही. हा संघ गुणतालिकेच्या तळाशी राहिला.




## 'आयसीसी'च्या पुरस्कारासाठी गिलला नामांकन

**दुबई: दि.७ प्रतिनिधी**

भारताच्या कसोटी संघाचा कर्णधार शुभमन गिलला आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) जुलै महिन्यासाठी सर्वोत्तम खेळाडूच्या पुरस्कारासाठी नामांकन मिळाले आहे. त्याची दक्षिण आफ्रिकेचा वियान मुल्डर आणि इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्स या अष्टपैलू खेळाडूंशी स्पर्धा आहे.गिलने इंग्लंडविरुद्ध नुकत्याच झालेल्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत फलंदाजीत अनेक विक्रम रचले. गिलने मालिकेत ७५.४०च्या सरासरीने आणि चार शतकांच्या मदतीने ७५४ धावा केल्या. यामध्ये एका द्विशतकाचाही समावेश आहे. कसोटी मालिकेत भारतीय कर्णधाराने केलेल्या सर्वाधिक धावांचा सुनील गावस्कर (७३२ धावा) यांचा विक्रम गिलने मोडीत काढला.गिल सार्वकालिक कर्णधारांच्या यादीत, सर डॉन ब्रॅडमननंतर (८१० धावा) दुसऱ्या स्थानावर आहे. दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार म्हणून आपल्या पहिल्याच सामन्यात मुल्डरने झिम्बाब्वेविरुद्ध नाबाद ३६७ धावांची खेळी केली. त्याला ब्रायन लाराचा नाबाद ४०० धावांचा विक्रम मोडीत काढण्याची संधी होती, मात्र त्याने संघाचा डाव घोषित केला. त्याने मालिकेतील दोन सामन्यांत २६५.५० च्या सरासरीने ५३१ धावा केल्या. दुसरीकडे, इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सने भारताविरुद्ध चार सामने खेळताना फलंदाजीत ५०.२०च्या सरासरीने २५१ धावा केल्या, तर गोलंदाजीत १२ बळीही मिळवले.

## न्युझीलंडच्या अडचणी वाढल्या!

### दुखापतीमुळे कॅप्टन मालिकेमधून बाहेर

**नवी दिल्ली, दि.७ प्रतिनिधी**

न्युझीलंड विरुद्ध झिम्बाम्वे यांच्यामध्ये सध्या दोन सामन्यांची कसोटी मालिका सुरु आहे. या मालिकेचा पहिला सामना झाला आहे, या सामन्यामध्ये न्युझीलंडच्या संघाने विजय मिळवुन झिम्बाम्वेच्या संघाविरुद्ध मालिकेमध्ये १-० अशी आघाडी घेतली आहे. आजपासुन या मालिकेच्या दुसऱ्या सामन्याला सुरुवात होणार आहे. या मालिकेमध्ये न्युझीलंडच्या संघाचे कर्णधारपद हे टॉम लॅथम यांच्याकडे होते. त्याने पहिल्या सामन्यामध्ये संघाची कमाना चांगली सांभाळली होती. आता न्युझीलंडच्या संघाला मोठा धक्का बसला आहे.मालिकेतील पहिला सामना जिंकून किवी संघाने १-० अशी आघाडी घेतली आहे. दुखापतीमुळे न्यूझीलंडचा कर्णधार टॉम लॅथम पहिल्या सामन्यात खेळू शकला नाही,




## अफगाणी खानने टी-२० क्रिकेटमध्ये रचला इतिहास!

**नवी दिल्ली, दि.७ प्रतिनिधी**

अफगाणिस्तानचा स्टार गोलंदाज रशीद खानने स्पर्धात्मक क्रिकेटमध्ये धमाकेदार कामगिरी करताना दिसून येत आहे. मंगळवारी रशीद खानने टी-२० क्रिकेटमध्ये मोठा कारनामा केला आहे. तो टी-२० क्रिकेटमध्ये ६५० विकेट्स घेणारा पहिला खेळाडू ठरला आहे.द हंड्रेड २०२५ मध्ये ओव्हल इनव्हिन्सिबल्सकडून खेळताना रशीद खानने त्याच्या पहिल्याच सामन्यात ही किमया केली आहे. रशीद खानने लॉर्ड्स येथे लंडन स्पिरिटविरुद्ध ३ बळी टिपले आहेत. या काळात त्याने २० चेंडूत फक्त ११ धावा देऊन ३ मोठ्या विकेट्स मिळवल्या. यासह, रशीद टी-२० क्रिकेटच्या इतिहासात सर्वाधिक विकेट्स घेणारा गोलंदाज ठरला आहे.

## शेअर बाजाराने घेतला यू-टर्न



सेन्सेक्स- निफ्टी हिरव्या रंगात बंद अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर लागू केलेल्या टॅरिफचा शेअर बाजारातील गुंतवणूकदारांवर मोठा परिणाम दिसून आला नाही. शेअर बाजाराने आज घसरणीसह सुरुवात केली होती. पण त्यानंतर बाजाराने यू-टर्न घेतला आणि सेन्सेक्स-निफ्टी सपाट पातळीवर हिरव्या रंगात बंद झाले. सेन्सेक्स ७९ अंकांनी वाढून ८०,६२३ वर बंद झाला. तर निफ्टी ५० निर्देशांक २१ अंकांच्या किरकोळ वाढीसह २४,५९६ वर स्थिरावला. विशेषतः , मीडिया आणि फार्मा शेअर्समध्ये खरेदी दिसून आली.
ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के अतिरिक्त टॅरिफ लादले आहे. रशियाकडून केल्या जात असलेल्या तेल खरेदीमुळे त्यांनी हे टॅरिफ लागू केले आहे. या पार्श्वभूमीवर बाजारात सुरुवातीला काही प्रमाणात दबाव राहिला. दुपारच्या सत्रात बाजारात घसरण वाढत गेली. पण त्यानंतर आजच्या सत्रातील अखेरच्या तासात जोरदार रिकव्हरी दिसून आली. यामुळे सेन्सेक्स- निफ्टी वाढून बंद झाले. क्षेत्रीय निर्देशांकातील निफ्टी आयटी, मीडिया आणि फार्मा ०.५ ते १ टक्के वाढून बंद झाले.

# निर्यात क्षेत्रात गुजरात आघाडीवर

**नवी दिल्ली, दि.७ प्रतिनिधी**

सरलेल्या २०२४-२५ या वर्षात गुजरातमधून सर्वात जास्त निर्यात झाली आहे. देशातून झालेल्या एकूण निर्यातीत गुजरात राज्याचा वाटा सर्वात जास्त म्हणजे २६.६% म्हणजे ९.८३ लाख कोटी रुपयाचा आहे.
सरलेल्या वर्षात भारतातील एकूणच निर्यातीवर नकारात्मक परिणाम झाला. तसाच गुजरात मधून झालेल्या निर्यातीवर झाला. मात्र देशातून एकूण झालेल्या निर्यातीत गुजरातने प्रथम क्रमांक कायम ठेवला आहे. दुसऱ्या क्रमांकावर महाराष्ट्र असून महाराष्ट्रातून सरलेल्या वर्षात ५.५७ लाख कोटी रुपयांची निर्यात झाली. महाराष्ट्रातून झालेल्या निर्यातीपेक्षा गुजरातमधून झालेली निर्यात ४.३ लाख कोटी रुपयांनी जास्त आहे.
फेडरेशन ऑफ इंडियन एक्सपोर्ट ऑर्गनायझेशन या संघटनेने जारी केलेल्या माहितीनुसार गुजरात आणि



महाराष्ट्रानंतर निर्यातीत तामिळनाडू, कर्नाटक, उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा या राज्यांचा क्रमांक लागतो.
भारतातून गेल्या वर्षी झालेल्या एकूण ३७.०२ लाख कोटी रुपयांच्या निर्यातीपैकी उत्तर प्रदेशातून केवळ १.८६ लाख कोटी रुपयांची निर्यात झाली. उत्तर प्रदेश हे भारतातील सर्वात मोठे राज्य आहे. एकूण निर्यातीत उत्तर प्रदेशाचा सध्याचा वाटा केवळ पाच टक्के असला तरी तो वेगाने वाढण्यासाठी पूरक वातावरण निर्मिती झाली असल्याचे निर्यातदारांनी सांगितले. उत्तर प्रदेशातून परंपरागत वस्तूबरोबरच आधुनिक वस्तूची निर्यात वाढले आहे. विशेषतः उत्तर प्रदेशातून अमेरिकेला जास्त निर्यात होते.गुजरातमध्ये जामनगर सह केवळ काही जिल्हे निर्यातीत जास्त योगदान करतात. जामनगरमधून गेल्या वर्षी ३.६३ लाख कोटी रुपयाची निर्यात झाली. यामध्ये पेट्रोलियम पदार्थांचा समावेश आहे.

## ट्रम्पच्या नवीन टॅरिफ घोषणेमुळे सोन्याला झळाळी



**नवी दिल्ली, दि.७ प्रतिनिधी**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाकडून तेल खरेदी करण्यासाठी भारतावर २५ टक्के बेस टॅरिफ व्यतिरिक्त अतिरिक्त २५ टक्के टॅरिफ लावण्याची घोषणा केली आहे हा टॅरिफ २७ ऑगस्टपासून लागू होणार आहे. या टॅरिफ घोषणेनंतर सोन्याच्या किमतीत वाढ झाली आहे. आज भारतीय बाजारात २४ कॅरेट सोने १,०२,५५० रुपये प्रति १० ग्रॅम दराने विकले जात आहे, तर त्याची किंमत एका दिवसापूर्वी १,०२,३३० रुपये होती. म्हणजेच, दरात २२० रुपयांची वाढ झाली आहे.आज २२ कॅरेट सोने ९४,००० रुपये प्रति १० ग्रॅम दराने व्यवहार करत आहे, जे एका दिवसापूर्वी ९३,८०० रुपये होते. म्हणजेच ते २०० रुपयांनी वाढले आहे.

बापरे! हे तर भलतेच...!

भारतीय बाजारात इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन

# इलेक्ट्रिक कार जास्त प्रदूषण करतात

**नवी दिल्ली, दि.७ प्रतिनिधी**

पर्यावरण वाचविण्यासाठी भारतीय बाजारात इलेक्ट्रीक वाहनांना प्रोत्साहन दिले जात आहे. एकीकडे इलेक्ट्रीक वाहनांच्या किंमती जास्त आहेत, परंतू इंधनाच्या बाबतीत खिशाला परवडणारी देखील आहेत. परंतू, पर्यावरणाच्या दृष्टीने विचार केला तर जी माहिती समोर येत आहे ती निश्चितच चिंताजनक आहे. इलेक्ट्रीक कार या पेट्रोल, डिझेल कारच्या तुलनेत जास्त प्रदुषणकारी असल्याचे दावे करण्यात येत आहेत. मुळात इलेक्ट्रीक आणि इंधनावरील वाहने बनविण्यामध्ये फारसा फरक नसतो. चेसिस, पार्ट आदी सारखेच असतात. फरक असतो तो फक्त इंजिन-मोटर आणि इंधनच्या ऐवजी बॅटरी. ही बॅटरी बनविण्याची जी प्रक्रिया आहे तीच निसर्गासाठी घातक ठरत आहे. काही रिसर्चनुसार पेट्रोल-डिझेल कारच्या तुलनेत, ईव्ही वाहनांमध्ये एकूण कार्बन उत्सर्जन सुमारे ४६ पट जास्त आहे. पेट्रोल, डिझेल वाहने २६ टक्के कार्बन उत्सर्जन करतात. एवढेच नाही तर एक ईव्ही कार बनविण्यासाठी सुमारे ५-१० टन (२) कार्बन डायऑक्साइड बाहेर पडतो. कारण ईव्ही कार बनविण्यासाठी जी बॅटरी बनविली जाते त्यातून पर्यावरणाचे मोठे नुकसान होत आहे. १ बॅटरी बनवण्यासाठी तुम्हाला सुमारे ८ ते १० किलो कोबाल्ट, ३५ किलो मॅंगनीज आणि ८ किलो लिथियमची आवश्यकता असते. कोबाल्ट हा धातू आहे, जो सहज उपलब्ध नाही. यामुळे कार कंपन्या त्याच्याजागी निकेल वापरता. त्यासाठी खाणींमध्ये उत्खनन करावे लागते. लिथियम आणि मॅंगनीजसाठी देखील मोठ्या प्रमाणावर उत्खनन करावे लागते. यातून पर्यावरणाची प्रचंड हानी होते.
इलेक्ट्रीक कारकडून होणारे प्रदूषण यावरच थांबत नाही तर ईव्ही बनविल्यानंतरही ती प्रदूषण करतच असते.



जड बॅटरीमुळे कारच्या ब्रेक आणि टायर्सची झीज जास्त होते. मग आता इलेक्ट्रीक कार पर्यावरण पूरक कशा ठरतात? तर शहरी भागात त्या धूर सोडत नाहीत, यामुळे ईव्ही कार पर्यावरण वाचवितात. जे काही प्रदूषण होते ते मायनिंगच्या ठिकाणी, बॅटरी बनविण्याच्या घटकांच्या फॅक्टरींमध्ये असा तर्क काढला जातो. यामुळे त्या पर्यावरणपूरक ठरतात.

अजिंक्य भारत
आपलं नागपूर
शुक्रवार, दि. ८ ऑगस्ट २०२५ www.ajinkyabharat.com


## महत्वाचे

### लाभार्थ्यांनी अर्ज सादर करावे

**नागपूर :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील दारिद्र्यरेषेखालील भूमिहीन कुटुंबाना चार एकर कोरडवाहू किंवा दोन एकर बागायती शेतजमीन १०० टक्के अनुदान तत्वावर उपलब्ध करून देण्यात येते. या योजनेसाठी सहायक आयुक्त समाजकल्याण यांनी अर्ज करण्याचे आवाहन केले आहे.त्याअनुषंगाने मौजा-माळेगाव व मौजा-गोंडीखापा ता. काटोल, जि. नागपूर येथील शेतजमीन खरेदी करण्यात आलेली असून, वाटप करणे असल्याने काटोल तालुक्यातील पात्र लाभार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण नागपूर येथे संपर्क साधावा.

### कर्ज योजनेचा लाभ घ्यावा

**नागपूर :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित जिल्हा कार्यालय नागपूर मार्फत थेट कर्ज योजने अंतर्गत अनुसूचित जातीतील/मांग/मांतग व या समाजातील बारा पोटजातीतील लाभार्थीकरीता ७५ चे भौतिक उद्दिष्ट प्राप्त झालेले असून इच्छुक लाभार्थ्यांनी २९ ऑगस्ट २०२५ पर्यंत जिल्हा कार्यालय नागपूर येथे प्रत्यक्ष भेट देत कर्जअर्ज घेऊन रितसर अर्ज सादर करावे. लाभार्थी निवड चिठ्ठी काढून लॉटरी पद्धतीने करण्यात येईल, ही नोंद घ्यावी. कर्ज प्रकरण एक लाख रुपयांच्या मर्यादेत मंजूर करण्यात येईल, असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

### नाल्याकाठी जुगार

**नागपूर :** नाल्याकाठी जुगार खेळण्याच्या आरोपात १२ इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला ही कारवाई जरीपटका पोलिसांनी बुधवारी सायंकाळी सव्वा चार वाजताच्या सुमारास केली परिमंडळ क्र. ५चे पोलिस उपायुक्त निकेतन कदम यांना आकाश टेंभुर्णे नावाचा इसम समतानगर नाल्याकाठी झाडीझुडपात सट्टयापट्ट्याच्या आकड्यांवर लोकांकडून पैसे घेऊन खावडी करत असल्याची माहिती मिळाली त्याआधारे विशेष पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी नमूद ठिकाणी पंचांसमक्ष छापा टाकला. त्यावेळी आकाश टेंभुर्णे, अनिल नंदनवार, अनमोल रामटेके, योगेंद्र शाहू, गणेश धुर्वे, दिनेश धुर्वे, प्यारेलाल सरोटे, पवन सहारे, छोटेलाल कोटांगले, मनोज मेश्राम, कैलास ठाकुर्णे, शामराव बोरकर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

# स्वच्छ सर्वेक्षणात नागपूरची मोठी झेप

## विविध लोकोपयोगी उपक्रमांत उल्लेखनीय कामगिरी, जीएफसी स्टार रेटिंगमध्ये वन स्टार प्राप्त

नागपूर, दि. ७ प्रतिनिधी

**केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाद्वारे 'स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५'चे सुधारित निकाल बुधवारी जाहीर करण्यात आले आहेत. स्वच्छता सर्वेक्षणात नागपूर महानगरपालिकाला '१० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या शहर' या गटात यावर्षी २२ वा क्रमांक (रँक) प्राप्त झाला आहे. आधीच्या निकालात नागपूरला २७ वे स्थान प्राप्त झाले होते. नव्याने जाहीर झालेल्या निकालात नागपूर महानगरपालिकाने उल्लेखनिय कामगिरी करीत मोठी झेप घेतली आहे. स्वच्छ सर्वेक्षणात नागपूरने देशात ४० शहरांपैकी '२२ ए'वा क्रमांक मिळाला आहे. तर, राज्यात ४१४ युएलबीपैकी नागपूरचा '२५ ए'वा क्रमांक आहे.**

नागपूर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात व अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांच्या देखरेखीत स्वच्छता संदर्भात नागपूर शहरात विविध लोकोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यानुसार आता जाहीर झालेल्या निकालात स्वच्छ भारत मिशन अंतर्गत विविध निकषांवर आधारित झालेल्या मूल्यांकनात नागपूर शहराची रँकिंग उल्लेखनियरित्या सुधारली आहे. याआधी 'घराघरातून कचरा संकलनात' ३० टक्के गुण प्राप्त झाले होते, त्यात आता सुधारणा झाली असून, ९० टक्क्यांवर झेप घेतली आहे. याशिवाय कचरा वर्गीकरणात केवळ एक टक्का गुण देण्यात आला होता, तो ६० टक्क्यांवर पोहोचला आहे. नागपूरला जीएफसी स्टार रेटिंगमध्ये वन स्टार प्राप्त झाला आहे. तर, ओडीएफ सर्टिफिकेटमध्ये 'वाटर प्लस' प्रमाणपत्र मिळाले आहे.

नुकत्याच जाहीर झालेल्या अहवालात नागपूर शहराची स्वच्छतेतील प्रगती आणि सहभागात्मक उपक्रमांचे कौतुक करण्यात आले आहे. डॉ. अभिजीत चौधरी यांनी सांगितले, की स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५च्या निकालात नागपूरला मिळालेल्या गुणांच्या बेरजेत त्रुटी आढळल्याने मनपा प्रशासनाने केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाच्या निदर्शनास आणून दिले होते. त्यानुसार गुणांची पुनर्तपासणी करण्यात आली असून, आता सुधारित निकालानुसार मनपाची रँकिंग २७ व्या स्थानावरून थेट '२२ ए'वर आली आहे. शहरात काही महिन्यांपासून 'स्वच्छता ही सेवा, 'बॅकलेन स्वच्छता मोहीम', सी अँड डी वेस्ट, कॉम्प्रेस्ड बायो गॅस प्रकल्प, बायोमायनिंग प्रकल्पासह अन्य उपक्रम राबविण्यात आले.

### विविध उपक्रम

**मनपाद्वारे शहरातील स्वच्छतेवर भर देण्याकरिता विविध उपक्रम राबविल्या जात आहेत. यात एक तारीख एक तास, आर आर आर सेंटर, स्वच्छ मोहल्ला स्पर्धा, स्वच्छ बाजारपेठ, इको ब्रिक्स यासोबतच शहरातील विविध शाळांमध्ये जनजागृती केली जात आहे. या संपूर्ण उपक्रमांना नागरिकांचा देखील उत्तम प्रतिसाद मिळत आहे. मनपा भविष्यात अधिक प्रयत्न करून स्वच्छ सर्वेक्षण मध्ये नागपूरचा रँक प्रथम दहा क्रमांकात आणण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे.**

## 'फायर मॉक ड्रिल '



**नागपूर : इंडियन ऑईल कार्पोरेशन लिमिटेडच्या (आयओसीएल) बुटीबोरी एमआयडीसीतील एलपीजी बॉटलिंग प्लान्टमध्ये संभाव्य धोका टाळण्यासाठी 'फायर मॉक ड्रिल ' करण्यात आली नागपूर महानगरपालिकाच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे प्रात्यक्षिके सादर केली.**

# राज्य नाट्यस्पर्धेमध्ये ३१ पर्यंत प्रवेश

## ऑनलाईन प्रक्रिया उपलब्ध

नागपूर, दि. ७ प्रतिनिधी



महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने ३ नोव्हेंबर २०२५ पासून नियोजित हौशी मराठी, हिंदी, संगीत व संस्कृत राज्य नाट्य स्पर्धांसाठी तसेच बालनाट्य स्पर्धा व दिव्यांग बालनाट्य स्पर्धांसाठी नाट्य संस्थांकडून १ ते ३१ ऑगस्ट २०२५ या कालावधीत ऑनलाईन प्रवेशिका मागविण्यात येत आहे. सांस्कृतिक कार्य संचालक विभीषण चवरे यांनी यासंदर्भात माहिती दिली. सांस्कृतिक कार्य मंत्री आशीष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा पार पडणार असल्याचे चवरे यांनी नमूद केले आहे.

२२ व्या महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेची प्राथमिक फेरी डिसेंबर २०२५ पासून विविध १० केंद्रांवर तर ६४ व्या हौशी हिंदी, संगीत व संस्कृत नाट्य स्पर्धेची अंतिम फेरी प्रत्येकी एका केंद्रावर डिसेंबर २०२५ पासून होणार आहे.नोंदणीकृत हौशी नाट्य संस्थांना तसेच गतवर्षी राज्य नाट्य स्पर्धेत सहभागी झालेल्या संस्थांना विहित नमुन्यातील प्रवेशिका, नियम संचालनालयाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन उपलब्ध होतील. आवश्यक त्या कागदपत्रांसह प्रवेशिका ३१ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन सादर कराव्यात. विहित मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत प्रवेशिका स्वीकारल्या जाणार नाहीत. प्रवेशिकेसोबत आवश्यक कागदपत्रे जोडली नसल्यास किंवा संपूर्ण तपशील भरला नसल्यास ऑनलाईन प्रवेशिका भरता येणार नाही. संस्थेची निवड झाल्यानंतर संस्थेने शासनाने निश्चित केलेल्या केंद्रावर व दिलेल्या तारखेस प्रयोग सादर केला नाही, तर त्यांची प्रवेशिकेसोबत भरलेली अनामत रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्यात येईल. नाट्यस्पर्धेकरिता संस्थांना शासन नियम बंधनकारक राहतील.

### महाल परिसरात आज वीज नाही

**नागपूर :** महावितरणच्या वतीने दुरुस्तीचे काम होत असल्याने महाल आणि बडकस चौक परिसरात शुक्रवार आणि पुढील सोमवारी वीजपुरवठा खंडीत राहणार आहे. महाल व बडकस चौक परिसरात ८ ऑगस्ट आणि ११ ऑगस्ट रोजी उच्च दाब वहिनीचे भूमिगत केबल जोडणीचे काम करण्यात येत आहे या दोन्ही दिवशी सकाळी ९ वाजतापासून दुपारी १ पर्यंत गरजेनुसार शट-डाऊन घेण्यात येणार असल्यामुळे महाल चौक, झेंडा चौक, कल्याणेश्वर मंदिर परिसर, संघ बिल्डिंग परिसर, पुस्तक बाजार चौक, गांधी गेट परिसर, नटराज टॉकीज परिसर, गजानन महाराज मंदिर परिसर, दारोडकर चौक परिसर, आयचित मंदिर परिसर, दक्षिणामूर्ती चौक, बडकस चौक, केळीबाग परिसरात विद्युत पुरवठा पूर्ण बंद राहणार आहे.

# 'हर घर तिरंगा'अभियानाअंतर्गत रांगोळी व तिरंगा प्रदर्शनी

नागपूर, दि. ७ प्रतिनिधी

नागपूर महानगरपालिकाचे अमृत महोत्सवी वर्ष आणि केंद्र शासनाच्या 'हर घर तिरंगा २०२५' अभियानांतर्गत रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात रांगोळी आणि तिरंगा प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले. प्रदर्शन जनतेसाठी १५ ऑगस्टपर्यंत खुले राहणार आहे.

अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर आणि बालकला अकादमीच्या अध्यक्षा मधुरा गडकरी यांची प्रमुख उपस्थिती होती. उपायुक्त राजेश भगत, क्रीडा अधिकारी डॉ. पीयूष अंबुलकर, बालकला अकादमीच्या उपाध्यक्षा सीमा फडणवीस आदी मान्यवर उपस्थित होते. येत्या १५ ऑगस्टला ७९ वा स्वातंत्र्य दिन



साजरा करणार आहोत. यावर्षी 'हर घर तिरंगा' या संकल्पनेवर अभियान देशभरात राबवले जात आहे. नागपूर महानगरपालिकाचे अमृत महोत्सवी वर्ष आणि 'हर घर तिरंगा' अभियानाअंतर्गत प्रदर्शनीचे आयोजित केले आहे.

ध्वज प्रदर्शनीमध्ये राष्ट्रीय ध्वजाचा इतिहास दर्शविला आहे. राष्ट्रध्वजाचे मूळ डिझाईन तयार करणारे पिंगली वेंकय्या यांची माहिती दिली आहे. याशिवाय डाक तिकिटांवरील तिरंगा, तिरंग्याचा आतापर्यंतचा प्रवास आणि विविध ठिकाणी तिरंगा फडकवल्याचे छायाचित्र दर्शविण्यात आले आहेत. १८ कलावंतांनी आकर्षक आणि सुंदर रांगोळ्या काढल्या आहेत नागरिकांसाठी येथे सेल्फी पॉईंटची व्यवस्था करण्यात आली आहे.

# नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात स्तनपान सप्ताह

## मातांना दिले मोलाचे मार्गदर्शन, आरोग्य केंद्रांमध्ये विविध उपक्रम

नागपूर, दि. ७ प्रतिनिधी

नागपूर महानगरपालिकाच्या वतीने शहरातील सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात स्तनपान सप्ताहानिमित्त विविध जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

मनपाच्या इंदोरा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. सरला लाड यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये लता मेडिकल रिसर्च फाउंडेशनच्या सहकार्याने जनजागृती कार्यक्रम पार पडला शहर कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. अश्विनी निकम, इंदोरा युपीएचसीच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. सांची जैस्वाल, आरोग्य कर्मचारी सिल्विया मोरडे, शीला सयाम, लता मेडिकल रिसर्च फाउंडेशनच्या आहार



समुपदेशक डॉ. शिल्पा भैसे, प्रकल्प समन्वयक मधुलिका शर्मा, प्रकल्प व्यवस्थापक डॉ. समरीन सदाफ खान, डॉ. रुचा सावजी यांच्यासह आशा सेविका, परिसरातील स्तनदा माता, गर्भवती महिला उपस्थित होत्या. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांच्या मार्गदर्शनात व वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांच्या नेतृत्वात जागतिक स्तनपान सप्ताहच्या अनुषंगाने मनपाच्या विविध नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये स्तनपान जनजागृती उपक्रम राबविण्यात आले. दहाही झोनमधील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील कार्यक्रमात स्तनदा माता व गर्भवती महिलांना स्तनपानाचे महत्व पटवून देण्यात आले. शून्य ते सहा महिन्यापर्यंतच्या बाळासाठी आईचे दूध अत्यंत आवश्यक असते. त्यामुळे बाळाला स्तनपान करताना आईने आहाराकडे विशेष लक्ष देणे आवश्यक असते. यासंदर्भात कार्यक्रमात विशेष प्रकाश टाकण्यात आला. आईसाठी महत्वाचा आहार व त्यामुळे बाळाला मिळणारे पोषण यावर मार्गदर्शन करण्यात आले. स्तनपान करताना आईने घ्यावयाची काळजी, स्तनपान करताना बाळाला पकडण्याची पद्धत, स्तनपानानंतर कसे हाताळावे, स्तनपानादरम्यान बाळाला त्रास झाल्यास घ्यावयाची काळजी, अचानक आलेल्या अडचणी आदींबाबत आशा सेविकांनी प्रातिनिधिक 'मॉडेल'चा उपयोग करून कार्यक्रमात प्रात्यक्षिक सादर केले.

### पसंतीचा नोंदणी क्रमांक मिळवा

**नागपूर :** उप प्रादेशिक परिवहन कार्यालय नागपूर (पूर्व) येथे चारचाकी वाहनांच्या एमएच ४९/ सीएल ही नोंदणी क्रमाकांची मालिका संपत असल्याने चारचाकी वाहनांसाठी एमएच ४९/ सीएस अशी नवीन मालिका ८ ऑगस्ट रोजी सुरू करण्यात येत आहे. ज्या वाहनधारकांना आपल्या वाहनांसाठी या मालिकेतून आकर्षक वा पसंतीचा नोंदणी क्रमांक आरक्षित करावयाचा असेल त्यांनी विहीत नमुन्यातील अर्ज रहिवास पुरावा, छायाचित्र ओळखपत्र, पॅनकार्ड व पसंतीचा नोंदणी क्रमांकासाठी 'उप प्रादेशिक परिवहन' यांचे नावे काढलेल्या फीच्या राष्ट्रीयकृत बँकेच्या अधिकारी, नागपूर (पूर्व) धनाकर्षासहीत स्वत: नविन वाहन नोंदणी विभाग ८ ऑगस्ट रोजी सकाळी ११ दुपारी अडीच वाजताच्यादरम्यान कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी केले आहे.

# देहव्यापारातून दोन पीडितांची सुटका, आरोपी ताब्यात

## 'ऑपरेशन शक्ती' अंतर्गत कारवाई

नागपूर, दि. ७ प्रतिनिधी

नागपूर पोलिसांच्या 'ऑपरेशन शक्ती' अंतर्गत गुन्हे शाखा सामाजिक सुरक्षा विभागाच्या पथकाने देहव्यापार चालवणाऱ्या आरोपीवर कारवाई केली आहे. यातील दोन पीडितांची सुटका करण्यात आली.

गोपनिय माहितीवरून गुन्हे शाखा सामाजिक सुरक्षा विभागाच्या पथकानेबेलतरोडी हद्दीतील लोटस सर्व्हिस अपार्टमेंट, पीएमजी सोसायटी, नरेंद्र नगर येथे ६ ऑगष्ट रोजी सायंकाळी चार ते रात्री साडेनऊच्या दरम्यान छापा टाकला. यावेळी आरोपी संकेत सुनिल तवळे (वय ३०, उंटखाना) हा स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी ग्राहकांना देहव्यापारासाठी जागा उपलब्ध करून देत असल्याचे आणि पीडित मुली व महिलांना कमी वेळेत अधिक पैसे कमवण्याचे आमिष दाखवून त्यांच्याकडून देहव्यापार करून घेत असल्याचे समोर आले. या कारवाईत आरोपीच्या ताब्यातून दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली. आरोपीच्या ताब्यातून रोख तीन हजार रुपये, दोन मोबाईल फोन, एक डीव्हीआर आणि इतर साहित्य असा एकूण २८ हजार ४५८/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (भा.न्या.सं.) कलम ३७०(२) सहकलम ३, ४, ५ अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला.

## 'नाट्यस्पर्धा' संध्या चिवंडेंचे दिग्दर्शन उत्कृष्ट

# महावितरणच्या 'रंगबावरी' ला दुसरा क्रमांक

नागपूर, दि. ७ प्रतिनिधी

**महावितरणच्या राज्यस्तरीय आंतरप्रादेशिक नाट्यस्पर्धेत, नागपूर प्रादेशिक विभागाच्या 'रंगबावरी' या नाटकाने द्वितीय क्रमांकाचा बहुमान पटकावला आहे. नाशिक येथे झालेल्या या स्पर्धेत, नागपूर संघाने विविध श्रेणींमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत अनेक पारितोषिके जिंकली.नाशिक येथे झालेल्या महावितरणच्या राज्यस्तरीय आंतरप्रादेशिक नाट्यस्पर्धेत, विविध विषयांवरील दर्जेदार नाट्यकृती सादर करण्यात आल्या, ज्यांना रसिकांनी मोठा प्रतिसाद दिला.**




### नागपूर संघाची पुरस्कारांवर मोहोर

**नागपूर प्रादेशिक विभागाच्या 'रंगबावरी' नाटकाने या स्पर्धेत विविध पुरस्कारांवर आपली मोहोर उमटवली. यामध्ये सर्वोत्कृष्ट नाटकात दुसरे स्थान, दिग्दर्शनात द्वितीय स्थान (संध्या चिवंडे), स्त्री अभिनयात प्रथम स्थान (रोहिणी ठाकरे), संगीतात प्रथम क्रमांक (रुपेश देशमुख) आणि रंगभूषा व वेशभूषेत द्वितीय क्रमांक (प्रशांत ठाकरे) यांचा समावेश आहे. याशिवाय, अभिनयासाठी सायली सायनकर यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.**

या स्पर्धेत नागपूर विभागाच्या 'रंगबावरी' या नाटकाने सर्वोत्कृष्ट नाटकाचा द्वितीय पुरस्कार पटकावला. या स्पर्धेत कोकण प्रादेशिक विभागाने 'आवर्त', पुणे प्रादेशिक विभागाने 'डॉक्टर तुम्ही सुद्धा', आणि छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक विभागाने 'केस नं. ९९' हे प्रयोग सादर केले. पारितोषिक वितरण सोहळ्याला राज्यभरातील महावितरणचे वरिष्ठ अधिकारी, अभियंते आणि नाट्यरसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रभाकर दुपारे, चंद्रकांत जाडकर आणि मीनाक्षी केंढे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

# ई-रिक्षा चोरून एकेक भाग ईलेक्ट्रिक कटरने कापला, एकास अटक

नागपूर, दि. ७ प्रतिनिधी

रिक्षा चोरून तिचा एकेक भाग पाण्यात बुडवून ठेवल्याची चोरीची अनोखी पद्धत सक्करदरा पोलिसांनी उघडकीस आणली आहे. २ ऑगस्ट २०२५ रोजी घडलेल्या ई-रिक्षा चोरीच्या प्रकरणात हाफिज खान हमीद खान (४५) याला अटक केली. तर, त्याला मदत करणाऱ्या 'नाना' नावाच्या इसमाचा शोध घेण्यात येत आहे.

सक्करदरा पोलिसांनी मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलिस निरीक्षक एम.एम. ठाकरे आणि नाईट ड्युटी ऑफिसर पीएसआय प्रवीण वाकळे यांच्या नेतृत्वाखाली वाठोडा ठाण्याच्या हद्दीत चोरीला गेलेली ई-रिक्षा शोधून काढली.



ही ई-रिक्षा शाहीनशाह चौक, मोठा ताजबाग येथून चोरीला गेल्याची नोंद होती. चौकशीदरम्यान आरोपी हाफिज खान हमीद खान याने ई-रिक्षा चोरल्याची कबुली दिली आणि 'नाना' नावाच्या एका साथीदारासह इलेक्ट्रिक कटरने ती तोडून घराजवळच्या पाण्याच्या खड्ड्यात तिचे भाग टाकल्याचे सांगितले. ई-रिक्षाचे तोडलेले भाग जप्त करण्यात येवून आरोपीला अटक केली. ही कारवाई उपायुक्त (झोन ४) रश्मिता राव आणि सहाय्यक पोलिस आयुक्त (सक्करदरा विभाग) नरेंद्र हिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पथकात पीएसआय प्रवीण वाकळे आणि कॉन्स्टेबल ज्ञानेश्वर, धर्मेंद्र,बाळू, राजेश (६६६८), एलएसआय भीमराव आणि पीसी आशीष यांचा समावेश होता.

अजिंक्य भारत

# आपलं अकोला

अकोला, शुक्रवार, दि. ८ ऑगस्ट २०२५ www.ajinkyabharat.com

OM COACHING CLASSES
COMPUTER SCIENCE
11th & 12th
Behind Tathod Mangal Karyalaya, Shastri Nagar, Akola,

महत्त्वाचे

### हॉटेलमध्ये घुसून युवकावर लाकडी दांड्याने हल्ला

**अकोला :** सिव्हिल लाईन परिसरात मस्तानी कॅफेजवळील साक्षी अपार्टमेंट मध्ये आज दुपारी १२ ते १ वाजेच्या सुमारास एक धक्कादायक प्रकार घडला. दोन अज्ञात इसमांनी कान्हेरी सराफ (ता. बार्शीटाकळी) येथील शुभम संजय जाधव (३०) यांच्यावर त्याच्या हॉटेलमध्ये शिरून अचानकपणे लाकडी दांड्याने हल्ला केला. फिर्यादी शुभम हे नेहमीप्रमाणे आपल्या हॉटेलमध्ये कामकाज करत असताना, दोन इसम तोंडाला पांढऱ्या रंगाचे दुपट्टे बांधून मुख्य दरवाजातुन आत आले आणि त्यांना लाकडी दांड्याने मारहाण केली. या हल्ल्यात शुभम जखमी झाला असून, यासंदर्भात त्यांनी सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

### खोतकर यांच्या विधानाचा जिल्हा कचेरी समोर निषेध

**अकोला :** आमदार अर्जुन खोतकर यांनी हिंदू खाटीक समाजाबद्दल जालना येथे वापरलेल्या आक्षेपार्ह भाषेच्या निषेधार्थ अकोल्यातील खाटीक समाजात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. या पार्श्वभूमीवर हिंदू दलीत खाटीक समाज विकास मंडळ (सतूर सेना) च्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करत निषेध नोंदवण्यात आला. यावेळी खोतकर यांच्या विरोधात घोषणाबाजी करत त्यांच्या वक्तव्यावर तातडीने ॲक्ट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली. संस्थापक अध्यक्ष संजय धनाडे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर केले.

### अवैध दारू अड्ड्यावर छापा

**अकोला :** आगामी धारगड यात्रेच्या पार्श्वभूमीवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बोर्डी (ता. अकोट) येथे धाड टाकून ८ हजार ४८० रुपये किंमतीचा अवैध देशी दारूचा साठा जप्त केला असून, एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ५ ऑगस्ट २०२५ रोजी ग्राम बोर्डी येथे कारवाई केली.पथकाने ग्रामस्थांच्या पंचनाम्यासह गावात धाड टाकून आरोपी श्याम अर्जुन लटकुटे (३६) याच्याकडून देशी दारू संत्रा ९९९ व टँगो पंच ९० मि.ली. चे एकूण २१२ नग जप्त केले. या दारूची एकूण किंमत ८ हजार ४८० रुपये इतकी आहे.

# अखेर बारशालाच बाळ परत आईच्या कुशीत!

## एसपींचा पुढाकार: मातेचे अश्रू अनावर

। विठ्ठल महल्ले ।



अजिंक्य भारत इम्पॅक्ट

**अकोला, दि. ७ :** ''एका आईच्या ममतेवर संकट आलं होतं... पण न्यायाने पुन्हा तिच्या कुशीत तिचं लेकरू परत आलं!'' अकोल्यातल्या रामदासपेठ पोलीस ठाण्यात समोर आलेल्या नवजात अपहरण प्रकरणाने अक्षरशः खळबळ उडवली होती. मात्र जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या तातडीच्या पुढाकारामुळे आणि दैनिक अजिंक्य भारत च्या ठाम पत्रकारितेमुळे गुरुवारी हे बालक परत मातेच्या कुशीत आलं तेही बारशाच्या दिवशी!
बाळापुरच्या मेहरा बानो मोहम्मद शाकीब (रा. छोटा मोमीनपुरा) यांनी आपल्या नवजात बाळाच्या जबरदस्तीने अपहरणाची तक्रार रामदासपेठ पोलीस ठाण्यात दिली होती. पती मोहम्मद शाकीब याने अकोल्यातील खासगी रुग्णालयातून बाळाला बायकोच्या संमतीविना घेऊन जात, थेट मुर्तिजापूरला नेलं, असा आरोप तिने केला.

विशेष म्हणजे, मेहरा बानो ही अजूनही ऑपरेशननंतरच्या शारीरिक वेदनेत होती... तरीही तिचं लेकरू तिच्यापासून हिरावून घेतलं गेलं होतं. एवढंच नाही, तर रुग्णालयातील काही कर्मचाऱ्यांचेही संगनमत असल्याचा संशयही तिने नोंदवला होता.
तिची सिझेरियन डिलिव्हरी २५ जुलै रोजी झाली होती. त्यानंतर बाळाला न्यूमोनियाचा त्रास होत असल्याने दुसऱ्या रुग्णालयात हलवलं गेलं. उपचारादरम्यान ती स्वतः त्याला स्तनपान देत होती. मात्र, ४ ऑगस्ट रोजी पतीने बाळाला आईचे दूध पाजण्यापासून थांबवलं.

त्यानंतर, मेहरा बानो यांनी थेट रामदासपेठ पोलीस ठाण्यात धाव घेतली. पण तिला तत्काळ मदत मिळाली नाही, महिला पोलीसही तैनात नव्हते, असा आरोप तिने केला. बालक आजारी असून त्याला आईच्या दुधाची अत्यंत गरज आहे, हेही तिने तक्रारीत नमूद केलं. वार्ड अँड गार्डियन कायद्यानुसार ६ वर्षाखालील बालकाचा ताबा प्रामुख्याने आईकडे असतो हा महत्त्वाचा कायदेशीर मुद्दा देखील तिच्या अर्जात होता.
या प्रकरणाची दैनिक अजिंक्य भारतने गंभीर दखल घेत ६ ऑगस्ट रोजी सविस्तर बातमी प्रसिद्ध केली. बातमीचा परिणाम असा झाला की, पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी तातडीने याकडे लक्ष दिलं आणि रामदासपेठ पोलिसांना योग्य ती कारवाई करण्याचे आदेश दिले. पोलीस निरीक्षक शैलेश खंडारे यांच्या नेतृत्वात, तातडीने मुलाचा ठावठिकाणा शोधून त्याला महिला व बालकल्याण समिती समोर सादर करण्याचे आदेश दिले गेले. आणि गुरुवारी केवळ तासाभरात बाळ आपल्या मातेच्या कुशीत परत आलं! बारशाच्याच दिवशी आपल्या बाळाला पुन्हा जवळ मिळालेल्या मेहरा बानोच्या डोळ्यात अश्रू तरळले पण यावेळी ते दुःखाचे नव्हे, तर आनंदाचे आणि समाधानाचे होते. बाळाच्या चेहऱ्यावरचा निरागस शांतभाव जणू म्हणत होता, ''आई, मी परत आलो!''
या प्रकरणाचा कायदेशीर पाठपुरावा ज्येष्ठ विधिज्ञ प्रवीण कडाळे पाटील आणि ॲड. संजय देशमुख यांनी केल्यामुळे अखेर रामदासपेठ पोलिसांनी गुरुवारी सायंकाळी मेहरा बानो यांची तक्रार स्वीकारली.
आता पुढे पोलिसांची चौकशी कोणत्या दिशेने जाते, आरोपीवर कोणती कारवाई होते आणि रुग्णालयातील कर्मचाऱ्यांची भूमिका काय होती, हे पाहणं महत्त्वाचं ठरेल. पण एक गोष्ट मात्र नक्की पत्रकारितेची ताकद, आईच्या ममतेची आर्त हाक आणि न्यायव्यवस्थेचा सजग हस्तक्षेप यामुळे एक बाळ आपल्या आईच्या कुशीत परत आलं तेही बारशालाच!

> ❑ 'मी अजून ऑपरेशनमधून सावरलेही नव्हते... पण माझ्या कुशीतून माझं लेकरू जबरदस्तीने हिरावून नेलं गेलं. तो आजारी होता, त्याला माझ्या दुधाची गरज होती... पण मी काहीच करू शकत नव्हते. माझ्या डोळ्यासमोर अन्याय झाला... पोलिसांकडे गेले, पण सुरुवातीला कोणीच ऐकून घेतलं नाही. अखेर, एक बातमी आली आणि माझं बाळ पुन्हा माझ्या कुशीत आलं बारशाच्या दिवशी!''
> **- मेहरा बानो,** पीडित माता

> ❑ आईच्या ममतेला न्याय मिळवून द्यायचा होता. आम्ही वेगाने कामाला लागलो... आणि केवळ काही तासांतच बाळ आईच्या कुशीत परत आलं. महिला बालकल्याण समिती व पोलिसांनी यासाठी संयुक्त कामगिरी बजावली.
> **- शैलेश खंडारे,** पोलीस निरीक्षक, रामदासपेठ

# जिल्हा परिषदेत प्रतिनियुक्तीचा घोळ कायमच

## शासन निर्णय बसविला धाब्यावर; अनेक कर्मचारी ठाण मांडून

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ७ :** जिल्हा परिषदेच्या अनेक विभागात गेल्या दहा ते बारा वर्षांपासून तात्पुरत्या प्रतिनियुक्त्यांच्या आदेशाच्या नावाखाली ठाण मांडून बसलेल्या व विभागीय आयुक्तांची परवानगी न घेता प्रतिनियुक्त्या करण्याचा प्रताप अधिकाऱ्यांनी केला आहे. यासंदर्भात तक्रारी झाल्यानंतरही प्रशासनाकडून अशा कर्मचाऱ्यांना पाठिशी घालण्यात येत असल्याचे दिसून येत आहे.
जिल्हा परिषदेच्या अनेक विभागात वर्ग ३ व ४ कर्मचाऱ्यांच्या तात्पुरत्या प्रतीनियुक्तीच्या नावाखाली अनेक कर्मचारी बऱ्याच वर्षांपासून ठाण मांडुन बसले आहेत. अधिकाऱ्यांची मर्जी सांभाळणाऱ्या या कर्मचाऱ्यांना नियम धाब्यावर बसवून प्रतिनियुक्त्या देण्यात आल्या आहेत. वास्तविक पाहता राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाने २७ जून २००६ च्या शासन निर्णयानुसार प्रशासकीय दृष्टीने प्रतिनियुक्त्या करावयाच्या असतील तर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी विभागीय आयुक्तांच्या पूर्व परवानगीनेच प्रतिनियुक्त्या करण्यात याव्यात, असे स्पष्ट आदेश आहेत; मात्र या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली नसल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते आकाश कोकाटे यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसह ग्रामविकास मंत्री, पालकमंत्री, विभागीय आयुक्तांना दिलेल्या निवेदनात केली आहे. जिल्हा परिषदेत काही अधिकाऱ्यांनी केलेल्या या प्रतिनियुक्त्यांची सखोल चौकशी करून त्या प्रतिनियुक्त्या रद्द कराव्यात, अन्यथा १५ दिवसात प्रतिनियुक्त्या रद्द न झाल्यास लोकशाही पद्धतीने आंदोलन करण्याचा इशारा आकाश कोकाटे यांनी दिला आहे; मात्र जिल्हा परिषद प्रशासनाकडून अशा कर्मचाऱ्यांना पाठिशी घालण्यात येत असून, अद्यापही संबंधित कर्मचाऱ्यांच्या प्रतिनियुक्त्या रद्द करण्यात आल्या नाहीत.

# प्रारूप प्रभाग रचना नगरविकासकडे सादर

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ७ :** अकोला महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी प्रारूप प्रभाग रचना राज्य सरकारच्या नगरविकास विभागाला सादर करण्यात आली आहे. त्यानंतर राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार प्रत्येक प्रभाग तयार केला की नाही, याची छाननी उपसचिव दर्जाच्या अधिकाऱ्यापुढे होणार आहे. त्यानंतर हा प्रारूप आराखडा नगरविकास विभाग ११ ऑगस्टदरम्यान राज्य निवडणूक आयोगास सादर करणार आहे.
त्यानंतर निवडणूक आयोगाकडून २२ ते २८ ऑगस्टदरम्यान प्रारूप प्रभाग रचना जाहीर करण्यासाठी महापालिकेस पाठवणार आहे. त्यानंतर प्रारूप प्रभाग रचनेवर हरकती आणि सुनावणी मागविण्यात येणार आहे. महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका आगामी काळात होणार असून, त्यासाठी मनपा निवडणूक विभागाने चार वॉर्डाचा एक प्रभाग, यानुसार प्रारूप प्रभाग रचनेचे काम पूर्ण केले आहे.
आगामी महापालिका निवडणुकीसाठी १ जुलै २०२५ पर्यंतची विधानसभा मतदार यादी घेण्यात येणार आहे. ८ मार्च २०२२ रोजी महापालिका सभागृहाचा कार्यकाळ संपल्यानंतर महापालिकेत प्रशासक राज असून साडे तीन वर्षांपासून प्रशासकांच्या हाती महापालिकेचा कारभार आहे. निवडणुकीला विलंब होत असल्याने राजकीय वातावरण थंड झाले होते, आता मात्र, निवडणूक पूर्व कार्यक्रम घोषित झाल्याने राजकीय वातावरण तापू लागले आहे. प्रारूप प्रभाग रचनेचा प्रस्ताव तयार करून तो नगरविकास विभागाला सादर करण्यासाठी १ ते ५ ऑगस्टचा वेळ दिला होता. त्यानुसार मनपा निवडणूक विभागाने प्रारूप प्रभाग रचना जिल्हाधिकारी अकोला यांच्याकडे सादर केली आहे.

# नद्यांच्या पर्यावरणीय समतोलासाठी कृत्रिम वाळू धोरण

## जिल्हाधिकारी अजित कुंभार : एम - सँड अंतर्गत पहिल्या ५० उद्योजकांना सवलती

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अकोला, दि. ७ :** नद्यांच्या पर्यावरणीय समतोलासाठी राज्य शासनाने नैसर्गिक वाळूला पर्याय म्हणून कृत्रिम वाळूचा ( एम सँड) पर्याय उपलब्ध करून दिला आहे. जिल्हा प्रशासनाने कृत्रिम वाळूचे उत्पादन वाढविण्यासाठी पुढाकार घेतला जात असून कृत्रिम वाळू उद्योगांचा विकास होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज येथे केले.
महसूल सप्ताह समारोपानिमित्त नियोजनभवनात आयोजित कृत्रिम वाळू धोरण कार्यशाळेत बोलत होते. प्र. अपर जिल्हाधिकारी महेश परांडेकर,उपजिल्हाधिकारी निखील खेमनार, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी महेश भिवापूरकर, जिल्हा खनिकर्म अधिकारी विशाल धांडे ,भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा उपसंचालक श्री कराळे, जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी अनिल चिंचोले, तहसीलदार सुरेश कव्हळे, सी.ए पंकज अग्रवाल आदी उपस्थित होते. यावेळी श्री. कुंभार म्हणाले की, कृत्रिम वाळू धोरणाचे मुख्य उद्दिष्ट नैसर्गिक वाळूवरील अवलंबन कमी करणे,
पर्यावरणाचे संवर्धन करणे, आणि बांधकाम क्षेत्राला योग्य दरात दर्जेदार वाळू उपलब्ध करून देणे आहे. त्यामुळे अधिकाधिक खाणपट्टाधारकांनी यामध्ये सहभागी व्हावे.कृत्रिम वाळूचे उत्पादन करणाऱ्या पहिल्या ५० उद्योजकांना जिल्हा प्रशासनाकडून सवलती देण्यात येणार असल्याचे प्रतिपादन केले.

# खासगी रुग्णालयांकडून नियमांची पायमल्ली

**अकोला :** शहरातील रुग्णालयांमध्ये दर यादी नसल्याच्या आणि रुग्णांकडून जास्त शुल्क आकारल्याच्या तक्रारी येत आहेत. बहुतांश रुग्णालये बॉम्बे नर्सिंग कायद्यानुसार चालत नसल्याच्या तसेच शहरात बनावट डॉक्टर असल्याच्या तक्रारी आहेत. ही गंभीर बाब पाहता महापालिकेच्या आरोग्य विभागाने इंडियन मेडिकल असोसिएशनच्या अध्यक्षांना पत्र पाठवले आहे. ज्यामध्ये आयएमए अंतर्गत चालणाऱ्या रुग्णालयांना बॉम्बे नर्सिंग होम कायद्यानुसार अद्ययावत करण्याचे नमूद आहे. रुग्णालय सुरू करण्यासाठी बॉम्बे नर्सिंग होम कायद्यानुसार विविध विभागांकडून परवानगी घेणे बंधनकारक आहे. यामध्ये रुग्णालय प्रशासनाला अग्निशमन एनआरसी, रुग्णालयात परिचारिकांची संख्या, बेडची संख्या, बायोमेडिकल वेस्ट विल्हेवाट बाबत सर्व नियमांचे पालन करणे, रुग्णालयाच्या बॅनरवर डॉक्टरांची शैक्षणिक पदवी, कौन्सिल क्रमांक, रुग्णालय उपचारांची यादी ठळक अक्षरात प्रदर्शित करणे, रुग्ण हक्क संहितेची माहिती प्रदर्शित करणे, ऑनलाइन पोर्टलवर रुग्णालयाची नोंदणी करणे, सर्व वैद्यकीय आरोग्य संस्थांना एबीडीएम अंतर्गत नोंदणी करणे बंधनकारक करण्यात यावे असे पत्रात नमूद आहे.

# तरुणाच्या आत्महत्ये प्रकरणी सासरकडील मंडळी विरुद्ध गुन्हा

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ७ :** मंगळवारी पारस रेल्वे स्थानक परिसरात संघपाल खंडारे नावाच्या तरुणाने रेल्वेसमोर आत्महत्या केली. या प्रकरणात अकोला जीआरपी पोलिसांनी मंगळवारी रात्री उशिरा मृताची पती, सासू, मेहुणी आणि मेहुणयाला अटक केली. बुधवारी चारही आरोपींना न्यायालयात हजर केले असता त्यांना दोन दिवसांचा पीसीआर देण्यात आला. आत्महत्येच्या याप्रकरणात मृताच्या वडिलांनी अकोला जीआरपीमध्ये संबंधितांविरुद्ध तक्रार दाखल केली. जीआरपी पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या कलम १०८ अंतर्गत आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आणि मृताची पत्नी शबनम, तिची आई, बहीण आणि भावाला अटक केली. घटनेची पार्श्वभूमी अशी आहे की मंगळवारी सकाळी पारस रेल्वे स्थानक परिसरात एका ३० वर्षीय तरुणाने रेल्वेसमोर उडी मारून आत्महत्या केली. रेल्वे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि पंचनामा इत्यादी प्रक्रिया पूर्ण करून प्रकरणाची दखल घेतली. ही बातमी पसरल्यानंतर मृताचे नातेवाईक आले आणि त्यांनी मृताचे नाव संघपाल सिद्धार्थ खंडारे असे सांगितले. या प्रकरणात, मृताच्या वडिलांनी अकोला जीआरपी पोलिसांकडे आरोपींविरुद्ध तक्रार दाखल केल्यानंतर, त्यांना अटक करण्यात आली. जीआरपीच्या प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलिस निरीक्षक अर्चना गाढवे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

वृक्ष चळवळ | वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे, ठरतेय काळाची गरज

# प्रत्येक नागरिकाने वृक्ष रक्षाबंधन साजरे करावे- ए.एस.नाथन

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ७ :** 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे..' आताच्या काळात हे शब्द फक्त कवितेपुरतेच उरल्याचा अनुभव येतोय. वृक्षांचे संवर्धन करणे ही काळाची गरज असून, वृक्ष आपले मित्र व कुटुंब आहेत, ही भावना वृद्धिंगत करण्यासाठी प्रत्येक नागरिक पर्यावरण प्रेमी वृक्षप्रेमींनी रक्षाबंधननिमित्त वृक्ष रक्षाबंधन करून वृक्षांप्रती कृतज्ञता व्यक्त करावी, असे आवाहन ऑक्सिजन मॅन



स्वस्तिक पॅटर्नचे जनक ए.एस. नाथन यांनी केले आहे.
अकोल्यातील वृक्षमित्र नाथन यांनी रक्षाबंधनाच्या दिवशी अनोखे वृक्ष रक्षाबंधनाची संकल्पना मांडली असून, प्रत्येक घरातील वृक्षांना राखी बांधून, वृक्ष रक्षाबंधनाची अनोखी संकल्पना साकार करीत वृक्षांचे संवर्धन व रक्षण करण्याचा संकल्प नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन केले आहे.
देशभरात वृक्षचळवळ निर्माण व्हावी व सणाच्या माध्यमातून तरी लोक वृक्षांचं रक्षण करतील, एवढाच उद्देश वृक्ष रक्षाबंधनाचा आहे. रक्षाबंधनाच्या दिवशी वृक्षांना राखी बांधून त्यांना आपल्या कुटुंबातील एक सदस्य समजून वृक्षाप्रती आत्मीयता रहावी व प्रेम वाढावे, या उद्देशाने हे रक्षाबंधन साजरे करण्यात यावे. वृक्ष हे आपले भाऊ आहेत, त्यामुळे यापुढे मी त्यांचे रक्षण करेल, हीच प्रतिज्ञा या माध्यमातून घेतल्या जावी असे आवाहन वृक्षमित्र नाथन यांनी केले आहे.

> ❑ संपूर्ण राज्यभरात सध्या 'एक विद्यार्थी एक वृक्ष' अंतर्गत विविध ठिकाणी वृक्षारोपण सुरू आहे. यापूर्वीही एक विद्यार्थी एक वृक्ष, एक जन्म एक वृक्ष, यासह विविध उपक्रमांतर्गत वृक्षारोपण करण्यात आलेल्या वृक्षांनासुद्धा राखी बांधून वृक्ष रक्षाबंधन प्रत्येकांनी साजरे करावे, जेणेकरून वृक्षांची असलेले आपले नाते अधिक वृद्धिंगत होईल.
> **-ए.एस. नाथन,** (ऑक्सिजन मॅन) अकोला.

# माना पोलिसांची हातभट्टीवर कारवाई

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ७ :** माना पोलीस स्टेशन हद्दीतील तीन गावांमध्ये गावठी हातभट्टी व देशी दारू विरोधात धडक कारवाई करण्यात आली. एकूण १६ हजार ६४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करीत चार आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. राहुल अवधुत गवई (३६), रा. कुरूम याच्या घराच्या पाठीमागे असलेल्या झोपडीत गावठी हातभट्टी दारू विक्रीच्या ठिकाणी धाड टाकण्यात आली. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी कारवाई करून ६० लिटर सडका मोहमाश किंमत १२ हजार रुपये व ५ लिटर हातभट्टी दारू किंमत १ हजार रुपये असा एकूण १३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. उमेश सुरेश गोंडाणे (३८), रा. मराठीपुरा, माना याच्याकडून २४ देशी दारू नग जप्त करण्यात आले. अंदाजे किंमत १ हजार ९२०. ग्राम धामोरी बु. जीवनकला जानराव सिरसाठ (६५) यांच्याकडून १८० चे १२ नग देशी दारू किंमत ९६० रुपये अशोक सीताराम नेटके (५५) यांच्याकडून ९० चे १९ नग देशी दारू किंमत ₹ ७६० या तीन गावांतील चौघांविरुद्ध स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून, एकूण १६ हजार ६४० रुपयांचा अवैध दारूचा साठा जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बदेली चंद्रकांत रेड्डी व उपविभागीय पोलीस अधिकारी मनोहर दाभाडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

अजिंक्य भारत
आपलं अकोला / वाशिम
अकोला, शुक्रवार, दि.८ ऑगस्ट २०२५ www.ajinkyabharat.com


## महत्त्वाचे

### महसूल सप्ताह अंतर्गत शिधापत्रिका व प्रमाणपत्र वाटप



**अकोट :** अकोला जिल्हाधिकारी यांचे आदेशाने व उपविभागीय अधिकारी अकोट, तहसीलदार अकोट यांचे मार्गदर्शनात महसूल सप्ताह सुरू आहे. निमित्तान महसुल सप्ताहांतर्गत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान ग्राम पंचायत कार्यालय कुटासा येथे आयोजित करण्यात आले होते.या अभियानाचे उद्घाटन कुटासा गावचे पोलिस पाटील गजानन उगले यांच्याहस्ते करण्यात आले आहे.तर कार्यक्रमांचे अध्यक्ष स्थान नायब तहसिलदार नरेंद्र सोनोने यांनी भूषविले. अभियानाला मंडळातील ग्रा.म.अ. एम.व्ही कोरडे, एस.आर.इंगळे, शीतल कोगदे,प्राथमिक आरोग्य उपकेंद्र कुटासाच्या डॉ. पूजा चौधरी, स.कृ.अ.नंदकिशोर खेडकर हे उपस्थित होते.

### हरित महाराष्ट्र इको क्लबच्यावतीने वृक्षारोपण



**देवरी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील एक झाड मा के नाम याविषयी व प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आईला साक्ष ठेवून एक झाड लावून आपला सहभाग नोंदवावा. या आवाहनानुसार अकोट तालुक्यामध्ये वृक्षारोपणाचे कार्यक्रम सुरु आहेत.सामाजिक वनीकरण विभाग आकोटच्या माध्यमातून नवयुग विद्यालय देवरी येथे दिनांक २ ऑगस्ट २५ पासुन महाराष्ट्रभर लागवड दिनाचे औचित्य साधून वृक्षारोपण रोपणाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी नवयुग विद्यालय देवरीचे मुख्याध्यापक सोनवणे यांची उपस्थिती होती.

### शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची खा. देशमुखांसोबत चर्चा

**वाशिम :** साहित्यरत्न, लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे औचित्य साधून बिगर सातबारा शेतकरी संघटनेच्या वतीने वाशिम यवतमाळ मतदार संघाचे खासदार संजय देशमुख यांना डॉ. अण्णाभाऊ साठे यांची प्रतिमा भेट देऊन चर्चा करण्यात आली. रविवार, ३ ऑगष्ट रोजी शासकीय विश्रामगृहात झालेल्या कार्यक्रमात संघटनेचे अध्यक्ष भाई जगदीशकुमार इंगळे, जिल्हाध्यक्ष राजु इंगोले, आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ नेते सरकार इंगोले, सुखदेव कांबळे, अ.भा. मातंग संघाचे राज्य कार्याध्यक्ष संजय वैरागडे, राजु धोंगडे आदींच्या हस्ते खासदारांना प्रतिमा देण्यात आली.

# देवरी गावाचा होतो वारंवार वीज पुरवठा खंडित

## मुंडगाव ३३ के.वी. ला जोडल्यापासून त्रास वाढला

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**देवरी, दि. ७ :** अकोट तालुक्यातील देवरी हे गावं मुंडगाव ३३ के.वी. ला जोडण्यात आले तेव्हापासून देवरी गावातील विद्युत पुरवठा वारंवार खंडित होत आहे.या त्रासाला ग्रामस्थ वैतागले आहेत.रोज सकाळ,संध्याकाळ केंव्हाही विद्युत पुरवठा खंडित होतो.अनेक ठिकाणी विद्युत वितरण कंपनी अकोट यांच्या कर्मचाऱ्यांचा कामचुकारपणा आहे. देवरी परिसरामध्ये अनेक डीपी, इलेक्ट्रिक पोल हे झाडांमध्ये आहेत .कित्येक वर्षापासूनचे विविध वनस्पतीचे वेल डीपीवर, पोलावर चढून वाढले पुन्हा नवीन वेलांचे



पावसाळ्यात वाढचं झाली आहे. विद्युत विभागाच्या कर्मचाऱ्यांनी पहिल्याच वेली काढल्या नसल्याने इलेक्ट्रिक पोल आणि डी पी चे अस्तित्वचं गायब झाले आहे. गेल्या काही वर्षांपासून हे वेलांची साम्राज्य वाढलेले आहे. परंतु विद्युत विभागाने याकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे सतत इलेक्ट्रिक खंडित होणे आजही देवरी परिसरामध्ये चालूच

> ❏ देवरी हे गाव चार हजार लोकसंख्येचे आहे येथे लहान लहान बालके, वयोवृद्ध आजारी आहेत. त्यात वारंवार विज पुरवठा खंडित होत आहे. त्यामुळे गावातील नागरिक अतिशय कंटाळून गेले आहेत
>
> **- शेताबाई तायडे**
> माजी उपसरपंच देवरी.

आहे..मागील जुलै महिन्यामध्ये आमदार रणधीर सावरकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना पावसाळ्यापूर्वी ग्रामीण भागातील विद्युत पुरवठाबाबत अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली होती .परंतु विद्युत पुरवठा कर्मचाऱ्यांनी केवळ आमदारांसमोर वेळ मारून नेली होती. मुंडगाव फिडर अंतर्गत येणारी गावे आज रोजी विद्युत पुरवठा विभागाला वैतागली आहेत. अकोट तालुका विद्युत पुरवठा वितरण कंपनीचे अधिकारी सामान्य जनतेला हजारो रुपयाने बिल वाढवून देतात. व ठेकेदारांना पाठीशी घालून त्यांनामोफत वीज तीन महिने बांधकामाकरिता देतात आहे हे सर्वश्रुत आहे अकोट येथील कार्यकारी अभियंता यांना ग्रामीण भागाकडे कामचुकारपणा करत असलेल्या अधिकाऱ्यांवर लक्ष ठेवण्याची गरज आहे.

# असोला खुर्दच्या मुख्य रस्त्यासाठी निधी मिळेना

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. ७ :** तालुक्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आसोला खुर्द येथे श्रावण महिन्यात दर दिवशी व विशेषतः सोमवारला हजारोच्या संख्येत श्रद्धाळू माथा टेकण्यासाठी ज्या रस्त्याने येतात त्या मुख्य रस्त्याचे कॉंक्रिटीकरण व रस्त्याच्या दोन्ही बाजूला नाल्याचे बांधकाम सह इतर प्रलंबित विकास कामे मार्गी लावण्याच्या विनंतीचे निवेदन राज्यमंत्री ना.इंद्रनील नाईक यांच्याकडे आसोला वासियांनी मंत्रालयात जाऊन दिले आहे.
सोहमनाथ महाराज यांचे नवसाला पावणारे प्रसिद्ध देवस्थान आसोला खुर्द या गावी असून लक्षावधी भक्तांच्या उपस्थितीत वर्षाला चार यात्रा या गावाला भरत असतात. देवालयापासून तर असोला फाटा कमान ह्या दोन किलोमीटर मुख्य रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण आणि रस्त्याच्या दोन्ही बाजूला नाली बांधकाम करण्यासाठी निधी देण्यात येण्याची मागणी मा. मंत्री महोदयांकडे लेखी निवेदनाद्वारा ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली. सोहमनाथ महाराज मंदिर परिसरामध्ये सभागृह बांधकाम करणे तथा बौद्ध बांधवांची वस्ती असलेल्या ठिकाणी सभागृह बांधकामा सोबतच आसोला खुर्द बस स्थानक ते सेवालाल महाराज मंदिरापासून पुढे हनुमान मंदिर पर्यंत रस्ता व नाली बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देण्याची विनंती निवेदनाद्वारा करण्यात आली. निवेदन देतेवेळी सामाजिक कार्यकर्ता वसंतराव राठोड,सरपंच निकिता व.राठोड, शामभाऊ राठोड, नितीन राठोड, छाया राठोड, गोपाल आडे,पंडित चव्हाण, बादल राठोड, उपसरपंच, देवानंद चव्हाण, मनोहर जाधव, रोहित राठोड, गोकुळ जाधव आदी आसोल्याचे नागरिक उपस्थित होते.

# पत्रकारांवरील हल्ल्याच्या निषेधार्थ ‘व्हॉईस ऑफ मीडिया’ बार्शीटाकळीतर्फे ठाणेदारांना निवेदन

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**बार्शीटाकळी, दि. ७ :** एका हिंदी दैनिकाचे संपादक आणि त्यांच्या कुटुंबीयांवर झालेल्या जीवघेण्या हल्ल्याच्या निषेधार्थ व्हॉईस ऑफ मिडिया बार्शीटाकळी तालुकाच्या वतीने बार्शीटाकळी पोलीस ठाण्याचे ठाणेदार प्रविण धुमाळ यांच्यामार्फत जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन देण्यात आले.
संबंधित आरोपींविरुद्ध पोलिस विभागाने दिलेली प्रेसनोट ही प्रसिद्ध करण्यात आली होती. यामुळे संतप्त झालेल्या आरोपींनी हा हल्ला केला. या घटनेला लोकशाही आणि पत्रकारितेवर झालेला थेट हल्ला



ठरवत आरोपींवर तात्काळ आणि कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच, अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी पत्रकारांच्या सुरक्षेसाठी कायमस्वरूपी आणि प्रभावी व्यवस्था उभारण्यात यावी, अशीही मागणी संघटनेने केली.या प्रसंगी ‘व्हॉईस ऑफ मिडिया’चे जिल्हा सचिव श्याम ठक, ज्येष्ठ मार्गदर्शक मुफीज खान,तालुकाध्यक्ष संजय वाट, सचिव तारीक शेख, उपाध्यक्ष भावेश पटेल, तालुका उपसंघटक श्याम कुलकर्णी, शहराध्यक्ष गुफरान शेख, सहसचिव बाळकृष्ण उताने पाटील , कोषाध्यक्ष कुमार काकड, भारत चव्हाण ,तसेच शेख इमाम, नदीम खान, रामदत्ता राठोड, मो. रफिक, नसुरुल्लाह खान, संजय चव्हाण आदी पत्रकार उपस्थित होते.

# पंचनामे सुरू झाल्याने ठिय्या आंदोलन मागे

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. ७ :** तालुक्यातील ईंझोरी महसूल मंडळातील अनेक गावांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे व त्यानंतर पावसाने दिलेल्या ओढीमुळे एकदा दोनदा नाही तर तीन वेळा पेरणी करूनही बियाणे न उगवल्यामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचा पंचनामा करण्याची सातत्याने मागणी करूनही कृषी व महसूल प्रशासनाकडून कुठल्याही हालचाली होत नसल्याच्या निषेधार्थ करण्यात येणारा तालुका कृषी अधिकारी कार्यालयावरील शुक्रवार दि.८ ऑगस्ट रोजीचा शिवसेनापप्रणीत ठिय्या आंदोलन तालुका कृषी प्रशासना कडून



पंचनामे सुरू झाल्याने थांबविण्यात आले आहे.
इंदुरी महसूल मंडळातील गावांमध्ये जून महिन्याच्या २५ आणि २६ तारखेला अतिवृष्टी झाल्याने बियाणे दडपून निघाले नव्हते त्यानंतर दुसऱ्यांदा पेरणी केल्यावर पावसाने उड दिल्याने तेही बियाणे न निघाल्याने शेतकऱ्यांनी कर्ज काढून तिसऱ्यांदा पेरणी करून हे शेतशिवारात बियाणे उगवलेच नसल्याची तक्रार तालुका प्रशासनाकडे या मंडळातील शेतकऱ्यांच्या वतीने २३ जुलै ला शिवसेना उबाठा गटाकडून करण्यात आली होती.
सातत्याने झालेल्या नुकसानीची माहिती सबंधित विभागाला देऊ नये कुठल्याही हालचाली होत नसल्याने शुक्रवार दि.८ ऑगस्ट रोजी बाधित शेतीच्या पंचनाम्यासाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालयासमोर शेतकऱ्यांच्या वतीने शिवसेना उबाठा गटाकडून हे आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन एक ऑगस्ट रोजी प्रशासनाला देण्यात आले होते. शेतकऱ्यांकडून प्राप्त निवेदनावरून आज इंझोरी महसूल मंडळातील काही शेतकऱ्यांचे शेतीचे पंचनामे कृषी सेवक पत्रे यांच्या द्वारा करण्यात आली. यावेळी शिवसेना उपतालुकाप्रमुख देवानंद हळदे, जगदीश आरेकर, हरिष दिघडे युवा सेना उपतालुकाप्रमुख हे उपस्थित होते. तालुका कृषी अधिकारी कार्यालय मानोरा यांच्याकडून गावनिहाय करण्यात आलेल्या दुबार पेरणीची माहिती घेऊन पुढील कारवाई करण्यात येणार असल्याचे लेखी पत्र देण्यात आल्याने ठिय्या आंदोलन तूर्तास स्थगित करण्यात आले.

# वाशिम जिल्ह्यात १ कोटी वृक्ष लागवड

## जिल्हा परिषदेकडून पंचायत समितीनिहाय उद्दिष्टांचे वाटप

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ७ :** महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या निर्देशानुसार आणि दिनांक २८ जुलै २०२५ रोजी निर्गमित शासन निर्णयाच्या अनुषंगाने, ''हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र'' या महत्त्वाकांक्षी अभियानांतर्गत राज्यात १ कोटी वृक्ष लागवड करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी वाशिम जिल्हा परिषदेच्या वतीने मोठ्या प्रमाणात जनजागृती सुरू करण्यात आली आहे.
या मोहिमेंतर्गत वाशिम जिल्ह्याला मिळालेले उद्दिष्ट पंचायत समितीनिहाय खालीलप्रमाणे वाटप करण्यात आले आहे: वृक्ष लागवड करताना परिसराच्या भौगोलिक परिस्थितीनुसार स्थानिक प्रजातींची निवड करावी. शासकीय



जागांचा उपयोग: जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायती व इतर शासकीय जागांवर लागवड करून शाश्वत हरितावरण निर्माण करावं. नियम व अंमलबजावणी: महसूल व वन विभागाच्या दिनांक ११/०६/२०२५ च्या शासन निर्णयातील सूचनांचं काटकसर पालन करावं. जिओ-टॅगिंग व माहिती अपलोड: प्रत्येक वृक्षलागवडीची स्थळ नोंदणी, जिओ-टॅगिंग, छायाचित्रे व वृक्षांचे जिवंत राहण्याचे प्रमाण महिन्याला सहामाही वन विभागाच्या पोर्टलवर अपलोड करणं अनिवार्य. कंट्रोल रूममार्फत नियंत्रण: ही संपूर्ण मोहिम प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांच्या कमांड कंट्रोल रूममार्फत संनियंत्रित केली जाईल.

> ❏ ''आपल्या गावासाठी, आपल्या पृथ्वीसाठी एक झाड लावा.'' या अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी प्रत्येक व्यक्तीने आपल्या गावासाठी व आपल्या पृथ्वीसाठी किमान एक तरी झाड लावुन या मोहिमेमध्ये योगदान द्यावे .
>
> **- आत्माराम बोंद्रे**
> उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
> जिल्हा परिषद , वाशिम

# इनरव्हील क्लब ऑफ अकोलाची पहिली जनरल बॉडी मीटिंग संपन्न

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला: दि. ७ :** दिनांक ०५ ऑगस्ट रोजी पीपी जया सरदेसाई यांच्याकडे इनरव्हील क्लब ऑफ अकोला ची पहिली जनरल बॉडी मिटिंग संपन्न झाली. अध्यक्ष जयश्री शास्त्रकार यांनी मीटिंगची सुरुवात केली. या मीटिंगमध्ये अध्यक्ष जयश्री शास्त्रकार यांनी आतापर्यंत केलेल्या कार्याची सर्वांना माहिती सांगितली. तसेच येणाऱ्या उपक्रमाबद्दल सुद्धा माहिती दिली .तसेच सचिव सीमा साबळे, कोषाध्यक्ष अलका मेहता, क्लब एडिटर अनुजा मांडवे ,यांनी सुद्धा त्यांच्या कार्याची माहिती दिली. अध्यक्ष जयश्री शास्त्रकार यांनी जुलै आणि ऑगस्ट महिन्यामध्ये ज्यांचे वाढदिवस येतात त्यांना त्यांच्याकडून छोटेसे गिफ्ट देऊन त्यांना सन्मानित केले. इनरव्हील क्लब ऑफ अकोला येथे नवीन सदस्यांचे आगमन झाले. आता सध्या श्रावण




महिना सुरू आहे. म्हणून इनरव्हील क्लब ऑफ अकोला यांनी हिरव्या रंगाची थीम ठेवली. हिरवा रंग श्रावण मध्ये खूप शुभ मानला जातो.अध्यक्ष जयश्री शास्त्रकार यांनी'' स्टोरी ऑफ सारी ''अंतर्गत हा उपक्रम घेतला. साडी हा आपला मराठी संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे .कुठलेही कार्यक्रम असो की उत्सव असो साडी महिला परिधान करतात. तसेच या मीटिंगमध्ये पीडीसी आशाजी मालीवाल यांच्याकडून संध्या दिपके यांना सिलिंग फॅन वितरित करण्यातआला. उपाध्यक्ष तसनीम वाघ यांनी आभार व्यक्त केले. अध्यक्ष जयश्री शास्त्रकार यांनी मीटिंग समाप्तीची घोषणा केली आणि राष्ट्रगीताने मीटिंगची समाप्ती झाली. ही मीटिंग पीपी जया सरदेसाई आणि पीपी निशा सुरेका यांनी स्पॉन्सर केली. या मिटींगला अध्यक्ष जयश्री शास्त्रकार, सचिव सीमा साबळे , क्लब एडिटर अनुजा मांडवे तसेच इनरव्हील क्लब ऑफ अकोला चे सर्व सदस्य उपस्थित होते.

## मागणी

### नागरिकांचे पातूर नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

# चिराचौक परिसरातील उघड्यावरील मांस विक्री बंद करा

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**पातुर, दि. ७ :** शहरांमधील मुख्य चीरा चौक भागांमध्ये रहदारीच्या रस्त्यावर गेल्या काही महिन्यापासून उघड्यावर मांस विक्रीची दुकाने लावल्यामुळे जाणाऱ्या येणाऱ्या महिला पुरुषांना नाहकचा त्रास सहन करावा लागत आहे. ही मांस विक्री तात्काळ बंद करावी अशी मागणी असलेले निवेदन पातुर नगरपरिषद मुख्याधिकारी यांना ७ ऑगस्ट रोजी दिले आहे.
या चिराचौक परिसरामध्ये ५० ते ६० वर्षापासून राहत असलेले चौकातून जाणाऱ्या



मुख्य रस्त्यावरूनच महिला मुली विद्यार्थी जाणे येणे करतात या परिसरामध्ये दवाखाने मेडिकल आणि मोठी आवश्यक दुकाने आहेत. मांस विक्रीचा व्यवसाय करणारे लोक रस्त्यावरच कोंबडीची पिसे मासोळीचे टाकाऊ अवयव आणि कोंबड्याचे टाकाऊ पदार्थ उघड्यावरच टाकत आहेत. टाकाऊ पदार्थ खाण्यासाठी कुत्रे डुकरे मोठ्या प्रमाणात या ठिकाणी गर्दी करून घाणीचे साम्राज्य पसरवित आहेत. त्यामुळे आजाराचा धोका निर्माण झाला आहे. येथीलच भगत वेटाळामध्ये देवीचे मंदिर आहे तर याच परिसरामध्ये बालाजी मंदिर सुद्धा आहे या ठिकाणी महिला पुरुष मोठ्या प्रमाणात दर्शनाला जातात.
मात्र रस्त्यावरच मांस विक्रीची दुकाने असल्यामुळे भावना दुखावल्या जात आहेत. पातुर शहर हे संवेदनशील असून याठिकाणी अनुचित प्रकार घडल्यास न प प्रशासन जबाबदार राहील असे निवेदनात नमूद केले आहे. यावेळी विजू भागत,दिनेश बोचरे, ऋषी सातव, प्रवीण इंगळे, सचिन बारोकार, निलेश माऊली कर, गजानन गाडगे, विक्की इंगळे, अंकुश सातव, तुषार तायडे,कन्हैया चिंचोळकर,पप्पू सातव,सौरभ माऊली कर,प्रवीण इनामदार,पवन इंगळे, सनद गवई, प्रज्वल बंड, अजय तायडे, अनिल वालोकार, शिवा भगत, प्रथमेश इंगळे आदीचा समावेश होता.

# समाजकार्य महाविद्यालयात क्षेत्रकार्य व सामाजिक संशोधन कार्यशाळा संपन्न

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ७ :** ग्रामीण विकास शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ, खडकी अकोला द्वारा संचालित, श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी अकोला येथे दिनांक ०६-०८-२०२५ रोजी ठीक सकाळी १०:०० वाजता. महाविद्यालयात क्षेत्रकार्य व सामाजिक संशोधनाबाबत कार्यशाळा घेण्यात आली.
यावेळी ग्रामीण विकास शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळाचे सचिव डॉ. सुरेशराव काळे , महाविद्यालयाचे अध्यक्ष प्रा. डॉ. संकेत काळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. केशव गोरे तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी व कार्यक्रम समन्वयक प्रा.डॉ.केतन वाकोडे, प्रा.डॉ. अर्चना धर्मे, सहा. कार्यक्रमाधिकारी प्रा. नवनाथ बडे,



इत्यादी मान्यवर विचार मंचावर उपस्थित होते, यावेळी विचार मंचावर उपस्थित सर्व मान्यवरांच्या शुभहस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार पण करून व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सदर कार्यशाळेचे प्रास्ताविक प्राचार्य .डॉ. केशव गोरे सर यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे समन्वय डॉ. केतन वाकोडे यांनी विद्यार्थ्यांना क्षेत्रकार्याबाबत विस्तृत माहिती दिली, तसेच सामाजिक संशोधन या विषयावर प्रा.डॉ. अर्चना धर्मे यांनी विद्यार्थ्यांना विस्तृत मार्गदर्शन केले. तसेच अध्यक्षीय भाषणात डॉ. संकेत काळे सर यांनी विद्यार्थ्यांना समाजातील सामाजिक समस्येवर संशोधन करण्याकरिता प्रेरित केले. सदर कार्यशाळेला महाविद्यालयातील प्रा. डॉ. प्रफुल्ल पवार, प्रा.डॉ.बळवंत पाटील, व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद,व एम.एस.डब्ल्यू चे बहुसंख्या विद्यार्थी उपस्थित होते. व कार्यशाळा यशस्वीरीत्या संपन्न झाली.

# ‘मिशन नेक्स्ट’ अमरावती ‘रिंग रोड’

## काटा-काकडदाती-मंगरुळ रोड: सुपखेला-बाभूळगाव-पुसदकडे

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**रिसोड, दि. ७ :** हिंगोलीकडे जाणाऱ्या वाहतुकीसाठी रिंग रोड झाला . परंतु पुसद आणि मंगरूळकडे जाणाऱ्या जड वाहतुकीमुळे अद्यापही वाहनांची मोठी गर्दी आहे. ही गर्दी कमी करण्यासाठी जांभरूण परांडे किंवा लाल मातीहून काटा- कोंडाळा--काकडदाती - मंगरूळ रोड - सुपखेला - बाभुळगाव मार्गे पुसद रोड असा रिंग रोड मंजूर करावा. अशी मागणी रस्ते विकास संघर्ष समितीने नामदार नितीन गडकरी यांचेकडे केली आहे. गडकरी यांनी या प्रस्तावित रिंग रोडसाठी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

शहरातील अकोला बायपास ते हिंगोली रोड या रस्त्याबाबत गेल्या महिनाभरापासून रस्ता तयार कसा होणार. याबाबत संभ्रम निर्माण झाला होता. हा संभ्रम दूर करण्यासाठी आणि शहरातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग हा



प्रत्येकांसाठी सुरक्षित आणि व्यवस्थित असला पाहिजेत याबद्दल रस्ते विकास संघर्ष समितीने नागपूर येथे जाऊन रस्ते वाहतूक मंत्री गडकरी यांची भेट घेऊन वादग्रस्त राष्ट्रीय मार्गातील असलेल्या त्रुटी निदर्शनास आणून दिल्या. लगेच या त्रुटी दूर करून वाशिंकारांच्या सोयीचा आणि सुरक्षित रस्ता देऊ. याशिवाय प्रत्येक चौक हा सुशोभित करू अशी ग्वाही नामदार गडकरी यांनी दिली.

या भेटीदरम्यान वाशिम येथून भेटीला गेलेल्या शिष्ट मंडळाने लाल मातीहून काटा, कोंडाळा, चिखली, काकडदती काटा- कोंडाळा-- काकडदाती - मंगरूळ रोड - सुपखेला - बाभुळगाव मार्ग पुसद रोड असा रिंग रोड नकाशा होऊन तयार असल्याची




आठवण मंत्री महोदयांना दिली. यावर गडकरी म्हणाले की या रिंग रोडबद्दल माझ्या तांत्रिक टीमला सांगून त्यासाठी किती निधी उपलब्ध करावा लागेल याचे अंदाज पत्रक तयार करणे, रस्ता किती मीटरचा करावा लागेल आणि या रिंग रोड मध्ये शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहित करून त्यांना योग्य मोबदला देणे. ही सुद्धा महत्त्वाची बाब आहे.

लाल मातीहून काटा, कोंडाळा, चिखली, काकडदती काटा- कोंडाळा- -काकडदाती - मंगरूळ रोड - सुपखेला - बाभुळगाव मार्ग पुसद रोड असा रिंग रोड तयार झाल्यास अनेक शेतकरी हे समृद्ध होतील. याशिवाय दळणवळणासाठी वाशिम शहराच्या आजूबाजूला असलेल्या ग्रामीण भागातील लोकांना या रिंग रोड वरून पूर्व, पश्चिम आणि दक्षिणेकडे कुठेही जायचे असेल तर हा रिंग रोड सुरक्षित , कमी अंतर आणि कालावधीचा असणार आहे. यासाठी हा रिंग रोड होणे अत्यंत महत्त्वाचे असल्याची बाब वाशिम शहर रस्ते विकास संघर्ष समितीच्या सदस्यांनी नामदार गडकरी यांचे लक्षात आणून दिलेली आहे. नामदार गडकरी यांनी या रिंग रोड साठी सकारात्मक प्रतिसाद दिल्यामुळे वाशिमकरांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.



लाल माती किंवा जांभरूण परांडे या ठिकाणापासून काटा कोंडाळा, चिखली, काकड दाती, मंगरूळ रोड, सुपखेला बाभुळगाव पुसद रोड असा रिंग रोड प्रस्तावित केला आहे. या रिंग रोडमुळे शेतकरी तर समृद्ध होतील. याशिवाय रोड लगतच्या जमिनीला चांगले महत्व येणार आहे. त्या परिसरातील हजारो लोकांना दळण वळणासाठी अत्यंत फायदेशीर असणार आहे. सर्वांनी या मोहिमेला सकारात्मक प्रतिसाद द्यावा अशी अपेक्षा आहे.

**-हरीश सारडा**
रस्ते विकास संघर्ष समिती, वाशिम

## महत्त्वाचे

### जागेच्या वादातून महिलेस मारहाण

**मंगरूळपीर :** जागेच्या वादातून महिलेस मारहाण करण्यात आल्याची घटना गिंभा गावात ५ ऑगस्ट रोजी घडली. या प्रकरणी पोलिसांनी ६ ऑगस्ट रोजी तिघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. लक्ष्मी सचिन धोंगडे (वय २२, रा. गिंभा) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ५ ऑगस्ट रोजी सायंकाळच्या सुमारास त्या व त्यांचे पती घरासमोर असताना सुनील नारायण धोंगडे याने 'तू माझ्या जागेत झोपडे का बांधले?' या कारणावरून वाद घालत शिवीगाळ केली. त्यानंतर त्याने हातातील धारदार शस्त्राने डाव्या हातावर वार करून जखमी केले. त्यानंतर नारायण धोंगळे आणि शांताबाई धोंगडे यांनी फिर्यादी व तिच्या पतीस मारहाण आणि शिवीगाळ केली, असे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी तिघांविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पोलिस अधिक तपास करीत

### पोर्टलचा वापर न करता बियाण्यांची विक्री: ५८ विक्रेत्यांना नोटीस!

**वाशिम :** खरीप हंगाम २०२५ पासून राज्यात बियाण्यांची विक्री 'साथी पोर्टल'द्वारे करणे अनिवार्य करण्यात आले आहे; मात्र जिल्ह्यातील काही विक्रेत्यांनी शासनाच्या या आदेशाचे उल्लंघन करून पोर्टलचा वापर न करता बियाण्यांची विक्री केली. त्यामुळे ४३ बियाणे व १५ खत विक्रेत्यांना नोटिसा बजावल्याची माहिती ६ ऑगस्ट रोजी कृषी विभागाने दिली. तपासणीदरम्यान खत विक्रीतही अनियमितता आढळून आली असून, प्रत्यक्ष साठा व ऑनलाइन दाखवलेला साठा यामध्ये तफावत असल्याचे आढळले.

### वाशिमच्या बाजारात चियाला २० हजारावर मिळतोय भाव

**वाशिम :** मागील काही दिवसांपूर्वी चियाचे दर २४ हजार रुपये प्रति क्विंटलच्याही वर पोहोचले होते. आता मात्र चियाच्या दरात चढ-उतार होत असल्याचे दिसत आहे. मागील महिन्यात १९ जुलै रोजी वाशिम बाजार समितीत चियाला कमाल १९ हजार ९०० रुपये प्रति क्विंटलचा दर मिळाला, तर सोमवार, ४ ऑगस्ट रोजी कमाल २०,४०० रुपये प्रति क्विंटलपर्यंतचा दर मिळाला. जिल्ह्यात चियाची तब्बल ३,६०८ हेक्टरवर लागवड झाली. रिसोड आणि वाशिम कृषी उत्पन्न बाजार समितीत या शेतमालाची खरेदी केली जाते. या शेतमालास जिल्ह्यात बाजारपेठही उपलब्ध झाली असताना दरही समाधानकारक मिळत असल्याने आता चियाच्या क्षेत्रात वाढही होण्याची शक्यता आहे. जुलैच्या मध्यंतरी चियाचे दर थेट २५ हजार ५०१ रुपये प्रति क्विंटलपर्यंत पोहोचले होते. त्यानंतर आठवडाभरातच चियाच्या दरात प्रति क्विंटलमागे ४ हजार ६०० रुपयांची घसरण झाली.

# फवारणीदरम्यान ट्रॅक्टरखाली दबून १६ वर्षीय मुलाचा मृत्यू

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**रिसोड, दि. ७ :** शेतात कीटकनाशकाची फवारणी करत असताना ट्रॅक्टरच्या चाकाखाली दबून १६ वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना रिसोड तालुक्यातील पेडगाव येथे मंगळवार, ६ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजताच्या सुमारास घडली. मृतकाचे नाव करण गजानन गोडघासे (रा. पेडगाव) असे आहे.

करण गोडघासे हा कीटकनाशक फवारणीच्या कामासाठी पेडगाव शेतशिवारात गेला होता. करण हा ट्रॅक्टर चालकाच्या शेजारी बसला होता. फवारणी सुरू असताना ट्रॅक्टर अचानक उसळला आणि करण हा समोरच्या चाकाखाली पडल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच रिसोड पोलिस स्टेशनचे अधिकारी आणि कर्मचारी तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पाहणी करून पुढील कारवाई सुरू केली. मृतदेह रिसोड ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी हलविण्यात आला.

# देशी दारूच्या दुकान मालकासह वाहतूकदारावर कारवाई

## १९ इसमांवर गुन्हे दाखल : दारू वाहतूकदारांचे धाबे दणाणले

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशीम, दि. ७ :** अवैधरित्य दारुविक्री करणाया इसमांवर कारवाई करून देशी विदेशी दारुसह मोबाईल व दुचाकी असा एकूण २ लाख ६२ हजार ६५२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.सदर कारवाई ५ ऑगस्ट रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाच्या पथकाच्या वतीने करण्यात आली.

प्राप्त माहितीनुसार ५ ऑगस्ट रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, वाशीम ते पुसद मंगरुळपीरकडे जाणाऱ्या रोडवरील अवैधरीत्या दारू वाहतूक केली जात आहे. सदर




माहितीवरून पोलीसांनी सापळा रचून रेल्वे उडाणपुलाजवळ अवैधरित्या दारु वाहतूक करणाया इसमावर कारवाई केली असता, आरोपी हा अवैधरित्य देशी दारुची वाहतूक करताना मिळून आला. त्याने, सदरचा माल तो कुंभी, ता. मंगरुळपीर येथील हॉटेल निसर्ग रेस्टॉरंट ढाबा व हॉटेल दराडे मामा ढाबा येथे पुरवठा करतो असे सांगितल्यावरुन हॉटेल निसर्ग रेस्टॉरंट ढाबा व हॉटेल दराडे मामा ढाबा येथे रेड करुन कार्यवाही करण्यात आली. नमुद तिनही घटनास्थळावरुन व आरोपीकडून ५२ हजार ६५२ रुपयांची देशी विदेशी दारु,१ लाख १० हजार रुपये किंमतीचे ४ मोबाईल व १ लाख रुपये किंमतीची एक दुचाकी असा एकूण २ लाख ६२ हजार ६५२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर अवैध दारु विक्री करणाया आरोपीविरुद्ध वाशीम शहर पोलीस स्टेशनवर गुन्हा दाखल करण्यात आला.

उपविभागीय पोलीस अधिकारी नवदीप अग्रवाल यांच्या पथकाने केलेल्या कारवाईत पुढील आरोपींचा समावेश आहे. रोहीत लुल्ला, लुल्ला वाईन शॉपी मंगरुळपीर, कैलास मगर, बाबा बिअर शॉपी अनसिंग, सचिन परळीकर, राजेश वाईन बार मंगरुळपीर, जुगलकिशोर जैस्वाल, रा आंबेडकर चौक वाशिम, देशी दारु शॉप मालक, हिंगोली नाका जवळ वाशिम या दुकानदार मालकांचा समावेश आहे. वाहतूकदार मध्ये आकाश गौतम मोरे, , रा.पंचशिल नगर वाशिम, सुनिल अरुण खपाटे, रा.पंचशिल नगर, वाशिम, केशव कुंडलीक केंद्रे रा.लेही, ता. मंगरुळपीर, सुनिल शालीग्राम दराडे, , रा.लेही ता. मंगरुळपीर, , नाजूकराव भडांगे रा. मंगरुळपीर, प्रदिप राठोड, शिवा भगत, दोन्ही रा. पिपळगाव (इजारे), नागेश खोटे, देवेंद्र मसनकार दोन्ही रा. कुंभी, रवि राठोड रा.लाखी, निलेश राठोड, विठ्ठल राठोड दोन्ही रा. वटफळ, राजकुमार राठोड रा. गोस्ता, निवास वल्लूलाळ, विलास बल्लाळ दोन्ही रा. गोस्ता यांचा समावेश आहे.

# विठोलीच्या शाळा दुरुस्तीसाठी तांडा सुधार समितीचे उपोषण

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

विठोली येथे शिक्षण झालेले हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक हे शेतकऱ्यांचे दैवत असून महापुरुषांची प्रशासनाकडून अवहेलना वेदनादायी व संतापजनक असल्याची प्रतिक्रिया अखिल भारतीय तांडा सुधार समितीचे महासचिव नामा बंजारा यांनी यानिमित्ताने प्रस्तुत प्रतिनिधीला दिली.

**मानोरा, दि. ७ :** देशाचे उपपंतप्रधान दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्यानंतर खऱ्या अर्थाने महाराष्ट्राला सुजलाम सुफलाम करणाऱ्या माजी मुख्यमंत्री व आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार वसंतराव नाईक यांनी शिक्षण घेतलेल्या विठोली ता. मानोरा जि. वाशिम येथील शाळेची अत्यंत जर्जर अवस्था झाली मोडकळीस आलेल्या ह्या वास्तूच्या दुरुस्ती व डागडूजी ची वारंवार मागणी करूनही प्रशासन याकडे लक्ष देत नसल्याने प्रशासनाच्या ह्या वेळकाढू धोरणाचा निषेध म्हणून आठ ऑगस्ट क्रांती दिनीच्या पूर्वसंध्येपासून विठोली येथे अखिल भारतीय तांडा सुधार समितीच्या वतीने जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती मानोरा तालुकाध्यक्ष डॉ. गणेश राठोड यांनी दिली. संत सेवालाल महाराज तांडा समृद्धी योजनेतून मंजूर २० लक्ष रुपयाच्या निधीतून मोडकळीस आलेल्या शाळा इमारतीची दुरुस्ती व सुशोभीकरणासाठी शासनाने विस लक्ष रुपये मंजूर करून वर्ष ओलंडला आहे.कामाचे इस्टीमेट सुद्धा झालेले असून देखील स्थानिक पं. समिती प्रशासनाने कोणतीही हालचाल केली नाही. याबद्दलचे अधिकृत निवेदन तांडा सुधार समितिने दि. ७ जुलै २०२५ रोजी प्रशासनाला दिले असुन समिती आपल्या निर्णयावर ठाम असल्याचे राष्ट्रीय महासचिव नामा बंजारा यांनी कलविले आहे.

या कामाचे इस्टिमेट होऊन तांत्रिक मंजुरीही मिळाली आहे.अखिल भारतीय तांडा सुधार समितीच्या वतीने वारंवार निवेदन देऊन या शाळेला स्मारक घोषित करावे अशी मागणी अखिल भारतीय तांडा सुधार समितीच्या डॉ. गणेश राठोड तालुका अध्यक्ष, रामराव चव्हाण तालुका उपाध्यक्ष, डॉ. सुधाकर राठोड तालुका सचिव, संकेत राठोड तालुका संघटक, धर्मराज आड़े सहसचिव यांनी मागील अनेक वर्षापासून लावून धरली आहे.

# वाशिम शहरात महिलांसाठी स्वच्छतागृह उभारा

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशीम, दि. ७ :** वाशिम शहरात महिलांसाठी स्वच्छता गृह निर्माण करण्यात यावे या मागणी साठी ६ जुलै रोजी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे वतीने नगर परिषदेच्या मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

त्यांनी निवेदनात म्हटले आहे की गेल्या कित्येक दिवसापासून बाहेरगावावरून येणाऱ्या तथा शहरातील महिला वर्गांसाठी शहरात स्वच्छतागृह कोठेच नाहीत , त्यामुळे महिलांना कठीण समस्येला सामोरे जावे लागत आहे.

महाराष्ट्रातील प्रत्येक शहरांमध्ये महिलांसाठी स्वच्छतागृह ठिकठिकाणी



उभारले आहेत परंतु आपल्या वाशीम शहरांमध्ये कोणत्याच ठिकाणी महिलांसाठी स्वच्छतागृह नसल्याने बाहेरगाव वरून कामानिमित्त किंवा बालासाहेबांच्या (बालाजी) दर्शनासाठी आलेल्या महिलांना तथा काही कामानिमित्त घराबाहेर पडलेल्या महिलांना स्वच्छतागृहाची फार मोठी अडचण येत आहेत ही अडचण लक्षात घेता वाशिम नगरपालिकेमार्फत त्वरित शहरांमध्ये ठिकठिकाणी स्वच्छतागृह तयार करावे व महिलांची समस्यां दूर करावी. अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे

मुख्याधिकारी निलेश गायकवाड म्हणाले की महिलासाठी स्वच्छता गृह बांधकामासाठी सर्व्हेक्षण करण्यात येत आहे त्यानंतर स्वच्छता गृहे बांधण्यात येतील निवेदनावर समता परिषदेचे प्रदेश चिटणीस प्रा अरविंद गाभणे, जिल्हा अध्यक्ष संतोष गोमाशे, जिल्हा सचिव विठ्ठल भागवत जिल्हा कार्याध्यक्ष विठ्ठल ढगे जिल्हा उपाध्यक्ष सेवाराम आडे, विलासराव रोकडे तालुका अध्यक्ष जावेद भवानीवाले जिल्हा कार्यकारिणी सदस्य कपील भालेराव तालुका प्रसिद्धी प्रमुख चंद्रकांत गायकवाड, वाशिम तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर वाशीमकर आकाश गाभणे सौं छायाताई मडके, वाशिम शहर कार्याध्यक्ष धनंजय रणखांब, सौं रंजना पारीसकर, सुरज हेंद्रे शंकर तडस,भगवान मडके मीनाताई बगाडे स्वप्नील जाधव, राधाबाई भंनगे आदी उपस्थित होते.

## नावलौकिक
## मानोरा तालुक्यातील भिलडोंगर गावचे नाव केले ‘रोशन’

# रोशन जाणार अंतराळ संशोधन संस्थेच्या भेटीला

। संजय अलदर ।

**मानोरा, दि. ७ :** तालुक्यातील भिलडोंगर ह्या गावचा निवासी व इतर मागास व बहुजन कल्याण विभागाद्वारा खाजगी आस्थापनेकडून चालविल्या जाणाऱ्या मूर्तिजापुर तालुक्यातील निवासी आश्रम शाळेत ज्ञानार्जन करीत असलेल्या रोशन गोपाल पवार या विद्यार्थ्यांची निवड भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) च्या भेटीसाठी झालेल्या चाचणी परीक्षा अंती निश्चित झाल्याने मानोरा तालुक्यातील शिक्षण क्षेत्रातून पवार यांनी तालुक्याचे नाव रोशन केल्याने त्याचे विशेष कौतुक केले जात आहे.

भारतीय अंतराळ संशोधन संस्था



(इस्रो) ही भारताची अवकाश संशोधन संस्था असून या संस्थेची स्थापना १५ ऑगस्ट १९६९ रोजी झाली. इस्रोचे मुख्य उद्देश अवकाश तंत्रज्ञानाचा विकास करणे आणि राष्ट्राच्या हितासाठी त्याचा उपयोग करणे हा आहे.

इस्रो अंतराळ तंत्रज्ञानाचा विकास करते आणि त्याचा



उपयोग विविध क्षेत्रांमध्ये होतो, जसे की हवामान अंदाज, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन आणि नकाशाशास्त्र. याशिवाय इस्रोने इस्रोने चांद्रयान-१ आणि चांद्रयान-२ या मोहिमांद्वारे चंद्रावर यशस्वीरित्या संशोधन केले. इस्रोने उपग्रह-आधारित दळणवळण, हवामान अंदाज आणि आपत्ती व्यवस्थापन सेवांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

अशा महत्वपूर्ण इस्रोला भेट देणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड अमरावती विभागातील मुलांसाठी घेण्यात आलेल्या निवड चाचणी परीक्षाअंती २७ जुलै रोजी जाहीर करण्यात येऊन त्यामध्ये अभ्यासू रोशन पवार याची सुद्धा गुनानुक्रमे नाव झळकले आहे.

स्व.मेरसिंह बंधू गोवर्धनसिंह राठोड कला व विज्ञान उच्च माध्यमिक विद्यालय दहातोंडा येथे निवासी आश्रम शाळेत शिक्षण घेत आहे.

मानोरा तालुक्यामध्ये सुद्धा प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक निवासी आश्रम शाळा अनेक ठिकाणी असून या आश्रम शाळेतील विद्यार्थी राष्ट्रीय पातळीवर तर सोडा जिल्हा पातळीवरील कुठल्याही प्रकारच्या परीक्षेमध्ये का कधी तालुक्याचे नाव रोशन करीत नाहीत असा सवाल मानोरा तालुक्यातील विद्यार्थी पर जिल्ह्यातील निवासी आश्रम शाळेमध्ये जाऊन आपल्या तालुक्याचे व जिल्ह्याचे नाव देश पातळीवर उंचावल्याने निर्माण होत आहे. तालुक्यातील अनुदानित निवासी आश्रम शाळा मध्ये तालुक्यात सर्व काही आलबेल नाही अशा चर्चा सुद्धा रोशन पवार च्या उत्तुंग भरारीने चर्चील्या जात आहेत.

**मानोरा तालुक्यातील ग्रामीण गावांमध्ये अनेक प्रतिभावंत हिरे आहेत. मात्र त्यांना शोधून चमकविणारा जोहरी (गुरुदेव) येथील अनुदानित निवासी आश्रम शाळा मध्ये कधी निर्माण होईल ? असा सवाल सुद्धा रोशन पवार यांनी उपस्थित केला आहे. दुसऱ्या जिल्ह्यात जाऊन वाशिम जिल्ह्यातील प्रतिभावंत चमकदार कामगिरीमुळे पुढे येत आहेत. हे उल्लेखनीय.**

# आर.ए. कॉलेजमध्ये अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ७ :** स्थानिक आर ए कॉलेज मध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. शैलेश सोनोने, डॉ. विजय जाधव सहाय्यक प्रा.स्वप्निल काळपांडे, प्रा. डॉ. सोनाली कुमरे यांनी अभिवादन केले . प्राचार्य डॉ. झंवर यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे जीवनावर आधारीत विचार व्यक्त केले. कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी अभिजीत घुगे, आयुष शिंदे , पल्लवी गोरे , कु. खुशी काष्टे आदित्य खडसे , कु. मुंडे , कु. शुभांगी गवई, कु. उंडाळ , कु. भगत , प्रणव खडसे , अमीर बेनीवाले उपस्थित होते. सूत्रसंचालन कु. सायली जाधव हिने केले तर आभार किशोर बेद्रे ह्याने केले.

## महत्त्वाचे

### हातमाग दिन : विणकर महिलांना विवर आयडीचे वाटप



**कारंजा :** ११ व्या हातमाग दिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात विणकर महिलांना आमदार डहाके यांच्या हस्ते विवर आयडी कार्डचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालय, विकास आयुक्त कार्यालय विणकर सेवा केंद्र आणि समयमती महिला ग्रामोद्योग केंद्र, कारंजा यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला. कार्यक्रमाचे आयोजन पंडित देवकीनंदन सभागृह, म.ब्र. आश्रम येथे करण्यात आले होते. यावेळी महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. विणकर क्षेत्रातील महिलांना ओळख मिळावी, त्यांच्या कल्याणासाठी शासनाच्या योजना थेट पोहोचाव्यात या उद्देशाने विवर आयडी कार्ड वाटप करण्यात आले. यामुळे महिलांना विविध शासकीय लाभ, प्रशिक्षण सुविधा तसेच योजनांचा लाभ घेण्यास मदत होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समयमती महिला ग्रामोद्योग केंद्राच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# बिछायत केंद्राच्या गोडाऊनला भीषण आग, साहित्य भक्ष्यस्थानी

### प्राथमिक अंदाजानुसार सुमारे ८ ते १० लाख रुपयांचे नुकसान

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**हिरपूर, दि. ७ :** हिरपूर येथील रवींद्र गाडबैल यांच्या बिछायत केंद्राच्या गोडाऊनला आज सकाळी अज्ञात कारणामुळे भीषण आग लागली. ही आग वेगाने पसरल्याने काही क्षणांतच संपूर्ण गोडाऊनला आगीने आपल्या कवेत घेत रौद्ररूप धारण केले. या आगीत लाखो रुपयांचे साहित्य जळून खाक झाले असून, संपूर्ण केंद्राची राखरांगोळी झाली आहे.

गोडाऊनमध्ये साठवलेले गाद्या, कपडे, चटया, टेबल, खुर्च्या, कापडी मंडप, साऊंड सिस्टम, पांघरुणे, लाकडी फर्निचर व इतर घरगुती साहित्य पूर्णतः भस्मसात झाले. आगीची माहिती मिळताच गावातील नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली; मात्र आगीच्या भीषणतेमुळे कोणतेही साहित्य वाचवणे शक्य झाले नाही. दरम्यान, अग्निशमन दलालाही तत्काळ सूचना देण्यात आली होती; परंतु अग्निशमन दल पोहोचेपर्यंत सर्व साहित्य खाक झाले होते. आग लागण्यामागचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी प्राथमिक तपासातून शॉर्टसर्किटचा संशय



व्यक्त केला जात आहे.

सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही, ही दिलासादायक बाब मानली जात आहे. घटनेनंतर तलाठी सुरवाडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. प्राथमिक अंदाजानुसार सुमारे ८ ते १० लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. गावकऱ्यांनी दाखवलेली तत्परता आणि धाडस यामुळे मोठा अनर्थ टळला. आग विझविण्यासाठी गावकऱ्यांनी आपल्या जीवाची पर्वा न करता प्रयत्न केले. गावातील कूपनलिकेवर बसवण्यात आलेल्या मोटार पंपच्या सहाय्याने पाइपद्वारे दूर अंतरावरून पाणी आणले गेले, त्यामुळे आग आटोक्यात आणण्यात मदत झाली. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त केली जात असून, प्रशासनाने या संदर्भात तपास सुरू केला आहे. संबंधित यंत्रणांनी लवकरात लवकर नुकसानग्रस्तांना मदत पुरवावी, अशी मागणी गावकऱ्यांतून होत आहे.

# 'आम्ही शपथ घेतो की...'

### प्रभातमध्ये विद्यार्थी संसदेचा शपथविधी सोहळा थाटात




दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ७ :** भारत देश हा लोकशाही प्रधान देश आहे आणि शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांना लोकशाहीचे महत्त्व कळावे, त्यांच्यात नेतृत्व गुणांची रुजवणूक व्हावी तसेच समाजसेवेबद्दल त्यांच्यात आवड निर्माण व्हावी, या हेतूने प्रभात किड्स स्कूलमध्ये विद्यार्थी प्रतिनिधी मंडळ निर्वाचित केले असून, नवनियुक्त विद्यार्थी प्रतिनिधी मंडळाचा शपथविधी सोहळा प्रभात किड्स स्कूलच्या सभागृहात गुरुवार, ७ ऑगस्ट रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

सुरुवातीला शाळेच्या एनसीसीच्या कॅडेट्सनी सर्व विद्यार्थी संसद सदस्यांना सन्मानपूर्वक सभामंचावर आणले. प्रभातच्या प्राचार्य वृषाली वाघमारे यांनी नवनिर्वाचित विद्यार्थी प्रतिनिधींना पदाची शपथ दिली. यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्य अर्चना बेलसरे, व्यवस्थापक अभिजीत जोशी, समन्वयक मो. आसिफ प्रामुख्याने उपस्थित होते. स्कूल हेड बॉय म्हणून रैवत देशपांडे याने पदाची शपथ घेतली तर हेड गर्ल म्हणून गार्गी गरकल हिने पदाची शपथ घेतली. तसेच प्रणील नावकार असिस्टंट हेड बॉय तर मधुरा वाघ हिने असिस्टंट हेड गर्ल म्हणून शपथ घेतली. या विद्यार्थी प्रतिनिधी मंडळातील सदस्य अलंकार डंबाळे, ओजस्वी पुरी, अपूर्वा मिटकरी, हंसिका तहलरामानी, वीर जयस्वाल, रेणुका रहाटे, आदर्श दलाल, अनुष्का टकरानी, अथर्व आखरे, शाश्वत महल्ले यांना त्यांच्या पदांची शपथ देण्यात आली. सोबतच शाळेतील चारही हाऊस कॅप्टन तथा व्हाइस कॅप्टन पदासाठी निवड झालेल्या शर्वरी गरकल, गार्गी गावंडे, अनुष्का मेंढे, स्वर्णिमा घुले, पार्थ देशमुख, सुज्वल चव्हान, शौर्य जयताडे व प्रिशा बंदीवान यांना त्यांच्या पदाची शपथ देण्यात आली. आजचा विद्यार्थी उद्याचा सुजाण नागरिक असणार आहे. विद्यार्थी प्रतिनिधी मंडळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा निकोप विकास साध्य होणार असून, त्यांच्यामध्ये स्वयं-शासनाची गोडी निर्माण होणार असल्याचे प्रतिपादन प्राचार्य वृषाली वाघमारे यांनी केले.

प्रभातचे संचालक डॉ. गजानन नारे, संचालिका वंदना नारे, सचिव नीरज आवंडेकर, अशोक ढेरे, ज्येष्ठ रंगकर्मी अरुण घाटोळे, व्ही. अनुराधा, समन्वयक (सीबीएसई) प्रशांत होळकर यांच्यासह पालकवर्ग उपस्थित होता. अत्यंत शिस्तबद्ध रितीने पार पडलेल्या या सोहळ्याचे प्रास्ताविक उपप्राचार्य अर्चना बेलसरे यांनी केले. त्यांनी ५ जुलैपासून सुरू झालेल्या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेचा आढावा घेतला. निवड प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा, मुलाखत व त्यानंतर त्याचे उत्कृष्ट सादरीकरण दिले तर तज्ज्ञ परीक्षकांनी अत्यंत चोख परीक्षण करून प्रतिनिधींची निवड केली. संचालन शरयु राऊत व अक्षरा इंगळे यांनी केले. तर आभार स्वराली जामकर यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. सांस्कृतिक विभाग प्रमुख नंदकिशोर डंबाळे यांच्या संयोजनात सामाजिक शास्त्र विभाग प्रमुख राहुल निलटकर, झीनल सेठ, दिनेश पाटील, समीर कुलकर्णी, अतुल डोंगरे, सागर पारेकर, श्रुती गोरे, स्वप्नाली बंड, वेद कळमकर, अनुराग भिरड, पंकज देशमुख, दिनेश आगाशे, अक्षय कळमकर, सचिन मुरुमकार, प्रशांत तळोकार व श्रीकांत बुलबुले यांनी अथक परिश्रम घेतले.

# बोर्डी शेतशिवारात विद्युत तारांचा स्पर्श होऊन बैल आणि गाईचा मृत्यू

### शेतकऱ्याचे दीड लाखाचे नुकसान

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. ७ :** तालुक्यातील ग्राम बोर्डी येथील शेतकरी श्रीकांत जगन्नाथ धर्मे यांच्या बोर्डी शेतशिवारात मौजे गट क्रमांक २३२ मध्ये गाईच्या मानेवर व छातीवर जिवंत विद्युत तारेचा स्पर्श झाल्याने व बैलाच्या छातीवर व पोटावर स्पर्श झाल्याने मृत्यू झाला आहे.

गाईचे वय ५ वर्षे तर बैल हा ७ वर्षे वयाचा होता. या दुर्घटनेत शेतकरी श्रीकांत जगन्नाथ धर्मे यांचे अंदाजे दीड लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. याबाबत पोलीस तक्रार करण्यात आली असून, उमरा बिट सांभाळणारे उमेश सोळंके यांनी घटनास्थळी भेट दिली. तसेच विद्युत वितरण विभागाचे चांदुरकर, कर्मचारी नवलकर यांनी मोका पाहणी करून अहवाल वरिष्ठांना सादर केला आहे. महसूल विभागाचे तलाठी राजाभाऊ खामकर यांनी घटनास्थळी भेट दिली व पंचनामा करून अहवाल सादर केला आहे.

# हुमणी अळीचे आक्रमण : आमदारांची पीक पाहणी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**कारंजा (लाड), दि. ७ :** कारंजा तालुक्यासह हुमणी अळीच्या प्रचंड प्रादुर्भावामुळे पोहा परिसरातील शेतकऱ्यांना मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर आज मा. आमदार सई डहाके यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन पिकांची पाहणी केली व शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.



पिके सडली असून, उगम थांबलेला आहे, अनेक ठिकाणी शेती नष्ट होण्याच्या स्थितीत आहे. विशेषतः सोयाबीन पिकाचे अतोनात नुकसान झाल्याचे निदर्शनास आले. शेतकऱ्यांनी शासनाकडे त्वरित पंचनामे करून नुकसानभरपाईची मागणी केली आहे. यावर आमदार सई डहाके यांनी सकारात्मक प्रतिसाद देत सांगितले, ''संबंधित यंत्रणेला तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश दिले आहेत. शेतकऱ्यांचे दु:ख हेच आमचे दु:ख असून, योग्य ती मदत मिळेपर्यंत आपण पाठपुरावा करू. या दौऱ्यावेळी भाजपा जिल्हा सरचिटणीस डॉ. राजीव काळे, सुरेश दहातोंडे, रवींद्र घुले, सरपंच शीतल मसने, डॉ. मोहन धाडवे, छगन बहाडे, नायब तहसीलदार हरणे , कृषी अधिकारी जैताळे , ढोकणे , तसेच तलाठी, मंडळ अधिकारी, ग्रामसेवक, कृषी सहायक यांच्यासह अनेक शेतकरी, ग्रामस्थ व कार्यकर्ते उपस्थित होते.

अजिंक्य भारत NEWS & MALABAR GOLD & DIAMONDS CELEBRATE THE BEAUTY OF LIFE Presents भक्तीमय श्रावण

वाचा अजिंक्य भारत जिंका चांदीचे नाणे





धनंजय राज कुमार, तोष्णीवाल लोणार



अजीत अमरनाथ विश्वकर्मा,
विठ्ठल नगर मोठी उमरी,अकोला



अभिलाषा अभिषेक ढमढेरे



गौरी अंकित धनस्कार,
किल्ला चौक जुने शहर,अकोला



अर्चना योगेश डांबलकार,
शिवर,अकोला



हर्षा राजेश नागलकर
महाकाली नगर जुने शहर,अकोला



सुनिता प्रमोदराव मुरुमकार,
शिवर,अकोला



शुभम रामचंद्र मानधने,
लोणार

वरील छायाचित्रांमधून एकास लकी ड्रॉ द्वारे मलाबार गोल्ड अँड डायमंड्स,रतनलाल प्लॉट, अकोला यांचे तर्फे एक चांदीचे नाणे भेट दिल्या जाणार आहे.
तसेच प्रकाशित होणाऱ्या सर्व छायाचित्रांमधून एक मेगा लकी ड्रॉ द्वारे एका विजेत्यास मोठे चांदीचे नाणे मिळवण्याची संधी आहे.
सहभागी होण्याकरीता फोटो, नाव व पत्ता दिलेल्या मोबाईल नंबर वर पाठवावे +91 85309 73259

## महत्वाचे

### बाळापूर फैलात मटका पकडला

**खामगाव :** स्थानिक बाळापुर फैल भागातील बुध्दविहाराच्या पाठीमागे मिथुन मोहन मोरे (३०) हा काल ६ ऑगस्ट २५ रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास वरली मटका खेळतांना व खेळवितांना पोलिसांना मिळून आला. त्याचेजवळुन रोख २१०० रु., मोबाईल ४ हजार रू. व वरली मटका साहित्य असा एकुण ६ हजार ५०५ रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पोहेकॉ. प्रदीप मोठे यांनी शहर पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोस्टेमध्ये उपरोक्त आरोपीविरूध्द कलम १२ अ मजुका नुसार गुन्हा दाखल केला आहे.

### इसमाची गळफास घेऊन आत्महत्या

**खामगाव :** तालुक्यातील ढोरपगाव येथील रहिवासी अरूण भावजी चोपडे (४९) यांनी गुरांच्या वाड्यातील टीनपत्राच्या लोखंडी अँगलला दोराच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना काल ६ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता उघडकीस आली. याप्रकरणी सोपान काशिराम चोपडे यांनी पिं. राजा पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोस्टेमध्ये कलम १९४ भान्यासुस नुसार मर्ग दाखल केला.

### मंदिरातील दानपेटीचे कुलूप तोडले

**खामगाव :** मंदिरात असलेल्या दानपेटीचे कुलूप तोडल्याची घटना आज ७ऑगस्ट रोजी सकाळी उघडकीस आली. घाटपुरी रोडवर पिं. राजा टर्निंगवरील गजानन महाराजांचे मंदिर आहे. त्या मंदिरामध्ये असलेल्या पेटीचे कुलूप कोणीतरी अज्ञात चोरट्याने तोडून नेले असून अंदाजे दिड ते दोन हजार रुपये पेटीमध्ये असल्याचे सांगण्यात येत आहे. आज ७ऑगस्ट रोजी सकाळी भाविक मंदिरात दर्शनाकरीता व दिवा लावण्याकरीता गेले असता झालेला प्रकार दिसून आला. तसेच शहरात छोट्या-मोठ्या चोऱ्या सुरुच असून या चोऱ्यांचा तपास पोलिसांनी लावावा असे तेथील नागरिकांत बोलल्या जात आहे.

### दारुच्या नशेत गळफास घेवून आत्महत्या

**खामगाव :** दारुच्या नशेत गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना स्थानिक घाटपुरी नाका परिसरात घडली. सदर इसमाच्या आत्महत्या प्रकरणी खामगाव शिवाजीनगर पोलिसांनी आकस्मित मृत्यूची नोंद केली आहे. स्थानिक घाटपुरी नाका आकाश संकुलस्थित अशोक पांडुरंग नेमाडे (४९) यांनी दारुच्या नशेत काहीही कारण नसताना गळफास घेवून आत्महत्या केली. याबाबत प्रणव अशोक नेमाडे (१९) याने शिवाजी नगर पोस्टेला दिलेल्या तक्रारीवरुन पोलिसांनी आकस्मित मृत्यूची नोंद केली आहे. मृतक यांनी दारुच्या नशेत गळफास घेतल्याचे तक्रारीत नमूद आहे. सदर इसमाच्या आत्महत्या प्रकरणी हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. याबाबत अधिक तपास शिवाजी नगर पोस्टेचे पोलिस करीत आहे.

**कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव**

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १५०० - २३०० |
| गहू | २४०० - २६०० |
| तुर | ४००० - ६६०० |
| हरभरा | ५३०० - ६१६० |
| सोयाबीन | ३७०० - ४८९५ |
| भुईमुग | ५१०० - ५१०० |
| मुंग | ६५८५ - ६५८५ |
| मलाई चना | ५०००-६८०० |
| बाजरी | १८०० - १८०० |
| तीळ | ८००० - ८००० |
| मक्का. | १९२५ - २०३१ |

# नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांच्या मदतीच्या निधीस मान्यता

## मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांची माहिती

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.७ :** नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना तत्काळ मदत करण्यास राज्य शासन प्राधान्य देत आहे. राज्यात जून २०२५ मध्ये छत्रपती संभाजीनगर, अमरावती विभाग आणि सप्टेंबर २०२४ ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत धाराशिव, छत्रपती संभाजीनगर व धुळे जिल्ह्यात झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीसाठी ३६८ कोटी ८६ लाख ८५ हजार मदतीच्या निधीस मान्यता दिली, असल्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी सांगितले.

या बाबतचे शासन निर्गमित जारी करण्यात आले आहेत. यामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील ९० हजार ३८३ शेतकऱ्यांच्या ८७३९०.०२ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ७४ कोटी ४५ लाख ३ हजार रुपये निधीचा समावेश आहे.

अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या शेतपिकांच्या मान्यता देण्यात आलेल्या निधीमध्ये छत्रपती संभाजीनगर विभागासाठी १४ कोटी ५४ लाख ६४ हजार, अमरावती विभागासाठी ८६ कोटी २३ लाख ३८ हजार आणि सप्टेंबर २०२४ ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत धाराशिव, छत्रपती संभाजीनगर व धुळे जिल्ह्यात झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीसाठी २६८ कोटी ८ लाख ८३ हजार निधीचा समावेश आहे.

आपदग्रस्तांना मदतीसाठी शासन संवेदनशील आपत्ती व्यवस्थापन व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी सांगितले की, नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांप्रती शासन संवेदनशील असून या बाधित शेतकऱ्यांना मदत मिळावी यासाठी बाधित पिकांचे तत्काळ पंचनामे करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते. प्रशासनानेही बाधित अतिवृष्टी, पूर या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकाचे तातडीने पंचनामे केल्याने बाधित शेतकऱ्यांना करण्यात येणाऱ्या निधीस मान्यता देण्यात आली. जून २०२५ मध्ये छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील १७१ शेतकऱ्यांच्या ७२.३२ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १६.०१ लाख, हिंगोली जिल्ह्यातील ३ हजार २४७ शेतकऱ्यांच्या १६११.३७ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ३६०.४५ लाख, नांदेड जिल्ह्यातील ७ हजार ४९८ शेतकऱ्यांच्या ४७९०.७८ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १०७६.१९ लाख आणि बीड जिल्ह्यातील १०३ शेतकऱ्यांच्या ११ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १.९९ लाख निधीचा समावेश आहे. अमरावती विभागातील अमरावती जिल्ह्यातील २ हजार २४० शेतकऱ्यांच्या १३१२.०२ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी २७५.७९ लाख, अकोला जिल्ह्यातील ६ हजार १३६ शेतकऱ्यांच्या ३७९०.३१ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ४०५.९० लाख, यवतमाळ जिल्ह्यातील १८६ शेतकऱ्यांच्या १३०.५० हेक्टर बाधित क्षेत्रासाठी २५.४५ लाख, बुलढाणा जिल्ह्यातील ९० हजार ३८३ शेतकऱ्यांच्या ८७३९०.०२ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ७४४५.०३ लाख आणि वाशिम जिल्ह्यातील ८ हजार ५२७ शेतकऱ्यांच्या ५१६२.२८ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ४७१.२१ लाख निधीचा समावेश आहे. सप्टेंबर २०२४ ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत धाराशिव जिल्ह्यातील ३ लाख २७ हजार ९३९ शेतकऱ्यांच्या १८९६१०.७० हेक्टर बाधित क्षेत्रासाठी २६१४३.३८ लाख, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ७ हजार ५४८ शेतकऱ्यांच्या ४८९१.०५ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ६६५.४१ लाख तर धुळे जिल्ह्यातील एका शेतकऱ्यांच्या ०.३ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ०.०४ लाख निधीचा समावेश आहे. या निर्णयामुळे बाधित शेतकऱ्यास दिलासा मिळणार असून शासनाने तातडीने पंचनामे करून नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. असल्याचेही मदत व पुनर्वसन मंत्री जाधव-पाटील यांनी सांगितले.

# माणूसकीचा ध्यास म्हणजे गझल: भीमराव पांचाळे

## बुलडाणेकरांचा गझल संवादला भरभरून प्रतिसाद

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.७ :** गझलेच्या रुपाने आशय प्रधान गायकीला रसिकमान्यता मिळाली. ह्या प्रवासात माझी धडपड फळाला आली, या गोष्टीचा मला निरंतर आनंद मिळत आहे. याच गझलेने माझे आयुष्य समृद्ध झाले , असे प्रतिपादन गजलनवाज पं भीमराव पांचाळे यांनी केले. मृणमयी मल्टीपर्पज सोसायटी, सहर - ए - गजल अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गजलसागर प्रतिष्ठान प्रस्तुत गजल संवाद या कार्यक्रमात पं . भीमराव पांचाळे बोलत होते. गझलेने मला महाराष्ट्रभर , देशात आणि विदेशातही सफर घडविली. गजलचे खलिफा स्व. सुरेश भट साहेबांच्या रूपाने माझ्या जीवनाला झालेल्या परिसस्पर्शामुळे माझे आयुष्य गझलमय झालं अन आयुष्याचं सोनं झालं , अशा साध्या सोप्या शब्दांमध्ये कधी गझलेतील मतला, एखादा शेर सादरीकरण करीत गझल नवाज भीमराव पांचाळे यांनी गजलप्रवास आपल्या सुमधूर स्वरांच्या माध्यमातून उलगडून दाखवित बुलढाणेकर रसिकांना गजल संवाद कार्यक्रमात तब्बल दोन तास खिळवून ठेवले.

गजल संवाद कार्यक्रमाचे आयोजन मयूर कुंज येथे डॉ. वैशाली निकम, डॉ. गजेंद्र निकम ,डॉ. गणेश गायकवाड, प्रतिभा गायकवाड,कर्नल सुहास जतकर व रविकिरण टाकळकर यांनी केले होते. तब्बल ५३ वर्षांपासून २००० पेक्षा जास्त गजल मैफीलींच्या माध्यमातून गजलनवाज पं भीमराव पांचाळे यांची गजलयात्रा सुरु आहे. गजल प्रकार रसिकप्रिय आहेच पण नव्या पिढीने या काव्यप्रकारात अधिकाधिक दर्जेदार निर्मिती करण्याची आवश्यकता आहे. असेही त्यांनी सांगितले. या लिहित्याा हातांना बळ देण्यासाठी गझल सागर प्रतिष्ठान च्या माध्यमातून आतापर्यंत १५० गजल लेखन व गझल मार्गदर्शन कार्यशाळा, १० गझल संमेलने व गजलेची बाराखडी शिकवणारी १८ पुस्तके प्रकाशित करून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत . आष्टगाव ता .मोर्शी जि. अमरावती येथे गझलनवाज पं . भीमराव पांचाळे यांच्या मूळगावी स्वर्गीय सुरेश भट ग्रंथालयाच्या रूपाने गझलेचे समृद्ध विचारपीठ साकारले आहे. या धडपडीतून येणाऱ्या काळात गझल अधिक समृद्ध होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला . त्यानिमित्ताने डॉ. गणेश गायकवाड यांचे अध्यक्षतेखाली अरविंद टाकळकर, कर्नल सुहास जतकर यांचे उपस्थितित छोटेखानी कार्यक्रमात शहरातील विविध संस्था व व्यक्तींच्या वतीने गझलनवाज भीमराव पांचाळे व सौ . गीताताई भीमराव पांचाळे यांचा सन्मान करण्यात आला.

# तोमोई इंग्लिश स्कूलचा आगळा वेगळा उपक्रम - समर वेकेशन होम वर्क एक्सिबिशन

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.७ :** शाळेकडून नेहमीच विद्यार्थ्यांना गृहपाठ दिला जातो व विद्यार्थी तो नेहमीच करतात.शिक्षकांनी तो चेक करून द्यावा यापेक्षा काहीतरी वेगळे करत तोमोई इंग्लिश स्कूल शाळेने शालेय स्तरावर विद्यार्थ्यांचे गृहपाठ प्रदर्शन भरवले. यामध्ये विद्यार्थ्यांना प्रत्येक विषयानुसार दिलेला गृहपाठ विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर हस्ताक्षर व नाविन्यपूर्ण कलेसह सादर केला होता.

विद्यार्थ्यांनी केलेल्या गृहपाठाचे प्रदर्शन भरवल्यामुळे बाल विद्यार्थ्यांमध्ये अतिशय उत्साह होता. हे प्रदर्शन सर्व पालकांसाठी खुले करण्यात आले होते. सर्व विद्यार्थी व पालकांनी प्रदर्शनाचा आनंद घेतला. अशा उपक्रमातुन जिज्ञासा वाढते व विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो. या प्रदर्शनाचे उदघाटन.डॉ. प्रतिमा व्यवहारे यांनी केले.याप्रसंगी मुख्याध्यापक अजित जवंजाळ, शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने पालक वर्ग उपस्थित होता.

# हिवरखेड पूर्णा गावामध्ये ओढ्यात वाहून दोन बैलांचा मृत्यू

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी



**किनगव राजा दि.७ :** अचानक आलेल्या मुसळधार पावसाने ओढ्याला अचानक पाणी वाढल्याने दोन बैल ओढ्यात वाहत जावून दोन्ही बैलांचा मृत्यू झाल्यांची घटना किनगांव राजा येथुन जवळ असलेल्या हिवरखेड पूर्णा गांवामध्ये दि. ६ ऑगस्ट रोजी घडली आहे.

सविस्तर वृत्त असे की,तालुक्यातील हिवरखेड पूर्णा येथील शेतकरी शरद काशिनाथ नागरे हे नेहमीप्रमाणे त्यांच्याकडे असलेल्या दोन खिल्लार जातीचे बैल शेताच्या शेजारी असलेल्या ओढ्याच्या काठावर चरत होते. अचानक ढगफुटी सदृश्य पावसामुळे ओढ्याला अचानक पूर येवून ओढ्याच्या पाण्यामध्ये खिल्लार बैल वाहुन केले. शेतकरी शरद नागरे यांनी बैलांचा दोन ते तीन तास शोध घेतला असता मिळून आले नाही त्यानंतर निमगाव वायाळ शिवारामध्ये असलेले गट क्रमांक ७० मध्ये बैल मृत अवस्थेत आढळून आले.शेतकरी शरद नागरे यांचे अंदाजे १ लाख ५० हजारांचे नुकसान झाले असून गावात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

घटनेची माहिती मिळताच तहसीलदार अजित दिवटे, नायब तहसीलदार डॉ.प्रवीण कुमार वराडे घटनास्थळी दाखल होवुन पहाणी करून शेतकरी शरद नागरे यांना धीर दिला.तलाठी मोगल,डॉ.साहिल देशमुख, पोलीस पाटील गजानन फुके यांच्या उपस्थितीमध्ये पंचनामा करण्यात आला.

# चिचारी येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी




**संग्रामपुर दि.७ :** परमपूज्यनीय सद्गुरू श्री सतपालजी महाराज व श्री. विभूजी महाराज यांच्या प्रेरणेने मानव उत्थान सेवा समिती, खामगावच्या वतीने पूज्यनिय अमृता माताजी यांचे जन्म दिवसाचे औचित्य साधून दरवर्षी दिनांक- ०१ ऑगस्ट ते १० ऑगस्ट या कालावधीत अंतर्गत दुर्गम भागातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येते, त्याप्रमाणे याही वर्षी ०५ ऑगस्ट २०२५ रोजी दुर्गम आदिवासी क्षेत्रातील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा चिचारी, ता. संग्रामपूर , जि. बुलडाणा येथे शैक्षणिक साहित्य जसे नोटबुक, पेन,पेन्सिल, खोडरबर, स्केल इत्यादी साहित्याचे वाटप पूज्यनीय महात्मा लखीबाईजी व महात्मा योगिनी बाईजी यांचे पावन हस्ते करण्यात आले.

विद्यार्थ्यांना आध्यत्म ज्ञानाचा व सेवेचा महिमा विषद करण्यात आला. सौ. सुवर्णाताई देशमुख यांनी टिफिन बॅग व स्कूल बॅग चे वाटप विध्यार्थ्यांना केले. त्याप्रसंगी मानव सेवा दलाचे पदाधिकारी, मनीष रोडे, ज्ञानेश्वर उंडे, अजय वाघ, विशाल मसने, सौ. वंदना रोडे, संतोष वानखडे तथा प्रकाश धामोडे मुख्याद्यापक ,सहायक अध्यापक .संजय इंगळे,सुभाष जाधव व सुनील बस्सी सर तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष. रफिक केदार, सदस्य वजीर सुरेते,अबुजर सोलकर . शाबीर पाले व इतर गावकरी उपस्थित होते.



**रक्षाबंधन:** लाडक्या बहिणीचा सर्वात महत्त्वाचा आनंदाचा सण रक्षाबंधन दोन दिवसांवर येऊन ठेपल्यामुळे लाडक्या भावासाठी राख्या खरेदी करताना लाडक्या बहिणींची दुकानावर गर्दी दिसून येत आहे. (छायाचित्री– रमेश खंडागळे, बीबी)

# अहंकाराच्या नाशाने ईश्वर प्राप्ती सुलभ होते-बाल संत दिपशरणजी महाराज

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी



**खामगाव दि.७ :** नारदाला कामावर विजय मिळविल्याचा अहंकार झाला होता आणि मोह नष्ट झाल्याचा अहंकार झाला होता. परंतु नारदाचा मोहनाश करण्यासाठी विष्णुने माया दाखविली व नारदाचा मोहनाश केला म्हणुन अहंकाराचा नाश झाल्या शिवाय ईश्वर प्राप्ती होत नाही. असे प्रतिपादन शिव महापुराण कथेच्या तिसऱ्या दिवशी बालसंत दिपशरणजी महाराज यांनी केले. कथेच्या प्रारंभी सद्भावना सेवा समितीचे अध्यक्ष राधेश्याम चांडक उपाख्य भाईजी यांनी दिपशरण महाराजांचे हार घालुन स्वागत केले.

यावेळी सौ.अर्चना रविंद्र लध्दड, सौ. अनुसया सुधाकर मानवतकर यांनी व्यासपीठावर शिवपुराण ग्रंथाचे पुजन करून आरती केली. श्रीमती प्रेमलता जैस्वाल, श्रीमती उषा जैस्वाल यांनी महाराजांना शाल व वस्त्र भेट दिले. के.एन. कापडे, प्रकाश बदर यांनी माल्यार्पण केले. आजच्या दिवसाचे व्यवस्थापन अग्रवाल समाज महिला मंडळ आणि प्रसाद वितरण सिंधी समाज महिला मंडळ, पंजाबी समाज महिला मंडळ, वर्मा समाज महिला मंडळ, गुजराती समाज महिला मंडळाकडे होत. सद्भावना सेवा समिती द्वारा जगदगुरु संत तुकाराम महाराज वारकरी भवन, बुलडाणा येथे दि. ०४ ते १० ऑगस्ट दुपारी २ ते ६ या वेळात भव्य संगितमय शिवमहापुराण कथेचे आयोजन केले आहे. कथेचा विस्तार करतांना म्हणाले ईश्वर कधीच कोणाचा विश्वासघात करत नाही. विश्वास करून तर पहा सरळ माणसाला ईश्वर सोपा आहे. ''लगन तुमसे लगा बैठे, जो होगा देखा जायेगा'' या भजनावर श्रोते मंत्रमुग्ध झाले होते. भजनाचा रंग लागला हे मराठी भजन श्रोत्यांना खुप आवडले. सायंकाळी आरतीपुर्वी सद्भावना सेवा समितीचे सहकोषाध्यक्ष श्री. तिलोकचंदजी चांडक यांचा ७१ वा वाढदिवस समितीचे अध्यक्ष श्रीमान भाईजी यांनी शाल देवून व दिपशरण महाराजांनी गुलाबाचे रोप देवून साजरा केला. दोघांनीही तिलोकचंदजीचे हार घालुन अभिनंदन केले. यावेळी व्यासपीठावर भाईजी, राजेश देशलहरा, चंपालाल शर्मा, सिध्दार्थ शर्मा, मनिष शर्मा, सौ. कुंदा पाटील, विजय शर्मा, माया शर्मा, पुरणमल शर्मा, नितीन जैस्वाल, सुरेश गट्टाणी यांनी आरती केली. सौ. मंदा संतोष तुपकर यांनी रुद्राभिषेक करुन आरती केली. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन प्रकाशचंद्र पाठक यांनी केले.

# देऊळगावराजा येथे अट्टल दरोडेखोरांचा पाठलाग करून अटक

## अनेक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी




**दे.राजा दि.७ :** पेट्रोलिंग करीत असताना बुलडाणा जिल्ह्यातील ज्वेलर्स दुकान व घरफोडी, मोटरसायकल चोरीचे गुन्हे दाखल असलेल्या एका सराईत गुन्हेगाराला बुलढाणा एलसीबी पथकाने ताब्यात घेतले असता, त्याने ४ अट्टल गुन्हेगारासह गुन्हे केल्याची कबुली दिली असून, ३ गुन्हेगारांना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे, यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पोलीस निरीक्षक सुनील अंबुलकर यांच्या आदेशाने ५ ऑगस्ट रोजी देउळगांव राजा येथे पेट्रोलींग करतांना सदर कारवाई करण्यात आली.

रेकॉर्ड वरील आरोपी हिरासिंग बावरी रा.देऊळगाव राजा, जि.बुलडाणा याने त्याच्या साथीदारांसह बुलडाणा जिल्ह्यामध्ये ज्वेलर्सचे दुकान, घरफोडी, मोटार सायकल चोरीचे गुन्हे केले आहे, अशी माहिती पथकाला देण्यात आली होती. दरम्यान सापळा रचून पथकाने हिरासिंग बावरी याचा देऊळगांव राजा शहरामध्ये शोध घेतला असता तो सरकारी दवाखान्या जवळ दिसला. दरम्यान तो पोलिसांना पाहून पळून जात असतांना पथकाने त्याचा पाठलाग करून शहरातील गीतांजली टॉकीज समोरील नंदन एजन्सी समोर हिरासिंग मोहनसिंग बावरी याला पकडले. त्याला विश्वासात घेवून पंचासमक्ष बुलढाणा जिल्हयातील ज्वेलर्सचे दुकानातील चोरी, घरफोडी, दूचाकी चोरी बाबत सखोल विचारपुस केली असता त्याने पंचासमक्ष त्याच्या साथीदारांसह विविध गुन्ह्याची कबुली दिली. मेहकर येथे कलम ३०५ (अ), ३३४ (१) बी.एन.एस. तसेच मेहकर १७४/२०२५ कलम ३०५ (अ), ३३४ (१) बी.एन.एस.व देऊळगाव राजा २५१/२०२५ कलम ३३४ (१), ६२ बी.एन.एस.असे गुन्हे आरोपींवर दाखल आहेत. या गुन्ह्यात गुन्हेगार सतनामसिंग ऊर्फ अजयसिंग चंदासिग बावरे रा. देऊळगांव राजा, तकदिरसिंग टिट्टुसिंग रा. जालना, रोशनसिंग बबलुसिंग टाक रा. संजय नगर दे. राजा, धर्मदरसिंग टाक रा.बीबी, जोगीदरसिंग रणजितसिंग टाक रा. वसमत यांचा सहभाग आहे.

या ५ आरोपीपैकी हिरासिंग मोहनसिंग बावरी वय २० वर्ष, रा.सरकारी दवाखान्याचे मागे देऊळगाव राजा, सतनामसिंग ऊर्फ अजयसिंग चंदासिग बावरे वय ३८ वर्ष रा.देऊळगाव राजा रोशनसिंग बबलुसिंग टाक वय २० वर्ष रा. संजय नगर दे. राजा या तीनही आरोपींना ताब्यात घेवून पुढील कायदेशिर कारवाई करिता वैद्यकीय तपासणी करून पोलीस स्टेशन मेहकर यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदर कार्यवाही पीएसआय प्रताप बाजड, पीएसआय अविनाश जायभाये, एएसआय ओमप्रकाश सावळे, एचसी दिगंबर कपाटे, पुरुषोत्तम आघाव, वनिता शिंगणे, दिपक वायाळ, विकास देशमुख या एलसीबीच्या पथकाने ही कारवाई केली आहे.

## महत्त्वाचे

### श्री बालाजी मंदिर येथे आरोग्य तपासणी शिबीर

**खामगाव :** स्थानिक सराफा भागातील श्री बालाजी मंदिर संस्थान येथे १५ ऑगस्ट २५ रोजी स्वातंत्र्यादिनानिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० ते १ वाजेपर्यंत शिबीर राहणार असून मधुमेह, हृदयरोग, उच्च रक्तदाब, दमा, संधीवात, पोटाचे व पचनाचे विकार, वृध्दापकाळातील आजार, नेत्र रोग तपासणी, शस्त्रक्रिया, स्त्रीरोग तपासणी, प्रसुतीपुर्व व पश्चात उपचार करण्यात येतील. शिबीरात हृदयरोग व संधीवात तज्ञ डॉ. दिपाली प्रतिक सुरूशे, नेत्ररोग तज्ञ डॉ. प्रतिक वसंत सुरूशे व स्त्रिरोग तज्ज्ञ डॉ. संध्या मनिष पॉल हे रुग्ण तपासणी करणार आहे. शिबीरात येतांना रूग्णांनी जुनी फाईल सोबत आणावी तसेच जास्तीत जास्त गरजुंनी शिबीराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### इसमाची गळफास घेऊन आत्महत्या

**खामगाव :** शिवसेना शिंदे गटाचे डॉ. संतोष तायडे यांनी आपल्या असंख्य कार्यकत्यांसह राष्ट्रवादी मध्ये शरद पवार - पक्षात प्रवेश केला. माजी प्रदेशाध्यक्ष - आमदार जयंत पाटील यांनी डॉ. तायडे यांच्या आतापर्यंतच्या कार्याची दखल घेत बुलढाणा जिल्ह्याच्या उपाध्यक्ष पदाची जबाबदारी दिली असून शरद पवार यांचे हात बळकट करून राष्ट्रवादी पक्षाला अधिक मजबूत करण्यासाठी कामाला लागा अशा सूचना केल्या. डॉ. तायडे यांच्या नियुक्तीमुळे सर्वच अभिनंदन होत आहे.

### नॅशनल हायस्कुलच्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**खामगाव :** येथील श्री अरजण खिमा नॅशनल हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमधील इयत्ता ५ वी ते १२ वी च्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव कार्यक्रम ६ ऑगस्ट रोजी संपन्न झाला. त्याामध्ये एस.एस.सी., एच.एस.सी (२०२५) मध्ये विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण विद्यार्थी, शिष्यवृत्ती, एम.टी.एस., एन.टी.एस., एन.एम.एम.एस., स्पर्धा परीक्षा, चित्रकला परीक्षा २०२४, विशेष प्राविण्य प्राप्त विद्यार्थी, एलीमेंट्री ग्रेड परीक्षा, ए-श्रेणी उत्तीर्ण, एम.टी.एस. परीक्षा गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी, एन.सी.सी. विभाग, क्रीडा विभागातून राज्यस्तरावर खेळलेल्या अशा विविध क्षेत्रामध्ये नेत्रदिपक यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना रोख बक्षिस व पारोतोषिक देवून गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षपद दिनेश संघवी यांनी भुषवीले. तसेच या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहूणे म्हणून डॉ. रामेश्वर पुरी (उपविभागीय अधिकारी महसूल), व डॉ. प्रशांत चौधरी (मज्जा मनोविकार तज्ञ, मुंबई), संस्थेचे सचिव मनोज नागडा, संस्थेचे कोषाध्यक्ष विजय नागडा, शाळेच्या प्राचार्या सौ. नंदा उदापूरकर, डॉ.सौ. हेमा जवंजाळ (प्राचार्या सु.रा. मोहता महिला महाविद्यालय) या सर्व मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा विविध पारीतोषिक देवून त्यांचा गुणगौरव करण्यात आला.

### निधनवार्ता



**नरवेल :** येथील रहिवाशी गजानन प्रल्हाद न्हवकर बरेच दिवसापासून आजारी असल्याने यांचे आज सकाळी आठ वाजता निधन झाले. त्याचे पश्चात बराच मोठा परिवार दोन मूल पती भाऊ आई देव त्याच्या आत्माला शांती देव.

# अतिवृष्टी: केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या पाठपुराव्याला यश ; शेतकऱ्यांना मिळणार मदत

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि. ७ :** बुलढाणा जिल्हयात २५ आणि २६ जून रोजी ढगफुटी सदृश्य पावसमुळे जिल्ह्यातील आठ मंडळ क्षेत्रामधील ८७ हजार ३९०.२ हेक्टर पिकांचे नुकसान झाले होते. केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केलेल्या पाठ पुराव्याला यश आले असून सरकारने बाधित शेतकऱ्यांसाठी ७४ कोटी ४५ लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर केली आहे.

बुलढाणा लोकसभा मतदारसंघात २५ व २६ जून रोजी ढगफुटीसदृश्य व अतिवृष्टीमुळे ८७ हजार ३९०.२ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले होते. ९० हजार ३८३ शेतकऱ्यांना या अतिवृष्टीचा फटका बसला होता. अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी धीर देत शासनाकडून तात्काळ मदत मिळवून देण्याची ग्वाही दिली होती. यावेळी त्यांच्यासोबत माजी आमदार संजय रायमुलकर होते. त्यानंतर केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री आजित पवार व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली व शेतकऱ्यांच्या नुकसानीबाबतची दाहकता आणि फोटोग्राफ दाखवुन त्यांच्या लक्षात आणून दिली. या शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई देण्याची मागणी केली होती. शासनाने ६ ऑगस्ट रोजी परीपत्रक काढून बुलढाणा जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांसाठी ७४कोटी ४५ लाख रुपयांची नुकसान भरपाई मंजूर केली आहे. बुलडाणा जिल्ह्यातील मेहकर मतदारसंघात सरासरी ११२ मिमी पावसाची नोद झाली होती. यामध्ये मेहकर मतदारसंघातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते.त्यांना तब्बल ६६ कोटींची नुकसान भरपाई मिळणार आहे. मेहकर मतदारसंघातील एकूण ६५,६०१ हेक्टर शेती क्षेत्र बाधित झाले असून ६६ हजार नुकसानग्रस्त शेतकरी मदतीसाठी पात्र ठरले आहेत. यामध्ये जमीन खरडून जाणे,फळबागांचे नुकसान आणि गाळ साचल्यामुळे पीक नष्ट होणाऱ्या सुमारे ६ हजार शेतकऱ्यांचाही समावेश करण्यात आला आहे.

या तातडीच्या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री आजित पवार व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार व्यक्त करत मतदारांना दिलेला शब्द पाळला असल्याच्या प्रतिक्रिया केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव व माजी आमदार संजय रायमुलकर यांनी व्यक्त केल्या.

# होमिओपॅथिक असोसिएशनतर्फे स्व.डॉ. अजय ढगे यांना अभिवादन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.७ :** येथील ज्येष्ठ होमियो तज्ञ स्व. डॉ. अजय ढगे यांना जयंती निमित्त बुलढाणा होमिओपॅथिक डॉक्टर्स असोसिएशनच्यावतीने अभिवादन करण्यात आले.

येथील बसस्थानकानजीक स्व. डॉ. अजय ढगे यांच्या दवाखाना परीसरात ६ ऑगस्ट रोजी सकाळी आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ होमिओ तज्ञ डॉ. ए.यु. शेख हे होते. तर डॉ. प्रभाकर पडघान यांच्यासह डॉ. गणेश वसू, डॉ. अशोक बडगुजर, अ‍ॅड. सौरभ ढगे, सौ. नेहा ढगे, सौ. देवयानी महेश ढगे, डॉ. दुर्गासिंग जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. होमिओपॅथीचे जनक डॉ. सॅम्युएल हनिमन व स्व. डॉ. अजय ढगे यांच्या प्रतिमेला उपस्थितांनी व होमिओपॅथिक डॉक्टर्स असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी डॉ. पवन बजाज व डॉ. जागृती खरे यांनी स्व. डॉ. ढगे यांची स्मृती जागवणारी गाणी सादर करुन संगीतमय अभिवादन केले. यावेळी बोलतांना डॉ. प्रभाकर पडघान यांनी चार दशकांपूर्वी संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यात होमिओपॅथी सेवा देणाऱ्या तज्ञांमध्ये स्व. डॉ. अजय ढगे यांचे कार्य खूप प्रेरणादायी होते, असे सांगितले. होमिओपॅथीला शहरात व जिल्ह्यात ओळख मिळवून देण्यासाठी त्याांनी केलेले प्रयत आजच्या पिढीला दिशादर्शक ठरणारे आहेत, असेही डॉ. पडघान यांनी सांगितले. यावेळी डॉ. गोपाल उबरहंडे, डॉ. मनीषा राठी यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दुर्गासिंग जाधव यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. स्वाती मसने यांनी केले तर डॉ. पवन बजाज यांनी आभार मानले. कार्यक्रमाला डॉ. दीपक बढे, डॉ. उमेश जाधव, डॉ. अभिजित पाटील, दंततज्ञ डॉ. आशिष खासबागे, इंजि. धनंजय देशपांडे, डॉ. दीपाली जोशी, डॉ. निलिमा जाधव, डॉ. रसिका वानखेडे, डॉ. दीपाली बारोटे, डॉ. दीपाली जयस्वाल, डॉ. विजया नरवाडे, डॉ. गायत्री सानप, डॉ. वैष्णवी उबरहंडे, डॉ. स्नेहल नरवाडे यांच्यासह होमिओपॅथिक डॉक्टर्स असोसिएशनचे सभासद व नागरीक उपस्थित होते. यशस्वीतेसाठी विलास सुरुशे, सागर गायकवाड यांनी परीश्रम घेतले.

# दुचाकीने दारूची वाहतूक करणाऱ्या युवकास अटक

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**संग्रामपूर दि.७ :** दुचाकीने देशी दारूची वाहतुक करणाऱ्या तरुणाला सोनाळा पोलीसांनी पकडले. यावेळी त्याच्या ताब्यातुन देशी दारु, दुचाकी असा एकुण ८६ हजार ७०० रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई मंगळवार रोजी दुपारी दीड वाजेच्या सुमारास टुनकी रस्त्यावरील राठोड पेट्रोल पंपाजवळ करण्यात आली आहे. तालुक्यातील टुनकी येथील किसन शिवाजी सोनोने वय २१ हा युवक सोनाळा येथून टुनकीकडे देशी दारूची तस्करी करीत असल्याची माहिती सोनाळा पोलीसांना मिळाली. या माहितीवरुन पोलीसांनी टुणकी रस्त्यावर नाकाबंदी केली. काही वेळानंतर सोनाळा येथून येणाऱ्या एका विना क्रमांकाच्या दुचाकीला थांबवून झडती घेतली असता त्यामध्ये देशी दारु आढळून आली. त्यानंतर पोलीसांनी ११ हजार ७०० रुपये किमतीची देशी दारू ७५ हजार रुपये किंमतीची दुचाकी असा एकूण ८६ हजार७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ट्राफिक पोलिसांनी फिल्म मेकरकडून मागितले दोन लाख

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**चिखली दि.७ :** कर्नाटकातील चित्रदुर्ग जिल्ह्यातील फिल्म मेकर ताज अब्दुल रहेमान रहमतुल्ला (वय २३) हे आपल्या सहकाऱ्यासह तवेरा गाडीतून ( ११ २८६२) मलकापूरकडे निघाले होते. चिखली बायपास रोडवर ट्राफिक पोलीस अभय व त्याचा साथीदार किरके यांनी त्यांची गाडी थांबवून कारवाई टाळण्यासाठी १५०० रुपये पेटीएमवर भरण्यास भाग पाडले.

पुढे काही अंतरावर, एक पांढऱ्या रंगाची किया कार त्यांच्या मागे आली व पुन्हा गाडी अडवण्यात आली. गाडीतून उतरलेल्या ३ अज्ञात पोलीसांनी गाडीची तपासणी करत एअर रायफल पाहिली आणि त्यावरून दोन लाख रुपयांची मागणी केली. घाबरलेल्या फिर्यादीने पैसे नसल्याचे सांगितले असता, पोलिसांनी ५०,००० रुपये तरी देण्यास भाग पाडले. फिर्यादीला शंका आल्याने त्यांनी गाडी घेऊन पळण्याचा प्रयत केला. परंतु गोंधळात गाडीचा ताबा सुटून अपघात झाला. त्यानंतरही ते तिघे पोलीस घटनास्थळी पोहचून पैशांची मागणी करत राहिले. परंतु स्थानिक पोलीस घटनास्थळी दाखल झाल्याने आरोपींनी फिर्यादीला धमकी दिली की, ही गोष्ट कुणालाही सांगू नकोस. फिर्यादीच्या तक्रारीनंतर चिखली पोलिसांनी आरोपी ट्राफिक पोलीस अभय, पोलीस किरके व तीन अनोळखी पोलिसांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास शरद भागवतकर यांच्या नेतृत्वाखाली सुरु असून, आरोपींची ओळख पटवण्याचे व अटकेचे प्रयत्न सुरू आहेत. ही घटना पोलीस खात्याच्या नीतिमत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. अशा पोलिसांवर तात्काळ निलंबन व कडक कारवाई करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

# मयत कर्मचाऱ्याच्या कुटुंबियास मदत

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.७ :** हृदयविकाराने निधन झालेल्या कर्मचाऱ्याच्या कुटुंबियास राजर्षी शाहू मल्टीस्टेटच्यावतीने ५० हजार रुपयांची मदत देण्यात आली.

मेहकर तालुक्यातील आरेगाव येथील गजानन नारायण वायाळ हे संस्थेच्या सिल्लोड शाखेत कार्यरत होते. काही दिवसांपूर्वी त्याांचे हृदयविकाराने निधन झाले. घरातील कर्ता व्यक्ती अचानक काळाने हिरावल्याने पती, मुलगी, वृद्ध आई- वडीलांवर दुःखाचा डोंगर कोसळला. संस्थापक अध्यक्ष संदीपदादा शेळके, संस्थाध्यक्षा मालतीताई शेळके यांनी शोकाकुल कुटुंबाचे सांत्वन केले. संस्थेच्यावतीने विभागीय व्यवस्थापक गोविंद येवले, शाखा व्यवस्थापक अक्षय बोडखे यांनी मयत कर्मचारी यांचे वडील नारायण वायाळ, आई कांताबाई वायाळ यांना ५० हजारांची मदत सुपूर्द केली.

# व्हॉलिबॉल चॅम्पियनशीप; १५ वर्षाआतील मुला-मुलींकरिता निवड चाचणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**चिखली दि.७ :** चीनमध्ये आंतरराष्ट्रीय शालेय खेल महासंघाद्वारे १५ वर्षाआतील मुलामुलींसाठी जागतिक स्कूल हॉलिबॉल चॅम्पियनशिप होणार आहे. या स्पर्धेत भारतीय संघ सहभागी होणार असुन भारतीय संघाची निवड करण्यासाठी भारतीय शालेय खेल महासंघाने राष्ट्रीय निवड चाचणीचे आयोजन दि.२५ ते ३० ऑगस्ट या कालावधीत श्री. शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगी बालेवाडी, पुणे या ठिकाणी करण्यात आले आहे. या स्पर्धेतसाठी जिल्ह्यातील उत्कृष्ठ खेळाडूंची निवड करून पाठविण्यात येणार आहे. त्यासाठी दि.११ ऑगस्ट रोजी जिल्हा क्रीडा संकूल, बुलढाणा येथे निवड चाचणी घेण्यात येणार आहे.

राष्ट्रीय निवड चाचणीत राज्याचे खेळाडु सहभागी होणार असून राज्याचा निवड चाचणी संघ निश्चित करण्यात राज्य निवड चाचणीचे आयोजन ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यात श्री. शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे बालेवाडी, पुणे या ठिकाणी करण्यात येणार आहे. राज्यस्तरीय निवड चाचणीसाठी थेट विभागीय निवड चाचणीचे आयोजन दि. १४ ऑगस्ट २०२५ पूर्वी करुन प्रत्योक विभागातून उत्कृष्ट ५ मुला-मुलींची निवड करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने जिल्हास्तरीय निवड चाचणी दि.११ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता जिल्हा क्रीडा संकुल, जांभरुन रोड बुलढाणा येथे घेण्यात येणार आहे. चाचणीस येतांना खेळाडूंनी जन्मतारखेचा दाखला, आधारकार्ड, जनरल रजिस्टरची सत्याप्रत किंवा निर्गम उतारा या कागदपत्रांसह उपस्थित रहावे, असे जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस. महानकर यांनी कळविले आहे.

# खामगाव औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांची विविध पदावर निवड

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.७ :** सतगुरू श्री अगाशे काका शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, खामगांव येथील शिल्प कारागिर प्रशिक्षण योजनेअंतर्गत सन २०१७ ते २०२२ या कालावधीत विविध व्यवसायात प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थींनी आपली यशस्वी वाटचाल करत शासकीय व खाजगी क्षेत्रात विविध पदांवर निवड मिळवली आहे.

विशेषतः विजतंत्री व तारतंत्री व्यवसायातील २०२०, २०२१ व २०२२ साली प्रवेशित प्रशिक्षणार्थी महावितरणमध्ये विद्युत सहायक या महत्त्वाच्या पदावर कार्यरत झाले आहेत. या यशस्वी प्रशिक्षणार्थ्यांमध्ये पवन जामोदे, गौरव चव्हाण, शिवराज हागे, विकास ठाकरे, मयुर गव्हाळे, संदेश गोळे, शितल पारसकर, संजना वानखेडे, ज्योत्सना भोजने, गजानन वाघमारे, आशिश तेलगोटे, आकाश पातोंड, कु. शितल राठोड, पंकज वाकोडे, कु. चंचल तायडे, कु. साक्षी सुरवाडे, कु. स्नेहा तेलगोटे, कु. वैशाली आखरे व कु. रोशनी खरले यांचा समावेश आहे. तसेच, फाउंड्रिमॅन व्यवसायात २०१८ व २०१९ मध्ये प्रवेश घेतलेल्या प्रशिक्षणार्थी अभय शिवदास राउत, शुभम एकनाथ बोरडे व सुमेध सुरेश बोदडे यांची रेल्वे टेक्निशियन आणि ऑर्डनन्स फॅक्टरीमध्ये टेक्निशियन पदांवर नियुक्ती झाली आहे, ही बाब संस्थेसाठी अत्यांत गौरवास्पद आहे. या सर्व यशामध्ये संस्थेचे प्राचार्य श्री. एस. डी. गंगावणे, उपप्राचार्य श्री. व्हि. व्हि. काळे, गटनिदेशक श्री. जे. व्हि. काळे, श्री. व्हि. के. सुपे, श्री. एन. एस. गावडे, श्री. व्हि. एस. भोजने, श्री. डि. जे. वानखडे, शिल्पनिदेशक श्री. ए. बि. माडीवाले, श्री. एस. जि. तायडे, श्री. एस. ए. खापर्डे व इतर सर्व शिल्पनिदेशक यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. संस्थेतील सर्व कर्मचारीवृंदांनी या यशस्वी प्रशिक्षणार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्रशिक्षणार्थ्यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त करत संस्थेच्या व मार्गदर्शक निदेशकांचे मनःपूर्वक आभार मानले.आला.

# व्हीव्ही पॅटचा वापर न करण्याचा निर्णय तुघलकी आणि मनमानी पद्धतीचा - अ‍ॅड.जयश्री शेळके

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**चिखली दि.७ :** महाराष्ट्र राज्यात येत्या दिवाळी नंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका होणार आहेत.अशातच वोटिंग ईव्हीएम मशीन बाबत संभ्रमावस्था असतानाही राज्य निवडणूक आयोगाने ईव्हीएमचा वापर केला जाईल परंतु व्हीव्ही पॅटचा वापर केल्या जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे आगामी स्थानीक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत संभ्रमावस्था व शंकेला वाव मिळत असून, हा तुघलकी आणि मनमानी पध्दतीचा निर्णय असल्याची प्रतिक्रिया शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या राज्य प्रवक्त्या अ‍ॅड. जयश्री शेळके यांनी व्यक्त केली.

गेल्या काही वर्षापासून रखडलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगर पालिका आणि नगर पालिका या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका ह्या येत्या दिवाळी नंतर होणार असल्याची माहिती समोर आली आहे. ऑक्टोंबर महिन्या अखेरीस या निवडणूकांची प्रक्रिया सुरू होईल. या निवडणुकांमध्ये ईव्हीएमचा वापर करण्यात येणार आहे, मात्र लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांप्रमाणे या निवडणुकीत व्हीव्ही पॅटचा वापर केला जाणार नाही, अशी माहिती निवडणुक आयोगाने दिली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी नाशिकसह उत्तर महाराष्ट्रातील प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. या बैठकी नंतर निवडणूक आयुक्तांनी पत्रकार परिषद घेत निवडणुक पुर्व तयारीची माहिती दिली. त्यावेळी राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत केवळ ईव्हीएमचा वापर केला जाईल. तर व्हीव्ही पॅटचा वापर केला जाणार नाही असे स्पष्ट केले. तर हा निर्णय म्हणजे तुघलकी असून शंका निर्माण करणारा असल्याचे मत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या राज्य प्रवक्त्या अ‍ॅड. जयश्री शेळके यांनी व्यक्त केले आहे.

# संजय रायमुलकरांनी शाळेत बसून घेतला बालपणीचा अनुभव

## वाढदिवसाचे औचित्य, देऊळगाव सा. आश्रम शाळेमध्ये शालेय साहित्य वाटप

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**मेहकर दि.७ :** राजकारणात अनेक जण येतात, पण लोकांच्या मनात घर करतो तोच खरा नेता! माजी आमदार संजयजी रायमुलकर यांनी आपल्या आणि सचिन जाधव यांच्या वाढदिवसाचं निमित्त साधत देऊळगाव सा.येथील सरस्वती आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांमध्ये जाऊन फक्त साहित्य वाटपच केलं नाही, तर विद्यार्थ्यांमध्ये बसून स्वतःचा शालेय अनुभव जागा केला. नेत्याची ही भूमिका आजच्या स्वार्थी राजकारणाला जबरदस्त चपराक आहे! राजकारणातील वाढदिवस म्हणजे बॅनरबाजी, हारतुरे, मोठे केक आणि गोंगाट पण येथे चित्र वेगळं होतं.

सरपंच संदीप आल्हाट मित्र मंडळाने हा उपक्रम राबवून दाखवलं की, वाढदिवसाचा खरा अर्थ हा सामाजिक बांधिलकीतच आहे. विद्यार्थ्यांना वह्या, पेन, दप्तर, कंपास, शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. संजय रायमुलकर यांनी विद्यार्थ्यांच्या सोबत बाकावर बसून त्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली, संवाद साधला, आणि सांगितले ''मीसुद्धा तुमच्यासारखाच विद्यार्थी होतो. मेहनत, शिस्त आणि शिक्षणानेच मी आज इथे पोहोचलो आहे.'' नेत्याच्या या विनम्रतेपुढे सर्व उपस्थितांची मने जिंकली गेली.यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख ऋषीभाऊ जाधव, उपतालुकाप्रमुख समाधान साबळे,ईसाई माता संस्थांचे महंत रामदास महाराज, शिवसेना जेष्ठ नेते मोतिरामजी राठोड,माजी जि.प.सदस्य तेजराव जाधव,माजी पं.स.सदस्य सुपाजी पायघन, शिवसेना नेते दिलीप नवत्रे, रणजित देशमुख,विशाल काळे,गोपाल बचाटे,राजेंद्र काटे,ओम सोनुने सागर पायघन उमेश समुद्रवार गणेश आल्हाट राजेश शिंदे शेख अब्रार शोईल भाई अनिस पठाण पदाधिकारी,सरपंच संदिप आल्हाट मित्र मंडळातील पदाधिकारी,आणि शिवसेना युवासेना आजी माजी प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते व शिक्षक वृंद, विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते कार्यक्रम चे आयोजन सरपंच श्री. संदिप आल्हाट यांनी केले कार्यक्रम उत्कृष्ट पणे पार पडावा म्हणून सागर पायघन उमेश समुद्रवार शेख अब्रार भाई ओम सोनुने प्रसाद गायकवाड राजेश शिंदे यांनी परिश्रम घेतले.

## महत्त्वाचे

### मजूराचा पाण्यात बुडून मृत्यू

**खामगाव :** नगर पालिकेच्या जनुना तलावावर सुरु असलेल्या विकास कामात ठेकेदाराकडे मजूर असलेल्या मोहन प्रल्हाद पारस्कर वय ३८ रा. कृषीनगर वाडी खाम गाव यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना काल ६ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजतादरम्यान घडली. काम अटोपून मोहन पारस्कर हा हात-पाय धुण्यासाठी गेला. त्यावेळी त्याचा पाय घसरुन तो पाण्यात बुडाला. याप्रकरणी लक्ष्मण पारस्कर यांनी पोलिसांत दिलेल्या फिर्यादवरुन शिवाजी नगर पोलिसांनी मर्ग दाखल केला आहे. घटनेची माहिती मिळताच शिवाजी नगर पोस्टेच्या कॉलवर रुखमाई फाउंडेशनचे प्रमुख संजय खंडेराव, अविनाश ठाकूर, अमर पिंपलेकर, रमेश अवचार, राहुल हेलोडे, बाला हेलोडे, बाला माळवंदे, करण त्रिभुवन या टिमने मृतदेह बाहेर काढला.

### लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

**खामगाव :** तालुक्यातील लोखंडा येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरा करण्यात आली. सर्वप्रथम अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन अभिवादन केले. याप्रसंगी लहुजी शक्ती सेना तालुकाध्यक्ष अनंता सकळकळे व लहुजी मित्र मंडळ लोखंडा यांच्याहस्ते आलेल्या मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी सचिन ठाकरे, रंगनाथ साबळे, संघपाल जाधव, प्रकाश दांडगे, ॲड. भोजने सर, ॲड. भगत सर, निंबाजी साबळे, उमेश बाभुळकर, गजानन सोनवणे, महादेव वानखडे, गजानन सकळकळे, शांताराम तायडे, विठ्ठलराव लोखंडकार, प्रतीक लोखंडकार, अशोक सावळे, सुरज हिवराळे, श्रीकृष्ण ठाकरे, विलास भागवत, गजानन लोखंडकार, गोविंदा आटोळे यांच्यासह समाजबांधव उपस्थित होते. डॉ. अण्णाभाऊ साठे यांची भव्य रथ मिरवणूक ढोल ताशाच्या गजरात गावातून काढण्यात आली यासाठी हिवरखेड पोस्टेचे ठाणेदार एपीआय चौधरी, लोखंडा बीड जमदार विठ्ठल चव्हाण व त्यांचे सहकारी यांनी पोलीस बंदोबस्त केला.

### इनरव्हील क्लबतर्फे विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

**खामगाव :** सामाजिक बांधिलकी जपत इनरव्हील क्लब ऑफ खामगाव, डिस्ट्रिक्ट ३०३ तर्फे ४ ऑगस्ट २०२५ रोजी रोटरी स्कूलमधील विद्यार्थ्यांना शालेय गणवेश आणि स्लेटचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत एकूण ३५ विद्यार्थ्यांना गणवेश तसेच शैक्षणिक साहित्या देण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहाय्य पुरवणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे हा होता. या कार्यक्रमात क्लबच्या अध्यक्षा श्रीमती स्वाती अग्रवाल, सचिव श्रीमती नेहा गणत्रा तसेच प्रकल्प प्रमुख श्रीमती स्नेहा चौधरी आणि श्रीमती ऋचा पटेल यांची उपस्थिती होती. इनरव्हील क्लब ऑफ खामगाव नेहमीच समाजोपयोगी आणि शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवत आहे. या प्रकल्पाचे सर्वत्र कौतुक झाले. अशी माहिती श्रीमती निधी केला यांनी दिली आहे.

### विश्वकर्मा यांची जयंती साजरी करा

**खामगाव :** राज्यातील कामगार विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व कार्यालयांमध्ये भगवान विश्वकर्मा यांची जयंती दरवर्षी १७ सप्टेंबर रोजी साजरी करण्यात यावी, असे निर्देश कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी आज दिले. यानुसार, कामगार विभागाच्या सर्व कार्यालयांमध्ये भगवान विश्वकर्मा यांची प्रतिमा लावण्यात आले.

# खामगावमध्ये अतिक्रमण निर्मूलन मोहीम सुरूच; कृउबासजवळील झुणका भाकर केंद्र पाडले

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**खामगाव दि. ७ :** खामगाव नगर परिषदेकडून शहरातील अतिक्रमण हटविण्याची मोहीम निर्धारपूर्वक आणि टप्प्याटप्प्याने राबविली जात असून, या मोहिमे अंतर्गत ६ ऑगस्ट रोजी कृषी उत्पन्न बाजार समितीजवळील जनूना रोड कॉर्नरवरील झुणका भाकर केंद्र जेसीबीच्या साहाय्याने जमीनदोस्त करण्यात आले. शहरात अतिक्रमणाबाबत तक्रारी नुसार सदर कारवई करण्यात येत असल्याचे मुख्याधिकारी यांनी अजिंक्य भारत सोबत बोलतांना सांगीतले.

हे केंद्र सार्वजनिक रस्त्यावर अतिक्रमण करून उभारण्यात आले होते. आणि वाहतुकीस अडथळा ठरत असल्याने या कारवाईचे महत्व अधिक अधोरेखित झाले आहे. नगर परिषद प्रशासनाने यापूर्वीच अतिक्रमणधारकांना वेळोवेळी नोटिसा बजावून तसेच ध्वनीक्षेपकाच्या माध्यमातून आवाहन करून स्वतःहून अतिक्रमण हटविण्याची संधी दिली होती. काही जबाबदार नागरिकांनी प्रशासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत अतिक्रमणे हटविली देखील, मात्र काहींनी दुर्लक्ष केल्याने अखेर प्रशासनाला कठोर पावले उचलावी लागली. ही कारवाई नगर परिषदेचे मुख्याधिकारी प्रशांत शेळके यांच्या मार्गदर्शनात नगर अभियंता प्रभाकर लाबडे, अभियंता राजेंद्र महस्के, शुभम नारखेडे आणि अतिक्रमण निर्मूलन अधिकारी मोहन आहिरे यांच्या नेतृत्वाखाली शांततेत पार पडली. यापूर्वी दिनांक २७ आणि २८ जून रोजी देखील शहरात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबविण्यात आली होती. त्यानंतर ही मोहीम टप्प्याटप्प्याने सुरूच असून, यामध्ये कोणतीही गय केली जाणार नाही, हे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. या पार्श्वभूमीवर खामगाव नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. प्रशांत शेळके यांनी पुन्हा एकदा नागरिकांना आवाहन केले आहे की, ''ज्यांनी अद्याप अतिक्रमणे हटवलेली नाहीत, त्यांनी ती त्वरित स्वतःहून काढून टाकावीत. अन्यथा नगर परिषद प्रशासन कठोर पावले उचलण्यास मागे-पुढे पाहणार नाही.''

शहरातील सौंदर्य, सार्वजनिक रस्त्यांची मोकळीक व नागरिकांची सोय यासाठी अतिक्रमण मुक्त शहर ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. नगर परिषद प्रशासनाच्या या सातत्यपूर्ण मोहिमेमुळे शहरात कायदा व शिस्त निर्माण होण्यास मदत होत असून, नागरिकांच्या सहकार्याची अपेक्षा प्रशासन व्यक्त करत आहे.

# जामोद येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिर उत्साहात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**जळगाव जा. दि.७ :** शेतकरी सर्वसामान्य नागरीक यांचे महसूल विभागातील विविध कार्यालयात प्रलंबित असलेली प्रश्न निकाली काढण्यासाठी महसूल विभागाच्या वतीने दि. ५ ऑगस्ट रोजी जामोद येथील बारी समाज मंगल कार्यालयाच्या सभागृहात छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिराचे उद्घाटक जळगांव जामोद चे तहसिलदार पवन पाटील हे होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जामोदच्या सरपंच्या सौ. गंगुबाई दामधर ह्या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून नायब तहसीलदार भरत कीटे, पुरवठा अधिकारी सुधीर गायकवाड, मंडळ अधिकारी विजय शिंदे, वैद्यकीय अधिकारी डॉ. प्राजक्ता देशमुख,डॉ. नेहा पुंडकर,सामाजिक कार्यकर्ते तथा भाजपचे प्रा. सचिन हागे, गोपाल घाटे,यांची प्रमुख उपस्तित होती. ग्राम सेवक तुळशिराम चौधरी, अरूण पारवे, यांच्या सह विविध पक्षांचे पदाधिकारी , सर्वच कार्यालयांचे अधिकारी कर्मचारी व लाभार्थी उपस्थित होते.

यावेळी जळगाव जामोद चे तहसिलदार पवन पाटील यांनी शासन आपल्या दारी आले आहे. आपल्या समस्या या शिबिरात निकाली काढाव्या असे आवाहन केले.घेतले महाराजस्व शिबीरात विविध विभागाचे स्टॉल लावण्यात आले होते, यामध्ये शेतकरी कार्ड तयार करणे, केवायसी करणे, पी एम किसान, कृषी विभाग , पुरवठा विभाग सेतू विभाग, भूमी अभिलेख,, आधार नोंदणी, घरकुल अर्ज, जाँब कार्ड,आभा कार्ड ,संजय गांधी योजना निवडणूक विभाग ,आरोग्य विभाग , इत्यादी विभागाचे स्टॉल होते. यावेळी आरोग्य विभागाच्या डाँ प्राजक्ता देशमुख, व टिम च्या वतीने या अभियानात आरोग्य शिबीर राबवत या शिबीरात शेकडो रूग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी मंडळ अधिकारी विजय शिंदे, तलाठी आदीती मुळे ,गणेश सोळंके ,राकेश चौरे ,जी. डी वाघ, कृषी सहाय्यक कृष्णा भगत,ज्ञानेश्वर शेगोकार, जि प. शाळेचे मुख्याध्यापक सुनिल हिस्सल, सेतु व्यवस्थापक सुनिल जावळे, यांचे सह इतरही सर्वच विभागाच्या कर्मचाऱ्यांसह सेतू चालक , व लाभार्थी उपस्थिती होती.

# स्व. गजाननदादा पाटील यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त रक्तदान

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेगाव दि.७ :** येथील स्थानिक माऊली ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजी शेगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना व डॉ. श्री पी ठाकरे मेमोरियल ब्लड बैंक अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. गजानन दादा पाटील यांच्या पुण्यतिथी प्रित्यर्थ रक्तदान शिबिराचे आयोजन ६ ऑगस्ट रोजी करण्यात आले होते. या शिबिरामध्ये महाविद्यालयातील ७८ विद्यार्थ्यांनी व विद्यार्थिनींनी स्वयंस्फूर्तीन रक्तदान केले. यामध्ये विद्याव्यर्थ्यासह प्राध्यापक व इतर सह कर्मचारी यांचाही समावेश होता तसेच याप्रसंगी सर्वांकडून दादांना विनम्र आदरांजली अर्पण करण्यात आली. यावेळी प्रमुख उद्घाटक म्हणून संस्थेचे अध्यक्ष ज्ञानेश्वरदादा पाटील व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. एम. जाधव, शैक्षणिक समन्वयक प्रा. अमित फाकड, सर्व विभागाचे विभागप्रमुख, रजिस्ट्रार सुधीर बढ़े, टी अँड पी.ऑफिसर तुषार बढ़े यांची उपस्थिती होती. त्यानंतर संस्थेचे संचालक श्रीधरदादा पाटील यांनी कार्यक्रमाला भेट देऊन दादांच्या प्रतिमेस आदरांजली अर्पण केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. एम. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. मंगेश धर्माळ, स्पोर्ट डायरेक्टर प्रा. संजय देशमुख, प्रा. राजकुमार धानुका रा. से यो. महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. कोमल कराळे, प्रा. आँचल गुमा बरा. से. वो. स्वयंसेवक यांनी परीक्षण करून कार्यक्रम संपन्न केले.

# विश्वगंगा नदीवरील लासुरा मेंढळी रस्त्यावरील पूल वाहून गेला; त्वरीत दुरूस्त करा शिवसेना (उबाठा) ची मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**मलकापुर दि.७ :** तालुक्यातील लासुरा-मेंढळी रस्त्यावरील विश्ववगंगा नदीवरील पूल वाहून गेल्याने ऐन पावसाळ्यात ग्राम स्थांना जिव धोक्यात घालून नदी पात्रातून शेतात ये-जा करावी लागत असल्याने या पुलाची तात्काळ दुरुस्ती करावी अन्यथा जि.प बांधकाम विभागाचे कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात असा इशारा एका निवेदनाद्वारे जि.प बांधकाम विभाग अभियंता सोळंके यांना देण्यात आला आहे निवेदनावर शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, शहर प्रमुख हरिदास गणबास, उपशहर प्रमुख शकील जमादार, किसानसेना शहर प्रमुख सै. वसीम सै. रहीम, वाहतूकसेना शहर प्रमुख इमरान लकी, विभाग प्रमुख चांद चव्हाण, शेख फरहान, जावेदखान, शेख मोहसीन शेख छोटू, पुरुषोत्तम काशीराम अढाव, रमेश शेषराव अढाव, रामपाल भिकूसिंग राजपूत, शंकर बगाडे, भास्कर नागो बगाडे, जितेंद्र शांताराम पारस्कर सह आदींच्या स्वाक्षऱ्या नमूद आहेत.

# टिप्परची ट्रॅक्टरला धडक; कामगार ठार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**नांदुरा दि.७ :** वीट घेऊन नांदुऱ्याकडे येत असलेल्या ट्रॅक्टरला मागून भरधाव वेगात आलेल्या टिप्परने धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात एक मजूर ठार झाल्याची घटना ६ ऑगस्ट रोजी सकाळच्या सुमारास पडली. याबाबत सविस्तर असे की, ट्रॅक्टर व टिप्पर दोन्हीही नांदुऱ्याकडे येत असताना सकाळी सुमारे ११:३० वाजे - दरम्यान ग्राम आमसरी जवळील हनुमान मंदिराजवळ ट्रॅक्टरला टिप्परने मागून जोरदार धडक दिली. त्याा भीषण अपघातात ट्रॅक्टर वरील मजूर श्रीराम काशिनाथ काटोले रा. नारखेड वय अंदाजे ४७ हे गंभीर जखमी - झाले. सदर घटनेची माहिती नांदुरा पोलीस स्टेशनचे कर्मचारी रवी झगरे न यांनी ओम साई फाउंडेशनला दिली असता ओम साई फाउंडेशनचे - स्वयंसेवक विलास निंबोळकर, कृष्णा वसुकार, गणेश बोचे, राहुल - इंगळे, रोहित भोपळे हे रुग्णवाहिकेसह घटनास्थळी दाखल झाले व - त्यांनी गंभीर जखमी श्रीराम काशिनाथ काटोले यास नांदुरा सामान्य रुग्णालय येथे दाखल केले. डॉक्टर जयस्वाल यांनी तपासणीनंतर जखमीस मृत घोषित केले. सदर घटनेचा तपास पोलीस करीत आहेत.

# वैद्यकीय व्यवस्थेतील त्रुटींवर तातडीने उपाययोजना कराव्या: मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**खामगाव दि.७ :** अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ संचालित आरोग्य समितीच्या वतीने खामगाव येथील महात्मा ज्योतिबा फुले उपजिल्हा सामान्य रुग्णालयातील व्यवस्थेबाबत गंभीर तक्रारी करत वैद्यकीय अधीक्षक मार्फत जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय बुलढाणा यांना निवेदन देण्यात आले आहे. यामध्ये रुग्णालयातील वैद्यकीय बेजबाबदारपणा, अपुऱ्या सुविधा व डॉक्टरी दुर्लक्ष यांविरोधात तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, रुग्णालयात भरती असलेल्या गरजू रुग्णांची डॉक्टरांकडून व्यवस्थित तपासणी होत नाही. अनेक रुग्णांना केवळ तोंडी औषधे देण्यात येतात तर काहींना फक्त परिचारिकांच्या भरोश्यावर सोडण्यात येते. वॉर्डमध्ये आवश्यक वैद्यकीय उपकरणे जसे की मॉनिटर, बीपी मशीन, ईसीजी मशीन आदींचा अभाव आहे.

यामुळे गंभीर रुग्णांच्या आरोग्यावर परिणाम होतो आहे. जर प्रशासनाने तात्काळ उपाययोजना केल्या नाहीत, तर सामान्य रुग्णालयासमोर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडले जाईल. या निवेदनप्रसंगी सुरज यादव, राजू आत्माराम घाटे, सिद्धेश्वर निर्मळ, रूपेश कलंत्री, सुमित शर्मा, प्रदीप शमी, गजानन लाड, सागर उभरे, सुभाष ठाकूर, सहदेव पवार, कल्पना सुरडकर, इंदूबाई सुरडकर, लखन सारसर, तुषार गव्हाळ आदी उपस्थित होते.

# विद्यार्थिनींकडून पोलीस दादाला राखी बांधून रक्षाबंधन साजरे

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**शेगाव दि.७ :** येथील एफ. एम. काशेलानी इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थिनींनी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी राखी पौर्णिमेचे औचित्य साधून शेगाव शहर पोलीस स्टेशनमध्ये पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना राखी बांधून रक्षाबंधन साजरे केले.

शाळेच्या वतीने इयत्ता सहावीतील विद्यार्थिनी दरवर्षी प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी व सेवक यांना राखी बांधून सद्भावना व्यक्त करतात. याच परंपरेनुसार यंदा देखील सदरक्षणाय खलनिग्रहणाय या पोलीस दलाच्या ब्रीदवाक्याशी सुसंगत असा भावनिक सोहळा पोलीस स्टेशनमध्ये पार पडला. या कार्यक्रमात पोलीस निरीक्षक नितीन पाटील, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सोनटक्के यांच्यासह ठाण्यातील अंमलदार व पोलीस कर्मचाऱ्यांना विद्यार्थिनींनी प्रेमपूर्वक राखी बांधली. या चिमुकल्यांनी पोलीस दलाच्या जनतेसाठी असलेल्या सेवेचे महत्त्व जाणून त्यांना दीर्घायुष्यासाठी सदिच्छा दिल्या. कार्यक्रमावेळी शाळेचे संचालक कुणाल काशेलानी, सहसंचालक मोनिका काशेलानी, मुख्याध्यापिका योगिता गावंडे, शिक्षक प्रेम सावळे, शिक्षिका आणि सहाय्यक ताई उपस्थित होत्या.

# लॉयन्स क्लब व धन्वंतरी चॅरीटेबलतर्फे आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी प्रस्ताव आमंत्रीत

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.७ :** सामाजिक कार्यात सदा अग्रेसर असणाऱ्या लॉयन्स क्लब खामगांव व धन्वंतरी चॅरिटेबल मेडीकल फाऊंडेशनच्या वतीने स्व. श्री.स. बावस्कर गुरुजी स्मृतीप्रित्यर्थ देण्यात येणाऱ्या आदर्श शिक्षक पुरस्काराचे हे बारावे वर्ष आहे. त्यासाठी बुलडाणा जिल्ह्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन तसेच अंध-अपंग, मुकबधीर, आदिवासी शाळांमध्ये विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व सोबतच सेवानिवृत्तीनंतरही सामाजिक कार्यात सक्रीय असणाऱ्या शिक्षकांकडून सदर प्रस्ताव आमंत्रित करण्यात येत आहेत.

लॉयन्स क्लबचे माजी प्रांतपाल डॉ. अशोक श्रावण बावस्कर यांच्या संकल्पनेतून सुरु करण्यात आलेल्या या जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी जिल्ह्यातील शिक्षकांकडून प्रस्ताव आमंत्रीत करण्याचे आवाहन लॉयन्स क्लब खामगांवच्या वतीने करण्यात आले आहे. ५००१ रु. रोख व सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप असून ह्या पुरस्कारासाठी निवड झालेल्या शिक्षकांचा सपत्नीक सत्कार करुन पुरस्कार प्रदान केल्या जातो. पुरस्कारासाठी शहरी व ग्रामिण भागात इयत्ता १ ली ते ७ वी तसेच इयत्ता ८ वी ते १२ वी असे प्रत्येकी दोन गट करण्यात आले आहेत. प्रत्येक गटामधून एक शिक्षक वा शिक्षिका असे एकुण चार पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. अंध, अपंग, मुकबधीर व आदीवासी आश्रम शाळेत विद्यादानाचे पवित्र कार्य करणाऱ्या शिक्षक वा शिक्षीकांमधून एक असा विशेष पुरस्कार देण्यात येणार आहे. तसेच सेवानिवृत्तीनंतर ही सामाजिक कार्यात सक्रीय असलेल्या गुरुजनांपैकी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या एका सेवानिवृत्त शिक्षकास पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. सोबतच पदवीधर महाविद्यालयात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व शैक्षणिक उपक्रमात अग्रेसर असणाऱ्या महाविद्यालयीन प्राध्यापक / प्राध्यापिका पैकी एकास विशेष पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. यासाठी विहित नमुन्यात दि. १० सप्टेंबर २०२५ पर्यंत प्रस्ताव आमंत्रीत केले आहेत. प्रस्ताव विहीत नमुन्यात हार्ड कॉपी, सॉफ्ट कॉपी चे स्परुपात ई-मेल . व मो.नं. ९४२२१८०९०८ या व्हॉटस्अप नंबरवर सुध्दा स्विकारण्यात येतील. प्रस्तावाची सॉफ्ट कॉपी प्राप्त करण्यासाठी तसेच विस्तृत माहिती तथा नाव नोंदणी व प्रस्ताव सादर करणेसाठी लॉ. डॉ. अशोक बावस्कर, अक्षय हॉस्पीटल, सिव्हील लाईन, खामगांव मो. नं. ९४२२१८०९०८, लॉयन्स क्लब अध्यक्ष लॉ. तुषार कमाणी मो.नं. ९८२२४६३३४६, सचिव लॉ. डॉ. गिरिश पवार मो.नं. ९५५२१८००००, कोषाध्यक्ष लॉ. कुणाल भिसे मो.नं. ९४२२९२६८८८ तसेच श्री. के. ओ. बावस्कर गुरुजी, बुलडाणा मो.नं. ९२७२९५८१२५, अक्षय मेडीकल, सिव्हील लाईन, खामगांव मो. ९२७३४५७३३३ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# वर्णा येथे शासन आपल्या दारी कार्यक्रम

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**खामगाव दि.७ :** महाराष्ट्र शासन महसूल सप्ताह अंतर्गत आज दि. ५ ऑगस्ट २०२५ रोजी महाराणा प्रताप सभागृह वर्णा येथे छत्रपती शिवाजी महाराज व समाधान शिबिर व शासन आपल्या दारी हा कार्यक्रम संपन्न झाला. सदर कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून वर्णा येथिल सरपंच सौ. स्वाती उमेश इंगळे कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय अधिकारी रामेश्वर पुरी व नायब तहसीलदार निखिल पाटील उपस्थित होते.

सदर कार्यक्रमांतर्गत विविध विभागांचे दाखले वाटप व माहितीपर मार्गदर्शन करण्यात आले यावेळी महसूल विभाग अंतर्गत सातबारा आठ अ फेरफार चे एकूण ३८ लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले संजय गांधी योजना व श्रावण बाळाचे बावीस आदेश वाटप करण्यात आले तसेच संजय गांधी योजनेतील सात नवीन अर्ज स्वीकारण्यात आले आधार कार्ड अपडेटेशन व एक केवायसी अंतर्गत एकूण ३१ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला तसेच जिवंत सातबारा अंतर्गत आठ अर्ज स्वीकृत करण्यात आले उत्पन्न दाखला व प्रमाणपत्र एकूण १६ दाखल्यांचे वाटप करण्यात आले तसेच कृषी विभागांतर्गत काळेगाव येथील दोन शेतकऱ्यांना कांदा चाळ मंजुरी आदेश देण्यात आलेत व सहा शेतकऱ्यांना फळबाग आदेश देण्यात आले तसेच वर्णा येथील चार शेतकऱ्यांना ठिबक सिंचन मंजुरी पत्र या निमित्ताने वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास काळेगाव मंडळातील सर्व गावातून लाभार्थी हजर होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्राम महसूल अधिकारी अनिल शिवाजी शिंदे काळेगाव यांनी तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्राम महसूल अधिकारी कुमारी स्वाती वाडेकर यांनी केले. या कार्यक्रमांतर्गत उपविभागीय अधिकारी यांनी विविध योजनांवर मार्गदर्शन केले तसेच माननीय उपविभागीय अधिकारी यांना उत्कृष्ट उपजिल्हाधिकारी पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल वर्णा येथील समस्त गावकऱ्यांच्या वतीने त्यांचा नागरिक सत्कार करण्यात आला तसेच माननीय नायब तहसीलदार निखिल पाटील यांना राजीव गांधी गतिमान जनता पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचे सुद्धा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी महसूल मंडळातील प्रमुख पाहुणे रामदास चौधरी मंडळ अधिकारी काळेगाव, सुरेंद्र प्रतापसिंग इंगळे पोलीस पाटील वर्णा, चंदू रामसिंग इंगळे तंटामुक्ती अध्यक्ष वर्णा, महादेव बळीराम अवचार पोलीस पाटील , संघटना तालुका अध्यक्ष भगवान सिंग सोळंके, माजी उपसभापती पंचायत समिती खामगाव, विजय कंदील तंत्र अधिकारी कृषी, या कार्यक्रमांतर्गत कृषी विभागामार्फत हुमणी अळी नियंत्रणाबाबत वर्णा येथील ग्राम कृषी अधिकारी सौ. जाधव मॅडम यांनी बाबत मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमास पी. बी. वंजारी, ज्ञानेश्वर नागरे,अनिल शिंदे, स्नेहा वाडेकर आदी उपस्थित होते.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
अमरावती, शुक्रवार, दि. ८ ऑगस्ट २०२५

## थोडक्यात

### सोन्याचे मणी देण्याच्या नावावर फसवणूक

**अमरावती** – नागपूर येथील रहिवाशी असलेल्या एका व्यावसायिकाला सोन्याचे एक किलो मणी देण्याची बतावणी करीत चौघांनी ९ लाख ४० हजारांनी फसवूणूक केली. याबाबत अशोक रामपाल अगृवाल (६७, रा. सोनाल टोली, बिनाकी, नागपूर) यांनी राजापेठ पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. सविस्तर वृत्तानुसार, २९ जुलै रोजी एक अनोळखी व्यक्ती फिर्यादीच्या दुकानात लाकडी मंदिर घेण्याच्या निमित्ताने आला. मंदिराची पाहणी करताना त्याने फिर्यादीला ठेकेदाराकडे खोदकाम करीत असताना चांदीचे सिक्के व सोन्याच्या वस्तू मिळाल्या. त्या मी तुम्हाला दाखवतो. याबद्दल कुणाला सांगू नका. मी तुम्हाला दाखवतो, असे म्हणत तिथून निघून गेला. त्यानंतर दोन दिवसांनी तो दोन महिलांसह व्यापाऱ्याकडे आला. त्याने बॅगेतून पिवळी धातूची माळ काढून त्यातून तिन मणी फिर्यादीच्या हातावर ठेवून सोनाराकडून त्याची शहानिशा करण्यास सांगीतले. सोनारानेही ते मणी सोन्याचे असल्याचे सांगीतले.

### चार बकऱ्या चोरून नेल्या

**शिरजगाव कसबा :** कारंजा बहिरम येथे अज्ञात चोरट्याने दोन बोकडांसह दोन बकऱ्या चोरून नेल्यात. त्यामुळे फिर्यादी नितेश लालचंद जावरकर (३२, रा. कारंजा बहिरम) यांचे अंदाजे २४ हजारांचे नुकसान झाले आहे. याबाबत त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून शिरजगाव कसबा पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### दारुड्या मुलाची वडिलांना मारहाण

**अचलपूर :** दारूडा मुलगा घरातील स्टिलचा गुंड भंगारवाल्याला विकायला नेत असताना वडिलांनी त्याला हटकले. त्यामुळे चिडलेल्या मुलाने लाथाबुक्क्यांसह काठीने वडिलांना मारहाण करीत जखमी केले. ही घटना तळेगाव मोहना येथे घडली. याबाबत जखमी वडील गजानन ओंकारराव पानबुडे (५५) यांच्या तक्रारीवरून सरमसपुरा पोलिसांनी अक्षय गजानन पानबुडे (२८) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### युवकाला काठीने मारहाण

**धारणी :** दारू पिवून घरासमोर शिवीगाळ करणाऱ्याला युवकाने हटकले. त्यामुळे चिडलेल्या दारुड्याने हातातील काठीने युवकाच्या पायावर वार केले. त्याला जीवे मारण्याची धमकी दिली. याबाबत सचिन चंपालाल कास्देकर (36) याच्या तक्रारीवरून धारणी पोलिसांनी गुन्हा नोंदवला. ही घटना मांडवा येथे घडली.

### मलकापूर येथे बांधाकामावरून वाद

**अंजनगाव सुर्जी :** तू माझ्या जागेत बांधकाम का केले, असा प्रश्न एकाने दुसऱ्याला विचारला. जाब का विचारला म्हणून तिघांनी त्याला हातातील कड्यासह लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. ही घटना मलकापूर येथे घडली. या प्रकरणी अनिल पंजाबराव ढोले (49) यांच्या तक्रारीवरून रहीमापूर पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### उसणवारी पैशावरून युवकास मारहाण

**धामणगाव रेल्वे** – योगेश नंदकिशोर पनपालिया (३२, रा. जळका पट) यांनी गावातीलच दोघांकडून वर्षभरापुर्वी १० हजार रुपये उसनवारी घेतले होते. ते पैसे परत मागण्यासाठी आलेल्या दोघांनी त्यांना काठीने मारहाण करीत पैसे कसे देत नाही, पाहून घेतो अशी धमकी देत शिवीगाळ केली.

# ८४१ पैकी ३१४ ग्रामपंचायतींचा विकास निधी अडकला!

## पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीच्या वितरणात भेदभावाचा आरोप; विकासकामे ठप्प

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**अमरावती, दि. ७ :** राज्यातील ग्रामविकासाच्या महत्त्वपूर्ण स्रोत असलेल्या पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीच्या वितरणात केंद्र शासनाने भेदभाव केल्याचा आरोप करण्यात आला आहे. अमरावती जिल्ह्यातील ८४१ ग्रामपंचायतींपैकी तब्बल ३१४ ग्रामपंचायतींना दुसऱ्या हप्त्याचा निधी अद्याप प्राप्त झालेला नाही, यामुळे तेथील अनेक मूलभूत विकासकामे रखडली आहेत.

लोकसंख्या आणि गरजेची कामे यानुसार संबंधित ग्रा. पं.ला किती रक्कम द्यावी, हे ठरवले जाते. यासंदर्भात राष्ट्रीय प्रधान मुखिया सरपंच संघटनेचे प्रतिनिधी मंडळ १७, १८ ऑगस्टला केंद्रीय ग्रामविकास मंत्र्यांची दिल्लीत भेट घेणार आहे. संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष राहुल उके व जिल्ह्यातील इतर पदाधिकाऱ्यांनी त्यासाठी पुढाकार घेतला आहे. अनेक महिन्यांपासून हा निधी अडकला असल्याने गावांतील विकासकामेही थांबली आहेत. आतापर्यंत या वित्त आयोगाच्या माध्यमातून जिल्ह्याला ८१ कोटी ६४ लाख २६ हजार रुपयांची रक्कम दोन टण्यात मिळाली. मात्र ३१४ ग्रा. पं.ची उर्वरित रक्कम केव्हा मिळेल, याबद्दल शासन बोलायला तयार नाही. त्यामुळेच निधी वितरणात शासनाने भेदभाव केला, असा आरोप संघटनेने केला आहे. ज्या ग्रा. पं.ची रक्कम रखडली त्यामध्ये धारणी तालुक्यातील सर्वाधिक ४९ ग्रा. पं.चा समावेश आहे. त्यापाठोपाठ अमरावती-३०,

| हप्ता कोणता ? | प्रकार | ग्रा.पं. | रक्कम |
|---|---|---|---|
| पहिला | अबंधित | ८४१ | ११८,५६,८३,००० |
| दुसरा | बंधित | ८४९ | २८,१०,३१,००० |
| दुसरा | बंधित | ५२७ | १२०,९८,३१,००० |
| दुसरा | अबंधित | ५२७ | ११३,९८,८१,००० |

अचलपूर-२९, नांदगाव खंडेश्वर-२७, तिवसा-२१, धामणगाव रेल्वे-२१, चांदूर रेल्वे-२१, अंजनगाव सुर्जी-२०, दर्यापूर-२०, भातकुली-१९, वरुड-१८, मोर्शी-१७, चिखलदरा-१६ आणि चांदूर बाजार तालुक्यातील १४ ग्रा. पं.चा समावेश आहे. विशेष म्हणजे यातील बहुतेक ग्रामपंचायती कमी लोकसंख्येच्या असून, त्यांच्याकडे या निधीशिवाय उत्पन्नाचा दुसरा कोणताही मोठा स्त्रोत नाही. स्वच्छता व पाणी पुरवठ्याच्या योजना तसेच रस्ते आणि इमारत दुरुस्ती यासाठी हा निधी खर्च करावा, असा दंडक आहे. परंतु निधीच न मिळाल्याने शाळा, दवाखान्याच्या इमारती तसेच ग्राम सचिवालयाची दुरुस्ती आणि गावांतील अंतर्गत रस्त्यांची डागडुजी रखडली आहे. दर सहा महिन्यातून एकदा या सूत्रानुसार एका आर्थिक वर्षात दोन हप्त्यांमध्ये हा निधी दिला जातो. या निधीची बंधित आणि अबंधित अशी विभागणी केली आहे. स्वच्छता व पाणी पुरवठ्याच्या कामांसाठी दिली जाणारी रक्कम ही बंधित तर रस्ते व इमारत दुरुस्तींसाठीची रक्कम ही अबंधित या संवर्गात मोडते. दरम्यान वारंवारच्या गावकऱ्यांच्या तक्रारीनुसार सावर्डी, वाघोली, जळका शहापूर, डिगरगव्हाण, पिंपळविहीर, देवरा-देवरी, सलोना, पाटी आदी ग्रा. पं. मधील सरपंचांनी जिल्हा परिषदेत जाऊन आपली कैफियत मांडली. त्यानुसार जि. प. प्रशासनानेही शासनाशी पत्रव्यवहार केला. परंतु नवे आर्थिक वर्ष सुरू झाले तरी निधी मिळाला नाही.

### ■ तांत्रिक चुकांमुळे अडकला निधी

शासन त्यांच्याकडे उपलब्ध निधीनुसार देशभरातील ग्रामपंचायतींना वित्त आयोगाची रक्कम पाठवित असते. जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींना बंधित व अबंधितचा पहिला हप्ता मिळाला आहे. काही ग्रामपंचायतींनी त्या रकमेची उपयोगिता प्रमाणपत्रे आणि ऑडिट रिपोर्ट देण्यात विलंब केला. त्यामुळे त्यांची मागणीही उशिराने नोंदवावी लागली. दरम्यान येत्या काळात त्यांनाही त्यांच्या वाट्याचा निधी मिळेल, अशा सूचना प्राप्त झाल्या आहेत.

**संजीता महापात्र, सीईओ, जि. प.**

### ■ ग्रामीण विभागाचा विकास केव्हा ?

जिल्ह्यात ८४९ ग्रामपंचायती आहेत. यापैकी गत आर्थिक वर्षात सर्व ग्रा. पं.ना बंधित आणि अबंधितचा पहिला हप्ता मिळाला. तसेच ५२७ ग्रा. पं.ना दुसऱ्या हप्त्याचीही रक्कम मिळाली. परंतु ३१४ ग्रा. पं. चा बंधित आणि अबंधितचा दुसरा हप्ता अद्याप प्रलंबित आहे. त्यामुळे तेथील विकास कामांचे प्रस्ताव तसेच पडून असून निधी कधी मिळतो आणि कामे कधी पूर्ण होतील, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

## शिक्षण उपसंचालक निलिमा टाके समाजभूषण पुरस्काराने सन्मानित

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**अमरावती, दि. ७ :** महाराष्ट्र प्रांतिक तैलिक समिती आयोजित तेली समाज मेळाव्यात अमरावती विभागाच्या शिक्षण उपसंचालक निलिमा टाके – गुल्हाने यांना तेली समाज भूषण पुरस्कार देऊन गौरवान्वित करण्यात आले.

महाराष्ट्र प्रांतिक तैलिक समितीचे प्रदेशाध्यक्ष माजी खासदार रामदास तडस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मेळाव्यात आपल्या कर्तुत्वाच्या जोरावर यशाचे शिखर गाठून शिक्षण उपसंचालक पदापर्यंत मजल मारणाऱ्या अमरावती विभागाच्या शिक्षण उपसंचालक निलिमा सचिन गुल्हाने-टाके यांना राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते तेली समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी काँग्रेस महिला प्रदेशाध्यक्ष संध्याताई सव्वालाखे, महाराष्ट्र प्रांतिक तैलिक समितीचे महासचिव भूषण कर्डिले, विभागीय अध्यक्ष संजय हिंगासपुरे आदी मान्यवर उपस्थित होते. निलिमा टाके-गुल्हाने या तेली समाजासाठी गौरव असून त्यांच्यासारख्या कर्तृत्ववान महिलांमुळे तेली समाजाला एक वेगळी दिशा मिळाली आहे. त्यांच्या कार्यापासून समाजातील इतर महिलांनी प्रेरणा घेऊन यशाचे शिखर गाठावे असे आवाहन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. सत्काराला उत्तर देताना निलिमा टाके-गुल्हाने म्हणाल्या की हा सत्कार माझा नसून संपूर्ण कुटुंबाचा व समाजाचा आहे. समाजातील मुलींनी मिळणाऱ्या प्रत्येक संधीचा फायदा घेत आपला ,आपल्या कुटुंबाचा व समाजाचा नावलौकिक वाढवावा असा मोलाचा सल्ला दिला. समाज भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल निलिमा टाके- गुल्हाने यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

## युवा शेतकऱ्याची गळफास लावून आत्महत्या

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**पापळ, दि. ७ :** मौजा पापळ येथील युवा शेतकरी गौरव रामदास कथले वय २५ यांनी स्वत:च्या शेतात असलेल्या लिंबाच्या झाडाला गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना दिनांक 5 ऑगस्ट रोजी रात्री ८ वाजून ३० मिनिटांनी घडली. गौरव रामदास कसले यांच्याकडे मौजा पापड येथे दोन एकर शेती असून गेल्या दोन वर्षांपूर्वी रोजगार हमीतून विहिर मंजूर झाली होती.त्यावेळी त्याने बांधकाम कर्ज करून पूर्ण केले.परंतु गेल्या अनेक दिवसांपासून या विहिरीचे चेक न निघाल्यामुळे ते आर्थिक विवंचनेत होते. अनेकदा पंचायत समितीला जाऊनही सुद्धा त्यांची त्यांची समाधान कारक उत्तर मिळाले नाही त्यामुळे त्यांनी कर्जबाजारी होऊन आर्थिक व्यवस्थेने दिनांक पाच ऑगस्ट रोजी स्वत:ची शेतातील लिंबाच्या झाडाला आत्महत्या केली. प्रशासनाने कोणतीही दखल न घेतल्यामुळे हा पवित्रा घेतल्या असल्याची गावकऱ्यांमध्ये चर्चा आहे तरी त्यांना त्यांच्या कुटुंबियांना शासनाने आर्थिक मदत द्यावी अशी गावकऱ्यांची मागणी आहे

## अप्रमाणित वजन काट्याने बाजारात ग्राहकांची फसवणूक

### इलेक्ट्रॉनिक काट्यातही मोठा घोळ | अनेक ठिकाणी दगडी वजने

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**बडनेरा, दि. ७ :** शहरामध्ये अनेक ठिकाणी अप्रमाणीत वजन काटे वापरल्या जात आहे आजही दांडी पारड्यातून ग्राहकांना माल दिल्या जात आहे. दांडी पारड्यामध्ये वजन म्हणून गोटे देखील वापरल्या जाते याकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने ग्राहकांची चांगलीच फसवणूक होत आहे...

बडनेरा शहरात दर सोमवारी आठवडी बाजार भरतो शहरासह मोठ्या संख्येत ग्रामीण भागातील लोक येथे खरेदीसाठी येत असतात भाजीपाला विक्रेते तसेच हातगाडी वाले सर्रास दांडी पारडे वजन करण्यासाठी वापरत आहे त्यात गोटे टाकून वजन केल्या जाते हे वजन अप्रमानेत असताना सुद्धा याचा सर्रास वापर होतो आहे मात्र संबंधित प्रशासनाकडून याची दखल घेतल्या जात नसल्याने विक्रेते राजरसपणे अशा दांडी पारड्याचे वापर करून लोकांची फसवणूक करीत आहे बऱ्याच ठिकाणी इलेक्ट्रॉनिक्स काटे आहेत ते मात्र मोठ्या दुकानदारांकडे असतात सर्वांनाच प्रमाणित वजन काटे वापरण्याच्या शासनाच्या सूचना असताना अशाप्रकारे लोकांची फसवणूक करणाऱ्या विरुद्ध प्रशासनाने कडक कारवाई केली पाहिजे सर्रास बाजारांमध्ये याचा वापर होतो आहे.

ही स्थिती एकाच बाजारातली नसून परिसरातल्या सर्वच लहान मोठ्या आठवडी बाजारांमध्ये पहावयास मिळते वेगवेगळे वजन काटे अधिकृत नसल्याने वजन काट्यात दांडी मारली जात असल्याने ग्राहकांची होणारी अशा प्रकारची लूट केव्हा थांबणार असा सवाल उपस्थित झाला आहे ग्राहकांच्या संरक्षणाचे रक्षण करण्याच्या उद्देशाने कायदेशीर मापन नियम 2011 अंतर्गत अमापक वजने आणि मापांच्या तैनाती आणि उत्पादनाशी संबंधित दंडात वाढ करण्यात आली आहे

## 'आविष्कार सेल' व आदिवासी अध्यासन केंद्राच्या समन्वयकपदी डॉ. मनिषा कोडापे

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**अमरावती,दि. ७ :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागातील प्रा. डॉ. मनिषा कोडापे यांची विद्यापीठाच्या 'आविष्कार सेल' व 'आदिवासी अध्यासन केंद्र' यांच्या समन्वयकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यापीठ प्रशासनाने हा निर्णय जाहीर केला असून, त्यांनी नुकताच आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला आहे.

डॉ. कोडापे या विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यही आहेत. शिक्षण, संशोधन आणि नवाचार क्षेत्रातील त्यांचे योगदान उल्लेखनीय असून, त्यांच्या या नवीन जबाबदारीबद्दल विद्यापीठ परिसरात तसेच शैक्षणिक वर्तुळात त्यांचे अभिनंदन केले जात आहे. विद्यापीठाच्या प्रगतीसाठी त्यांच्या नेतृत्वातून नवीन दिशा लाभेल, असा विश्वास विद्यापीठातील सहकारी वर्गाने व्यक्त केला आहे.

## दरोडा टाकण्याच्या तयारीत आलेल्या तीन जणांना अटक

### दोन विधीसंघर्षीत बालकांचाही समावेश | गुन्हे शाखा पोलिसांची कारवाई

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी





**अमरावती, दि. ७ :** दरोड्याची पूर्व तयारी करून दरोडा टाकण्याच्या तयारी असलेल्या तीन सराईत गुन्हेगारांना व दोन विधी संघर्षीत बालकांना गुन्हे शाखेच्या पोलिसांनी ताब्या घेतले. आरोपी कडून दरोड्यात वापरण्यात येणारे साहित्य जप्त केले आहे. आरोपी हे अटल गुन्हेगार असून त्यांनी आता पर्यंत पोलिस आयुक्तालच्या हद्दीत अनेक गंभीर गुन्हे केल्याचे उघड झाले आहे. आरोपी राहुल गौतम श्रीरामे (२२, रा. सिद्धार्थ नगर), शेख सुफियान शेख इलियास (४०, रा. गजानन नगर), यश उर्फ चारू चरणदास मेश्राम (२०, रा. सिद्धार्थ नगर) अशी आरोपीची नावे आहे. यामध्ये दोन विधी संघर्ष बालकांचाही समवेश आहे. ६ अगस्त रोजी आरोपी हे नवीन बायपास रोडवरील वडरपुरा कडे जाणाऱ्या कच्च्या रोडवर येणाऱ्या जाणाऱ्या चारचाकी वाहनाला थांबवून लूटमार करण्याच्या प्रयत्नात होते. ही बाब गुन्हे शाखेच्या पोलिसांना माहिती पडली होती. त्यावरून सापडा रचुन तिघांनाही ताब्यात घेतले आहे. आरोपी कडून गुन्ह्यात वापरण्यात येणारे साहित्य जप्त केले आहे. आरोपी अट्टल गुन्हेगार असून त्यांनी आता पर्यंत गंभीर गुन्हे केले आहे.

ही कारवाई पोलिस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण, सहायक पोलिस निरीक्षक महेश इंगोले, अमोल कडू, संजय वानखडे, बबलू येवतीकर, दीपक सुंदरकर, सुनिल लाचुरकर, गजानन ढेवले, आस्तिक देशमुख, मनोज ठोसर, जहिर शेख, संग्राम भोजने, मंगेश शिंदे, नईम बेग, अब्दुल संबे, विशाल वाकपांजर, चेतन कराडे, यांच्या पथकाने केली आहे.

# राज्य आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी जिल्ह्यातील ३० शिक्षक रिंगणात!

## बाह्यमूल्यमापन ७ ते १३ ऑगस्टदरम्यान; १४ ऑगस्टला मुलाखती

दै. अजिंक्य भारत | सुधीर केने

**अमरावती, दि. ७ :** राज्यातील शिक्षण क्षेत्रात दरवर्षी उत्सुकतेने वाट पाहिला जाणारा राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार यंदा अर्जांच्या संख्येत घट नोंदवत आहे. अमरावती जिल्ह्यातून केवळ ३० शिक्षकांनी या पुरस्कारासाठी अर्ज दाखल केले असून, त्यांचे बाह्य मूल्यमापन ७ ते १३ ऑगस्ट २०२५ दरम्यान होणार आहे. १४ ऑगस्ट रोजी डायट, अमरावती येथे मुलाखतींचे आयोजन करण्यात आले आहे.

या पुरस्काराअंतर्गत राज्य शासनाकडून 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार' देण्यात येतो. यंदा प्राप्त झालेल्या ३० नामांकनांमध्ये विविध विभागांतील शिक्षकांचा समावेश आहे. यामध्ये प्राथमिक विभाग ७, माध्यमिक विभाग१०, सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार ७, आदिवासी विभाग ३ विशेष शिक्षक (कला/क्रीडा) २, दिव्यांग शिक्षक प्रवर्ग १.




### स्काऊट-गाईड पुरस्कारासाठी एकही अर्ज नाही!

दरवर्षीप्रमाणे स्काऊट गाईड या विशेष प्रवर्गासाठी एक स्काऊट व एक गाईड शिक्षकांना पुरस्कार देण्यात येतो. मात्र, यंदा अमरावती जिल्ह्यातून एकाही शिक्षकाने या प्रवर्गात अर्ज दाखल केलेला नाही, ही बाब विशेष उल्लेखनीय आहे.

### १४ ऑगस्ट रोजी मुलाखती

राज्य आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी अर्ज केलेल्या शिक्षकांची मुलाखत दिनांक १४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वाजता, डायट, अमरावती येथे घेण्यात येणार आहे. माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयाने सर्व अर्जदार शिक्षकांनी आवश्यक कागदपत्रांसह वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

### तालुकानिहाय अर्जांची स्थिती

| | |
|---|---|
| वरुड | ४ |
| चांदूरबाजार | २ |
| मोर्शी | ३ |
| अमरावती मनपा क्षेत्र | ४ |
| भातकुली | ४ |
| धारणी | ३ |
| दर्यापूर | १ |
| तिवसा | २ |
| चिखलदरा | ४ |
| अमरावती ग्रामीण | १ |
| अंजनगाव सुर्जी | १ |
| अचलपूर | ४ |

## हातभट्टी चालविणारा आरोपी 'एमपीडीए' अंतर्गत स्थानबद्ध

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ७ :** मोर्शी पोलिस ठाणे हद्दीतील पाळा येथील कुख्यात हातभट्टीवाला शेरु शहा करीम शहा (36) याला महाराष्ट्र प्रतिबंधक कायदा (एमपीडीए) अंतर्गत एक वर्षासाठी अमरावती जिल्हा मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले.

शेरु शहा मागील अनेक वर्षांपासून गावठी हातभट्टी दारू तयार करून विक्री करत होता. या अवैध व्यवसायामुळे परिसरातील तरुणांमध्ये व्यसनाधिनता वाढली होती. याशिवाय दारूमुळे होणारे भांडण-तंटे, महिलांची छेडछाड, सामाजिक अस्वस्थता यामध्ये लक्षणीय वाढ झाली होती. स्थानिक पोलिसांनी वेळोवेळी कारवाई केली, तरी आरोपीने आपला अवैध धंदा सुरूच ठेवला.

पोलिसांच्या अहवालावर आधारित प्रस्ताव पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी जिल्हादंडाधिकारी आशिष येरेकर यांच्याकडे सादर केला. त्यानुसार सर्व कायदेशीर बाबींची पडताळणी करून शेरु शहा हा खरोखरच परिसरासाठी धोका असल्याचे स्पष्ट झाल्याने त्याच्यावर 30 जुलै रोजी एक वर्षाकरिता

एमपीडीए अंतर्गत स्थानबद्धतेचा आदेश देण्यात आला. या आदेशाची अंमलबजावणी करताना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरण वानखडे, सहायक पोलिस निरीक्षक सारंग बोबीलवार, विष्णुपंत राठोड, पोलिस हवालदार अमोल देशमुख, तसेच मोर्शी पोलीस स्टेशनचे ठाणेदार पोलिस निरीक्षक सुरज बोंडे, नितीन देशमुख व पोलिस हवालदार योगेश सांभारे यांनी तात्काळ शेरु शहाला ताब्यात घेतले व 30 जुलै रोजी कारागृहात हलवले. या कारवाईमुळे अमरावती ग्रामीण जिल्ह्यात अवैध धंद्यांना चाप बसण्याची शक्यता असून अशा सराईत गुन्हेगारांवर पोलिसांकडून सातत्याने एमपीडीएसारख्या कठोर कायद्यांतर्गत कारवाई केली जात आहे.

## थोडक्यात

### महिलेची सोनसाखळी लंपास

**अमरावती :** आजारी आईला भेटण्यासाठी दोन बहिणी सुभाषा कॉलनीतून वैभव कॉलनीकडे पायदळ जात होत्या. त्याच वेळी समोरून दुचाकीवर दोन अनोळखी व्यक्ती आले. त्यापैकी मागे बसलेल्या एकीच्या गळ्यातील १८ ग्रॅमची सोन्याची पोथ हिसकावून पळ काढला. तिची अंदाजे किंमत एक लाख रुपये आहे. ही घटना हरिगंगा ऑईल मिलजवळ महिलेने दिलेल्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी दोन सोनसाखळी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### शहरातून दोन दुचाकी लंपास

**अमरावती :** पत्नीसह टांक चेंबर्स येथे दवाखान्यात आलेल्या ५० वर्षीय व्यक्तीने त्याची दुचाकी (एमएच २७–बीके ०४६८) गाडगे नगर उड्डाणपुलाखाली उभी केली होती. चोरट्याने ती चोरून नेली. याबाबत गाडगे नगर पोलिसात त्यांनी तक्रार नोंदवली. तर दुसरी घटना जयस्तंभ चौकात घडली. फिर्यादी सतीश किसनलाल गुप्ता (७५) हे फळाच्या गाडीवर फळ घेण्यासाठी गेले होते. त्या वेळी संधी साधून चोरट्याने त्यांची दुचाकी (एमएच २७–एएच ७९३९) चोरून नेली. तिची अंदाजे किंमत 10 हजार रुपये होती. त्यांच्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### फ्लॅटमधून तीन लॅपटॉप लंपास

**अमरावती :** रात्र झोपताना फ्लॅटच्या बाल्कनीचा दरवाजा उघडा ठेवून तीन मित्र झोपले होते. मात्र सकाळी उठल्यावर त्यांना त्यांचे तीन लॅपटॉप, दोन मोबाईल, बॅगेत ठेवलेले बँकेचे एटीएम कार्ड, क्रेडीट कार्ड, चेकबुक व पासबुक दिसून आले नाही. अज्ञाताने आत प्रवेश करीत एकूण ८५ हजार ८०० रुपयांचे साहित्य चोरून नेले. याबाबत विक्की सावरमल जांगिड (२८, रा. गिरीधर अपार्टमेंट, साईनगर) यांच्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती :** रहाटगाव येथून पेट्रोल भरण्यासाठी पंपावर जाणाऱ्या दुचाकी (एमएच २७–बीएस ७६६७) चालकाला चार चाकी (एमएच २६–एआर ७३००) चालकाने वळण घेताना कोणतेही इंडिकेटर न देता धडक दिली. त्यात दुचाकी चालक मनीष विलास सावरकर (३७, रा. रहाटगाव) यांनी दुखापत झाली. ही घटना ३१ जुलै रोजी हॉटेल ग्रँड महफीलसमोर घडली होती. उपचारांती दुरुस्त झाल्यावर त्यांनी चार चाकी चालकाविरुद्ध गाडगे नगर पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी चार चाकीच्या चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### चिंचफैल परिसरात जुगारावर धाड

**अमरावती :** चिंचफैल येथे सुरू असलेल्या जुगारावर धाड टाकत राजापेठ पोलिसांनी एकूण २१ हजार १०० रुपयांचे साहित्य जप्त केले, तर दोघांवर गुन्हे दाखल केले. त्यापैकी एकजण फरार झाला असून उदय सिताराम गोरे (२८) हा पोलिसांच्या हातात सापडला.

### दारू विक्रेत्यावर कारवाई

**अमरावती :** नांदगाव पेठ पोलिसांनी शिवणगाव व जळका शहापूर येथे अवैध देशी दारू विक्रीवर कारवाई करीत एकूण १ हजार ६६. रुपयांची दारू जप्त केली, तर दोघांवर गुन्हे दाखल केले.

# शहरात मुरूम चोरट्यांचा हैदोस!

## १०० ब्रासची परवानगी मात्र सौरउर्जा प्रकल्पच पोखरुन नेला






दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.७ :** चांदुरबाजार तालुक्यातील शिरजगाव कसबा येथे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्पांतर्गत १९ एकर क्षेत्रावर सौर प्लांटचे काम सुरू आहे. या ठिकाणच्या जमिनीचे सपाटीकरण करण्यासाठी सोलर कंपनीने मुरूम काढण्याची परवानगी मागितली होती. मात्र, परवानगीपेक्षा शेकडो ब्रास जास्त मुरूम उत्खनन करून ते चक्क खरपी ते बेलोरा दरम्यान सुरू असलेल्या एमएसआरडीसीच्या रस्त्याच्या बांधकामावर वापरल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

चांदुरबाजार तहसील कार्यालयाने फक्त १०० ब्रास मुरूम काढण्याची परवानगी दिली होती. तरीदेखील मोठ्या प्रमाणावर उत्खनन करण्यात आले. या प्रकरणात सोलर कंपनी, महसूल विभाग तसेच स्थानिक प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप आहे. सूत्रांच्या माहितीनुसार या प्रकरणात एका सत्ताधारी पक्षाच्या आमदाराच्या भावाचे नाव समोर येत आहे. महसूल मंत्री स्वत: अमरावतीचे पालकमंत्री असल्याने कारवाई होणार का, हा प्रश्न उपस्थित होत आहे.

राज्याच्या सीमेवरून मोठ्या प्रमाणावर मुरूम काढून तो शासकीय कामासाठी वापरल्याचे समोर आले आहे. महसूल विभाग, खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मंडल अधिकारी, तलाठी, कोतवाल आणि स्थानिक पोलिसांनी कोणतीही कारवाई न केल्याने राजकीय दबाव असल्याचे स्पष्ट होते.

मुरूमचे अधिक उत्खनन लक्षात आल्यानंतर सोलर कंपनीने वाहतुकीस बंदी घातली होती. काही दिवस वाहन खाजगी पेट्रोल पंपावर उभी होती. मात्र, एका वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यास पालक पातळीवरून फोन आल्यानंतर वाहतूक पुन्हा सुरू झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली. त्यामुळे महसूल मंत्र्यांची या प्रकरणी मूक परवानगी आहे का, असा संशय व्यक्त केला जात आहे.

### सपाटीकरणासाठी परवानगी

सोलर कंपनीला फक्त सपाटीकरणासाठी परवानगी होती. मात्र, राजकीय दबावाखाली वाहतूक साठीही मंजुरी मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे. या गंभीर गैरव्यवहारावर कारवाई होणे अपेक्षित आहे.

# जनता विद्यालयात क्रांतिसिंह नाना पाटील जयंती साजरी

## बॉक्सिंग स्पर्धा : यशस्वी विद्यार्थिनींचा सत्कार




दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अंजनगाव बारी, दि. ७ :** भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक झुंजार नेते प्रामुख्याने सातारा, सांगली या भागात त्यांनी स्वतंत्र्याची चळवळ उभी केली होती ब्रिटिश सरकार विरोधात गावागावातील तरुणांना हाताशी धरून प्रतिसरकार उभे केले अशा या लढवय्या नेत्याची जयंती दि. ऑगस्ट २०२५ रोजी जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय अंजनगाव बारी येथे साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक विनोद मुगल, प्रमुख उपस्थिती पर्यवेक्षक गजेंद्र अवघड,दिगंबर करडे, मंगेश ढेकण उपस्थित होते. प्रथम शाळेचे मुख्याध्यापक विनोद मुगल तसेच पर्यवेक्षक गजेंद्र अवघड आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्यात आले. प्रास्ताविक दिगंबर करडे यांनी केले. त्यानंतर विद्यार्थ्यांची भाषणे झाली. याच दिनाचे औचित्य साधून आरुषी जगदीश अट्टेल वर्ग ८ ब या विद्यार्थिनीने राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धा २०२५ जळगाव खान्देश येथे ब्रॉन्ज मेडल मिळवले. त्याबद्दल मुख्याध्यापक विनोद मुगल, पर्यवेक्षक गजेंद्र अवघड यांनी तिचे मेडल आणि पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले तसेच अंजनगाव बारी येथील बॉक्सिंग क्लब चालवणारी तेजस्विनी ठाकरे माजी विद्यार्थीनी जी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करते तिचे सुद्धा मुख्याध्यापक विनोद मुगल यांनी अभिनंदन केले तसेच शाळेतील सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी यांनी कुमारी आरुषी अट्टेल हिचे अभिनंदन केले.

# श्रीक्षेत्र नागरवाडी येथे मुलींच्या सुसज्ज निवास हॉलचा 'उद्घाटन सोहळा' उत्साहात

## आदिवासी मुला-मुलींना वाटले विविध प्रकारचे साहित्य



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**चांदूरबाजार, दि. ७ :** कर्मयोगी संत गाडगेबाबांचे अंतिम श्रध्दास्थान असलेल्या,श्री गाडगे महाराज संस्था श्रीक्षेत्र नागरवाडी येथे मुंबई येथिल उदार दयाळु सितादेवी संतोषकुमार झुनझुनवाला यांच्या विशेष पुढाकारातून आश्रमशाळेतील मुलींच्या निवासाकरीता २० लक्ष रुपये खर्चातून सोयीसुविधायुक्त नव्याने उभारण्यात आलेल्या निवास हॉलचा उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात या ठिकाणी पार पडला. याप्रसंगी नागरवाडी इंद्रभुवानाचे शिल्पकार तथा संस्थेचे सर्वेसर्वा बापूसाहेब देशमुख यांच्या समवेत आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी दानशुर सितादेवी संतोषकुमारजी झुनझुनवाला व परीवार तसेच सोहळ्याला विशेष उपस्थित मान्यवरांचे शाल,श्रीफळ,पुष्पहार देवुन हृदयस्पर्शी असे स्वागत केले. दरम्यान सितादेवी संतोषकुमारजी झुनझुनवाला यांनी कर्मयोगी संत गाडगेबाबांच्या मुर्तीचे पुजन व माल्यार्पण करत त्यांना अभिवादन केले. यानंतर प्रामुख्याने उदार दयाळु स्व.संतोषकुमारजी झुनझुनवाला यांच्या स्मरणार्थ सितादेवी संतोषकुमारजी झुनझुनवाला यांनी मेळघाटक्षेत्रातील शिक्षण घेत असलेल्या, गोरगरीब आदिवासी मुलींच्या निवासाकरीता सर्व सोयीसुविधा युक्त नव्याने उभारण्यात आलेल्या सुंदर अशा प्रशस्त निवास हॉलचे उद्घाटन दानशुर सितादेवी संतोषकुमारजी झुनझुनवाला यांच्या हस्ते यावेळी करण्यात आले.या उद्घाटन प्रसंगी बोलताना श्री.बापूसाहेब देशमुख म्हणाले आदिवासी विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसह शिक्षणाच्या संधी वाढवण्याच्या दृष्टीने संस्थेचे कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाची उन्नती शक्य आहे आणि यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील आहेत. या कार्यक्रमाला मुंबई येथिल संदिप झुनझुनवाला, संजय झुनझुनवाला, सारिकाबेन झुनझुनवाला, प्रियाबेन झुनझुनवाला, बबिताबेन झुनझुनवाला, प्रा.डॉ.अरविंद देशमुख, दिपकदादा देशमुख, किशोरसिंह गहलोत, सरपंच सौ.मनिषा इंगळे, नामदेवराव दरवाई, केशवराव गावंडे, व्यवस्थापक गजानन देशमुख, व्यवस्थापक प्रशांत देशमुख, दादर संचालक सागर देशमुख, कुणाल देशमुख नाशिक, प्रकाश महात्मे, गजानन जवंजाळ, माजी मुख्याध्यापक किशोर चौधरी, पत्रकार धनंजय धांडे, अमोल कंटाळे, संतोष मिसाळ, रमेश तोटे, सुखदेवराव नवघरे, सुनिल मोहोड, अमोल शेळके, शुभम कठाळे महाराज,तसेच परिसारीतील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गांधी विद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती साजरी



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अंजनगाव बारी, दि. ७ :** गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बडनेरा येथे लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती, सामाजिक समता व संघर्षशीलतेचे मूल्य बिंबवणारा हा कार्यक्रम प्रेरणादायी ठरला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अनिश बडगुजर होते.

प्रमुख अतिथी म्हणून मिलिंद चिरडे व कु. विद्या घाटे यांची उपस्थिती लाभली. आदिती सुने, श्रुती झलके, आदित्य अंबा डकरे, सोनल घोडे, श्रृती सौंदळे, विद्या शिंदे, दिपाली शेबे, निधी मोडक, समीक्षा घंगाडे यांनी टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या कार्यावर प्रभावी भाषण सादर केले. शिक्षिका घाटे मॅडम यांनी भाषणाद्वारे विद्यार्थ्यांना सत्य, निर्भयता, आत्मविश्वास आणि परिश्रमाचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमास भेंडकर,दुधे, ठाकरे, चांडक, उके, राणे, ढोले, चिंचोळकर इत्यादी शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. खुशीअंबाडकर तर ओम अंबाडकर यांनी मनःपूर्वक आभार मानले. विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त सहभाग आणि मुख्याध्यापिका वंदना टिकस यांच्या मार्गदर्शक सहकार्यमुळे कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला.




# शहरात अवैध धंद्यांचा सुळसुळाट

## युवक कॉंग्रेसची पोलिस आयुक्ताकडे तक्रार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ७ :** गेल्या महिन्याभरामध्ये शहरात गुन्हेगारी कृत्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. एमडी ड्रग्स विक्री, गांजा विक्री व चायना चाकू यांची विक्री शहरात राजरोसपणे सुरू आहे. त्याचप्रमाणे अवैध जुगार अड्डयांची संख्या ही मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. एकंदरीत सर्व प्रकारच्या अवैध धंद्यांनी शहरात आपले हातपाय सगळीकडे पसरले आहेत. याचा शहराच्या सामाजिक स्वास्थ्यावर गंभीर परिणाम होतो आहे. गेल्या महिन्याभरात चक्क दोन पोलीस कर्मचाऱ्यांच्या हत्या झालेल्या असून जनतेचे रक्षण करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांची हत्या करणे पर्यंत गुन्हेगारांचे मनोधैर्य वाढलेले आहे. यामुळे सामान्य नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे. त्यामुळे पोलीस दलाच्या कार्यक्षमतेवर सुद्धा प्रश्नचिन्ह निर्माण केले जात आहे.

एमडी ड्रग्स, गांजा व इतर अमली पदार्थांच्या विळख्यात तरुणाई गुंतलेली आहे. त्याचबरोबर या गुन्ह्यात अल्पवयीन मुलांचा सहभागी तर अत्यंत चिंताजनक बाब आहे. शहरातील अनेक बार वा पब्समध्ये मध्यरात्री उशीरपर्यंत पार्ट्यांचे आयोजन केले जात आहे. या ठिकाणी अल्पवयीन मुलांना सर्रास दारू विक्री केली जात आहे. अवैध जुगार अड्डयांच्या स्पर्धेतून चक्क आमदारांच्या घरासमोर चाकू हल्ला करण्यापर्यंत गुन्हेगारांची मजल गेलेली आहे अशा या सगळ्या परिस्थितीमध्ये पोलीस प्रशासनाचे अस्तित्व कुठेही दिसत नसल्याची भावना सुद्धा नागरिकांमध्ये आहे. वाढत्या गुन्हेगारीचे संघटीकरण होत आहे की काय आणि या गुन्ह्यांमध्ये अल्पवयीन मुले अग्रेसर असून त्यांच्यावर प्रशासनाचा व पोलिसांचा कोणताही धाक नसल्याचे दिसून येत आहे. शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखावी अशी मागणी यावेळी युवक कॉंग्रेस द्वारे निवेदनाच्या माध्यमातून करण्यात आली आहे.

यावेळी समीर जवंजाळ, वैभव देशमुख, सागर कलाने, अनिकेत ढेंगळे, आशिष यादव, संकेत साहू, मोहीत भेंडे, धनंजय बोबडे, कौस्तुभ देशमुख, संकेत भेंडे, शुभम बांबल, कृणाल गावंडे, पियुष अभ्यंकर, चैतन्य गायकवाड, श्रेयस धर्माळे, वेदांत केने, अमेय देशमुख, आकाश गेडाम, कुणाल जोत हे युवक कॉंग्रेस पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सेवानिवृत्त शिक्षक जगदीश सावरकर यांचा सत्कार



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**शिरखेड, दि. ७ :** जिल्हा परिषद उच्च माध्यमिक मराठी शाळा शिरखेड येथील उच्चश्रेणी मुख्याध्यापक जगदीश सावरकर हे नियत वयोमानानुसार ३१ जुलैला सेवानिवृत्त झाले. उत्कृष्ट सेवाकार्याबद्दल शाळेत छोटेखानी कार्यक्रमात त्यांना सहृदय निरोप देण्यात आला. शाळा व्यवस्थापन समीती अध्यक्ष रामेश्वर डोळस हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते तर प्रमुख अतिथी म्हणुन पल्लवी शिंदे शा.व्य.स. उपाध्यक्ष , मीना मोहोड सरपंचा, उज्वला देशमुख उपसरपंचा, विद्या यावले मुख्याध्यापिका, वांगे सर केंद्र प्रमुख, सहाय्यक शिक्षक मनोहर दाभाडे, सुनिल पातुरकर, ज्योत्स्ना वाघमारे, दीप्ती सुरोसे , मंगला शिंदे, रंजना भगत, तसेच शाळा व्यवस्थापक समिती सदस्य, ग्रा.पं.सदस्य यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन विद्या यावले यांनी केले.

आभार प्रदर्शन ज्योत्स्ना वाघमारे यांनी केले. शाळा व्यवस्थापन समिती यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन करण्यात आले. केंद्र प्रमुख मनोज मनोज वांगे, शाळा व्यवस्थापन अध्यक्ष रामेश्वर डोळस, मुख्याध्यापिका व सहाय्यक शिक्षक यांच्या वतीने जगदीश सावरकर यांचा शाल श्रीफळ, स्मृतिचिन्ह, देऊन सत्कार करण्यात आला.

# आदिवासी सुविधा व रस्ते प्रकल्पांवरील ढिसाळ कारभार

## कामात हयगय करणाऱ्या अधिकाऱ्यांवर होणार कारवाई | आ. रवि राणा यांची ताकीद

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ७ :** सार्वजनिक बांधकाम विभाग व आदिवासी विकास विभागाच्या पेंडिंग आश्वासन कामकाजावर गंभीर चर्चा झाली. समिती समोर ज्या ऊनिवा दिसून आल्या त्या संबंधाने समिती अध्यक्ष आ.. रवी राणा यांनी संबंधित सचिव, आयुक्त, प्रकल्प अधिकारी यांना थेट कारवाईचे आदेश दिले. या वेळी समितीचे सदस्य आ. संजय बनसोडे, माजी मंत्री पराग शहा, विक्रम पाचपुते, राजेश पवार उपस्थित होते. आदिवासी सुविधा व रस्ते प्रकल्पावरील ढिसाळ कारभार करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

रस्त्यांच्या कडेने सोलार दिवे बसवण्यासंदर्भात अहवाल सादर करण्याचे निर्देश.आदिवासी नागरिकांचे कल्याणासाठी शासन जागृत आहे. त्यांचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे, आहार, स्वच्छता, शिक्षण व्यवस्थापनावर लक्ष केंद्रित करणे. पारधी समाजातील विद्यार्थ्यांसाठी विशेष



पुढाकार. आदिवासी शाळा मधील आहाराचा दर्जा चांगला असला पाहिजे. आदिवासी तांडे वाड्या येथील पोच मार्ग दळणवळण सुविधा चांगले असल्या पाहिजेत. या संबंधाने अधिकारी उत्तर देत असताना अफशेल अफियशी ठरले. या प्रकरणी अध्यक्ष आ. रवी राणा यांनी नाराजी व्यक्त करत जर कुणी जाणीव पुर्वक कसूर करत असेल तर त्यांचे वर कारवाही करणार. असा सज्जड ईशांरा अध्यक्ष आ. राणा यांनी दिला.

### अकस्मात पाहणी करणार

लेखाशीर्ष 50/54 अंतर्गत रस्ते व आदिवासी वसतिगृहांची अचानक तपासणी होणार. समितीने स्पष्ट केले की, हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही. पुढील बैठकीत सर्व प्रकरणांचा संबंधित सचिव, उप सचिव, आयुक्त, ईतर अधिकाऱ्यांना साक्ष करिता समितीसमोर बोलावून आढावा घेतला जाईल. या बैठकीत आदिवासी विकास विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग चे खालील सचिव, उप सचिव, आयुक्त, मुख्य अभियंता, अनेक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, वन विभागाचे अधिकारी, उपस्थित होते.

अजिंक्य भारत

# यवतमाळ जिल्हा

शुक्रवार, दि. ८ ऑगस्ट २०२५ www.ajinkyabharat.com



## महत्वाचे

### पुसदमध्ये आज शोभायात्रा

**पुसद :** संयुक्त राष्ट्र संघाने घोषित केलेल्या जागतिक आदिवासी गौरव दिनानिमित्त, येत्या आज शुक्रवारी (दि. ९) पुसद शहरात अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेच्यावतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्य मोटारसायकल रॅली व शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली काकडदाती येथील वसंत उद्यानापासून सुरू होऊन क्रांतिसूर्य बिरसा मुंडा चौकात समारोप होईल. आदिवासी बांधवांनी आपल्या पारंपरिक वेशभूषेत आणि सांस्कृतिक कलागुणांसह हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे, असे कळकळीचे आवाहन परिषदेचे जिल्हाध्यक्ष सुनील ढाले यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे

### शिक्षिकेला लग्नासाठी दमदाटी

**बाभूळगाव :** तालुक्यातील एका ३३ वर्षीय सहायक शिक्षिकेने, 'माझ्याशी लग्न कर' म्हणून सतत बळजबरी करणाऱ्या एका शिक्षकाविरुद्ध पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. ५ ऑगस्ट रोजी ही तक्रार देण्यात आली. पीडित शिक्षिकेच्या तक्रारीनुसार, आरोपी शिक्षक संजय सहदेव घडीकर (वय ५३) हा पूर्वी एकाच शाळेत असताना त्यांना लग्नासाठी सतत दमदाटी करत होता. त्याची बदली जवळच्या कोपरा गावात झाली, तरीही त्याने भर रस्त्यात अडवून त्रास देणे सुरूच ठेवले. 'बळजबरीने लग्न करीन,' अशी धमकीही तो देत होता. याप्रकरणी बाभुळगाव पोलिसांनी आरोपीविरुद्ध विनयभंग, धमकी देणे अशा विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे.

### दुचाकी लंपास

**वणी :**शहरातील जैन ले-आऊट परिसरातून अज्ञात चोरट्याने तीस हजार रुपये किमतीची दुचाकी लंपास केल्याची घटना ३० ते ३१ जुलैच्या रात्री घडली. याप्रकरणी वणी पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सागर सुधाकरराव पाटाळकर (वय ४२) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांनी आपली एम.एच-२९ बीजे-३६५० क्रमांकाची दुचाकी घरासमोर उभी केली होती. सकाळी पाहिले असता, त्यांना दुचाकी जागेवर दिसली नाही. त्यांनी परिसरात शोधाशोध केली, मात्र ती मिळून आली नाही. शहरात वाहनचोरीच्या घटना वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. पोलिसांनी तक्रारीची नोंद घेतली असून, अज्ञात चोरट्याचा आणि चोरी गेलेल्या दुचाकीचा शोध घेत आहेत.

# सहस्त्रकुंड जलविद्युत प्रकल्पाला कडाडून विरोध

## विदर्भ-मराठवाड्यातील शेतकरी आक्रमक; हजारो हेक्टर सुपीक जमीन जाणार पाण्याखाली

**उमरखेड, दि.७ प्रतिनिधी**

प्रस्तावित सहस्त्रकुंड जलविद्युत प्रकल्पावरून विदर्भ आणि मराठवाड्यात संघर्ष पेटला आहे. सत्ताधारी आमदार प्रकल्पाचे समर्थन करत असताना, हजारो हेक्टर जमीन पाण्याखाली जाणार असल्याने, शेतकऱ्यांनी आणि नागरिकांनी तीव्र विरोध सुरू केला आहे. या विरोधासाठी 'प्रकल्प विरोधी संघर्ष समिती'ने ठिकठिकाणी सभा-मेळावे आयोजित केले आहेत.

राज्य शासनाकडून प्रस्तावित सहस्त्रकुंड जलविद्युत प्रकल्पाला मान्यता देण्यासाठी वेगाने हालचाली सुरू आहेत. उमरखेडचे आमदार किसनराव वानखेडे आणि हदगावचे आमदार बाबूराव पाटील कदम कोहळीकर हे या प्रकल्पाचे समर्थन करत आहेत. मात्र, दुसरीकडे या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या विदर्भ आणि मराठवाड्यातील नागरिकांकडून याला तीव्र विरोध होत आहे. स्थानिकांचा विरोध डावलून, लोकप्रतिनिधी प्रकल्पाचे समर्थन करत असल्याने, संभाव्य प्रकल्पग्रस्त शेतकरी आणि नागरिकांमध्ये संतापाची लाट आहे. या विरोधाला संघटित स्वरूप देण्यासाठी 'प्रकल्प विरोधी संघर्ष समिती' स्थापन करण्यात आली असून, समितीकडून गावोगावी जनजागृतीसाठी सभा आणि मेळावे घेतले जात आहेत. या मेळाव्यांना नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत असल्याने, प्रकल्पाच्या भवितव्याबद्दल साशंकता निर्माण झाली आहे.

### प्रकल्पातून 'विकासा'चे चित्र

आमदार किसनराव वानखेडे यांनी विधानसभेत मांडलेल्या माहितीनुसार, या प्रकल्पामुळे २५ मेगावॉट वीज निर्मिती होणार आहे. तसेच, सुमारे ३२ हजार हेक्टर कोरडवाहू जमीन सिंचनाखाली येईल. याचा थेट फायदा विदर्भ-मराठवाड्यातील उमरखेड, महागाव, हिमायतनगर, माहूर आणि किनवट या तालुक्यांना होणार आहे. त्यामुळेहा प्रकल्प विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सरकारचे म्हणणे आहे.

### 'आम्ही भूमिहीन व्हायचे का?'

या प्रकल्पामुळे विदर्भ आणि मराठवाड्यातील सुमारे साडेसहा हजार हेक्टर जमीन बुडीत क्षेत्रात जाणार आहे. यातील बहुतांश शेतजमीन ही आधीच सिंचनाखाली असून सुपीक आहे, असा दावा शेतकऱ्यांनी केला आहे. ही सुपीक जमीन पाण्याखाली गेल्यास, आम्ही भूमिहीन होऊ, अशी भीती प्रकल्पग्रस्त व्यक्त करत आहेत. उमरखेडच्या 'ग्रीन झोन'मधील जमीन का बुडवली जात आहे, असा सवालही ते विचारत आहेत.

# ३४ वर्षीय युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

## घरी कुणी नसताना उचलले टोकाचे पाऊल

**बाभूळगाव, दि. ७ प्रतिनिधी**



शहरातील गादे चौक परिसरात एका ३७ वर्षीय युवकाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. बुधवारी दुपारी ही घटना उघडकीस आली असून, या घटनेमुळे शहरात हळहळ व्यक्त होत आहे. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप कळू शकले नाही.

महेश मनोहर सहारे (वय ३७) असे मृत युवकाचे नाव आहे. तो आणि त्याची पत्नी यवतमाळ येथे एका खासगी कंपनीत कामाला होते. बुधवारी तो काही कामानिमित्त घरी आला होता. दुपारी चार वाजताच्या सुमारास त्याची आई शेजारी गेली असता, त्याने घरातील छताच्या कडीला नायलॉनच्या दोरीने गळफास घेतला, ज्यात त्याचा जागीच मृत्यू झाला. आई घरी परतल्यावर हा प्रकार उघडकीस आला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला आणि मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालयात पाठवला. महेशच्या पश्चात आई, पत्नी रोशनी, मुलगी ऋतुजा आणि भाऊ-वहिनी असा मोठा आप्तपरिवार आहे. याप्रकरणी बाभुळगाव पोलिस पुढील तपास करत आहेत. या घटनेमुळे सहारे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# उमरखेडच्या रस्त्यांना नदीचे स्वरूप



**उमरखेड : शहरात गुरुवारी (दि. ७) सायंकाळी पावसाने अक्षरशः कहर केला. अवघ्या काही तासांत झालेल्या धो-धो पावसामुळे शहराचे रस्ते जणू नद्या बनले होते. प्रमुख मार्गांवर पाणी साचल्याने संपूर्ण वाहतूक व्यवस्था कोलमडली. या अनपेक्षित जलसंकटातून वाट काढताना वाहनचालकांची आणि पादचाऱ्यांची उडालेली तारांबळ दृश्यात स्पष्ट दिसत होती. प्रत्येक जण आपल्या घरापर्यंत सुरक्षित पोहोचण्यासाठी धडपडत होता. या पावसाने शहरातील नालेसफाई आणि पाणी निचरा व्यवस्थेचे पितळ उघडे पाडले असून, नागरिकांना मात्र मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले.**

# आमदार तोडसाम जागतिक कायदेविषयक परिषदेत करणार भारताचे प्रतिनिधित्व

## आमदार राजू तोडसाम अमेरिकेला रवाना

**पांढरकवडा, दि. ७ प्रतिनिधी**



आंतरराष्ट्रीय लोकशाही संवाद आणि कायदेविषयक क्षमता वाढीसाठी अमेरिकेतील बोस्टन येथे आयोजित करण्यात आलेल्या जागतिक कायदेविषयक परिषदेसाठी, केळापूर-आर्णी विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजू तोडसाम हे अमेरिकेला रवाना झाले आहेत. भारतीय राष्ट्रीय कायदेविषयक परिषदेने (NLC India) आयोजित केलेल्या या अभ्यास दौऱ्यात ते भारताचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

या अभ्यास दौऱ्यामध्ये देशभरातील २४ राज्ये आणि २१ राजकीय पक्षांमधील १३० हून अधिक आमदार आणि विधान परिषद सदस्यांचा समावेश आहे. हा गट जगभरातील सहा हजारांहून अधिक कायदेविषयक कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहे. यावेळी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), डिजिटल लोकशाही, सायबर सुरक्षा आणि मतदार आत्मविश्वास यांसारख्या आधुनिक विषयांवर चर्चासत्रे होणार आहेत. आपल्या या दौऱ्याबद्दल बोलताना आमदार तोडसाम म्हणाले, "जागतिक व्यासपीठावर राज्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली असली तरी, मी याकडे केवळ आंतरराष्ट्रीय अनुभव म्हणून पाहत नाही. लोकशाही मजबूत करण्यासोबतच, देशा-देशांमधील संवाद, सहकार्य आणि ज्ञानाची देवाण-घेवाण करण्याची ही एक संधी आहे. जागतिक सुशासनाच्या चांगल्या परंपरा शिकून, त्या जनतेच्या सेवेत आणण्याचा माझा प्रयत्न राहील." या दौऱ्यामुळे त्यांना जागतिक स्तरावरील प्रशासकीय आणि कायदेशीर बाबींचा अभ्यास करण्याची संधी मिळणार आहे.

# डोंगरगावात गोठ्याला भीषण आग

## दोन बैल गंभीर जखमी; तलाठ्याने 'फोन'वरच केला पंचनामा

**राळेगाव, दि.७ प्रतिनिधी**



राळेगाव तालुक्यातील डोंगरगाव येथे एका शेतकऱ्याच्या गोठ्याला आग लागून लाखोंचे नुकसान झाले आहे. यात दोन बैल गंभीर जखमी झाले, तर शेतीचे सर्व साहित्य जळून खाक झाले. या घटनेनंतर तलाठ्याने प्रत्यक्ष पाहणी न केल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप पसरला आहे.

डोंगरगाव येथील शेतकरी लक्ष्मण रामभाऊ उरकुडे यांच्या शेतातील गोठ्याला गुरुवारी मध्यरात्री एक वाजताच्या सुमारास आग लागली. आगीच्या ज्वाळांनी गोठा वेढताच आत बांधलेले बैल दावे तोडून बाहेर पळाले, मात्र ते गंभीर भाजले. या आगीत पाइप, पंप, खतांची ५० पोती, युरिया आणि कीटकनाशके असे सर्व साहित्य जळून खाक झाल्याने उरकुडे यांचे मोठे नुकसान झाले आहे. सकाळी त्यांनी या घटनेची माहिती तलाठ्याला दिली. मात्र, दिवसभर तलाठी घटनास्थळी फिरकलेच नाहीत आणि फोनवर माहिती घेऊन पंचनामा करत असल्याचे सांगितले. या हलगर्जीपणामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी संबंधित तलाठ्यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. या प्रकारामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

# कोसळल्याने युवक ठार

**वणी, दि. ७ :** येथील सिंधी कॉलनी परिसरात एका तीस वर्षीय युवकाचा घराच्या तिसऱ्या मजल्यावरून पडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. हितेश जगदीश फेरवाणी (वय ३०) असे मृत युवकाचे नाव आहे. ही घटना मंगळवारी (दि. ५) रात्री ११ वाजताच्या सुमारास घडली. तिसऱ्या मजल्यावरून खाली पडल्याने हितेश गंभीर जखमी झाले होते. त्यांना तातडीने वणीतील एका खासगी रुग्णालयात व नंतर नागपूरला हलविण्यात आले. मात्र, डोक्याला गंभीर इजा झाल्यामुळे उपचारादरम्यान बुधवारी सकाळी त्यांचा मृत्यू झाला. हा अपघात होता, आत्महत्या की घातपात, हे अद्याप अस्पष्ट असून, पोलिस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत. त्यांच्या पश्चात त्यांची आई व बहीण असा परिवार आहे.

# नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करा

## शिवसेनेची (उबाठा) मागणी; सोयाबीनवर 'हुमणी'चे संकट



**यवतमाळ, दि.७ प्रतिनिधी**

यवतमाळ जिल्ह्यात सोयाबीन पिकावर हुमणी अळीच्या प्रादुर्भावामुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना भरपाई द्यावी, या मागणीसाठी शिवसेनेने (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आक्रमक पवित्रा घेतला आहे. पक्षाने आज जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत ही मागणी केली आहे.

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर सोयाबीनची लागवड झाली आहे, मात्र हुमणी अळीच्या आक्रमणामुळे पीक उद्ध्वस्त झाले आहे. अनेक शेतकऱ्यांसाठी हे संकट नवीन असल्याने, उपाययोजना करण्यापूर्वीच कीडीने पीक फस्त केले आहे, ज्यामुळे मोठे आर्थिक नुकसान होणार आहे. जिल्हा संपर्कप्रमुख राजेंद्र गायकवाड, जिल्हाप्रमुख किशोर इंगळे आणि प्रवीण शिंदे यांच्या नेतृत्वात हे निवेदन देण्यात आले. यावेळी महिला आघाडी जिल्हाप्रमुख कल्पना दरवई, युवा सेना जिल्हाप्रमुख अमोल धोपेकर, उपजिल्हाप्रमुख राजेंद्र धोटे, विनोद काकडे, बळीराम मुटकुळे, रविपाल गंधे यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते .शासनाने या गंभीर समस्येची तातडीने दखल घ्यावी, अन्यथा शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही शिवसेनेने दिला आहे.

## माणुसकीचे दर्शन — अपर पोलिस अधीक्षकांच्याहस्ते भावनिक बिदाई

# 'नंददीप' केंद्रातून सात 'प्रभुजीं'ची घरवापसी

**यवतमाळ, दि. ७ प्रतिनिधी**

समर्थवाडी येथील 'नंददीप' बेघर निवारा केंद्रातून बरे झालेल्या सात मनोरुग्णांना (प्रभुजी) गुरुवारी त्यांच्या घरी पाठवण्यात आले. नवनियुक्त अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात आणि त्यांच्या पत्नी गौरी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा भावनिक बिदाई सोहळा पार पडला. यावेळी थोरात यांनी शिंदे दाम्पत्याच्या कार्याचे कौतुक करत, मदतीचे आश्वासन दिले.

गुरुवारी (दि. ७) 'नंददीप' बेघर निवारा केंद्रात आयोजित या बिदाई सोहळ्याला भेट देऊन, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात यांनी या सेवाकार्याची माहिती घेतली. त्यांनी आणि त्यांच्या पत्नी गौरी यांनी स्वतः मनोरुग्णांना भोजन वाढले. 'एखादे काम सुरू करून अर्ध्यात सोडणारे बरेच असतात, पण आपले आयुष्य कार्याला वाहून घेणारे फार कमी असतात,' अशा शब्दांत त्यांनी मनोरुग्णसेवक संदीप आणि नंदिनी शिंदे या दाम्पत्याचे कौतुक केले. या कार्याला उंच पातळीवर नेण्यासाठी वैयक्तिकरित्या प्रयत्न करू, असे आश्वासनही त्यांनी दिले. यावेळी, केंद्राला साडेतीन एकर जमीन दान करणारे हरिओम (बाबूजी) भूत, मानसोपचार तज्ज्ञ डॉ. श्रीकांत मेश्राम, अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. प्रशांत कसारे, डॉ. रेखा कसारे आणि डॉ. कविता करोडदेव उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन निशांत सायरे यांनी, तर आभार नंदिनी शिंदे यांनी मानले. या सातही 'प्रभुजीं'ना पश्चिम बंगाल, उत्तरप्रदेश, बिहार आणि आसाम येथील त्यांच्या कुटुंबीयांकडे सुखरूप पोहोचवले जाणार आहे. अपर पोलिस अधीक्षक थोरात यांनी केंद्राशी जोडल्या गेलेल्या डॉक्टरांच्या सेवाभावी वृत्तीची तोंडभरून स्तुती केली. ते म्हणाले, 'मानसोपचाराशिवाय मनोरुग्णांना बरे करता येत नाही.' त्यांनी सुरुवातीपासून सामाजिक जबाबदारी निभावणारे मेंदूरोग तज्ज्ञ डॉ. श्रीकांत मेश्राम, मनोरुग्ण 'बंगाली मावशी'च्या पायाची जटील शस्त्रक्रिया यशस्वी करणारे डॉ. प्रशांत व रेखा कसारे, तसेच नियमित सेवा देणारे डॉ. प्रवीण राखुंडे व डॉ. कविता करोडदेव यांच्या कार्याचा विशेष गौरव केला.



### 'नंददीप'च्या कार्याला मदतीचे आश्वासन

या सेवाकार्याला पत्नी नंदिनी यांची साथ मिल्यानेच हे कार्य नेटाने पुढे जात असल्याचे संदीप शिंदे यांनी सांगितले. यावर, 'या सेवेला राज्य शासनाची मदत मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू,' असे अभिवचन अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात यांनी दिले. त्यांच्या पत्नी गौरी यांनीही भारावून जाऊन, या सेवाकार्याची वैयक्तिकरित्या जनजागृती करण्याचे आश्वासन दिले. या आश्वासनांमुळे शिंदे दाम्पत्याला मोठे बळ मिळाले आहे.

# बसस्थानक परिसरात महिला कंडक्टरचा आत्महत्येचा प्रयत्न

## पोलिस-नागरिकांच्या सतर्कतेने वाचले प्राण

**पुसद, दि.७ प्रतिनिधी**

पुसद बसस्थानक परिसरात आज, गुरुवारी एका महिला कंडक्टरने झाडावर चढून गळफास घेत आत्महत्येचा प्रयत्न केल्याने खळबळ उडाली. मात्र, पोलिस आणि नागरिकांनी दाखविलेल्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला असून, महिलेचे प्राण वाचविण्यात यश आले आहे.

एका विद्यार्थिनीला मारहाण केल्याप्रकरणी दोन दिवसांपूर्वी या महिला कंडक्टरवर गुन्हा दाखल झाला होता. याच मानसिक तणावातून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचे समजते. घटनेची माहिती मिळताच, शहर पोलिस ठाण्याचे ठाणेदार सेवानंद वानखेडे यांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. यावेळी, सलमान नावाच्या एका धाडसी ऑटोचालकाने प्रसंगावधान दाखवत झाडावर चढून आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या महिलेला खांद्यावर उचलून खाली उतरवले. त्याच्या या शौर्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. पोलिसांनी या महिलेला ताब्यात घेतले असून, तिचे समुपदेशन करून तिला पुढील उपचारांसाठी हलविण्यात आले आहे. या घटनेमुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते, मात्र वेळीच झालेल्या मदतीमुळे अनुचित प्रकार टळला. पोलिस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत.

## महत्वाचे

### उसण्या पैशांवरून वाद

**पुसद :** उसने पैसे परत करण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून चार जणांनी संगनमत करून एका युवकाला काठीने मारहाण केल्याची घटना तालुक्यातील वसंतवाडी येथे सोमवारी (दि. ४) सायंकाळी घडली. याप्रकरणी खंडाळा पोलिसांनी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सुनिल बंडु राठोड (वय २९) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी महेश सुनील चव्हाण, उमेश सुनील चव्हाण, विवेक रामराव राठोड आणि नितेश विजय राठोड यांनी त्यांच्यासोबत उसण्या पैशांवरून वाद घातला. आरोपींनी त्यांना शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच, थापडाबुक्क्यांनी आणि लाकडी काठीने त्यांच्या पायावर, खांद्यावर आणि पाठीवर मारहाण करून जखमी केले. पोलिसांनी गुन्हा नोंदवून आरोपींचा शोध सुरू केला आहे.

### दुचाकी चोरी

**घाटंजी :** तालुक्यातील पारवा-आदिलाबाद रस्त्यालगतच्या एका शेताजवळून अज्ञात चोरट्याने बारा हजार रुपये किमतीची दुचाकी लंपास केली. ही घटना २५ जुलै रोजी घडली असली तरी, याबाबत नुकताच गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पारवा पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. भिमराव संजय आगीरकर (वय ४२) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांनी आपली एम.एच-२९ बीएस-५३७६ क्रमांकाची दुचाकी श्रावण चौधरी यांच्या शेताजवळ उभी केली होती. काही वेळाने ते परत आले असता, त्यांना दुचाकी जागेवर दिसली नाही. त्यांनी परिसरात शोधाशोध केली, मात्र ती मिळून आली नाही. पोलिसांनी तक्रारीवरून अज्ञात चोरट्याचा शोध सुरू केला आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

### अवैध रेती वाहतूक

**राळेगाव :** येथे विनापरवाना गौण खनिजाची (रेती) अवैध वाहतूक करणाऱ्या एका ट्रॅक्टरवर महसूल अधिकाऱ्यांनी कारवाई केली. ही घटना ३ ऑगस्ट रोजी दुपारी राम मंदिर आष्टा रोडवर घडली. याप्रकरणी राळेगाव पोलिसांनी ट्रॅक्टर चालकाविरुद्ध विविध कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. ग्राम महसूल अधिकारी अनिल राजेश्वर ओंकार (वय ५२) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी सुरज अशोक पुरके (वय २७) हा त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर-ट्रॉलीमधून एक ब्रास रेती (किंमत ७ हजार रुपये) चोरून व विनापरवाना वाहतूक करत होता. ओंकार यांनी त्याला रंगेहाथ पकडले.

# पॅट परीक्षेचा उडाला बोजवारा

## ५० विद्यार्थ्यांसाठी फक्त ५ प्रश्नपत्रिका, शिक्षण विभागाचा 'सावळा गोंधळ'

**पुसद, दि. ७ प्रतिनिधी**

राज्यभरात मोठा गाजावाजा करून सुरू करण्यात आलेल्या 'पॅट' परीक्षेचा, शिक्षण विभागाच्या ढिसाळ नियोजनामुळे पुरता फज्जा उडाला आहे. तालुक्यातील शाळांमध्ये ५० ते ७० विद्यार्थ्यांसाठी केवळ पाच ते दहा प्रश्नपत्रिका पाठवण्यात आल्याने, परीक्षा कशी घ्यावी, असा प्रश्न मुख्याध्यापकांसमोर उभा ठाकला आहे. या प्रकारामुळे, प्रश्नपत्रिका छपाईत मोठा काळाबाजार झाल्याचा संशय व्यक्त होत आहे.


संग्रहित

शिक्षण विभागाने 'पॅट' परीक्षेची घोषणा करून, सर्व शाळांना प्रश्नपत्रिका पुरवण्याचे आदेश दिले होते. मात्र, प्रत्यक्षात विद्यार्थी संख्येनुसार प्रश्नपत्रिका न पाठवता, अत्यंत तुटपुंज्या प्रमाणात त्या पाठवण्यात आल्या. अनेक शाळांना तर प्रश्नपत्रिका मिळाल्याच नाहीत. या गोंधळाबाबत शिक्षण विभागाकडे विचारणा केली असता, "फलकावर प्रश्न लिहून, विद्यार्थ्यांकडून वहीच्या पानावर उत्तरे लिहून घ्या," असे अजब उत्तर मिळाल्याचे शिक्षक सांगत आहेत. विद्यार्थी संख्येनुसार प्रश्नपत्रिका छापल्या असत्या, तर हा गोंधळ उडाला नसता. त्यामुळे, या प्रश्नपत्रिका केवळ कागदोपत्रीच छापल्या गेल्या की काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. शासनाचा हा हेतू खरोखरच फलद्रूप होणार का, की केवळ 'मलिदा' खाण्यासाठीच अशा परीक्षांचा घाट घातला जातो, असा संतप्त सवाल शिक्षक आणि पालक वर्गातून विचारला जात आहे.

### प्रश्नपत्रिका छपाईच्या चौकशीची मागणी

**या परीक्षेच्या प्रश्नपत्रिका खरोखरच छापल्या गेल्या की, यात मोठा काळाबाजार झाला, हे समजायला मार्ग नाही. शासनाचे कोट्यवधी रुपये खर्चून केवळ अधिकाऱ्यांची खिसे भरण्याचा हा प्रकार नाही ना, असा प्रश्न निर्माण झाला आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी झाल्यास, मोठे सत्य बाहेर येईल, अशी मागणी विविध संघटनांकडून होत आहे. छपाईची निविदा कोणाला आणि किती प्रतींची दिली होती, हे शिक्षण विभागाने जाहीर करावे, अशी मागणीही जोर धरत आहे.**

### शिक्षक अध्यापन सोडून माहितीच्या गुंत्यात

**शिक्षण विभागाकडून दररोज नवनवीन परिपत्रके काढून, वेगवेगळी माहिती मागवली जात असल्याने, शिक्षक वर्ग अध्यापन कार्याकडे कमी आणि माहिती देण्याच्या कामातच जास्त गुंतला आहे. या 'सावळ्या गोंधळात' शिक्षक मानसिक तणावाखाली असून, याचा थेट परिणाम शिक्षणाच्या दर्जावर होत आहे. या अशा तुघलकी परीक्षा बंद कराव्यात, अशी मागणी आता पालक वर्गातूनही होत आहे.**

# जागतिक आदिवासी दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

## 9 आणि 10 ऑगस्टला होणार सोहळा

**यवतमाळ, दि. ७ प्रतिनिधी**



जागतिक आदिवासी दिनानिमित्त यवतमाळात ९ आणि १० ऑगस्ट रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये भव्य मोटारसायकल रॅली, आरोग्य शिबिर, गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा आणि समाज प्रबोधन कार्यक्रमाचा समावेश आहे, अशी माहिती उत्सव समितीने दिली.

९ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता वाघापूर येथील क्रांतिकारक गोंडराजे बाबुराव शेडमाके चौकातून भव्य मोटारसायकल रॅलीला सुरुवात होईल. तर, १० ऑगस्ट रोजी सहकार भवनात सकाळी ९ ते ११ या वेळेत आरोग्य शिबिर होणार असून, याचे उद्घाटन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले करतील. त्यानंतर सकाळी ११ वाजता गुणवंत विद्यार्थी सत्कार आणि समाज प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते होईल आणि अध्यक्षस्थानी ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉइज फेडरेशनचे उपाध्यक्ष गुलाबराव कुडमेथे असतील. कार्यक्रमाला खासदार संजय देशमुख, आमदार बाळासाहेब मांगुळकर, आमदार राजू तोडसाम, माजी मंत्री शिवाजीराव मोघे, वसंतराव पुरके यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन उत्सव समितीचे अध्यक्ष गुलाबराव कुडमेथे, सचिव दिलीपराव मसराम आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले आहे.

# महापुरुषांचे गुण आत्मसात करून समाजविकास साधा

## प्राचार्य डॉ. श्रीकांत पर्बत यांचे प्रतिपादन

**यवतमाळ, दि. ७ प्रतिनिधी**




स्थानिक दाते अध्यापक पदविका प्रशिक्षण महाविद्यालयात (डी.एड. कॉलेज) लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती संयुक्तपणे साजरी करण्यात आली. 'महापुरुषांचे गुण भावी शिक्षकांनी आत्मसात करावेत, असे आवाहन यावेळी मान्यवरांनी केले.

प्राचार्य डॉ. श्रीकांत पर्बत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला प्रमुख वक्त्या म्हणून प्रा. डॉ. नीता देवतळे उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात पसायदानाने आणि प्रतिमा पूजनाने झाली. यावेळी छात्रध्यापक प्रथमेश कात्रे, मनस्वी डंभारे, रागिणी कांबळे आणि प्राची खडके यांनी आपल्या भाषणातून दोन्ही महापुरुषांच्या कार्यावर प्रकाश टाकला. प्रमुख वक्त्या डॉ. देवतळे यांनी, 'टिळक आणि साठे यांच्या जीवनातील उदाहरणांतून त्यांचे गुण आपण आत्मसात करून विद्यार्थ्यांमध्ये रुजवावेत,' असे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. पर्बत म्हणाले, 'या महापुरुषांचे कार्य अजरामर असून, त्यांच्या जीवनावरील पुस्तके वाचून आपण समाज विकासासाठी योगदान देऊ शकतो.' कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनश्री मुखरे, प्रास्ताविक स्वाती करपाते, परिचय साक्षी गेडाम तर आभार अखलाक सिद्दिकी यांनी मानले. यशस्वीतेसाठी कल्याणी होले, वर्षा भड, ईश्वरी पोटे, वैष्णवी गुल्हाणे, आचल उभाड, प्रिया वाघाडे, साक्षी सर्जेराव व माधुरी राठोड यांनी परिश्रम घेतले.

# शालेय क्रीडा स्पर्धेत विद्यार्थ्यांना मिळाले छत

## 'अजिंक्य भारत'च्या वृत्ताचा दणका, उन्हात खेळणा-या खेळाडूंची बातमी होताच आयोजक जागे

**आर्णी, दि. ७ प्रतिनिधी**



अजिंक्य भारत IMPACT


अजिंक्य भारत

शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये नियोजनाचा बोजवारा

चिमुकले खेळाडू तळपत्या उन्हात खेळले कबड्डी, 'खेळा'च्या नावाखाली विद्यार्थ्यांचे हाल

येथील शालेय क्रिडा स्पर्धेदरम्यान नियोजनाअभावी विद्यार्थ्यांना उन्हात खेळावे लागत असल्याच्या 'अजिंक्य भारत'च्या वृत्ताची आयोजकांनी तात्काळ दखल घेतली आहे. बातमी प्रसिद्ध होताच खडबडून जागे झालेल्या आयोजकांनी दुसऱ्याच दिवशी खेळाडूंसाठी मंडप आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली, ज्यामुळे खेळाडू आणि शिक्षकांनी सुटकेचा निःश्वास सोडत 'अजिंक्य भारत' वृत्तसमुहाचे आभार मानले.

स्थानिक क्रिडा संकुलात १७ वर्षांखालील मुला-मुलींच्या शालेय कबड्डी स्पर्धा सुरू झाल्या आहेत. मात्र, स्पर्धेच्या पहिल्या दिवशी आयोजकांनी खेळाडूंसाठी कोणतीही व्यवस्था केली नव्हती. खेळाडूंना भर उन्हात कबड्डी खेळावी लागत असल्याने त्यांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. या नियोजनाच्या बोजवाऱ्यावर 'अजिंक्य भारत'ने शालेय क्रिडा स्पर्धकांना आयोजनाचा बोजवारा या मथळ्याखाली वृत्त प्रकाशित केले होते. या वृत्ताने आयोजकांचे धाबे दणाणले आणि त्यांनी तात्काळ उपाययोजना केल्या. स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी, बुधवारी (दि. ६) क्रिडा मैदानावरील कबड्डीच्या चटईवर ग्रीन नेटचा मंडप टाकण्यात आला आणि खेळाडूंसाठी पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली. या व्यवस्थेमुळे खेळाडूंमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. एका बातमीमुळे खेळाडूंची गैरसोय दूर झाल्याने, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी 'अजिंक्य भारत'चे आभार व्यक्त केले.

# राज्यस्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी निवड चाचणी

## नेहरू स्टेडियमवर होणार आयोजन

**यवतमाळ, दि. ७ प्रतिनिधी**

महाराष्ट्र ॲथलेटिक्स संघटनेच्या राज्यस्तरीय ज्युनियर अजिंक्यपद स्पर्धेसाठी यवतमाळ जिल्हा निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. ११ आणि १७ ऑगस्टपासून दोन टप्प्यांत होणाऱ्या या स्पर्धेतून गुणवंत खेळाडूंची निवड राज्यासाठी केली जाईल. जिल्हा क्रीडा संकुलातील नेहरू स्टेडियमवर ही स्पर्धा पार पडेल.

यवतमाळ जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेच्या वतीने ही जिल्हास्तरीय अजिंक्यपद स्पर्धा व निवड चाचणी आयोजित करण्यात आली आहे. १४ व १६ वर्षांखालील मुला-मुलींची स्पर्धा ११ आणि १२ ऑगस्ट रोजी, तर १८ व २० वर्षांखालील मुला-मुलींची स्पर्धा १७ आणि १८ ऑगस्ट रोजी जिल्हा क्रीडा संकुलातील नेहरू स्टेडियमच्या सिंथेटिक ट्रॅकवर सकाळी दहा वाजता होईल. यामध्ये १०० मीटर ते १०००० मीटर धावणे, थाळीफेक, गोळाफेक, भालाफेक, लांब उडी, उंच उडी, तिहेरी उडी आणि रिले या क्रीडा प्रकारांचा समावेश आहे. प्रत्येक गटातील प्रथम व द्वितीय क्रमांकाच्या खेळाडूंना राज्यस्तरीय स्पर्धेत यवतमाळ जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळेल. इच्छुक खेळाडूंनी आधार कार्ड आणि दोन पासपोर्ट फोटोसह उपस्थित राहावे. अधिक माहितीसाठी सचिव प्रा. प्रेमेंद्र रामपूरकर, प्राचार्य संदीप चावक, अजय मिरकुटे, अमित गुरव, जितेंद्र सातपुते आणि कोमलसिंग यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन अध्यक्ष विजय संतान आणि राजू जॉन यांनी केले आहे.

# आर्णी येथील सह दुय्यम निबंधक कार्यालयात वृक्षारोपण

**आर्णी, दि. ७ प्रतिनिधी**



आर्णी येथील सह दुय्यम निबंधक कार्यालयात 'झाडे लावा, झाडे जगवा' अभियानांतर्गत वृक्षारोपण करण्यात आले. सह दुय्यम निबंधक अविनाश कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून पर्यावरण संवर्धनाचा संकल्प केला.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि भावी पिढीला शुद्ध हवा मिळावी, या उदात्त हेतूने सह दुय्यम निबंधक कार्यालय आर्णी येथे हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यालयाच्या आवारात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सह दुय्यम निबंधक अविनाश कांबळे होते. त्यांच्यासोबत कनिष्ठ लिपिक नयन राठोड, प्रवीण मुंगीनवार, विजय तायडे, देवेंद्र बर्डे, सलीम शेख, नारायण शिंदे, अभिषेक चाकेवाड, लव राजपूल्लू, अशोक हिरास, मनोज तायडे, अतुल मुंगिनवार, शौकत काका, शुद्धधन खाडे आणि खुशाल ठाकरे यांच्यासह कार्यालयातील सर्व कर्मचारी व नागरिक उपस्थित होते. प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी घ्यावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले. शासकीय कार्यालयाने राबवलेल्या या पर्यावरणपूरक उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. या कार्यक्रमामुळे कार्यालयाच्या परिसरात हिरवाई वाढण्यास मदत होणार असून, इतरांसाठीही हा एक प्रेरणादायी उपक्रम ठरला आहे.

# शिवाजी महाराज राजस्व अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## एकाच छताखाली नागरिकांच्या समस्या निकाली



**राळेगाव, दि. ७ प्रतिनिधी**

'महसूल सप्ताह' निमित्ताने राळेगाव तालुक्यात आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियाना'ला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तालुक्यातील सातही महसूल मंडळांमध्ये एकाच दिवशी शिबिरे घेऊन, विविध शासकीय योजनांचा लाभ आणि प्रमाणपत्रे नागरिकांना देण्यात आली. प्रशासनाच्या या लोकाभिमुख उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

राज्य शासनाच्या आदेशानुसार, 'महसूल दिन' आणि 'महसूल सप्ताह' निमित्ताने, राळेगाव महसूल विभागाने सोमवारी (दि. ४) तालुक्यातील राळेगाव, धानोरा, वडकी, वाढोणा बाजार, वरध, झाडगाव आणि किन्ही जवादे या सातही मंडळांमध्ये 'शिवाजी महाराज महाराजस्व शिबिरांचे' आयोजन केले होते. या शिबिरांना स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, तहसीलदार अमित भोईटे, सहायक गटविकास अधिकारी भारती ईसळ, भूमी अभिलेख उपअधीक्षक भारत गवई आणि तालुका कृषी अधिकारी सुहास बेंडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. "नागरिकांच्या सक्रिय सहभागामुळे प्रशासनाच्या लोकाभिमुखतेचा आणि परस्पर सहयोगाचा प्रेरणादायी अनुभव साकार झाला," असे निवासी नायब तहसीलदार नरेंद्र हलामी यांनी सांगितले. या शिबिरांमध्ये पंचायत समिती, कृषी विभाग, पशुसंवर्धन, बांधकाम, शिक्षण, आरोग्य, महावितरण, आधार केंद्र, निवडणूक विभाग, पुरवठा विभाग, संगायो, सेतू सुविधा केंद्र, सेंट्रल बँक आणि एकात्मिक बाल विकास योजना या विभागांनी स्वतंत्र स्टॉल्स उभारले होते. यामुळे नागरिकांना विविध योजनांची माहिती आणि सेवा एकाच ठिकाणी मिळाल्याने, त्यांची मोठी सोय झाली.

### नागरिकांना मिळाला थेट लाभ

**या शिबिरांमध्ये विविध योजनांचे लाभ थेट नागरिकांपर्यंत पोहोचवण्यात आले. यामध्ये संकटग्रस्त शेतकरी योजनेतील ५ लाभार्थी, संजय गांधी निराधार योजनेतील २० लाभार्थी, २० नवीन रेशन कार्ड, तर ३७ शेतकऱ्यांना पीक संरक्षणासाठी घडीपत्रिकांचे वाटप करण्यात आले. तसेच, महसूल विभागाकडून जात, उत्पन्न, नॉन-क्रिमिलेअर, ऐपत आणि अधिवास प्रमाणपत्रांचेही वाटप करण्यात आले.**

**प्रतिष्ठापना** — आज भव्य सोहळा, बौद्ध चळवळीच्या परंपरेला अनोखा सन्मान

# थायलंडहून आलेल्या बुद्धमूर्तीने केळझरा गाव सजले

**आर्णी, दि. ७ प्रतिनिधी**

**आर्णी तालुक्यातील बौद्ध चळवळीचे केंद्र असलेल्या केळझरा (वरठी) येथील श्रावस्ती बुद्ध विहारात, थायलंडहून दान म्हणून प्राप्त झालेल्या भव्य बुद्धमूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. येत्या शुक्रवारी (दि. ८) दुपारी २ वाजता होणाऱ्या या ऐतिहासिक सोहळ्यासाठी जय्यत तयारी सुरू असून, हजारो भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.**



सावळी सदोबा-आर्णी तालुक्यातील चळवळीच्या परंपरेसाठी ओळखल्या जाणाऱ्या केळझरा गावात, शुक्रवार, दिनांक ८ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता हा भव्य मूर्ती प्रतिष्ठापना सोहळा संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाला भदन्त राहुल थेरो (यवतमाळ), भदन्त सुमंगल थेरो (नागपूर), भदन्त अश्वजीत (यवतमाळ), भदन्त जीवक (यवतमाळ), भदन्त धम्मानंद (यवतमाळ), आर्या विशाखा भिख्युनी (घाटंजी), आर्या आर्यशीला भिख्युनी (नांदेड), आर्या सुकेशनी भिख्युनी (राळेगाव), भदन्त सिद्धार्थ बोधी (चंद्रपूर), भदन्त शीलबोधी (चंद्रपूर), भदन्त देवदत्त (चंद्रपूर) आणि भदन्त सुमंगल (उमरगा, कर्नाटक) या भिक्खू संघांची आणि भिक्खुनी संघांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तसेच, कार्यक्रमाचे मुख्य पाहुणे म्हणून नागपूर येथील मूल परिणय बुद्धिस्ट सेमिनारचे आचार्य महानागरत्नजी आणि आर्णीचे तहसीलदार वैशाख वाहूरवाघ उपस्थित राहणार आहेत. हा सोहळा केवळ मूर्ती स्थापनाच नसून, गावाच्या बौद्धिक आणि सांस्कृतिक वारशाचा सन्मान आहे. सर्व भाविकांनी या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन विशाखा महिला मंडळ आणि समस्त गावकऱ्यांनी केले आहे.

### या सर्वांचे लाभले मोलाचे योगदान

**या बुद्धमूर्ती स्थापनेसाठी विजय भगत, नरेंद्र खरतडे, अरुण शिवणकर, हरिभाऊ लोखंडे, गौतम मनवर, मधुकर खरतडे, श्रीराम गजघाटे, पद्माकर गजघाटे, पंजाब शिवणकर, नागोराव मानकर, नरेंद्र गजघाटे, राहुल नगराळे, धम्मदीप भगत, विकी खडतडे, संतोष धोंगडे आणि अक्षय भगत, संतोष भगत यांच्यासह समस्त केळझरकर यांचे विशेष योगदान लाभले आहे. त्यांच्या अथक परिश्रमामुळेच हा ऐतिहासिक सोहळा साकार होत आहे.**

### परंपरेला थायलंडहून 'दान'

**केळझरा हे गाव बौद्ध चळवळीच्या कार्यासाठी नेहमीच अग्रगण्य राहिले आहे. येथील श्रावस्ती बुद्ध विहार हे अनेक वर्षांपासून गावकऱ्यांचे प्रेरणास्थान आहे. गावकऱ्यांनी बौद्ध विचारांचा प्रसार आणि संवर्धन करून एक आदर्श निर्माण केला आहे. याच कार्याची दखल घेऊन, थायलंड येथून विशेष दान म्हणून ही भव्य बुद्धमूर्ती गावाला प्राप्त झाली आहे. हा केवळ गावाचाच नव्हे, तर संपूर्ण परिसरातील बौद्ध चळवळीचा मोठा सन्मान मानला जात आहे.**